सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

# 2012-2013

# लेखापरिक्षण अहवाल

**उपसंचालक(म.न.पा.ले.प.)**

**स्थानिक निधी लेखापरिक्षा,**

**उपविभाग-3 औरंगाबाद.**

Scanned by CamScanner

# चंद्रपुर महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2012-2013

उप संचालक,(मनपा लेप) विभाग - 3, स्थानिक निधी लेखापरिक्षा, औरंगाबाद

लेखा कोष भवन, तिसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालया जवळ

Scanned by CamScanner

# अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे चंद्रपुर महानगरपालिका यांनी 2012-2013 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

Scanned by CamScanner

# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर जि. चंद्रपूर
# सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचा
# लेखापरीक्षण अहवाल

---

जा.क्र.स्था-18/ब/म.न.पा.चंद्रपूर/अहवाल/12-13/ 732 दि. 22 DEC 2015.
कार्यालय

उप संचालक (म.न.पा.ले.प.)
स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद
उपविभाग क्र. 3 यांचे कार्यालय,
3 रा मजला, लेखा कोष भवन, औरंगाबाद.

प्रति,
मा. आयुक्त,
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
जिल्हा चंद्रपूर

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर सन 2012-2013 चे लेखापरीक्षण श्री. बी.एन.काळपांडे, लेखापरीक्षा अधिकारी यांच्या पथकाने दिनांक 16/03/2015 ते 24/09/2015 या कालावधीत पुर्ण केले. सदर लेखापरीक्षण अहवालावर श्रीमती रेहाना काझी, उपसंचालक (म.न.पा.ले.प), स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद यांनी दि. 10.12.2015 रोजी मा.आयुक्त महानगरपालिका,चंद्रपुर यांचे समवेत चर्चा करुन अहवालाचे अंतिमीकरण केले.लेखापरिक्षण कालावधीमध्ये खालील पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पाहत होते.

| अ.क्र. | नाव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | श्री.एन.बी.वटी | प्रशासक | 01/04/2012 ते 29/04/2012 |
| | सौ.संगीताबाई अमृतकर | महापौर | 30/04/2012 ते 31/03/2013 |
| 2 | श्री.एन.बी.वटी | आयुक्त | 30/04/2012 ते 31/05/2012 |
| | श्री.सी.एस.डहाळकर | आयुक्त | 01/06/2012 ते 07/06/2012 |
| | श्री प्रकाशराव बोखड | आयुक्त | 08/06/2012 ते 31/03/2013 |

Scanned by CamScanner

# प्रस्तावणा

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व राष्ट्रीय लेखा संहीता नुसार विसंगत बाबी चा सारांश**

चंद्रपूर महानगरपालिकेचे सन 2012-13 चे लेखापरीक्षण विहित श्रमदिनात पूर्ण केले असून याकामी महानगरपालिकेच्या संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्यामुळे 109 अर्धसमास पत्रांपैकी संपूर्ण म्हणजे 109 अर्धसमास बहुतांशी पूर्तता होवून उत्तर प्राप्त झाल्याने लेखाआक्षेप घेतांना बऱ्याचश्या बाबी टाळता आलेल्या आहेत. तसेच महानगरपालिकेने एकूण रुपये 18,00,14,273/- अंदाजपत्रकापेक्षा प्रत्यक्ष जादा रकमा प्राप्त केलेल्या आहेत. ही बाब मा. आयुक्त, वित्त विभाग यांच्या प्रयत्नामुळे शक्य झाले आहे. त्यामुळे ही बाब निश्चितच प्रशंसनीय आहे. मात्र कराची रुपये 34407695/- व दुकान गाळे रुपये 8372168/- अशी एकूण रुपये 42779863/- वसुली न झालेली रक्कम फार मोठ्या प्रमाणात असल्याने महानगरपालिकेने नीती आणि कार्य ह्या मध्ये बदल घडविण्याची नितांत गरज आहे, जेणेकरून प्रत्यक्ष वर्तविलेला अंदाज हा भविष्यात वस्तुनिष्ठ स्वरूपाचा राहून महानगरपालिकेला विकासात्मक कामे करण्यास पुरेसा निधी उपलब्ध होईल.

सन 2012-13 च्या लेखापरिक्षणातील लेखाआक्षेपाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने जवळपास 9 वर्ष हा फार मोठा कालावधी उलटूनही व्दिनोंद पद्धतीचा अवलंब केलेला नसून राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियम पुस्तिकानुसार विहित नोंदवह्या ठेवलेल्या नाहीत. याबाबत महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम 94 नुसार कार्यवाही केलेली आहे. मात्र वार्षिक लेखे व इतर नोंदवह्या नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 60 नुसार नमुना क्रमांक 28 मध्ये ठेवलेल्या आहे निश्चितच ही बाब शासन निर्देशाचे पालन करणारी नसल्याचे दिसून आले आहे.

तसेच जाहिराती, झेरॉक्स, प्रवास भत्ता, मा, उपायुक्तांचे निवास स्थान, सीम कार्ड, कोर्ट केसेस, इंधन व वाहन दुरुस्ती, स्वच्छता, विद्युत कामे, दैनदिन्यांची जादा छपाई, टाकाऊ वस्तू संकलन, मानवी मजूर पुरविण्याचे कंत्राट, पुस्तके खरेदी इत्यादीवर नियमबाह्य प्रदान झाल्याने महानगरपालिकेची हानी झाल्याचे दिसून आले.

तसेच प्रमाणकावर अचूक लेखाशीर्षक नमूद नसणे, धनादेश अनादरीत होणे, शासकीय वसुलीच्या रकमा विहित कालावधीत भरणा न करणे, मालमत्ता कराच्या नोंदवह्या अद्यायावत नसणे, अनुदान नोंदवही अद्यायावत नसणे, हुतात्मा स्मारक देखभाल व दुरुस्ती बाबत निधी खर्च न करणे, थकीत लेखाआक्षेपाचे अनुपालन विहित कालावधीत न करणे, अपंग, महिला व बालकल्याण आणि अनुसूचित जाती व जमाती यांचे वैयक्तिक लाभाच्या योजनाबाबत विहित टक्केवारीनुसार खर्च न करणे, रु.1000/- वरील प्रदाने EFT द्वारा न करणे, प्राथमिक शाळांना मिळणारे शालेय पोषण आहार अनुदान मनपा निधीत जमा न करणे, दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्राप्त अनुदानाचा दुरुपयोग करणे, ई-निविदा पद्धतीचा अवलंब न करणे, बांधकामे प्रदीर्घ कालावधीपासून अपूर्ण ठेवणे, कंत्राटदाराच्या बिलावरून मोजमाप पुस्तिकेत नोंदी घेणे, मोजमाप पुस्तकात आवश्यक नोंदी नसणे, कामाचा व कामगाराचा विमा शासकीय विमा निधीकडे न उतरविणे, आगप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना न करणे आणि महानगरपालिका चंद्रपूरअंतर्गत आरोग्य विभागातील कर्मचारी व अधिकाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीचा लाभ न देणे इत्यादी या गंभीर स्वरूपाच्या बाबी दिसून आल्या आहे त्यामुळे प्रशासनाने आणि मा. आयुक्त यांनी ह्या लेखापरीक्षण अहवालाचे सूक्ष्म निरीक्षण करून महानगरपालिका चंद्रपूरचे कार्यालयीन कामकाजात सुधारणा होण्यासाठी अथक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

Scanned by CamScanner

**सन 2012-13 मधील निवडक लेखाआक्षेपाचा संक्षिप्त तपशील**

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | परिच्छेद विवरण |
|---|---|---|
| 1 | परी.क्र. 5 | जाहिरात अधिक आकारमानाची दिल्यामुळे जादा खर्च आला आहे. वसुली रु. 9141 |
| 2 | परी.क्र. 44 | प्रमाणकावर लेखाशिर्ष, लेखासंकेतांक, अंदाजपत्रकीय तरतूद व चढत्या क्रमांकाची बेरीज ई. बाबी नमूद नसल्याने खर्च प्रमाणकांची खात्री झालेली नाही.अक्षेपित रु. 948048176 |
| 3 | परी.क्र. 7 | DCPS च्या रक्कमा ओरिएटल बँक ऑफ कॉमर्स शाखा चंद्रपूर येथे बचत खात्यात गुंतविल्यामुळे त्यावर 4% व्याज मनपा ला प्राप्त झाले असून सन 2012-13 चा शासकीय व्याजदर 8.8% कर्मचाऱ्याना द्यावयाचा असल्याने रु. 86584/- एवढया रक्कमेचा मनपा ला आर्थिक बोजा पडलेला आहे. |
| 4 | परी.क्र. 27 | उपायुक्त यांना शासननिर्णयापेक्षा जादा दराने घरभाडे देण्यात आल्याने जादा प्रदानाची रक्कम रु. 120240/- वसूल होणे आवश्यक आहे. |
| 5 | परी.क्र. 10 | गैरहजर कर्मचाऱ्यांच्या रजेच्या नोंदी सेवापुस्तकात घेण्यात आल्या नाहीत. तसेच विनापरवानगी गैरहजर कर्मचाऱ्यांना रु. 500 व 1000 दंड नियमबह्यपणे आकारला आहे. |
| 6 | परी.क्र. 2 | द्विनोंद पध्दतीचे लेखे व नोंदवह्या ठेवण्यात आलेल्या नाहीत. |
| 7 | परी.क्र. 25 | प्राथमिक शाळांना मिळालेले अनुदान मनपा निधीमध्ये जमा न करता शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद चंद्रपुर यांचे कडून परस्पर शाळांना पाठविल्या जात असल्याने मनपा अंतर्गत सदर शाळा असल्याने सदर शाळांना मनपा निधी मार्फतच अनुदानाचे वाटप होणे आवश्यक आहे. |
| 8 | परी.क्र. 30 | अपंग, महिला व बालकल्याण व अनुसूचित जाती/जमाती मधील लाभार्थ्यांना मनपा ने स्वउत्पन्नातून विहित टक्केवारीने खर्च करून लाभ देण्यात आलेला नसल्याने अनेक लाभार्थी लाभापासून वंचित राहिले आहे. |
| 9 | परी.क्र. 68 | शासकीय वस्तूंचे देखभाल व दुरुस्तीवर शासनाने निर्देश देऊनही खर्च केला नाही. त्यामुळे हुतात्मा स्मारकाची दुर्दशा झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. |
| 10 | परी.क्र. 50 | न.प. चंद्रपूर चे 1454 व महानगरपालिका चंद्रपूर चे 83 असे एकूण 1537 लेखा आक्षेप प्रलंबित आहेत. ले.प. अहवाल मिळाल्यापासून 4 महिन्याचे आत कार्यवाही करावयाची होती. |
| 11 | परी.क्र. 62 | महानगरपालिका अंतर्गत असलेल्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्याना 6 व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीचा लाभ दिला नसल्याने सदरील कर्मचाऱ्यांना असुधारीत वेतनश्रेणीद्वारे वेतन दिल्या जात असल्याचे दिसून आले. |
| 12 | परी.क्र. 18 | कंत्राटदराने सादर केलेल्या विद्युत कामाची बिले जशीच्या तशीच मोजमाप |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | पुस्तिकांत नोंदविलेली आहेत. मोजमाप पुस्तिकांत शाखा अभियंता, सहाय्यक अभियंता, कार्यकारी अभियंता यांनी मोजमापे व मुल्यांकन नोंदवून त्याची रीतसर पडताळणी केल्यानंतरच कंत्राटदारांना प्रदाने करावयाचे असताना श्री. काळे विदूत निरीक्षक ह्यांनी मोजमाप पुस्तिकांत कंत्राटदाराच्या विनंतीवरून नोंदी घेऊन कंत्राटदारास प्रदान केले असल्याने सदर प्रदानामध्ये महानगरपालिकेची हानी झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे नियमबाह्यपणे नोंदविलेल्या आणि कामाची तपासणी न करताच प्रदान केलेली रक्कम रु. 20,09,921/- वसूल करण्यात यावी. |
| 13 | परी.क्र. 36 | ई-निविदा पद्धतीचा अवलंब केला नाही. आक्षेपित रक्कम रु. 2,37,98,002/-. |
| 14 | परी.क्र. 41 | प्राप्त निविदा धारकाएवजी इतरांना नियमबाह्यपणे कंत्राट दिलेला आहे. त्यामुळे प्रदानाची रक्कम रु. 253838/- वसुलपात्र आहे. |
| 15 | परी.क्र. 21 | मुल्यवर्धीत कराची रक्कम एकूण प्रदानाच्या 5% नोंदणीकृत नसलेल्या कंत्राटदाराकडून वसूल करावयाची असताना एकूण रु. 218077/- कमी वसुली केली आहे. |
| 16 | परी.क्र. 22 | कंत्राटी कामे व कामगारांचा विमा शासकीय विमा निधी कडे उतरविण्यात आलेला नाही. त्यामुळे शासकीय विमा निधी कडे भरणा करावयाची रक्कम 218077 वसूल करून विमा निधी कडे भरणा करावी. |
| 17 | परी.क्र. 26 | हातगाडया कंत्राटदरानी स्वत:च्या वापरण्याबाबत निविदा सूचना प्रसिध्द केल्या होत्या. तरीसुद्धा मनपा ने हातगाडया खरेदी करून विनाशुल्क दिल्या आहेत. त्यामुळे मनपा चा निष्फळ खर्च झाला आहे.त्यामुळे 760775 कंत्राटदराकडून वसूल करणे आवश्यक आहे. |
| 18 | परी.क्र. 63 | आग प्रतीबंधक व जीवनसंरक्षक उपाययोजना मनपा ने त्यांचे अधिनस्त संपूर्ण विभागाच्या इमारती मध्ये केल्या नाहीत. भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. |
| 19 | परी.क्र. 37 | सन 2008-09 पासूनचे बांधकाने अपूर्ण आहेत. अक्षेपित रु. 59569492. |
| 20 | परी.क्र. 20 | सन 2007-08 मधील निविदा मंजूर केलेल्या कंत्राटदारांना सन 2012-13 मध्ये विना निविदा नियमबाह्यपणे कंत्राट देण्यात आल्याने रक्कम रु. 248467 वसूल होणे आवश्यक आहे. |

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ....1

I PART I : भाग १ ....2

मागील लेखा परीक्षण अहवाल ....2

PART II ....7

**कलम ९ अ खालील आक्षेप** ....8

1 चंद्रपूर महानगरपालिकेचा अर्थसंकल्प, आर्थिक स्थिती व वार्षिक लेख्यावरील अभिप्राय. ....9

2 दुहेरी नोंद पध्दती अभिलेख्यातील अनियमितता ....13

3 अग्रिमाची रक्कम वसुल न करण्याची अनियमितता ....15

4 सेवापुस्तकातील अनियमितेबाबत. ....16

5 वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीवर झालेल्या नियमबाहय खर्चाबाबत. ....22

6 झेरॉक्स बाबत झालेल्या अनियमिततेबाबत. ....25

7 परिभाषित अंशदान निवृती वेतन योजनेमधील नियमबाहय अनियमितता ....28

8 श्री. महेन्द्र बब्बुजी हजारे, आरोग्य निरीक्षक यांचे चुकीचे वेतननिश्चितीबाबत ....30

9 विमानाने केलेल्या नियमबाहय प्रवासाबाबत. ....32

10 रजेवर/गैरहजर असलेल्या कर्मचा-यांची नोंद सेवा पुस्तकात घेतल्या जात नसल्याबाबत. ....35

11 श्री. श्रीहरी शंकर बनकर, वरिष्ठ लिपिक यांना नियमबाह्य वेतनवाढी मंजूर करण्यात आल्यामुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत ....36

12 दैनंदिनी छपाईकरीता महानगरपालिका निधीची हानी करण्याची अनियमितता ....37

13 किटकनाशक व जंतूनाशक व क्लोरीन खरेदीतील अनियमितता ....38

14 करवसुलीची उददिष्टपुर्ती अवैधरीत्या दर्शविण्याची अनियमितता ....40

15 म.न.पा.चे मालकीची व भाडेपट्टेवर दिलेल्या इमारत/गाळे यांचे भाडे व मालमत्ताकर थकबाकीबाबत. ....42

16 दुकान/गाळ्यांचा योग्य विनियोग न करण्याची अनियमितता. ....43

17 प्राथमिक शाळेच्या अभिलेख्यातील नियमबाहयता ....44

18 कंत्राटदाराची बिले मोजमाप पुस्तकात उतरवून प्रदान केल्याची अनियमितता. ....46

19 बैल बाजार परिसरात झरपट नदीवर आंघोळीचे ओटे बांधकामाचे अभिलेख्यामधे खाडातोड करण्याची अनियमितता. ....49

20 सन 2007-08 मधे निविदा मंजूर केलेल्या कंत्राटदारांनाच सन 2012-13 मधे कार्यारंभ आदेश देण्याची अनियमितता ....50

21 महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियमाचे विसंगत वसुलीमुळे शासन महसूल हानीची अनियमितता. ....52

22 कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविण्यात आला नसल्याची अनियमितता. ....57


Scanned by CamScanner

**कलम ९ ब खालील आक्षेप** ........ 60

23 प्रवास भत्यातील तिकीटाचे नियमबाहयरित्या जादा दराने शोधन केल्याबाबत. ........ 61

24 रूपये 1000 वरील रकमांचे प्रदान रोखपालाने रोखीने केल्याची अनियमितता ........ 62

25 प्राथमिक शाळांना मिळणारे अनुदान महानगरपालिका निधीत जमा न करण्याची अनियमितता ........ 63

26 हातगाडया खरेदीवरील निष्फळ खर्चाबाबत ........ 66

27 उपायुक्त यांना खाजगी निवास भाडयाची रूपये 120240/- जादा प्रदानाबाबत. ........ 68

28 विवाह नोंदणी फी व शास्तीची रक्कम शासकीय कोषागाराकडे भरणा करण्याची कार्यवाही होत नसल्याबाबत. 70

29 ग्रंथालय विभागातील पुस्तक खरेदीतील अनियमितता. ........ 70

30 अपंग, महीला व बालक आणि अनु. जाती व अनु. जमातीकरीता विहीत प्रमाणात खर्च न करण्याची अनियमितता ........ 72

31 महानगरपालिका कार्यालयाबाहेर रकमांचे प्रदान नियमबाहयपणे रोखीने करण्याची अनियमितता ........ 73

32 पशुंची तपासणी न करताच पशुवध फी वसुल करण्याची अनियमितता ........ 74

33 प्रवास भत्ता अनुज्ञेय नसलेल्या श्रेणीतुन केल्यामुळे झालेल्या जादा प्रदानाबाबत. ........ 75

34 मालमत्ता व इतर कराची थकीत रकमांची नोंद सन 2012-13 मधील मागणी नोंदवही मध्ये न घेतल्याची अनियमितता. ........ 77

35 म.न.पा. तील स्वच्छता विभागाचे कचरा गोळा करण्याचे कंटेनर दुरुस्तीमधील अनियमितता. ........ 81

36 ई. निविदा पद्धतीशिवाय बांधकामे करण्याची अनियमितता. ........ 83

37 बांधकामे अपूर्ण असण्याची अनियमितता ........ 85

38 बाबूपेठ वार्ड येथील महर्षी कर्वे शाळेतील वालकंपाउंड चे बांधकाम अभिलेख्यातील अनियमितता. ........ 86

39 अनुदानित रक्कमांचा दुरुपयोग करण्याची अनियमितता. ........ 88

40 कोहिनूर स्टेडीअम येथे वालकंपाउंड उंची वाढविणे प्रदानामधील अनियमितता. ........ 91

41 प्राप्त निविदा धारकांएवजी इतरांना कामाचे कंत्राट देण्याची अनियमितता. ........ 92

42 मानवी मजूर पुरविण्याबाबतचे कंत्राट नियमबाहयपणे देण्यात आल्याची अनियमितता ........ 94

43 टाकाऊ वस्तू संतुलन कंत्राटातील अनियमिततेमुळे महानगरपालिकेच्या झालेल्या हानीबाबतची अनियमितता. 96

**कलम ९ क खालील आक्षेप** ........ 99

—————— निरंक —————— ........ 100

**कलम ९ ड खालील आक्षेप** ........ 102

44 प्रमाणणकार लेखाशिर्ष, लेखासंकेतांक, अंदाजपत्रकीय तरतुद व चढत्या क्रमांकाची बेरीज नमुद नसतांना रकमेची अदाई करण्याची अनियमितता ........ 103

45 कर विभागातील जमा रकमाच्या विवरणपत्राची पडताळणी करणेबाबत. ........ 104

Scanned by CamScanner

46 सेवानिवृत होणा-या कर्मचा-याच्या वेतनातुन 3 महिने आधी भविष्य निर्वाह निधी वर्गणीची रक्कम कपात न करण्याबाबत. ....105

47 वेतन राखीव निधीमधील अनियमितता. ....107

48 अनुदान नोंदवही अपुर्ण असणेबाबत. ....108

49 रोख पुस्तकामधील अनियमितता. ....109

50 लेखापरीक्षण अहवालातील लेखाआक्षेपाबाबत विहीत मुदतीत कार्यवाही केली नसल्याची अनियमितता ....110

51 प्राथमिक शाळाच्या अभिलेख्यात आढळून आलेल्या नियमबाहयता. ....111

52 नियम, अधिनियम व शासन निर्णयानुसार प्रदान रकमाबाबत कार्यवाही केली नसल्याची अनियमितता ....113

53 मालमत्ता कर विभागातील झालेल्या अनियमितेबाबत. ....114

54 जन्म व मृत्यू विभागातील जमा रकमांच्या अभिलेख्यातील अनियमिततेबाबत. ....115

55 चंद्रपूर शहर महानगरपालिका येथील स्थानिक संस्था कर (LBT) वसुली बाबत ....117

56 स्थानिक संस्था कराच्या (LBT) बँकेत जमा रकमेशी ताळमेळाबाबत ....118

57 बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदार यांचेकडून स्थानिक संस्था कराची आकारणी व वसुलीबाबत ....120

58 श्री. भुपेश बाबुरावजी गोठे, आरोग्य निरीक्षक यांचे पदोन्नतीचे वेळी केलेल्या चुकीचे वेतननिश्चितीबाबत ..121

59 श्री. नामदेव राउत यांच्या सेवापुस्तकामध्ये आढळुन आलेल्या अनियमितता बाबत ....123

60 मनपा अधिकारी व कर्मचा-यांना मोबाईल सिम कार्ड पुरवुन मासिक बिलाचे शोधन करण्याबाबत. ....125

61 चंद्रपूर शहर महानगरपालिका येथील स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून प्राप्त विवरणपत्राबाबत. 127

62 आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीमधील अनियमिततेबाबत. ....129

63 आगप्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजना केली नसल्याची अनियमितता. ....130

64 आरोग्य विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन श्रेणीतील कमाल टप्प्यावरील वेतनानंतरच्या वेतनवाढीबाबत. ....131

65 नागरीकांना आरोग्यविषयक सुविधा मिळाल्या नसल्याची अनियमितता ....133

66 मनपा सार्वत्रिक निवडणूक 2012 मध्ये कर्मचारी/अधिकारी मानधन तसेच अतिकालिक भत्ताच्या रकमाच्या प्रदानाच्या अनियमिततेबाबत. ....134

67 श्री.नामदेव राऊत, सहायक ग्रंथपाल यांच्या प्रवास भत्ता देयकातील अनियमिततेबाबत. ....136

68 शासकीय वास्तुंचे देखभाल दुरुस्तीवर मंजूर तरतुद खर्च न करण्याची अनियमितता ....137

69 वृक्ष निधीमधुन ट्रिगार्ड खरेदीमधील नियमबाहय अनियमितता. ....138

70 अनुसुचित जाती व नवबौध्द घटकासाठी घरकुल बांधकामाबाबत. ....141

71 चंद्रपूर विकास योजनेच्या अधिप्रमाणित प्रती तयार करून शासनाकडे पाठविण्याकरीता अग्रीमाची रक्कम रूपये 40000/- नगररचना कार्यालय चंद्रपूर यांना प्रदानाबाबत ....143

72 नगररचना विभागाने जाहिरातीवर केलेल्या नियमबाहय शोधनाबाबत. ....145

73 कोर्ट केसेस प्रकरणात प्रदान रकमेतील अनियमितता. ....147


Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 74 | चंद्रपूर शहर महानगरपालिका येथे विविध विभागात नोंदवह्या न ठेवणेबाबतची अनियमितता. | 151 |
| 75 | एम.एच 34-9889 (स्टाफ कार) मधील इंधन वापराबाबत. | 153 |
| 76 | म.न.पा.तील कार्यरत वाहनांचे इतिहासपत्रकाबाबत (HISTORY SHEET). | 154 |
| 77 | म.न.पा.तील वाहनाकरीता इंधन खरेदी देयके व इंधन वापराबाबत. | 155 |
| 78 | म.न.पा. तील कार्यरत वाहने दुरुस्तीमधील अनियमितता. | 156 |
| 79 | मोजमाप पुस्तकातील अनियमितता. | 158 |
| | लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र | 161 |

विवरणपत्रे व जोडपत्रे ........ 162




Scanned by CamScanner

### विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण

| विभाग | ४अ | ४ब | ४क | ४ड |
|---|---|---|---|---|
| इतर | | 29, 30, 31, 32, 33 | | 66, 67, 68, 69, 70 |
| सामान्य प्रशासन | 5, 6, 7, 8, 9, 10, 11 | 27 | | 58, 59, 60, 61, 62, 63 |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 19, 20, 21, 22 | 36, 37, 38, 39, 40, 41 | | 79 |
| शहर अभियंता आणि विद्युत विभाग | 18 | | | |
| लेखा विभाग | 1, 2, 3, 4 | 23, 24 | | 44, 45, 46, 47, 48, 49, 50 |
| नगर रचना | | | | 71, 72 |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | | | | 55, 56, 57 |
| कर निर्धारण व संकलन | 14, 15, 16 | 34 | | 53 |
| आरोग्य | | 42, 43 | | 64, 65 |
| भूमी व मालमत्ता विभाग | | | | 74 |
| विधी विभाग | | | | 73 |
| भांडार | 12, 13 | 26 | | |
| शिक्षण विभाग किंवा शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ किंवा माध्यमिक शिक्षण | 17 | 25 | | 51, 52 |
| अग्निशमन विभाग | | 35 | | 75, 76, 77, 78 |
| जन्म मृत्यु नोंदणी विभाग | | 28 | | 54 |



Scanned by CamScanner

I Part I : भाग १

*मागील लेखा परीक्षण अहवाल*

## भाग-1

## (मागील लेखापरीक्षण अहवाल)

चंद्रपूर नगरपालिका दिनांक 25/10/2011 पासून चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूर, मध्ये रुपांतरीत झालेली असून मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे संवैधानिक लेखा परीक्षक म्हणून मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम 1930 नुसार घोषित असल्याने, त्यांचे मार्फत नियमित होणारे लेखा परीक्षण महानगरपालिका अस्तीत्वात आल्याने ते संपुष्ठात आले होते. तथापि, मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम 1930 मध्ये सुधारणा होऊन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम 1930 (सुधारणा 2011) अन्वये महानगरपालिका लेखा परीक्षण कामी संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना संवैधानिक लेखा परीक्षक म्हणून मान्यता प्राप्त झाल्याने चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर या स्थानिक स्वराज्य संस्थेचे सन 2011-12 लेखा परीक्षण पूर्ण करण्यात येऊन लेखापरीक्षण अहवाल जा.क्र 344 दिनांक 15.7.2014 ला निर्गमित केलेला आहे.

सन 2011-12 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद.

| परिच्छेद क्र. | विषय |
|---|---|
| 1 | अर्थसंकल्प / आर्थिक स्थिती बाबत. |
| 2 | शासकीय निधीत महानगरपालिका हिस्सा पोटी जमा करावयाची रक्कम शासनाच्याच निधीतून वर्ग करण्याची अनियमितता. |
| 3 | रोजंदारी कर्मचा-यांच्या मजुरी खर्चाची अनियमितता. |
| 4 | पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी यांच्या भ्रमणध्वनी वापराचा मासिक खर्च नियमबाहयपणे मनपा निधीतून करणे बाबत. |
| 5 | विशेष स्वच्छता कर किमान दराने ही आकारणी केलेली नसल्याने होत असलेल्या आर्थिक नुकसानी बाबत. |
| 6 | वृक्ष प्राधिकरणाची स्थापना न करणे बाबत. |
| 7 | जल व मलप्रवाह निधीची स्थापना करणे बाबत. |
| 8 | महाकाली मंदीर वार्ड येथे गौतम नगर एरिया झरपर नदी जवळ 'पे ॲण्ड युज' पध्दतीने शौचालय बांधणे कामातील अनियमितता. |
| 9 | झोन कमांक 1 मध्ये वेगवेगळया वार्डास रोड डांबरीकरण पॅचेस करण्याचे कामातील अनियमितता. |
| 10 | बाजार फी मक्ता पध्दतीने वसुली करणे मधील अनियमितता. |
| 11 | पडीत जागा-खुले भुखंड इत्यादीवर मालमत्ता कर व इतर कर आकारणी न केल्याने होत असलेल्या आर्थिक नुकसानी बाबत. |



Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| 12 | राहाते घर नोंद असलेल्या मालमत्ता वर मालमत्ता कर व इतर करांचे निर्धारण न झाल्याने झालेली आर्थिक हानी बाबत. |
| 13 | पद मंजुरी प्राप्त नसतांना अदा झालेल्या वेतन व भत्त्यावरील खर्चा बाबत. |
| 14 | सप्टेंबरच्या विदयार्थी पट संख्ये नुसार निश्चीत झालेल्या शिक्षक संख्ये पेक्षा जादा शिक्षक कार्यरत राहील्याने त्यांचे वेतन व भत्त्यांवरील खर्चा बाबत. |
| | नियम 9 ब खालील परिच्छेद |
| 15 | अग्रीम नोंदवही व थकबाकी बाबत. |
| 16 | पल्स पोलियो अभियानासाठी मागणी नसलेल्या बाबीं करीता अग्रीम अदा केले बाबत. |
| 17 | पंचशिल वार्ड जटपूरा गेट ते पंचशिल चौक ते अनुजा हॉस्पीटल ते बँक ऑफ इंडीया पर्यत रस्ता डांबरीकरण कामातील अनियमितता. |
| 18 | इमारत, गाळे, मार्केट, ओटे, थकीत भाडे व कर रकमा यांची चालू मागणीतून सूट देऊन मागणी कमी केल्याने झालेले कायमचे आर्थिक नुकसानी बाबत. |
| 19 | मागणी नोंदवहीतून थकीत मागणीची नोंद कायम स्वरूपी कमी करून झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत. (7 मजली इमारत मार्केट) |
| 20 | भाडेपट्टे वरील इमारत / गाळे यांची मागणी नोंदवही व थकबाकी बाबतची अनियमितता. |
| 21 | मागणी नोंदवहीत नोंदविलेल्या मालमत्तांवर एकत्रित मालमत्ता कराची मागणी न करणेची अनियमितता. |
| 22 | एकत्रित मालमत्ता कराच्या मागणी नोंदवहीतून मालमत्ता धारकांची नावे कमी करणे तसेच थकीत करांच्या रकमांची नोंद कायम स्वरूपी कमी करणे/ कमी रकमेने ओढणे इत्यादी बाबतची अनियमितता. |
| 23 | नगर पालिका व्यापारी संकुल (राजकला टॉकीज) गाळेधारकांना थकीत मालमत्ता करात सूट दिल्याने झालेल्या आर्थिक नुकसाना बाबत. |
| 24 | मालमत्ता कर रकमा विहीत मुदतीत वसुल न झाल्याने अदत्त रकमांवर शास्तीची आकारणी न करणे बाबत. |
| 25 | विवाह नोंदणी फी व शास्तीची रक्कम शासनाकडे जमा न करणेची अनियमितता |
| 26 | विवाह मंडळाची नोंदणी व फी वसुल न केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत. |
| 27 | नागरी सुविधा केंद्र व कार्यालय करीता संगणक लेन चे काम करणे बाबत. |
| 28 | महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर शासन सदरी भरणा करणे बाबत झालेली अनियमितता. |
| 29 | 11 वा वित्त आयोग निधी अंतर्गत मंजूर कामावरील खर्च नियमबाहयपणे 12 वा वित्त आयोग निधीतून नियमबाहयपणे अदा करणे बाबत. |
| 30 | नियमबाहयपणे विमान प्रवास करणे व प्रवास रक्कम खर्च करणे बाबत. |
| 31 | संगणक , लॅपटॉप इतर साहीत्य खरेदी बाबत. |
| 32 | बॅलेट युनिट आणने कामी वाहतूक व मजुरी साठी प्रदान अग्रीमा बाबत. |
| 33 | जादा आतिकालिक भत्ता प्रदाना बाबत. |
| 34 | आवक-जावक कामी वापरण्यात येण्या-या तिकीटाचा हिशेब नसले बाबत. |



Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| 35 | पत्रकारांना फोल्डर फाईल व तत्सम स्टेशनरी साहीत्य पुरविणे खर्चा बाबत |
| 36 | विना अनुदानीत शैक्षणिक संस्थांना शिक्षण करात सुट दिल्याने होत असलेल्या आर्थिक नुकसानी बाबत. |
| 37 | शिक्षण कर व रोजगार हमी कर वसुल रक्कम शासन सदरी उशिरा भरणा केले बाबत. |
| | नियम 9 क खालील परिच्छेद |
| | इतर अनियमितता |
| 38 | आस्थापना खर्चा बाबत. |
| 39 | पटणी नोंदवही (भरणाकिर्द) मध्ये पावती क्रमांक व पूस्तक क्रमांक नमूद न करता रकमां वसुल करणे व नोंदविणे बाबत |
| 40 | एकाच कालावधी साठी गुंतवणूक केलेल्या रकमांवर कमी/जादा व्याज दराने व्याज रकमां प्राप्त होणे बाबत. |
| 41 | सर्वसाधारण रोखवही (डे बुक) व बँक पासबुक मधील शिल्लक असलेल्या रकमांतील तफावती बाबत. |
| 42 | धनादेशाने रकमांचे प्रदान न करणे बाबत. |
| 43 | दर महा रोखवहीतील रोख रकमेची पडताळणी न करण्याची अनियमितता. |
| 44 | मार्च 2012 अखेर शिल्लक रकमांचे (बँक खाती) प्रमाणपत्र प्राप्त न करणे बाबत. |
| 45 | दवाखाना बाहय रुग्न सेवा (ओपीडी) फी वसुली विना पावतीने करण्याची अनियमितता |
| 46 | मनपा दवाखाना अंतर्गत नागरी आरोग्य केंद्रा (ओपीडी) कडून होत असलेल्या फी वसुलीतील अनियमितता. |
| 47 | मुद्रांकित पोच पावत्या व बिजके नसतांना देयके पारीत झाले बाबत. |
| 48 | वाचनालय वर्गणी थकबाकी राहाणे व इतर अनियमितता बाबत. |
| 49 | खाते प्रमुखाने विहीत नमुन्यात साठा नोंदवही (नमुना क्रमांक 1) परिरक्षित न केले बाबत. |
| 50 | मालमत्ता कर धनादेशाने जमा करतांना वठलेल्या दिनांकाची पावती न देणे बाबत |
| 51 | मुख्याधिकारी निवासस्थानाचे घरभाडे महानगरपालिका निधीतून अदा होणे बाबत |
| 52 | विमा हप्ता रक्कम भरणा करणे बाबत |
| 53 | स्वच्छता निरीक्षक यांना गणवेश करीता कापड खरेदी करणे बाबत. |
| 54 | उपार्जित पध्दतीवर आधारीत व्दीनोंद पध्दतीने लेखे ठेवणे बाबत |
| 55 | सन 2011-2012 करीता मुख्य लेखा परीक्षक यांनी अहवाल सादर केला नसले बाबत.. |
| 56 | दिनांक 31 मार्च 2012 नंतर वसुलात आणलेल्या रकमा त्याच दिनांकास प्राप्त दर्शविण्याची अनियमितता. |
| 57 | एकत्रित मालमत्ता कर मोठया प्रमाणावर थकीत असले बाबत. |
| 58 | सक्तीचे व ऐच्छिक करांची वसुली न करण्याच्या अनियमिततेमुळे होत असलेल्या आर्थिक नुकसानी बाबत |
| 59 | एकत्रित मालमत्ता पटणी नोंदवही व मध्यवर्ती भरणा पटणी नोंदवहीत मासिक व वार्षिक गोषवारे नोंदविलेले नसले बाबत. |
| 60 | मालमत्ता कर मागणी नोंदवहया मधील गंभीर अनियमितता |



Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| 61 | अल्पसंख्यांक निधी अंतर्गत केलेल्या बांधकामातील अनियमितता बाबत |
| 62 | आरोग्य विभागा अंतर्गत नागरी आरोग्य केंद्रे तपासणी कालावधीत (ओपीडी सेवा) बंद असले बाबत. |
| 63 | अतिरीक्त पदांवरील वेतन व भत्ते खर्चातील अनियमितता. |
| 64 | कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात आलेल्या कर्मचा-यांची प्रकरणे तसेच पूर्णवेळ कार्यरत कर्मचा-यांची सेवा पुस्तके तपासणी साठी सादर न केले बाबत |
| 65 | निविदा जाहीरात प्रसिध्दी खर्चा बाबत. |
| 66 | वाहन लेख्यातील अनियमितता |
| 67 | कालबाहय / निरुपयोगी झालेली वाहने निर्लेखीत न करणे बाबत. |
| 68 | सामान्य पावती पुस्तका (नमुना क्र. 2) अन्वये फी, शास्ती इत्यादी रकमा वसुल करणे बाबत. |
| 69 | मुद्रांक शुल्क सहायक अनुदान बाबत. |
| 70 | रोजगार निधी नोंदवही परिरक्षित केले नसले बाबत |
| 71 | पाणी पुरवठा राखीव निधी बाबत. |
| 72 | अग्निशमन विभागाकडील परवाना शुल्क वसुली बाबत |
| 73 | मध्यवर्ती पटणी नोंदवही व लेखा शाखेतील रोकडवहीतील जमा एकत्रीत मालमत्ता करातील असलेल्या तफावती बाबत |
| 74 | कर संकलन विभागाची एकत्रित मध्यवर्ती भरणा नोंदवही व लेखा शाखेतील जमा वर्गीकरण नोंदवहीतील असलेली तफावती बाबत. |
| 75 | मालमत्ता कर वसुल रकमा पटणी नोंदवही व मागणी नोंदवही यांचा ताळमेळ नसले बाबत. |
| 76 | वाढ घट नोंदवही बाबत |
| 77 | नगर रचना विभागाकडील परवाना शुल्क व परवाना नुतनीकरण करणे इत्यादी नोंदवही बाबत. |
| 78 | महानगरपालिका भोगवटादार असलेल्या जागांचा तपशिला बाबत |
| 79 | इमारत परवाना नोंदवही अपूर्ण असले बाबत. |
| 80 | अपूर्ण बांधकामांबाबत |
| 81 | विहीत नमुन्यात आवश्यक त्या नोंदवहया परिरक्षित केल्या नसले बाबत |
| 82 | जंगम मालमत्ता नोंदवही एकत्रितरित्या परीरक्षित केले नसले बाबत. |
| 83 | प्रतिभुती बंधपत्र व जामीनदार हयात दाखले न घेणे बाबत |

उपरोक्त नमूद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या पुढील वर्षाचे अभिप्रायामध्ये नमूद करण्यात आलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यात यावे.

## पुर्नविलोकन अहवालामध्ये समाविष्ठ परिच्छेदाचा तपशील

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लेख्यावरील लेखापरीक्षण पुर्नविलोकन अहवालामध्ये समाविष्ठ परिच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ले.प.वर्ष | मूळ | लेखापरीक्षा | लेखापरीक्षा | लेखा आक्षेपाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

| | | परिच्छेद क्रमांक | पुर्नविलोकन अहवालानुसार परिच्छेद क्र. | पुर्नविलोकन अहवालानुसार पृष्ठ क्र. | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2011-12 | 17 | 2.319 | 242 | पंचशील वार्ड जटपुरा गेट ते पंचशील चौक ते अनुजा हॉस्पिटल ते बँक ऑफ इंडिया पर्यंत रस्ता डांबरीकरण कामातील अनियमितता. |
| 2 | 2011-12 | 20 | 2.320 | 243 | भाडे पट्टेवरील इमारत/गाळे यांची मागणी नोंदवही व थकबाकीबाबतची अनियमितताबाबत. |
| 3 | 2011-12 | 25 | 2.321 | 243 | विवाह नोंदणी फी व शास्तीची रक्कम शासनाकडे जमा न करणेची अनियमितताबाबत. |
| 4 | 2011-12 | 60 | 2.322 | 244 | मालमत्ता कर मागणी नोंदवहयामधील गंभीर अनियमितताबाबत. |



Scanned by CamScanner

# Part II

# भाग एक

## गंभीर अनियमितता

## कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप



Scanned by CamScanner

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान



Scanned by CamScanner

1 ***चंद्रपूर महानगरपालिकेचा अर्थसंकल्प, आर्थिक स्थिती व वार्षिक लेख्यावरील अभिप्राय.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा./शासन निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***चंद्रपूर महानगरपालिकेने वित्तीय लेखे विहित नमुन्यात सादर केले नाहीत. तसेच महानगरपालिकेने तरतूद केलेली नसताना किंवा तरतुदीपेक्षा जादा खर्च केलेला आहे. त्याचप्रमाणे मनपाची आर्थिक स्थिती असमाधानकारक असल्याचे दिसून येते.***

विशेष सर्वसाधारण अर्थसंकल्पीय सभा ठराव – (सुधारीत अर्थसंकल्प) क्रमांक 105 दि. 22.03.2013

| जमा रक्कमेचा सुधारीत अंदाज | प्रत्यक्ष जमा झालेल्या रकमा | खर्च रक्कमेचा सुधारीत अंदाज | प्रत्यक्ष झालेला खर्च |
|---|---|---|---|
| रु.1,45,62,04,000 | रु. 1,05,95,83,841 | रु. 1,42,12,56,000 | रु. 97,26,39,953 |

चंद्रपूर महानगरपालिकेचे सन 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 100 व 100(अ) नुसार विशेष सर्वसाधारण अर्थसंकल्पीय सभेने मंजूर केलेला व सन 2012-13 या वित्तीय वर्षाचा मूळ अर्थसंकल्प कलम 101 अन्वये संमत केलेला सुधारीत अर्थसंकल्प, सन 2012-13 मधील प्रत्यक्ष जमा व खर्च ईत्यादीची तपासणी केली असता अर्थसंकल्पीय रकमा, प्रत्यक्ष जमा व खर्च खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते.

मागील 3 वर्षातील मा. आयुक्त, स्थायी समिती व महासभा यांचे अंदाज तसेच प्रत्यक्ष जमा व खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| लेखाशिर्ष | सन 2009-10 प्रत्यक्ष जमा/खर्च | सन2010-11 प्रत्यक्ष जमा/खर्च | सन 2011-12 प्रत्यक्ष जमा/खर्च | सन 2012-13 सुधारीत अंदाज | सन 2012-13 प्रत्यक्ष अंदाज/खर्च |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | 12,36,42,670 | 17,82,61,373 | 18,84,73,634 | 39,98,61,896 | 41,67,34,133 |
| अ) जमा | | | | | |
| अ) महसुली | 75,01,12,271 | 49,96,64,692 | 75,91,54,674 | 1,17,77,04,000 | 92,59,15,755 |



Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आय | | | | | |
| ब) भांडवली आय | 0 | 25,42,400 | 0 | 1,50,00,000 | 3,32,99,862 |
| क) इतर आय | 21,80,79,408 | 31,38,05,678 | 4,37,93,563 | 26,35,00,000 | 10,03,68,224 |
| एकूण उत्पन्न | 96,81,91,679 | 81,60,12,770 | 80,29,48,237 | 1,45,62,04,000 | 1,05,95,83,841 |
| सुरु. शिल्लक धरून एकूण उत्पन्न | 1,09,18,34,349 | 99,42,74,143 | 99,14,21,871 | 1,85,60,65,896 | 1,47,63,17,974 |
| ब) खर्च | | | | | |
| भाग – 1 महसुली खर्च | 33,54,14,612 | 36,42,06,543 | 33,60,58,556 | 59,04,56,000 | 50,12,37,109 |
| भाग – 2 भांडवली खर्च | 20,45,06,033 | 37,18,35,173 | 32,08,70,494 | 50,88,00,000 | 21,35,97,158 |
| भाग – 3 इतर खर्च | 37,36,52,331 | 6,97,58,793 | 3,98,64,107 | 32,20,00,000 | 25,78,05,686 |
| सन 2012-13 एकूण खर्च | 91,35,72,976 | 80,58,00,509 | 69,67,93,157 | 1,42,12,56,000 | 97,22,39,953 |
| दि. 31.03.2013 ची अखेरची शिल्लक | 17,82,61,373 | 18,84,73,634 | 29,46,28,714 | 43,48,09,896 | 50,40,78,021 |

1) सन 2012-13 च्या सुधारीत अर्थसंकल्पीय व प्रत्यक्षात जमा – खर्चाच्या रकमा मागील 3 वर्षाच्या प्रत्यक्षात आकडेवारी विचारात घेऊन साधारणतः 10% जादा प्राप्तीचा अंदाज घेऊन चालू अर्थसंकल्पात गृहीत धरून सादर करणे आवश्यक आहे. तथापि उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, मागील 3 वर्षाच्या प्रत्यक्ष जादा रकमेच्या तुलनेत लेखापरीक्षण वर्षातील सुधारीत जमा रकमेची तरतूद जवळपास 70% ने अधिक केलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेने मागील 3 वर्षाची प्रत्यक्ष जमा व खर्चाची सरासरी न पाहता व अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना शासन निर्देशाप्रमाणे विषद केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करून अर्थसंकल्प तयार केल्याचे दिसून येत नाही. तसेच खालील बाबीवरून -

१. कर व दर रु. 3,52,91,330/-

२. संकीर्ण रु. 12,04,51,518/-

३. विक्री पासून उत्पन्न रु. 1,82,99,862/-

४. शिक्षण कर रु. 18,98,564/-



Scanned by CamScanner

५. रोहयो कर रु. 24,33,113/-

६. बांधकाम उपकर रु. 16,39,886/-

**एकूण** रु. 18,00,14,273/-

सन 2012-13 मध्ये अंदाजपत्रकीय अंदाजापेक्षा महानगरपालिकेने एकूण रुपये 18,00,14,273/- जादा रक्कम प्राप्त केलेली आहे. सदर बाबतीत महापालिका प्रशासन, मा. आयुक्त, वित्त विभाग आणि संबंधित विभागप्रमुख ह्यांचे कार्य निश्चीतच प्रशंसनीय आहे. मात्र खालील रकमा कमी प्राप्त झाल्या याबाबत महानगरपालिकेने नीती आणि कार्य यामध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्याचे दिसून आले.

कमी प्राप्त रकमा -

१. विशेष अधिनियमाखालील वसुली रु. 98,900/-

२. मालमत्तेपासून महसूल रु. 10,97,770/-

३. अनुदाने रु. 30,61,50,858/-

४. अग्रिम रु. 18,16,467/-

५. ठेवी रु. 74,44,427/-

६. विविध योजना कार्यक्रम रु. 30,73,680/-

७. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना रु. 1,73,750/-

८. शासनाची कर वसुली रु. 2,03,896/-

**एकूण** रु. 32,00,59,748/-

वरीलप्रमाणे एकूण रक्कम रुपये 32,00,59,748/- एवढी प्रचंड रक्कम प्रत्यक्ष अंदाजापेक्षा वसूल झालेली नाही. सदहू बांब महानगरपालिकेच्या विकासाच्या अनुषंगाने चिंताजनक असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

यावरून कमी प्राप्त रक्कम रु. 32,00,59,748/- पैकी रुपये 180014273/- जादा वसूल झाले असल्याने रु. 140045475/- निव्वळ कमी वसुली झाली आहे. त्यामुळे अंदाजपत्रकात दर्शविण्यात आलेल्या जमा रकमा प्रत्यक्ष अंदाजानुसार घेण्यात आल्या नाहीत ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

2) मंजूर तरतुदीपेक्षा/तरतूद नसताना केलेला जादा खर्च –

| अ.क्र. | लेखाशिर्ष | तरतूद | प्रत्यक्ष खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|
| 01 | करवसुली - आकस्मिक खर्च | 5,00,000 | 6,56,144 | 1,56,144 |
| 02 | स्थानिक संस्था कर - आकस्मिक खर्च | 3,00,000 | 3,35,796 | 35,796 |
| 03 | अग्निशमन - कर आकस्मिक | 2,00,000 | 2,57,121 | 57,121 |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | खर्च | | | |
| 04 | अग्निशमन - मोटर दुरुस्ती/इंधन खरेदी | 10,00,000 | 11,47,552 | 1,47,552 |
| 05 | अग्निशमन - नवीन वाहन खरेदी | 0 | 25,27,770 | 25,27,770 |
| 06 | दिवाबत्ती-दिवे व इतर वस्तू खरेदी | 70,00,000 | 1,07,55,422 | 37,55,422 |
| 07 | दिवाबत्ती-विजेचा खर्च | 1,50,00,000 | 1,83,82,505 | 33,82,505 |
| 08 | दिवाबत्ती-नवीन विद्युत लाईन टाकण्याचा खर्च | 75,00,000 | 4,83,04,148 | 4,08,04,148 |
| 09 | उपद्रवी प्राणी यापासून सुरक्षा-मोकाट कुत्र्यांचा/जनावरांचा बंदोबस्त | 1,00,000 | 1,87,183 | 87,183 |
| 10 | मलनि:स्सारण खर्च-खाजगी कंत्राटादवारे साफसफाई | 1,00,00,000 | 1,13,50,793 | 13,50,793 |
| 11 | मलनि:स्सारण खर्च-नाली सफाई | 0 | 1,19,73,418 | 1,19,73,418 |
| 12 | मलनि:स्सारण खर्च-घनकचरा व्यवस्थापन | 0 | 1,98,648 | 1,98,648 |
| 13 | सार्वजनिक शिक्षण खर्च-पुस्तके/नियतकालिके खरेदी | 1,50,000 | 2,15,626 | 65,626 |
| 14 | संकीर्ण-राष्ट्रीय दिन | 1,50,000 | 1,77,355 | 27,355 |
| 15 | संकीर्ण-आपत्ती व्यवस्थापन | 1,00,000 | 21,06,431 | 20,06,431 |
| 16 | संकीर्ण-सु.ज.श.रो.यो. | 75,00,000 | 80,99,818 | 5,99,818 |
| 17 | संकीर्ण-रस्ता बांधकाम | 1,00,00,000 | 2,89,22,669 | 1,89,22,669 |
| 18 | शासन अनुदान-12 वा वित्त आयोग | 1,16,00,000 | 2,08,57,658 | 92,57,658 |
| 19 | शासन अनुदान-वैशीष्ठपूर्ण काम | 0 | 2,07,59,277 | 2,07,59,277 |
| 20 | शासन अनुदान-अनु.जाती व नवबौद्ध घरकुल | 3,00,00,000 | 3,19,36,794 | 19,36,794 |
| 21 | शासन अनुदान-सु.ज.श.रो.यो. | 90,00,000 | 1,93,43,073 | 1,03,43,073 |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 22 | शासन अनुदान - विविध योजनेकरिता मनपा हिस्सा | 0 | 20,98,92,870 | 20,98,92,870 |

वर नमूदनुसार मंजूर सुधारित तरतुदीपेक्षा अथवा तरतूद केलेली नसतांना जादा खर्च करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 104 नुसार कोणत्याही अर्थसंकल्पीय शीर्षकाखाली तरतूद केलेल्या रकमेपेक्षा जादा खर्च अनुज्ञेय नसतांना व तातडीची आवश्यकता असेल तेव्हा महानगरपालिकेने आर्थिक वर्षात जादा खर्चाचे पुनर्विनियोजन करून त्यास सभेची तात्काळ मंजुरी घेणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य असतांना मंजूर तरतुदीपेक्षा जादा खर्च करण्याची अनियमितता झालेली असून सदर बाब नियमबाह्य आहे.

**3) वार्षिक लेखे –**

चंद्रपूर महानगरपालिकेने सन 2012-13 या संपूर्ण कालावधीचे लेखे तयार केले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 94(1) नुसार मा. आयुक्त यांनी प्रत्येक वर्षाचे एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर शक्य तितक्या लवकर मागील वर्षातील वार्षिक लेखे मान्यतेसाठी स्थायी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि महानगरपालिकेने सनदी लेखापालाकडून तयार करून घेतलेले लेखे व वार्षिक ताळेबंद अथवा महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नुसार तयार केलेला नाही. त्यामुळे चंद्रपूर महानगरपालिकेचे सन 2012-13 च्या वार्षिक लेख्याचे प्रमाणिकरण करता येऊ शकले नाही.

DATPVKM0101 (Ref No : 87, Hmm No : 37)

## 2 *दुहेरी नोंद पध्दती अभिलेख्यातील अनियमितता*

**द्विनोंद पद्धतीचे लेखे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 15**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***सन 2012-13 व्दिनोंद पध्दतीने ठेवावयाचे विवरणपत्रे सादर करण्यात आली. सदरील विवरणपत्रे सनदी लेखापालाकडून तयार करवून घेतल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. मात्र सदर विवरणपत्रातील माहीती त्रोटक स्वरूपाची असल्याचे आढळून आल्यामुळे महानगरपालिका चंद्रपुर येथे व्दिनोंद पध्दतीच्या विवरणपत्राचा उपयोग महानगरपालिका कामकाजासाठी परिपुर्ण झाला असे म्हणता येणार नाही.***

सन 2012-13 चे लेखापरीक्षणाकरीता सादर केलेल्या व्दिनोंद पध्दतीच्या विवरणपत्राची पडताळणी केली असता खालील अनियमितता असल्याचे दिसून आले. हयाबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 79 दि. 24/7/2015 नुसार खुलासा मागविण्यात आला असता विवरणपत्रातील माहीतीची पुर्तता महानगरपालिकेने केली नसल्याचे आढळते.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 106(3) अनुसार व्दिनोंद पध्दतीचे विवरण व सन 2012-13 चा वार्षिक लेखा यावरील अहवाल सादर करण्यात आला नाही.



Scanned by CamScanner

2) NMAM प्रकरण 31 नुसार महानगरपालिकेने ठेवावयाची द्विनोंद पध्दतीच्या लेख्याबाबत उचित कार्यवाही केलेली नाही.

3) आय - व्यय लेख्यामध्ये मागील वर्षापर्यंतची थकीत जमा रकमा व पुढिल वर्षाच्या आगाऊ प्राप्त रकमा वेगवेगळ्या दर्शवून त्या वजा केल्या असल्याचे सप्रमाण नोंदी घेण्यात आलेल्या नाही.

4) तसेच चालु वर्षाच्या विशिष्ट अप्राप्त रकमा वेगळया दर्शवून उत्पन्नात समाविष्ठ केल्याच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

5) खर्च रकमा बाबत मागील वर्षीच्या थकीत देय रकमा चालू वर्षीच्या खर्च रकमेत वेगळया दर्शविण्यात येवून त्या समाविष्ठ केल्याच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाही.

6) मागील वर्षाची थकीत देणी सन 2012-13 मध्ये दिली असल्यास व पुढिल वर्षाकरीता रक्कम सन 2012-13 मध्येच प्रदान केली असल्यास अशा रकमा वेगळया दर्शवून एकूण खर्च रकमेतून वजा केल्याच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

7) ताळमेळपत्रक व मत्ता दायित्व पत्रक जोडण्यात आले नाही.

8) लेजर अकाऊंट बॅलन्स बाबत आवश्यक नोंदवही ठेवून ती प्रमाणित करणे आवश्यक असतांना उक्त कार्यवाही करण्यासाठी लेजर अकाऊंट ठेवले नसल्याचे आढळले.

9) संपूर्ण मालमत्ता रकमेतून घसारा रक्कम वजा केल्याच्या वेगळया नोंदी घेवून मालमत्तेचे सन 2012-13 अखेरचे मुल्य दर्शविण्यात आले नाही.

10) महानगरपालिकेने सुरू केलेल्या कामाचे नोंदीचे विवरणपत्रात नोंदी घ्रोण्यात आलेल्या नाहीत.

11) NMAM मधील प्रकरण 29 नुसार दैनिक, त्रैमासिक व वार्षिक या कालावधीत आवश्यक त्या नोंदवहया बंद करून त्याचा गोषवारा काढणे आवश्यक आहे. परंतू नोंदवहया ठेवल्याच नसल्याने महानगरपालिकेकडून सदर कार्यवाही झालेली नाही.

12) NMAM मधील प्रकरण 29.09 ते 29.41 नुसार सन 2012-13 अखेरीस् लेखे बंद करण्याबाबत सक्षम अधिका-यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र सदरील कार्यवाही नोंदवहया ठेवण्यात आलेल्या नसल्याने महानगरपालिकेला करता आली नसल्याचे दिसून आले.

13) सन 2012-13 करीताचे Receipts & payments account सादर करण्यात आले नाही त्यामुळे जमा खर्चाबाबत अचुक पडताळणी करता आली नाही.

14) सन 2012-13 अखेरीस साठा (Stock in hand) बाबतचे विवरणपत्र तयार करण्यात आलेले नाही.

15) खाली विवरणपत्रे अत्यंत महत्वाचे असतांना सनदी लेखापालाकडून तयार करून घेण्यात आलेली नाही.

a) Trial Balance - Headwise (31.2)

b) Statement of cashflow (31.5)

c) Sheduled B - 1 General Fund (corporation)

d) Sheduled B - 2 earmarked Funds (Special fund/ trust or agency fund)

e) Sheduled B - 3 Reserve Fund

f) Sheduled B - 4 Grants and contribution for specific purpose

g) Sheduled B - 18 - loans advances & deposits

h) Sheduled B - 18 (a) accumulated provision against advances & deposits

i) Sheduled B - 19 OTHER ASSETS

j) Sheduled B - 20 MISCELLANEOUS EXPENDITURE (TO THE EXTEND NOT WRITTEN OFF)

खालील प्रमाणे द्विनोंद पद्धतीच्या नोंदवहया ठेवण्यात आलेल्या नाहीत.

| Sr. No. | Contents | Form |
|---|---|---|
| 1 | Cash book | GEN - 1 |
| 2 | Journal book | GEN – 2 |
| 3 | Ledger | GEN – 3 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 4 | Cash bank receipt voucher | GEN – 4 |
| 5 | Cash bank payment voucher | GEN – 5 |
| 6 | Contra voucher | GEN – 6 |
| 7 | Journal voucher | GEN – 7 |
| 8 | Receipt | GEN – 8 |
| 9 | Receipt register | GEN – 9 |
| 10 | Statement on status of cheque received | GEN – 10 |
| 11 | Collection register | GEN – 11 |
| 12 | Summery of daily collection | GEN – 12 |
| 13 | Registers of bills for payments | GEN – 13 |
| 14 | Payment order | GEN – 14 |
| 15 | Cheque issue register | GEN – 15 |
| 16 | Register of advance | GEN – 16 |
| 17 | Register of permannat advance | GEN – 17 |
| 18 | Deposit register | GEN - 18 |
| 19 | Summery statement of deposits adjusted | GEN – 19 |
| 20 | Demand register | GEN – 20 |
| 21 | Bill of --------- income | GEN – 21 |
| 22 | Summery statement of bills raised | GEN – 22 |
| 23 | Register of notice fee, warrents fees, other fee | GEN – 23 |
| 24 | Summery statement of notice fee, warrents fees, other fee | GEN – 24 |
| 25 | Register of refunds, remissions and write off | GEN – 25 |
| 26 | Summery statement refunds and remissions | GEN – 26 |
| 27 | Summery statement write - off | GEN – 27 |
| 28 | Statement of outstanding liability for expences | GEN – 28 |
| 29 | Documents control register + stock account of receipt / cheque book | GEN - 29 |

याबाबत महानगरपालिकेने स्थायी समिती सभा ठराव क्रं. 28 दि. 7/6/2014 नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 94 अनुसार सन 2012-13 चे वार्षिक लेखे व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहीता 1971 चा नियम 60 नमुना क्रं. 28 च्या अभिलेख्यास मंजूरी दिलेली आहे. तसेच व्दिनोंद पध्दतीतील विवरणपत्रातील माहीतीस सुध्दा संजूरी दिलेली आहे. मात्र प्रत्यक्षात महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक लेखासु/02004/71/प्र.क्रं. 4/04/नवि-3/ मुंबई दि. 6 जुलै 2005 च्या शासन निर्णयानुसार सन 2012-13 मध्ये व्दिनोंद पध्दतीत सुधारीत नोंदवहया व अभिलेखे ठेवण्याबाबत अंमलबजावणी केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिका चंद्रपुर सन 2012-13 च्या लेखापरीक्षणाचा शासनाचा उददेश सफल होवू शकला नाही. शासन निर्देशाचे पालन महानगरपालिकेने करणे बाबत त्वरीत करार्यवाही होणे आवश्यक असल्याचे हयाबाबत प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे.

DATBNKM6401 (Ref No: 32, Hmn No: 79)

### *3 अग्रिमाची रक्कम वसुल न करण्याची अनियमितता*

**अग्रिम व ठेवी**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : लेखा म. न. पा. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 58500.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 32500.00/-



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

वसूलपात्र रक्कम रु. 26000.00/-

दि 24/11/1994 ते 20/12/2012 हया कालावधीत वेळोवेळी अग्रिम मंजूर करण्यात आले. परंतू त्याचे समायोजन 90 दिवसाचे आंत झाले नसतांना सदरील अग्रिमाची रक्कम सुध्दा वसुल करण्यात आली नाही.

सन 2012-13 चे लेखापरीक्षणास सादर केलेल्या अग्रीम नोंदवही मध्ये खालील प्रमाणकानुसार संबंधितांना अग्रीम देण्यात आला. तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | प्रमाणक क्रं | दिनांक | रक्कम | नाव |
|---|---|---|---|---|
| 1 | 2400 | 24/11/1994 | 20000 | टाटा इंजि . ॲटो कंपनी , दिल्ली |
| 2 | 325 | 1/6/2004 | 6000 | श्री . संजय वाघमारे |
| 3 | 727 | 15/1/2010 | 5000 | श्री . बेनझर ई . जोसेफ |
| 4 | 96 | 23/12/2011 | 15000 | श्री . महेश के . बारई |
| 5 | 352 | 9/7/2012 | 2500 | श्री . अनिल मैदमवार |
| 6 | 592 | 6/8/2012 | 5000 | श्री . मधुसुदन पिंगलावार |
| 7 | 1114 | 20/12/2012 | 5000 | श्रीमती अल्ला अकुलवार |

नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रं. 35 दि. 3/1/2006 नुसार नगरपरिषदेने अग्रीम मंजूर करण्यावर निर्बंध घातला आहे. तसेच नगरपरिषद लेखासंहीता 2011 प्रकरण 16 कलम 248 नुसार 90 दिवसाचे आत अग्रीमाचे समायोजन होणे आवश्यक होते. परंतू वरीलप्रमाणे प्रमाणकाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या रकमेचे समायोजन विहीत मुदतीत झाले नसतांनाही महानगरपालिका प्रशासनाने सदरील अग्रीमाची एकूण रक्कम रु. 26000 अदयापही वसूलात आणलेली नाही. तसेच श्री जोसेफ, श्री.बाराई, श्री मैदनवार, श्री पिंगलावार व श्रीमती अकुलवार यांचे कडून अग्रीमाचे समायोजन विलंबाने झाले असता त्यांचे कडून व्याजाची रक्कम वसूल करण्यात आली नाही.

संबंधितांकडे सन 1994 पासून अग्रीमाची रक्कम थकीत असतांना महानगर पालिकेने वसुलीची कार्यवाही न करणे ही बाब नियमबाहयपणे ठरते. सबब हयाबाबत यथाशिघ्र कार्यवाही करण्यात येवून सदरील अग्रीमाची एकूण रक्कम रु. 26000 व त्यापासून महानगरपालिकेस प्राप्त न झालेल्या व्याजाच्या रकमेची परिगणना करून वसुलात आणावी. तसेच श्री. जोसेफ रु. 5000, श्री. बारई रु. 15000 व श्रीमती आकुलवार रु. 5000 हयांनी विहीत कालावधीत अग्रीमाचे समायोजन केले नसल्याने संबंधितांनी महानगरपालिकेच्या निधीची रक्कम नियमबाहयपणे वापरलेली असतांना महानगरपालिकेच्या निधीची रक्कम वसुल न करता फक्त अग्रीमाची रक्कम वसुल करण्यात आली. त्यामुळे संबंधितांकडून समायोजन निधी संपण्याचे तारखेनंतर महानगरपालिकेचे झालेल्या नुकसानीच्या व्याजाची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

DATBNKM6401 (Ref No : 9, Hmm No : 5)

### 4 सेवापुस्तकातील अनियमितेबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 05**



Scanned by CamScanner

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***महाराष्ट्र नागरी सेवा(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 चे नियम 38 नुसार सेवापुस्तकात शासकिय कर्मचा-याच्या कार्यालयीन कालावधीमध्ये घडणा-या प्रत्येक महत्वपुर्ण घटनांची नोंद करुन ती कार्यालय प्रमुखाकडुन साक्षांकित पाहिजे. असे असतांना अनेक कर्मचा-यांच्या रजा मंजुरीची नोंद, रजेचा हिशेब, बिनपगारी रजा नियमित सेवेकरीता ग्राहय धरण्यात याव्यात अथवा नाही याची नोंद नाही. अनेक ठिकाणी रजा मंजुरी नोंदीखाली कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी नाही. DCPS लेखाक्रमांक सेवापुस्तकात दर्शनी भागावर नमुद नाही. सेवापडताळणीची नोंद दरवर्षी घेण्यात येत नाही. कुटुंबाचा नामनिर्देश फार्म सेवापुस्तकासोबत जोडला नाही. चारित्र पडताळणी नोंद सेवापुस्तकामध्ये घेतलेली नाही.*** |

मनपा चंद्रपुर येथील सेवारत खालील 85 कर्मचा-याच्या सेवापुस्तकाची तपासनी केली असता सेवापुस्तकात सर्वसाधारणपणे खालील अनियमितता आढळुन आल्या.

1. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम 1981 चे नियम 45 नुसार सेवापुस्तकातील सेवापडताळणी प्रत्येक वर्षा च्या मे महिन्यामध्ये कार्यालय प्रमुखाने करण्याबावत शासन निर्देश आहेत . कर्मचा-याच्या सेवापुस्तकात नियमानुसार सेवाविषयक नोंदी बरोवर नमुद करण्यात आल्याबाबत कार्यालय प्रमुख वेतन देयके वेतन पट आणि तत्सम अभिय लेख्यावरून कर्मचा-याच्या सेवेची पडताळणी मागील वित्तीय वर्षाच्या अखेरपर्यंत करण्यात आली आहे असे सहीनिशी एक प्रमाणपत्र सेवापुस्तकात नोंदविल . परंतु वरील कर्मचा -याच्या सेवा पुस्तकाची तपासनी केली असता अनेक कर्मचा -याच्या सेवापुस्तकात ते सेवेत नियुक्त झाल्याच्या दिनांकापासुन वेतनपडताळणी करण्यात आली नाही. तसेच खालील सर्वच कर्मचा-याच्या सेवापुस्तकात सन 2012 पासुन लेखापरीक्षण दिनांकापर्यंत नोंदी घेण्यात आली नाही.

2. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम 1981 चे नियम 38(1) अन्वये सेवापुस्तकात कर्मचा-याने घेतलेल्या रजेची नोंद नियमितपणे आणि त्या त्या वेळी केली पाहिजे आणि ती कार्यालय प्रमुखाकडुन साक्षांकित पाहिजे . असे असतांना काही कर्मचा -याचे सेवा पुस्तक तपासले असता त्यांच्या हजेरी रजीष्टरवरील अनुपस्थितीचा कालावधी नियमीत केल्याबाबतची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आलेली नाही.

3. खालील अ.क्र.40 मधील श्रीमती कल्पना देवकरण छप्परवंद सफाई कामगार यांच्या सेवापुस्तकाची तपासनी केली असता सेवापुस्तकामधील पहिल्या पानावर जात म्हणुन <u>महार</u> असा उल्लेख करण्यात आला. त्यांच्या शाळा सोडण्याच्या दाखल्यावर जात <u>आदिवासी</u> दर्शविण्यात आली. तसेच त्यांचे जातीचे



Scanned by CamScanner

प्रमाणपत्र क्रमांक MRC81/AMT/210/1994/95 दिनांक 10-5-1995 नुसार त्याची जात मेहरा दर्शविण्यात आली. यावरून सदर कर्मचारी कोणत्या जातीची आहे याचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे सदर कर्मचा-याची जात पडताळणी पथकाकडुन प्रमाणपत्र प्राप्त करून त्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात यावी.

4. नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2007/पडताळणी/नवि-26 दिनांक 21 नोव्हेंबर 2007 अन्वये महानगर पालीकेने सरळ सेवेने नियुक्त केलेल्या कर्मचा-याची चारित्र पडताळणी पोलीस यंत्रनेमार्फत करणे आवश्यक असुन महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 चे नियम 38 नुसार कर्मचा-याच्या कार्यालयीन जीवनामध्ये घडणा -या प्रत्येक गोष्टीची नोंद सेवा पुस्तकामध्ये केली पाहिजे. असे असतांना सेवा पुस्तकामध्ये चारित्र पडताळणी झाल्याची नोंद करण्यात आली नाही.

5. खालील अ.क्र. 42 मधील श्री सुनिल केशव तळवेकर विजतंत्री यांच्या सेवा पुस्तकासोबत पोलीस चारित्र प्रमाणपत्र जोडण्यात आले नाही व सेवापुस्ताकामध्ये तशी नोंद सुध्दा नाही . अ.क्र. 5 मधील कर्मचारी श्री. आशिष मलिक यांचे सेवापुस्तकामध्ये जातीचे प्रमाणपत्र , पोलीस चारित्र प्रमाणपत्र, वैदयकिय तंदुरूस्तीचे प्रमाणपत्र व नियुक्ती आदेश संलग्न नाही.

6. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :अंनियो 1007/18/सेवा-4 दिनांक 7-7-2007 मधील परिच्छेद 9 नुसार राज्य अभिलेख देखभाल अभिकरण प्रत्येक कर्मचा -यास एक निवृतीलेखा क्रमांक नमुना एक संबंधीत आहरण व संवितरण अधिका -याला पाठविल सदरहु नमुन्याची एक प्रत कर्मचा-यांच्या सेवापुस्तकात चिकटविण्यात यावी . परंतु लेखापरीक्षणात कोणत्याही कर्मचा -याच्या सेवापुस्तकासोबत नमुना 1 जोडण्यात आला नाही तसेच नस्तीला संलग्न केला नाही.

कर्मचा-याचे सेवापुस्तकामध्ये आढळुन आलेल्या अनियमितता खालीलप्रमाणे-

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव व पदनाम | नियुक्ती दिनांक | अनियमितता |
|---|---|---|---|
| 1. | गोविंद प्रभु खोटे, सफाई कामगार | 10-11-2007 | 1. DCPS लेखाक्रमांक सेवापुस्तकात जोडलेला नाही.<br>2. रजेची नोंद से.पु.त घेतली नाही<br>3. रजा हिशेब नमुना हजेरी रजिष्टरवरून भरलेला नाही.<br>4. सेवापडताळणीची नोंद से.पु. 1.1.11 पासुन घेतलेली नाही.<br>5. चारीत्र पडताळणी नोंद से.पु.घेतलेली नाही.<br>6. कुटुंबाचा नामनिर्देश फार्म से.पु.सोबत जोडला नाही. |
| 2. | चंदन कन्हई राठोड | 9-11-2007 | वरील अ.क्र. 1,2,5,6<br>3. रजा हिशेब नमुन्यात सन 2012-13मध्ये घेतलेल्या रजेची नोंद नाही.<br>4. सेवापडताळणी दिनांक 1.1.2011 पासुन घेतलेली नाही. |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 7. दिनांक 21.8.2012 ते 24.12.2012 ची नोंद घेतली असुन त्याखाली प्रशासकिय अधिकाऱ्यांनी रजा मंजुरीबाबत स्वाक्षरी केली नाही. |
| 3. | अविनाश सारसर | 8.62010 | वरील अ.क्र. 1,4(अ),5,6<br>4(अ). सेवापडताळणी रुजु आल्या पासुन घेतलेली नाही. |
| 4. | सौ. मंदा राज नन्हेट | 14.10.2008 | वरील अ.क्र.1,4,5,6 |
| 5. | आशिष मलिक | 14.11.2008 | 1,4,5,6<br>7. से.पु. जात प्रमाणपत्र, चारीत्र प्रमाणपत्र, वैदयकियदृष्टया तंदरुस्त असल्याचे प्रमाणपत्र, नियुक्ती आदेश संलग्न नाही. |
| 6. | सुनिता दि. बक्सरीया | 9.11.2007 | वरील अ.क्र. 1,4(अ),5,6 |
| 7. | सुनिल कैलाश समुंद | 14.11.2009 | —"— |
| 8. | शक्ती अशोक हटवाल | 16.11.2009 | वरील अ.क्र. 1,5,6<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2012 पासुन घेतलेली नाही. |
| 9. | प्रतिभा मनोहर लंगोटे | 16.11.2009 | वरील अ.क्र. 1,4(अ),5,6 |
| 10. | रोहित संजय छपरबंद | 16.11.2009 | —"— |
| 11. | राजु सुरेश नहारकर | 31.1.2008 | वरील अ.क्र. 1,5,6<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2012 पासुन घेतलेली नाही. |
| 12. | सोनु अशोक हजारे | 4.5.2011 | वरील अ.क्र. 1,4(अ),5,6 |
| 13. | अंजु राकेश करिहार | 19.2.2013 | —"— |
| 14. | कंचन चंदन मत्तेल | 1.9.2012 | —"— |
| 15. | सरोज रजन सारसर | 4.5.2011 | —"— |
| 16. | सुरज पूनम हटवाल | 1.9.2012 | —"— |
| 17. | आकाश अशोक ग्रावकर | 5.12.2013 | —"— |
| 18. | भारत भगवान हजारे | 5.5.2011 | —"— |
| 19. | अरविंद राजू खोडे | 1.1.2010 | —"— |
| 20. | किरण रंगझोड दूभल | 31.1.2008 | वरील अ.क्र. 1, 5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2011 पासुन घेतलेली नाही. |
| 21. | सागर मानू उसरे | 15.10.2008 | वरील अ.क्र. 1,4(अ),5,6 प्रमाणे |
| 22. | गोकुल जगन्नाथ तांबे | 16.11.2009 | —"— |
| 23. | रंजीता सुखराम दुलगज | 16.11.2009 | —"— |
| 24. | आकाश दिपक खोटे | 1.1.2010 | वरील अ.क्र. 1, 5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2012 पासुन घेतलेली नाही. |
| 25. | प्रिती पप्पू महातव | 17.11.2009 | वरील अ.क्र. 1,4(अ),5,6 प्रमाणे |
| 26. | आतिश मनोहर समुंद | 7.6.2010 | —"— |
| 27. | कविता सुरज टाक | 16.12.2009 | —"— |
| 28. | विना रम्मु संगेल | 1.6.2010 | —"— |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 29. | निता सुदेश ब्राम्हणे | 13.11.2007 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2011 पासुन घेतलेली नाही. |
| 30. | बेटी कन्हैया सावरकर | 31.1.2008 | ---"--- |
| 31. | विश्वनाथ रतन महतव | 31.1.2008 | ---"--- |
| 32. | अनिल गणे.श नन्हेर | 9.11.2007 | ---"--- |
| 33. | रक्षा राजू खोटे | 1.6.2010 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2012 पासुन घेतलेली नाही. |
| 34. | मिलिंद बाबडया महातक | 14.11.2009 | वरील अ.क्र. 1,4(अ),5,6 प्रमाणे |
| 35. | मयुर मन्नु मालीक | 30.1.2008 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2011 पासुन घेतलेली नाही. |
| 36. | धिरज साजन शुक्ल | 9.11.2007 | ---"--- |
| 37 | रोहित सिताराम महातव | 9.11.2007 | ---"--- |
| 38 | वंदना गणेश हाते | 15.10.2008 | ---"--- |
| 39 | महेश राजेंद्र मार्वे | 14.10.2008 | ---"--- |
| 40 | कल्पना दे. छपरबंद, महार | 16.11.2009 | वरील अ.क्र. 1,4(अ),5,6 प्रमाणे<br>7.से.पु. नुसार जात महार, शाळा सोडण्याचा दाखला नुसार जात आदिवासी व जातीचे प्रमाणपत्रानुसार जात मेहतर करि खुलासा करावा. |
| 41 | राज शामा खोडे | 14.11.2007 | वरील अ.क्र. 1,4(अ),5,6 प्रमाणे |
| 42 | सुनिल केशव तळवेकर | 19.10.201 | वरील अ.क्र. 1,4(अ),6 प्रमाणे<br>पोलीस चारीत्र प्रमाणपत्र से.पु. जोडले नाही व नोंद नाही. |
| 43 | लता अमीत दुलगंज | 16.11.2009 | वरील अ.क्र. 1,4(अ),5,6 प्रमाणे |
| 44 | पप्पू मदन राठोड | 11.5.2013 | ---"--- |
| 45 | लक्ष्मण प्रेमलाल बिरीया | 20.2.2013 | ---"--- |
| 46 | शितल रमेश महातव | 5.12.2013 | ---"--- |
| 47 | सागर जिवन खोटे | 25.9.2013 | ---"--- |
| 48 | जोत्सना राजेश भुते | 9.11.2007 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2011 पासुन घेतलेली नाही. |
| 49 | कल्पना भू-या भुते | 13.11.2007 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2012 पासुन घेतलेली नाही. |
| 50 | रिता राजू खोटे | 6.11.2007 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2011 पासुन घेतलेली नाही. |
| 51 | मनिश राजन शुक्ला | 31.1.2008 | ---"--- |
| 52 | शारदा दिपक मलीक | 3.7.2014 | वरील अ.क्र. 1,4(अ),5,6 प्रमाणे |
| 53 | नितिन मदन खोटे | 6.5.2011 | ---"--- |
| 54 | राहूल संजय छपरबंद | 1.9.2012 | ---"--- |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 55 | विशाल शाम हजारे | 1.9.2012 | ---"--- |
| 56 | राज देविदास हजारे | 5.5.2011 | ---"--- |
| 57 | जयदिप म बिरीया | 1.9.2012 | ---"--- |
| 58 | नितेश प. पैसाडेली | 9.11.2007 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2011 पासुन घेतलेली नाही. |
| 59 | मिना जानकी भार्वे | 13.11.2007 | वरील अ.क्र. 1,4,5,6 प्रमाणे |
| 60 | कला विजय सारसार | 13..11.2007 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2011 पासुन घेतलेली नाही. |
| 61 | रामराज ब. सावरकर | 15.10.2008 | ---"---. |
| 62 | माया ललता नन्हेट | 10.11.2007 | ---"--- |
| 63 | लता सुनिल समुंद | 6.11.2007 | ---"--- |
| 64 | अमर हसन दुलगज | 16.11.2009 | वरील अ.क्र. 1,4,5,6 प्रमाणे |
| 65 | दिनेश किसन खोटे | 16.11.2009 | ---"--- |
| 66 | किरण रामसिंग राठोड | 14.11.2007 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2011 पासुन घेतलेली नाही. |
| 67 | नितीन मोहन पैसाडेली | 15.10.2008 | ---"--- |
| 68 | शैलेश किशोर महातव | 31.1.2008 | ---"--- |
| 69 | संध्या ढंगी बक्सरिया | 14.11.2007 | ---"--- |
| 70 | आशा राम लिडर | 13.11.2007 | ---"--- |
| 71 | सुधीर सुरेश बक्सरीया | 9.11.2007 | ---"--- |
| 72 | देवीदास शामलाल नन्हेट | 17.11.2007 | ---"--- |
| 73 | आरती दि. नहारकर | 6.11.2007 | ---"--- |
| 74 | गणेश कैलाश खोटे | 9.11.2007 | ---"--- |
| 75 | गौरी धरमदास मार्वे | 14.11.2007 | ---"--- |
| 76 | उषा ठाकुर समुंद | 15.11.2007 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2012 पासुन घेतलेली नाही. |
| 77 | कांता राजू मलिक | 31.1.2008 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2011 पासुन घेतलेली नाही. |
| 78 | विशाल नंदलाल मलिक | 9.11.2007 | ---"--- |
| 79 | धमर शाम सारसर | 13.11.2007 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2012 पासुन घेतलेली नाही. |
| 80 | जितेंद्र मिठ्ठलाल सारसर | 13.11.2007 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2011 पासुन घेतलेली नाही. |
| 81 | विजय बुध्दु दाभोडे | 13.11.2007 | ---"--- |
| 82 | गीता अनिल समुंद | 6.11.2007 | ---"--- |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 83 | उमेश जग्गु भुते | 9.11.2007 | ---"--- |
| 84 | माया नारायन मार्वे | 14.11.2007 | वरील अ.क्र. 1,5,6 प्रमाणे<br>4. सेवापडताळणी दि. 1-1-2012 पासुन घेतलेली नाही. |
| 85 | राकेश प्रकाश खोडे | 14.11.2007 | ---"--- |

DATSSKM6702 (Ref No : 23, Itmn No : 2?)

## 5 वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीवर झालेल्या नियमबाह्य खर्चाबाबत.

0

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 10**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 99669.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 90528.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9141.00/-

***सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. पीयुबी-1000/प्र.क्र.73/2000/34 दिनांक 1-5-2001 तील जोडपत्र अ शासकिय जाहिरात वितरण धोरण 2001 नियमावली तील अ.क्र. 7 नुसार जाहिरातीची नोंद रोटेशन रजिष्टरमध्ये न घेता कमी जास्त आकारमानाच्या जाहिराती देण्यात आल्या. जाहिरातीची माहिती जिल्हा माहिती कार्यालयाला देण्यात आली नाही. तसेच कोणत्या लेखाशिर्षाखाली खर्च झाला याबाबतचा तपशिल प्रमाणकांत नमूद नाही. यावरून मनपा चंद्रपूर येथे जाहिराती नियमबाहयपणे देण्यात अल्याचे दिसून येत असल्याने सन 2012-13 मध्ये नोंदविण्यात आलेला एकुण खर्च रूपये 99669/- ची वसुली होणे आवश्यक आहे.***

सन 2012-13 या वित्तिय वर्षामधील जाहिराती खर्चाचे विवरण खालील प्रमाणे लेखापरीक्षण करतांना सामान्य प्रशासन विभागामार्फत विविध विभागाच्या जाहिराती वर्तमानपत्रातुन खालील प्रमाणे प्रशिध्द करण्यात आल्या.

| प्र.क्र./दिनांक | रक्कम | विभाग | वर्तमानपत्र व दर | प्रकाशित दिनांक | आदेशानुसार आकार | दिलेली जाहिरात (सें.मी.) | जादा प्रदान | तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7. | 8. | 9. |
| 1544/12-3-2013 | 1920 | सभा | दै.महाविदर्भ/ रु.16/सें.मी. | 16-1-2013 | कमीत कमी | 12X10 | | 1. आदेशामध्ये कमीत कमी जागेत जाहिरात नमुद असतांना जादा |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | जागेत जाहिरात प्रशिध्द केली.<br>2. आदेशात जाहिरात प्रकाशित करण्याचा दिनांक नाही. |
| 1525/-"- | 2880 | LBT | –"– | 25-1-2013 | –"– | 12X15 | | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 1546/-"- | 1280 | स्वच्छता | –"– | 31-1-2015 | –"– | 8X13 | | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 1547/-"- | 1920 | Fire | –"– | –"– | –"– | 9X15 | | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 1548/-"- | 2880 | कर | –"– | 14-2-2013 | 12x15 | 12x15 | | वरील 2 प्रमाणे |
| 1549/-"- | 2880 | –"– | –"– | -"- | कमीत कमी | 8x10 | | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 1550/-"- | 1280 | सभा | –"– | 22-2-2013 | –"– | 8x12 | | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 1551/-"- | 1680 | स्टोअर्स | –"– हिंदी | 19-2-2013 | –"– | 12x10 | | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 1552/-"- | 14400 | कर | दै.खालसा संदेश/ रु.12/सें.मी. | –"– | –"– | 60x20 | | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 1553/-"- - | 1152 | स्वच्छता | –"– | 12-2-2013 | 12x16 | 12x8 | 1192 | वरील 2 प्रमाणे |
| 1554/-"- | 25840 | कर | दै.महाराष्ट्र टाईम्स/@रु.184/सें.मी | 8-1-2013 | –"– | 8x5 | | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 1555/-"- | 6400 | सभा | दै.लोकमत | 25-1-2013 | –"– | 8x20 | | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 1556/-"- | 5840 | स्वच्छता | –"–/ रु.40/सें.मी | 31-1-2013 | 15x12 | 15x20.53 | 747 | वरील 2 प्रमाणे |
| 1557/-"- | 2772 | बांधकाम | सा.चंद्रपुरकी बुलंद आवाज रु. 97/सें.मी | 17-2-2013 | 10x8 | 10x8 | | वरील 2 प्रमाणे |
| 1558/-"- | 6480 | कर | –"–/ रु.9/सें.मी | 18-2-2013 | 15X12 | 15x20.53 | 1152 | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 1559/-"- | 3200 | Fire | दै.तरुणभारत/ रु.25/सें.मी | 16-1-2013 | –"– | 8x16 | | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 1560/-"- 989 | 4960 | कर | सा.चंद्रपूर एक्सप्रेस रु.8/सें.मी | 16-2-2013 | 12x15 | 31x20 | 3520 | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 1561/-"- | 2880 | कर | सांध्य दै. आदिमानव रु. 8/सें.मी | 14-2-2013 | –"– | 12x30 | | वरील 1 व 2 प्रमाणे |
| 1562/-"- | 1200 | स्वच्छता | दै.चंद्रधुन रु.10/सें.मी | 4-2-2013 | 8x10 | 8x15 | 400 | वरील 2 प्रमाणे |
| 1563/-"- | 1785 | कर | सा.लोकतंत्र की | 18-2- | 15x15 | 15x17 | 210 | वरील 2 प्रमाणे |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आवाज रु. 7/सें.मी | 2013 | | | | |
| 1554/-*- | 3520 | बांधकाम | दै. सन्नाटा रु. 10/सें.मी | 1-3-2013 | 15x20 | 22x16 | 520 | वरील 2 प्रमाणे |
| 1555/-*- | 2520 | स्वच्छता | दै. चंद्रपूर समाचार रु.14/सें.मी | 12-2-2013 | 10x8 | 15x12 | 1400 | वरील 2 प्रमाणे |
| | 99669 | | | एकुण | | | 9141 | |

वरील प्रमाणकाव्दारे प्रदान केलेल्या जाहिरातीच्या देयकाची व रोटेशन रजिष्टरची तपासनी केली असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. सन 2012-13 या वर्षातील जाहिरात रोटेशन रजिष्टरची तपासनी केली असता रोटेशन रजिष्टरवर विविध वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीची नोंद घेण्यात आली नाही . माहे जानेवारी व फेब्रुवारी 2013 मध्ये प्रकाशित झालेल्या व माहे मार्च 2013 मध्ये शोधन केलेल्या एकुण 49 जाहिरातीपैकी रोटेशन रजिष्टरमध्ये विभागीय स्तरावरील वर्तमान पत्रात फक्त 12 व स्थानिक वर्तमानपत्रात 14 अशा एकुण 26 जाहिरातीची नोंद घेण्यात आली . उर्वरीत जाहिरातीची नोंद घेण्यात आली नाही . नोंद घेतलेल्या जाहिरातीपैकी एकुण 10 जाहिरातीची नोंद पेंसील ने घेतलेली आढळुन आली. यावरून रोटेशन रजिष्टर नियमित भरले जात नसल्याचे दिसुन येते.

2. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र .पीयुबी-1000/प्र.क्र.73/2000/34 दिनांक 1-5-2001 तील जोडपत्र अ शासकिय जाहिरात वितरण धोरण 2001 नियमावली तील अ .क्र. 7 नुसार वर्तमानपत्रात जाहिरात देतांना जाहिरातीचे वाटप त्या त्या वर्गातील वृत्तपत्रामध्ये समान प्रति कॉलम सें.मी.च्या तत्वावर करण्यात यावे. कोणत्याही एका वृत्तपत्राला किंवा वृत्तपत्राच्या एका गटाला वर्गीकृत जाहिरातीच्या वितरणाबाबतीत विषेश प्राधान्य दिले जाणार नाही . असे नमुद असतांना वरील प्रमाणे एकाच वृत्तपत्रांना जास्तीत जास्त जाहिराती दिल्याचे दिसुन येते.

3. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पीयुबी-1000/प्र.क्र.73/2000/34 दिनांक 1-5-2001 तील जोडपत्र अ शासकिय जाहिरात वितरण धोरण 2001 नियमावली तील अनुक्रमांक 3-अ नुसार वर्गीकृत जाहिराती वृत्तपत्राकडे परस्पर न पाठविता ती जिल्हा माहिती व जनसंपर्क कार्यालय यांचेमार्फतच वर्तमानपत्राकडे पाठविणे आवश्यक असतांना पालिकेने सर्वच जाहिराती नियमबाहय परस्पर वृत्तपत्राकडे पाठविल्याचे दिसुन येते.

4. वरील प्रमाणकाव्दारे प्रशिध्द केलेल्या जाहिरातीमधील अ.क्र. 7 नुसार आदेशामध्ये नमुद केलेल्या आकारमानापेक्षा वृत्तपत्रामध्ये जादा आकाराची जाहिरात प्रशिध्द करण्यात आली . दिनांक 1 मे 2001 च्या शासन निर्णयातील परिशिष्ट अ च्या परिच्छेद क 16 ई नुसार वृत्तपत्रात प्रशिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीत आदेशात नमुद करण्यात आलेल्या आकारापेक्षा अधिक आकारात वृत्तपत्रांनी जाहिरात प्रशिध्द केल्यास संबंधीत शासकिय कार्यालयाने शासनाने ठरवुन दिलेल्या आकाराचेच देयक अदा करण्यात यावे . परंतु मनपाने अधिक आकारात प्रशिध्द केलेल्या जाहिरातीचे पुर्णत : प्रदान केले त्यामुळे मनपाला आर्थिक नुकसान सहन करावे लागले . अधिक आकारात दिलेल्या जाहिरातीचे अतिरीक्त केलेले प्रदान जवाबदारी निश्चित करून संबंधीताकडुन रक्कमेची वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

5. जाहिरातीची देयके चुकती करण्यासाठी पाठवितांना त्या देयकावर तिसरी प्रत माहिती व जनसंपर्क



Scanned by CamScanner

कार्यालयाकडे पाठविण्यात आली आहे अशा प्रकारचे पत्र वृतपत्रानी ज्या विभागाची जाहिरात असेल त्या विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे . अन्यथा देयकाची रक्कम चुकती करण्यात येवू नये . असे 1मे2001च्या शासन निर्णयातील परिशिष्ट अ च्या अ .क्र. 8 मध्ये नमुद असतांना उक्त कार्यवाही करण्यात आली नाही.

6. 1 मे 2001 च्या शासन निर्णयातील परिशिष्ट अ च्या अ .क्र. 21 नुसार जिल्हा माहिती कार्यालयाकडुन वृतपत्रांना वितरीत करण्यासाठी किमान 10 दिवस आधी संबंधीत कार्यालयाकडे पाठविणे प्रत्येक कार्यालयांना बंधनकारक राहील. असे असतांना जिल्हा माहिती कार्यालयाकडे जाहिरात 10 दिवस आधी पाठविण्यात आली नाही.

7. सर्व जाहिरातीमध्ये माहिती व जनसंपर्क कार्यालयाचा लोगो /लामणदिवा छापणे बंधणकारक असतांना कोणत्याही जाहिरातीमध्ये माहिती व जनसंपर्क कार्यालयाचा लोगो छापण्यात आला नाही . त्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झाले असतांना सुध्दा देयकाचे प्रदान नियमबाहयरित्या करण्यात आल्याचे दिसुन येते.

8. वृतपत्रांना दिलेल्या जाहिरातीच्या आदेशामध्ये जाहिरात कोणत्या दिनांकास प्रकाशित करणे आहे . याबाबतचा उल्लेख आदेशामध्ये नमुद नाही.

9. जाहिरातीच्या आदेशामध्ये नमुद केलेल्या आकारमानापेक्षा वृत्तपत्रांनी जादा आकाराच्या जाहिराती प्रकाशित करण्यात आल्या त्यामुळे मनपाला जादा आर्थिक भुर्दंड सोसावा लागला. जादा आकारमानाची जाहिरातीचे रूपये 9141/- वसुल करण्यात यावे.

10. सन 2012-13 मध्ये जाहिरातीवर विभागनिहाय झालेल्या प्रमाणकानुसार खर्चाची माहिती अर्धसमास पत्र क्रमांक 17 दिनांक 30-04-2015 नुसार मागणी केली असता सदर माहिती सादर केली नाही. त्यामुळे लेखा आक्षेपामध्ये संपुर्ण आर्थिक वर्षात नियमबाहयपणे प्रदानाची रक्कम परिगणीत करता आली नसल्यामुळे मनपाने सदरील रककमेची चौकशी करून वसुलात आणावी . सबब उपरोक्त प्रमाणकाव्दारे प्रदान दर्शविलेली एकुण रक्कम रूपये 99669/- आक्षेपात ठेवण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No : 1, Hum No : 17)

### 6 झेरॉक्स बाबत झालेल्या अनियमिततेबाबत.

0

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 07**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 410193.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 410193.00/-



Scanned by CamScanner

***झेरॉक्स खर्चाच्या निविदेप्रक्रियेमध्ये अनेक नियमबाहय बाबी आढळल्या आहेत. त्यामुळे सदर प्रदानाची एकूण रक्कम रूपये 410193/- वसुल होणे आवश्यक आहे.***

| प्र. क्र. | दिनांक | रक्कम | माहे | कॉपी | बिल क्र./दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1512 | 1-3-2013 | 37257 | डिसेंबर 2012 | 101974 | नाही/1-1-2013 |
| 1513 | 1-3-2013 | 21056 | जानेवारी2013 | 57447 | नाही/25-2-2013 |
| 1772 | 30-3-2013 | 13170 | फेब्रुवारी 2013 | 18647 | नाही/26-2-2013 |
| 1769 | 30-3-2013 | 25171 | मार्च 2013 | 27644 | नाही/26-3-2013 |
| 1770 | 30-3-2013 | 24524 | फेब्रुवारी 2013 | बिल नाही, आर्डर शिट नाही, विविध विभागाचे झेरॉक्स काढल्याचे विवरणपत्र नाही. | |
| 1771 | 30-3-2013 | 17840 | 1-3-13ते15-3-13 | 25558 | नाही/22-3-2013 |
| | | | | 231270 | |

सन 2012-13 या वित्तीय वर्षातील कार्यालयीन कामाकरीता झेरॉक्सवर रूपये 410193/- खर्च करण्यात आला. याबाबत दिनांक 12-12-2013 ला दैनिक सन्नाटा चंद्रपुर या वर्तमान पत्रात जाहीरात देवुन दिनांक 19-12-2012 ला निविदा भरण्याची अंतीम तारीख नमुद केली. दिनांक 4-1-2013 ला निविदा उघडण्यात आल्या प्राप्त 3 निविदापैकी कमीतकमी दराची निविदा मे निरज बुक डेपो याची असल्यामुळे त्यांना कामाचे कार्यादेश देण्यात आले . खालील मार्च 2013 या निवडक महिण्याच्या देयकाची तपासनी केली असता खालील अनियमितता आढळुन आल्या.

1) उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय, क्र. भांकस-1088/(2512)/उदयोग-6 दिनांक 2-1-1992 मधील परिशिष्ट 8.3.(अ) नुसार निविदा प्रशिध्द झाल्यानंतर पुरवठादारांना निविदा भरण्यासाठी कमीतकमी तीन आठवडयाचा कालावधी दयावा असे आदेश असतांना निविदा दैनिक सन्नाटामध्ये दिनांक 12-12-2012 ला देवुन एका आठवडयात दिनांक 19-12-2012 ला निविदा भरण्याकरीता नमुद केले. यावरून पुरवठाधारकांना निविदा भरण्याकरीता पुरेपुर कालावधी न दिल्यामुळे झेरॉक्स बाबत जास्तीत जास्त पुरवठाधारकांनी निविदा न भरल्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ महानगरपालीकेला मिळाला नसल्याचे दिसुन आले.

2) पुरवठाधारकांनी सादर केलेला लिफाफा सिलबंद नसल्याचे दिसुन येते तसेच तसेच पुरवठाधारकाची लिफाप्यावर स्वाक्षरी नसल्यामुळे लिफापा त्यांच्यासमोर उघडण्यात आला नाही. याबाबत शासन निर्णय दिनांक 2-1-1992 मधील परिशिष्ट 8.3.(क) नुसार निव्दिा उघडतांना पुरवठाधारकांना त्याची पुर्वसुचना देवुन निविदाधारकासमोर निविदा उघडणे बंधनकारक असतांना तशा प्रकारची नियमबाहय कार्यवाही करण्यात आली. निविदा भरण्याकरीता 8 दिवस व उघडण्याकरीता 16 दिवस कां लागले याचा समर्थनिय खुलासा सादर केला नाही.

3) झेरॉक्स विविध विभागामार्फत काढण्यात येत असते परंतु झेरॉक्स कशाच्या काढल्या तसेच किती



Scanned by CamScanner

काढल्या व सदर नोंदवहीवर विभाग प्रमुखाची स्वाक्षरी असल्याची विभागनिहाय नोंदवही सादर करण्याकरीता अर्धसमासपत्र क्रमांक 13 दिनांक 18-4-2015 ला मागणी केली असता नोंदवही सादर न करता ती ठेवण्यात आली नसल्याचे मौखीकरीत्या सांगण्यात आले . यावरून प्रत्यक्षांत विभागाने वर्षात किती व कोणत्या दस्ताऐवजाच्या झेरॉक्स काढण्यात आल्या हे महानगर पालीकेकडे माहिती उपलब्द नसल्यामुळे मे. निरज बुक डेपो यांनी सादर केलेल्या विवरण पत्र हेच ग्राहय मानुन त्याप्रमाणे रकमेचे शोधन केल्याचे दिसुन येते . विभागनिहाय झेरॉक्स नोंदवही सादर करावी . तोपर्यंत झेरॉक्संवर केलेला खर्च रूपये 410193/- लेखापरीक्षणास तात्पुरता अमान्य करण्यात येत आहे.

4) सन 2012-13 मधील माहे मार्च 13 या एक महिण्यात 231270 प्रती झेरॉक्स काढल्याचे आढळुन आले. यावरून प्रतीमाह 2 लाख पेक्षा अधिक झेरॉक्स कॉपी काढुन त्यावर वर्षात 4 लाखावर खर्च होत असल्यास मनपाने झेरॉक्स मशिन खरेदी केल्यास मनपाच्या खर्चात कपात होवुन आर्थिक लाभ होईल.

5) सन 2012-13 या वित्तीय वर्षात झेरॉक्सवर रूपये 410193/- खर्च करण्यात आला . वित्तिय वर्षात रूपये 2 लाखावर खर्च होत असल्यास शासन नियमानुसार निविदा जाहीरात एक वर्तमान पत्र विभागीय स्तरावरील व एक स्थानिक वर्तमान पत्रात देणे आवश्यक असतांना दिनांक 12-12-2013 ला दैनिक सन्नाटा चंद्रपुर या स्थानिक वर्तमान पत्रात जाहीरात देवुन खुल्या बाजारपेठेचा फायदा मनपाला झालेला नाही . विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रात जाहीरात न देता स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आल्या.

6) वरील प्रमाणक क्रमांक 1770 ची तपासनी केली असता देयकासोबत मे . निरज बुक डेपो यांचे माहे फेब्रुवारी 2013 चे बिल नस्ती व देयकासोबत जोडण्यात आले नाही . देयकासोबत कार्यालयाने खर्च मंजुर केल्याची टिपणी जोडण्यात आली नाही . सदर प्रमाणकामध्ये रूपये 24524 चा खर्च केला असुन सदर खर्चाचे किती झेरॉक्स काढले याचे तपशिलवार विवरण पत्र देयक व नस्तीसोबत जोडण्यात आले नाही. त्यामुळे माहे फेब्रुवारी 2013 मध्ये केलेला खर्च रूपये 24524/- लेखापरीक्षणास तात्पुरता अमान्य करण्यात येत आहे.

7) उपायुक्त मनपा चंद्रपुर यांचे पत्र क्र . चंशमनपा/साप्रआ/2727/12 दिनांक 12-12-2012 अन्वये दैनिक सन्नाटा या वर्तमान पत्रात जाहीरात कमीतकमी जागेत प्रशिध्द करण्या यावी . असे नमुद करण्यात आले. परंतु कमीतकमी जागेबाबत जाहीरातीचा आकार नमुद केलेला नाही . त्यामुळे वर्तमान पत्रे जाहीरात जास्तीत जास्त जागेत देण्यात येत असते . दैनिक सन्नाटा या वर्तमानपत्रात झेरॉक्सची जाहीरातीचा आकार 24X16 सेंमी. छापण्यात आली. यावरून वर्तमानपत्राने जाहीरात मोठया जागेत छापल्यामुळे मनपाला आर्थिक नुकसान झाले.

वरील अनियमिततेमुळे महानगर पालिकेला आर्थिक नुकसान झाले. त्यामुळे झेरॉक्सवर सन 2012-13 मध्ये झालेला खर्च रूपये 410193 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.





Scanned by CamScanner

## 7 परिभाषित अंशदान निवृती वेतन योजनेमधील नियमबाहय अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
अनियमितता संख्या : 03

मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 93ई
गुंतलेली रक्कम रु. 1803822.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1803822.00/-

**मनपाने दिनांक 1 नोव्हेंबर 2005 पासुन 84 कर्मचा-याची नियुक्ती करण्यात आले परंतु कर्मचारी नियुक्त झाल्याच्या दिनांकापासुन माहे मे 2012 पर्यंत DCPS ची रक्कम कपात करण्यात आली नाही. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक:अंनियो1008/18/सेवा-4 दिनांक 25-3-2008 नुसार भनिनिचे नमुद व्याजानुसार DCPS च्या रकमेवर व्याज आकारणे आवश्यक असतांना मनपाने सन 2012-13 ला बचत खात्यात रक्कम गुंतवल्यामुळे कमी व्याजामुळे मनपाला रुपये 86,584/- नुकसान झाले.**

केंद्र शासनाने परिभाषित अंशदान निवृती योजना(Defined Contribution Pension System) दिनांक 22 डिसेंबर 2003 पासुन लागू केली आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनाच्या सेवेत नव्याने दिनांक 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त् होणा-या कर्मचा-यांना ज्यांना महाराष्ट्र नागरी सेवा(निवृतीवेतन)नियम 1982 नुसार अस्तित्वात असलेली निवृतीवेतन योजना व भविष्य निर्वाह निधी योजना लागु आहे अशा संस्थांना परिभाषित अंशदान निवृती योजना राज्य शासनाचे वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अंनियो 1005/126/सेवा-4 दिनांक 31 ऑक्टोबर 2005 अन्वये दिनांक 1 नोव्हेंबर 2005 पासुन लागु करण्यात आली.

सदर योजना महानगरपालिकेने स्थायी सभेचा ठराव क्रमांक 04 दिनांक 19.04.2012 अन्वये योजना लागु करण्याकरीता मंजुरी प्रदान करण्यात आली. त्यानुसार मनपाचे प्राधिकृत अधिकारी यांचे शाखा प्रबंधन ओरीएन्टल बॅंक ऑफ कामर्स, चंद्रपुर यांना पत्र क्रमांक चंशमनपा/लेखा/ 511/2012 दिनांक 24-5-2012 अन्वये परिभाषित अंशदान निवृती वेतन योजनेअंर्तत मनपा कर्मचा-यांचे आहरित न करता येण्याजोगा संयुक्त खाते उघडुन त्यामध्ये दरमहा प्रत्येकी कर्मचा-याचे अंशदान जमा करण्यात यावे तसेच चंद्रपुर मनपा यांच्या तितकाच सहभाग त्यांचे खात्यात जमा करण्याची कार्यवाही करण्याकरीता निर्देशित केले. त्यानंतर माहे मे 2012 पासुन परिभाषित अंशदान निवृती वेतन योजनेची रक्कम बॅंक खात्यात खालील प्रमाणे जमा करण्यात आली.



Scanned by CamScanner

| महिना | धनादेश क्र./दिनांक | बँकेत जमा केलेली रक्कम | कर्मचारी संख्या | बँकेत धनादेश जमा केल्याचे पत्र क्रमांक/व दिनांक | बँकेत जमा केल्याचा दिनांक | बँकेत उशिरा जमा केल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| मे 2012 | 609455/18-6-2012 | 154202 | 84/77 | चंशमनपा/साप्रअ/ | 4-7-2012 | 34 |
| | 931890/18-6-2012 | 6582 | 3 | 877दि.29 6-12 | | |
| जुन 2012 | 698692/9-7-2012 | 156216 | 77 | 1114/18-7-12 | 20-7-2012 | 20 |
| | 931900/18-7-2012 | 6582 | 3 | 1130/18-7-12 | | |
| जुलै 2012 | 698715/8-8-2012 | 159692 | 80 | 1509/17-8-12 | 24-8-2012 | 24 |
| | 010634/9-8-2012 | 6582 | 4 | --"-- | | |
| ऑगष्ट 2012 | 698748/18-9-2012 | 165920 | 80 | 1964/29-9-12 | 28-9-2012 | 28 |
| | 010651/14-9-2012 | 6582 | 3 | --"-- | | |
| सप्टेंबर 2012 | 010601/9-10-2012 | 6582 | 92/3 | 2122/11-10-12 | 21-11-2012 | 51 |
| | 698713/7-11-2012 | 186754 | 87 | 2446/17-11-12 | | |
| ऑक्टोबर2012 | 010670/7-11-2012 | 6582 | 3 | 2447/17-11-12 | 29-12-2012 | 60 |
| | 698790/17-12-2012 | 176432 | 86 | 2864/24-12-12 | | |
| नोव्हेंबर 2012 | 010695/10-12-2012 | 6858 | 3 | 2864/24-12-12 | 8-1-2013 | 39 |
| | 806333/1-1--2013 | 183768 | 86 | 3000/4-1-13 | | |
| डिसेंबर 2012 | 806354/19-1-2013 | 185932 | 87 | 3279/21-1-13 | 31-1-2013 | 31 |
| | 010705/23-1-2012 | 6858 | 3 | 3346/29-1-13 | | |
| जानेवारी 2013 | 806385/18-2-2013 | 186188 | 87 | 3580/20-3-2013 | 25-2-2013 | 25 |
| | 010715/11-2-2013 | 6858 | 3 | | | |
| फेब्रुवारी 2013 | 806417/15-3-2013 | 181794 | 85 | 3992/20-3-2013 | 21-3-2013 | 21 |
| | 010725/15-3-2013 | 6858 | 3 | | | |
| | एकुण- | 18,03,822 | | | | |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक:अंनियो 1007/18/सेवा-4 दिनांक 7-7-2007 मधील परिच्छेद 6(ड) अन्वये कर्मचारी ज्या महिण्यात नियुक्त झालेला असेल त्याच्या पुढील महिण्याच्या वेतनातुन परिभाषित अंशदान निवृत्ती योजनेच्या अंशदानाची कपात करण्यात यावी. परंतु मनपा चंद्रपुर मध्ये दिनांक 1-11-2005 नंतर व माहे मे 2012 पर्यंत एकुण 84 कर्मचा-याची नियुक्ती करण्यात आली परंतु त्या कर्मचा-याच्या वेतनातुन नियुक्तीच्या पुढील महिण्याच्या वेतनातुन अंशदानाची कपात न करता माहे मे 2012 देय जुन 2012 पासुन अंशदानाची कपात केली.

2. शासन निर्णय दिनांक 7-7-2007 मधील परिच्छेद 16 नुसार कर्मचारी ज्या महिण्यात नियुक्त झालेला असेल त्याच्या पुढील महिण्यापासुन करावयाची कर्मचा-याच्या अंशदानाच्या थकबाकीची वसुली समान मासिक हप्त्यामध्ये नियमित मासिक अंशदानाच्या वसुली सोबत करण्यात यावी. प्रत्येक महिण्याच्या अंशदानासाठी स्वतंत्र अनुसुच्या जोडण्यात याव्या. प्रत्येक कर्मचा-याच्या



Scanned by CamScanner

बाबतीत अंशदानाची सर्व थकबाकी पुर्णपणे वसुल होईपर्यंत अशा प्रकारच्या अंशदानाच्या दोन हप्त्याची वसुली ठेवण्यात यावी परंतु मनपा चंद्रपुरने माहे मे 2012 पासुन एकाच महिण्याच्या अंशदानाची वेतनातुन वसुली केली परंतु थकबाकीची वसुली करण्यात आली नाही.

3. कर्मचा-याच्या बॅंक खात्यात वर्ष अखेरपर्यंत जमा केलेले अंशदान व मनपाचे सममुल्य अंशदान त्या वित्तीय वर्षात वित्त विभाग शासन निणय क्रमांक: अंनियो/1008/18/सेवा-4 दिनांक 25-3-2008 नुसार जमा झालेल्या एकत्रित रकमेवर भविष्य निर्वाह निधीकरीता ठरविण्यात आलेल्या दराने व्याज देण्यात यावे. सन 2012-13 या वित्तीय वर्षात भनिनिचे व्याज दर 8.8% दरानुसार गुंतवलेल्या 18,03,822 रकमेवर व्याज 158736/- अपेक्षीत असतांना सदर रक्कम ओरिएन्टल बॅंक ऑफ कॉमर्स शाखा चंद्रपूरमध्ये बचत खात्यात गुंतविली. सदर बॅंकेचा सन 2012-13 मध्ये बचत खात्याचा व्याजाचा वार्षिक दर 4% असल्यामुळे मनपाला रूपये 86584/- कमी व्याज प्राप्त झाल्यामुळे मनपाला आर्थिक नुकसान झाले.

कर्मचारी सेवानिवृत झाल्यानंतर त्यांना निवृती वेतनाची एकमुस्त रक्कम मिळणार नसल्यामुळे कर्मचा-याच्या कुटुंबीयांना आर्थिक लाभ होणार नाही. सदर कृती नियमबाहय असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सन 2012-13 मध्ये परिभाषित अंशदान निवृती योजनेतील बॅंकेत जमा केलेली रक्कम रूपये 1803822/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No : 5, Hmr No: 30

## *8 श्री. महेन्द्र बब्बुजी हजारे, आरोग्य निरीक्षक यांचे चुकीचे वेतननिश्चितीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 275074.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 275074.00/-

***मनपा चंद्रपूर येथील स्वच्छता विभागातील आरोग्य निरीक्षक श्री. महेन्द्र बब्बुजी हजारे यांचे दिनांक 01/07/2009 पासूनच्या वेतनवाढी व त्यापुढील पदोन्नतीमधील वेतननिश्चिती चुकीची झाल्याने त्यांना अतिप्रदान झालेले आहे.***

प्रमाणक क्र.875 दिनांक-15/03/2013 रक्कम-275074



Scanned by CamScanner

स्वच्छता विभागातील श्री. महेन्द्र बब्बुजी हजारे, आरोग्य निरीक्षक हे दि. 7-1-2000 ला सफाई कामगार या पदावर रुजू झाले असता त्यांचे दिनांक 1-1-2006 ला विद्यमान वेतनश्रेणी रु. 2550-55-2660-3200/- मध्ये रु. 2900/- वेतन होते. सदर वेतनवर सहाव्या वेतन आयोगानुसार दिनांक 1-1-2006 ला वेतनबँड रु. 4440-7440/- रु. 1300/- ग्रेडवेतन मध्ये खालीलप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात आले.

दिनांक 1-1-2006 ला निश्चित केलेले वेतन रु. 5400 + रु. 1300 ग्रे.वे.

वेतनवाढ दि. 1-7-2006 ला वेतन - रु. 5400 + रु. 1300 ग्रे.वे. = रु. 6700 वर 3% वेतनवाढ

रु. 210 एकूण रु. 5610 + रु. 1300 ग्रे.वे.

दि. 1-7-2007 - रु. 5610 + रु. 1300 ग्रे.वे. = रु. 6910 वर 3% वेतनवाढ

रु. 210 एकूण रु. 5820 + रु. 1300 ग्रे.वे.

दि. 1-7-2008 - रु. 5820 + रु. 1300 ग्रे.वे. = रु. 7120 वर 3% वेतनवाढ

रु. 220 एकूण रु. 6040 + रु. 1300 ग्रे.वे.

दि. 1-7-2009 - रु. 6040 + रु. 1300 ग्रे.वे. = रु. 7340 वर 3% वेतनवाढ

रु. 220.20 i.e. रु. 230 एकूण रु. 6270 + रु. 1300 ग्रे.वे.

<u>(चुकीचे आहे)</u>

दि. 1-7-2010 - रु. 6270 + रु. 1300 ग्रे.वे. = रु. 7570 वर 3% वेतनवाढ

रु. 230 एकूण रु. 6500 + रु. 1300 ग्रे.वे.

दि. 1-7-2011 - रु. 6500 + रु. 1300 ग्रे.वे. = रु. 7800 वर 3% वेतनवाढ

रु. 240 एकूण रु. 6740 + रु. 1300 ग्रे.वे.

श्री. हजारे यांना कार्या. आदेश क्र. चशमनपा/ साप्रआ/29/013 दि. 3-4-2013 अन्वये दि. 6-1-2012 <u>(चुकीचे आहे)</u> पासून वेतनबॉन्ड रु. 4440-7440 + रु. 1600 ग्रेड वेतन मध्ये कालबद्ध पदोन्नती अंतर्गत वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आला असता खालीलप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात आली आहे.

दि. 6-1-2012 ला वेतन - रु. 6740 + रु. 1300 ग्रे.वे. = रु. 8040 वर 3% वेतनवाढ

रु. 250 एकूण रु. 6990 + रु. 1600 ग्रे.वे.

वेतनवाढ दि. 1-7-2012 ला वेतन - रु. 6990 + रु. 1600 ग्रे.वे. = रु. 8590 वर 3% वेतनवाढ

रु. 260 एकूण रु. 7250 + रु. 1600 ग्रे.वे. <u>(चुकीचे आहे)</u>

वेतनवाढ दि. 1-7-2013 ला वेतन - रु. 7250 + रु. 1600 ग्रे.वे. = रु. 8850 वर 3% वेतनवाढ

रु. 270 एकूण रु. 7520 + रु. 1600 ग्रे.वे.

श्री. हजारे यांनी ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गवर्णमेंट येथून माहे डिसेंबर 2011 ला झालेल्या व दिनांक 19-3-2012 ला घोषित निकालानुसार सैनिटरी इन्स्पेक्टर डिप्लोमा कोर्स अभ्यासक्रम उत्तीर्ण केल्यामुळे त्यांना कार्या. आदेश क्र. चशमनपा/ साप्रआ/468/2014 दि. 21-5-2014 अन्वये वेतनबॉन्ड रु. 5200-20200 + रु. 2400 ग्रेड वेतन मध्ये स्वच्छता निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आल्यामुळे त्यांचे विकल्पांवन्ये खालीलप्रमाणे वेतननिश्चित करण्यात आले.

नियमित वेतनवाढ दि. 1-7-2014 ला वेतन - रु. 7520 + रु. 1300 ग्रे.वे. = रु. 8820 वर 3% वेतनवाढ

रु. 270 एकूण रु. 7790 + रु. 1300 ग्रे.वे.

दि. 1-7-2014 ला पदो. पदावर वेतननिश्चिती- रु.7790 + रु. 1300 ग्रे.वे. = रु. 9090 वर 3% वेतनवाढ

(विकल्पानुसार) रु. 280 एकूण रु.8070+रु.2400 ग्रे.वे.<u>(विकल्प आढळला नाही)</u>



Scanned by CamScanner

पुढील वेतनवाढीचा दि. 1-7-2015 राहील.

वरनमुद् केलेल्या वेतननिश्चिती व वेतनवाढीमध्ये कंसात दर्शविल्याप्रमाणे दि. 1-7-2009 ला दिलेली वेतनवाढ चुकीची आहे. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. वेपूर 1209/प्र.क.69/सेवा-9 दि. 5-5-2010 परी.क्र.2.5 मध्ये नमुदनुसार 3% वेतनवाढीची परिगणना करतांना 1 रु. व त्यापुढील रक्कम 10 च्या पटीत घेण्यात येऊन 99 पैसे व त्यापेक्षा कमी पैसे दुर्लक्षित करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत. त्यामुळे दि.1-7-2009 ला 3% वेतनवाढीची रक्कम रु. 220.20 अशी परीगणित होत असल्यामुळे ती रु. 230 ऐवजी 20 पैसे दुर्लक्षित करून रु. 220 पुर्णांकित करून तेवढीच वेतनवाढ देणे आवश्यक असल्यामुळे संबंधितांना रु. 10 प्रतीमाहप्रमाणे लेखापरीक्षणापर्यंत अतिप्रदान झालेले आहे. त्याचप्रमाणे संबंधित कर्मचारी न.प./मनपा चे सेवेत दि. 7-1-2000 ला रुजू झालेले असल्यामुळे त्यांची 12 वर्षाची संतत सेवा दि. 6-1-2012 ला पूर्ण होते व त्यांना दि. 7-1-2012 ला कालबद्ध पदोन्नतीअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी देय ठरते. त्यामुळे त्यांना दि.6-1-2012 ला दिलेली व कालबद्ध पदोन्नतीअंतर्गत केलेली वेतननिश्चिती चुकीची असून एक दिवस ज्यादा प्रदान झालेले आहे. तसेच संबंधितांना वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन निश्चित केल्यानंतर पुढील वेतनवाढ दि. 1-7-2012 ला मंजूर करण्यात आली आहे. शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र. वेपूर 1209/प्र.क.20/सेवा-9 दि.22-4-2009 मधील नियम क्र. 10 अन्वये पदोन्नतीत वेतन निश्चित केल्यानंतर 6 महिने किंवा त्यापेक्षा जास्त सेवा झाली असल्यास पुढील वेतानाढ दि. 1 जुलै 2012 ला देय ठरते. संबंधित कर्मचारी दि. 6-1-2012 ला पदोन्नत झाल्यामुळे व त्याची 30 जून 2012 पर्यंत पदोन्नत पदावरील सेवा 6 महिने पूर्ण होत नसल्यामुळे त्याला पुढील वेतनवाढ दि. 1-7-2013 ला देय ठरते. त्यामुळे विभागाने दि. 1-7-2012 ला मंजूर केलेली वेतनवाढ चुकीची असून संबंधिताना 1 जुलै 2012 पासून लेखापरीक्षणापर्यंत एका वेतनवाढीच्या रक्कमेचे जादा प्रदान झालेले आहे. त्याचप्रमाणे संबंधितांना दि. 21-5-2014 ला आरोग्य निरीक्षक पदावर पदोन्नती दिली असता संबंधितांची विकल्पन्वये वेतननिश्चिती केलेली आहे. तथापि संबंधितांनी दिलेला विकल्प सेवा पुस्तकात आढळून आला नाही. त्यामुळे मनपाने स्वीकृत केलेला विकल्प लेखापरीक्षणास पडताळणीस उपलब्ध करवून द्यावा.अन्यथा पदोन्नतीच्या दिनांकास सुधारित वेतननिश्चिती करून संबंधितांकडून अतिप्रदानाची रक्कम वसूल करावी.

तरी संबंधितांचे सेवा पुस्तकातील वेतनाच्या नोंदींचे पुनर्विलोकन करून दि. 1-7-2009 पासून सुधारित वेतननिश्चिती करावी व देय/आहरीत वेतनाचे विवरणपत्र तयार करून संबंधितांना विभागाने केलेल्या चुकीच्या वेतननिश्चिती/वेतनवाढीमुळे झालेल्या अतिप्रदानाची वसुली केल्याचे लेखापरीक्षणास सप्रमाण अनुपालन सादर करावे.

सदर लेखाआक्षेप अर्ध समाज पत्र क्र. 32 दि. 27-05-2015 चे अनुषंगाने आवश्यक अनुपालन अप्राप्त असल्याने घेण्यात येते.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 275074 |
| गुंतलेली रक्कम | 275074 |

DATPVKM6101 (Ref No : 17, Hmm No : 3)

## 9 विमानाने केलेल्या नियमबाहय प्रवासाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
अनियमितता संख्या : 03



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 98706.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 71788.00/-

*मुंबई नागरी सेवा नियम 1959 मधील नियम 417-ब आणि 490 व महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक-1010/प्र.क्र.2/सेवा-5 दिनांक 3 मार्च 2010 अन्वये सचिवापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांना विमान प्रवास अनुज्ञेय अनुज्ञेय नाही. न्यायालयीन तसेच विधीमंडळ कामकाजासाठी विमान प्रवास अनुज्ञेय राहील. अपवादात्मक परीस्थितीत परत येणे तातडीचे असेल तर प्रशासनिक विभागाच्या सचिवाच्या लेखी पुर्व परवानगीने विमान प्रवास करता येईल असे निर्देश असतांना त्यांची अंमलबजावणी न केल्यामुळे झालेला खर्च रुपये 71,788 वसुलपात्र ठरतो.*

सन 2012-13 या वित्तीय वर्षात मनपाचे मुख्याधिकारी, आयुक्त, उपायुक्त यांनी नागपूर ते मुंबई व परत असा प्रवास नगर प्रशासन मंत्रालय मुंबई व इतर मंत्रालयातील विभागातील बैठकीला उपस्थित राहण्याकरीता खालील अधिकारी यांनी विमानाने प्रवास केला.

| प्र.क्र./दिनांक | रक्कम | अधिकाऱ्याचे नाव/पदनाम | तपशिल | विमानाचे टिकीट |
|---|---|---|---|---|
| 179/11.5.2012 | 9408 | रविंद्र देवतळे, मुख्याधिकारी | दिनांक 21.5.2011 सचिव यांनी सचिव लेवल बैच करीता आयोजीत बैठकीला उपस्थित. | 3384 |
| 180/ –"– | 10053 | –"– | दिनांक 16.8.2011 संचालक न.पा. प्रशासन यांनी UIDSSMT योजनेच्या बैठकीला उपस्थित. | 3384 |
| 181/ –"– | 6281 | –"– | दिनांक 6.9.2011 मंत्रालय कक्षात रामाळा तलावासंबंधी आयोजीत सभेस उपस्थित. | 4076 |
| 182/ –"– | 5612 | –"– | दिनांक 17.9.2011 LB संस्था यांनी टुलकिट विषयावर आयोजीत कार्यशाळेला उपस्थित. | 3558 |
| 183/ –"– | 5911 | –"– | दिनांक 20.11.2011 राज्यमंत्री न.वि.विभाग यांचे कार्यालयात व्यापार इमारत लिलाव चर्चेस उपस्थित. | 3673 |
| 184/ –"– | 6671 | –"– | दिनांक 1.10.2011 MUIDCL येथे IRDP सभेस उपस्थित | 3720 |
| 185/ –"– | 5595 | –"– | 3.11.2011 IRDPबाबत MUIDCL येथे | 3636 |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | सभा व IHSDP योजनेचे प्रशिक्षण | |
| 186/ --"-- | 5570 | --"-- | दिनांक 7.1.2012 संचालक न.पा. प्रशासन यांच्या कार्यालयात अग्नी सुरक्षा विषयावरील बैठकीला उपस्थित | 3806 |
| 187/ --"-- | 4843 | --"-- | दिनांक 7.4.2012 प्रधान सचिव न.वि.विभाग यांनी विकास योजना छाननी सभेस उपस्थित. | 2789 |
| 390/ 13.7.2012 | 8664 | प्रकाश बोखड, आयुक्त | दिनांक 14.6.2012 सचिव न.वि.विभाग यांचेकडील बैठकीला उपस्थित. | 4187 4187 |
| 684/ 1.9.2012 | 9567 | --"-- | दिनांक 17.8.2012 न.वि.विभाग येथे LB.संस्था करासंबंधी सभेस उपस्थित. | 4353 4634 |
| 929/18.10.2012 | 10582 | रविंद्र देवतळे, उपायुक्त | दिनांक 26.4.2012 मुख्य सचिव न.वि.विभागामध्ये UIDSSMT योजनेसंबंधीत बैठकीला उपस्थित. | 8542 |
| 930/ --"-- | 9949 | प्रकाश बोखड, आयुक्त | दिनांक 6.10.2012 मुख्य सचिव न.वि.विभागामध्ये UIDSSMT बाबत सभेस उपस्थित. | 4330 4329 |
| | 98,706 | | एकुण- | 71,788 |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. मुंबई नागरी सेवा नियम 1959 मधील नियम 417-ब आणि 490 व महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक-1010/प्र.क्र.2/सेवा-5 दिनांक 3 मार्च 2010 अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक-1010/प्र.क्र.2/सेवा-5 दिनांक 23 जुन 2010 अन्वये सचिवापेक्षा कमी दर्जाच्या अधिका -यांना विमान प्रवास अनुज्ञेय राहणार नाही. असे स्पष्ट निर्देश असतांना वरील अधिकारी हे सचिव दर्जाचे नसतांना त्यांनी केलेला विमान प्रवास अनुज्ञेय नाही.

2. उपरोक्त आदेश दिनांक 23 जुन 2010 अन्वये न्यायालयीन तसेच विधीमंडळ कामकाजासाठी व इतर कोणत्याही साधनाने /मार्गाने वेळेत पोहोचने शक्य नसल्यास अशा प्रसंगी संबंधीत प्रशासनिक विभागाच्या सचिवाच्या लेखी पुर्व परवाणगीने विमान प्रवास करता येईल. परंतु देयकाची तपासनी केली असता वरील अधिका -यांनी मंत्रालयातील विविध बैठकीकरीता उपस्थित राहण्याकरीता विमान प्रवास केल्याचे दिसुन यंते . परंतु प्रशासनिक विभागाच्या सचिवाच्या लेखी पुर्व परवानगीने विमान प्रवास केलेला नाही.

3. मा. आयुक्त श्री बोखड यांनी दिनांक 17.8.2012 व 6.10.2012 ला विमानाने जाणे-येणे केल्याचे दिसुन येते परंतु वरील दिनांक 3 मार्च 2010 अन्वये अपवादात्मक परीस्थितीत परत येणे तातडीचे असेल तर प्रशासनिक विभागाच्या सचिवाच्या लेखी पुर्व परवाणगीने विमान प्रवास करता ये ईल. असे असतांना शासनाची पुर्व परवाणगी न घेता परतीचा विमान प्रवास करण्यात आला.



Scanned by CamScanner

वरील बाबीमुळे शासनाच्या आदेशाचे स्पष्ट उल्लंघन करुन विमान प्रवास केल्याचे दिसुन येते . वरील बाबीमुळे विमानाने केलेला खर्च रुपये 71,788/- नियमबाहय ठरतो.

DATSSKM6702 (Ref No : 24, Hmm No : 87)

*10 रजेवर/गैरहजर असलेल्या कर्मचा-यांची नोंद सेवा पुस्तकात घेतल्या जात नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 0**

*अनियमितता कलम : 9अ*

***स्वच्छता विभागातील अनेक कर्मचारी वारंवार अर्ज न देता सतत गैरहजर राहतात. याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 चे नियम 38(1) नुसार प्रत्येक प्रत्येक रजेची नोंद त्या त्या वेळी केली पाहिजे. असे असतांना अनेक कर्मचा-याची गैरहजेरीची नोंद सेवापुस्तकात घेतली नाही. महाराष्ट्र नागरी सेवा(रजा) नियम 1981 चे नियम 48(2) नुसार कामावर अनुपस्थित राहणारा शासकिय कर्मचारी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र असतांना मनपाचे अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही.***

सन 2012-13 मध्ये स्वच्छता विभागातील सफाई कामगाराचे निवडक सेवापुस्तक हजेरी रजिष्टर सोबत तपासने असता खालील कर्मचा -यांनी विविध कारणाकरीता विनापरवानगी सुटी उपभोगल्या. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 24 दिनांक 15/05/2015 अन्वये खुलासा मागीतला असता संदर कर्मचारी रजेचा अर्ज न देता गैरहजर राहिल्यामुळे त्यांची रजा मंजूर न करता गैरहरी लावून वेतन कपात करण्यात आले . कर्मचारी अर्ज न देता किंवा पुर्व सुचना न देता सतत गैरहजर राहणे ही सेवा व शर्ती नियमाचा भंग करणारी बाब आहे . काही कर्मचारी विनापरवानगी सुटीवर असल्यामुळे त्यांना रूपये रूपये 500/- व 1000/- रूपये दंडाची आकारणी करण्यात आली.

महाराष्ट्र नागरी सेवा(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 चे नियम 38(1) नुसार प्रत्येक प्रत्येक रजेची नोंद त्या त्या वेळी केली पाहिजे . तसेच रजेशिवाय कामावरील प्रत्येक अनुपस्थितीची नोंद सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे . परंतु सुटी/रजेची/अनुपस्थितीची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही. निवृत्ती वेतनाच्या रकमेवर प्रतीकुल परिणाम होवू शकेल अशी सेवेतील प्रतेक घटना सेवापुस्तकात नोंद घेणे आवश्यक आहे . नियम 63(6) नुसार रजेशिवाय अनुपस्थित राहिल्याचा कालावधी भुतलक्षी प्रभावाने असाधारण रजेमध्ये परिवर्तीत करणे आवश्यक आहे . महाराष्ट्र नागरी



Scanned by CamScanner

सेवा(रजा) नियम 1981 चे नियम 48(2) नुसार बुध्दीपुरस्पर कामावर अनुपस्थित राहणारा शासकिय कर्मचारी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरेल. परंतु खालील कर्मचारी वारंवार अनुपस्थित असल्यामुळे त्यांच्यावर मनपाने कोणत्याही प्रकारची शिस्तभंगाची कार्यवाही केलेली नाही . सेवानिवृतीच्या वेळी असाधरण/बिनपगारी रजेचा कालावधी गृहीत धरता येत नसल्यामुळे सेवापुस्तकात रजेच्या नोंद न घेतल्यामुळे गंभीर नियमबाहय बाब असल्याचे दिसुन येते.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | रजेवर असल्याचा कालावधी/महिना 2012-13 | | | | | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एप्रि | मे | जुन | जुलै | ऑ | सप्टे | ऑक्टो | नोव्हे | डिसें | जाने | फेब्रु | मार्च | |
| 1. | प्रिती पपु महातव | 30 | 31 | 0 | 9 | 12 | 30 | 31 | 10 | 0 | 3 | 6 | 6 | 168 |
| 2. | सुशिल चंदा बक्सरीया | 29 | 15 | 22 | 28 | 19 | 30 | 31 | 30 | 31 | 31 | 28 | 9 | 303 |
| 3. | मनोज कुंजीलाल मंजरे | 30 | 31 | 30 | 31 | | 21 | 31 | 30 | 31 | 31 | 28 | 31 | 325 |
| 4. | सुनिल कैलाश समुंद | 17 | 26 | 30 | 31 | 10 | 6 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 123 |
| 5. | सुनिल मिठुलाल किनवरीया | 23 | 27 | 13 | 25 | 14 | 8 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 110 |
| 6. | दिलीप मोहन बक्सरीया | 0 | 0 | 0 | 21 | 13 | 7 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 41 |
| 7. | गोविंद प्र. खोटे | 17 | 13 | 19 | 31 | 31 | 30 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 143 |
| 8. | गिता भुते | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 26 | 31 | 57 |
| 9. | भैया डोर्लीकर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 28 | 0 | 28 |
| 10. | अमरचंद ध दंडेले | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 30 | 31 | 31 | 0 | 0 | 92 |
| 11. | चंदन कन्हई राठोड | 8 | 12 | 23 | 16 | 22 | 30 | 31 | 30 | 20 | 23 | 28 | 31 | 274 |

DATSSKM6702 (Ref No : 45

***11 श्री. श्रीहरी शंकर बनकर, वरिष्ठ लिपिक यांना नियमबाहय वेतनवाढी मंजूर करण्यात आल्यामुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत.***

-

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 1**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***लेखा विभागातील श्री. श्रीहरी बनकर, वरिष्ठ लिपिक यांना नियमबाहय वेतनवाढी मंजूर केल्यामुळे त्यांना अतिप्रदान झालेली रक्कम वसूलपात्र आहे.***



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

चंद्रपूर शहर महानगरपालिका, येथे कार्यरत श्री. श्रीहरी शं. बनकर, वरिष्ठ लिपिक यांचे सेवापुस्तकाची तपासणी केली असता ते दि. 7-9-1983 ला जकात लिपिक या पदावर विद्यमान वेतनश्रेणी रु. 260-10-390-15-465 द.रो. 15-495/- या वेतनश्रेणीमध्ये न.प. चंद्रपूर येथे रुजू झाले. त्यांचे दि. 1-1-1986 ला चवथ्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी रु. 950-20-1150 द.रो. 25-1500/- मध्ये रु. 1030/- वर वेतन निश्चित होऊन त्यांना पुढील वेतनवाढी निर्गमित केल्या. ते दि. 1-9-1991 ला वेतन रु. 1150/- घेत असतांना त्यांना दि. 1-9-1991 ची वेतनवाढ मंजूर करण्यापूर्वी दक्षता रोध ओल्यांडण्याची परवानगी प्राप्त करणे आवश्यक होते. म.ना.से. (वेतन) नियम 1981 मधील नियम 37 नुसार ज्यांना वेतनवाढ रोखून धरण्याचा अधिकार आहे अशा अधिकाऱ्याने वेतनवाढीकरिता दक्षता रोध ओल्यांडण्यास परवानगी दिल्याशिवाय व तसे आदेश केल्यानंतरच संबंधितांना पुढील वेतनवाढ अनुज्ञेय होते.

संबंधितांचे सेवापुस्तकात दक्षता रोध ओल्यांडण्याबाबत अशा प्रकारची परवानगी दिल्याच्या आदेशाची नोंद नसल्यामुळे त्यांना दि. 1-9-92 ला रु. 1150/- या वेतनापुढील वार्षिक वेतनवाढी देय ठरत नाही. त्यामुळे दिनांक 1-9-1992 पासून नियमबाह्यरित्या मंजूर केलेल्या वेतनवाढी तसेच दिनांक 1-1-1996 ला पाचव्या वेतन आयोग व दि. 1-1-2006 ला सहाव्या वेतन आयोगानुसार केलेली सुधारित वेतननिश्चिती व त्याअनुषंगाने निर्गमित केलेल्या वेतनवाढी वसूलपात्र ठरतात.

तरी संबंधितांकडून दि. 1-9-1992 पासून मंजूर केलेल्या वेतनवाढी व त्यावरील देय भत्त्यांची परिगणना करून अतिप्रदान रकमेची वसुली करून आवश्यक विवरणपत्रासह तसे लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

सदर लेखा आक्षेप अर्धसमास पत्र क्र. 106 दि.26-8-2015 नुसार आस्थापना विभागास खुलासा सादर करण्याबाबत लेखी कळविण्यात आले असता लेखापरीक्षण पथकाने मागितलेली माहितीचे अनुषंगाने संबंधित मुद्द्यांबाबत सदर विभागाने समर्पक व परिपूर्ण अनुपालन सादर केले नसल्याने सदर आक्षेप घेण्यात येते.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 0 |
| गुंतलेली रक्कम | 0 |

DATPVKM6101 (Ref No. 64, Item No. 106)

## *12 दैनंदिनी छपाईकरीता महानगरपालिका निधीची हानी करण्याची अनियमितता*

\-

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 98000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 89450.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 8850.00/-

| |
|---|
| ***महानगरपालिकेने आवश्यकतेपेक्षा जादा दैनंदिनी (डायरी) छपाई करून महानगरपालिका निधीची हानी केली*** |



Scanned by CamScanner

आहे त्यामुळे जादा खर्चाची रक्कम रु 7875 वसुल करणे आवश्यक आहे

1) करारनामा दिनांक 21/12/2012

2) पुरवठा आदेश क्रं. 2850 दि. 21/12/2012

3) पुरवठादार - शिवा पब्लिकेशन, चंद्रपूर

4) छपाई नग व दर - 400 नग × 245 रुपये

5) खरेदी - दरपत्रकाव्दारे

6) खर्च - प.क्रं. 1484 दि. 25/2/2013 रु. 9800

याबर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येते.

1) महानगरपालिका चंद्रपूर येथे जवळपास 66 पालिका सदस्य व पदाधिकारी असून विभागातील अधिकारी व विभागप्रमुख जवळपास 34 असल्याने एकूण संख्या जवळपास 100 होते. सदर दैनंदिनीचा वापर शासकीय कामकाजासाठी करावयाचा असल्याने मनपाने पदाधिकारी, पालिका सदस्य, अधिकारी व विभागप्रमुख यांचे करीता दैनंदिनी जवळपास 100 नग छापणे आवश्यक होते. परंतू पुरवठा आदेशानुसार एकूण 400 नग दैनंदिनी ची नियमबाह्यपणे छपाई करण्यात आली. त्यामुळे जवळपास 300 नग दैनंदिनी छपाईकरीता रू. 67500 जादा खर्च करण्यात आला.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय भाख्यंस/1088(2695) उदयोग - 6 दि 16/7/1993 नुसार रू. 50000 व त्यावरील रकमासाठी निवीदा सुचना वृत्तपत्रात प्रसिध्द करावयाची असतांना महानगरपालिकेने नियमबाह्यपणे दरपत्रके बोलावून दैनंदिनीची छपाई केल्याचे आढळले.

3) महानगरपालिका चंद्रपूर अधिनस्त नागरिकांकडून कररुपाने गोळा होत असलेल्या पैशाचा विनियोग महापालिकेच्या पदाधिकारी व अधिकारी वर्गाने विकास कामासाठी करावयाचा असतांना दैनंदिनी छपाईकरीता आवश्यकतेपेक्षा जादा दैनंदिनी छपाई करीता रू. 67500 निष्फळ खर्च केल्याचे दिसून आले.

4) साठा पंजीतील नोंदीनुसार जवळपास 35 डाय-यांचे अदयापही वाटप झाले नाही. त्यामुळे 38 × 225 = 8850 रुपये संबंधित पुरवठादारास प्रदान करूनही व सन 2013 हे वर्ष संपले असतांनाही डाय-यांचे वाटप करण्यात आले नाही. त्यामुळे 38 डाय-यांचा रू. 8850 निष्फळ खर्च झाला आहे.

5) मा. आयुक्त यांनीसुध्दा साठा नोंदवहीची पडताळणी करून खरेदी दैनंदिनीच्या वाटपाबाबतचा आढावा घेतला नाही. तसेच महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकांनीसुध्दा सदरील अवास्तव खर्चाबाबत महापालिकेस ज्ञात केले नाही.

उपरोक्त अभिप्रायावरून सन 2012-13 मध्ये दैनंदिनी छपाईवर आवश्यकतेपेक्षा जास्त खर्च करण्यात येवून रु 8850 एवढया किंमतीच्या दैनंदिनी वाटपच झाल्या नसल्याने हयाबाबत पुरवठा आदेश देणारे संबंधित अधिकारी यांचेकडून सदर रक्कम रू. 8850 वसुल होणे आवश्यक असल्याने उर्वरित रक्कम रू. 89450 आक्षेपित ठेवण्यात येते.

DATBNKM6401 (Ref No. 6, Hami No. 27)

## 13 किटकनाशक व जंतूनाशक व क्लोरीन खरेदीतील अनियमितता



Scanned by CamScanner

चंद्रपुर . महानगरपालिका

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष : भांडार विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 521400.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 500544.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 20856.00/-

***किटकनाशक, जंतूनाशक व क्लोरीन बाबत नियमबाहय पध्दतीने प्रदान करण्यात आले असून कार्यकंत्राटाची रक्कम रु 20856 वसुल करुन शासन लेखाशिर्षात भरणा करणे आवश्यक आहे.***

1) प्र. क्रं. 42 दि. 30/4/2012 रु. 366000 मे. यूनिव्हर्सल केमिकल्स, काटोल

2) पुरवठा आदेश क्रं. 2352 दि. 5/12/2011

3) प्रशासकीय मंजूरी – सयी समिती ठराव क्रं. 72 दि. 5/10/2011

4) बिल क्रमांक – 789 दि. 28/12/2011 रु. 366000

उपरोक्त तपशिलानुसार महानगरपालिकेने सन 2011-12 या वर्षाकरीता खालीलप्रमाणे खरेदी केली असल्याचे आढळून आले.

अ.क्रं. मालाचे नाव परिमाण दर रु. एकूण किंमत रु.

1

2 मॅथलिन 50 C.C.

मिथील 200 लिटर

300 बॅग 370 प्रती लिटर

630 प्रती बॅग 37000

189000

तसेच सन 2011-12 करीता खालीलप्रमाणे क्लोरीनची खरेदी करण्यात आली.

| अ.क्रं. | मालाचे नाव | परिमाण | दर रु. | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | क्लोरीन | 300 बॅग (25Kg/per bag) | 518 प्रती बॅग | 155400 |

1) पुरवठादार – मे. साईनाथ एजन्सी, चंद्रपूर

2) पुरवठा आदेश – क्रं. 2351 दि. 5/12/2011

3) बिल क्रं. – 159 दि. 19/12/2011

4) साठा पंजी – पान क्रं. 10 दि. 19/12/2011

वरीलप्रमाणे किटकनाशक, जंतूनाशक व क्लोरीन खरेदीची नियमबाहयपणे खरेदी करण्यात आल्याचे दिसून आले.

1) पुरवठादाराकडील दराबाबत स्थानिक विक्रेत्याकडून दरपत्रकातील किंमतीविषयी खात्री करण्यात आलेली नसल्याने महानगरपालिकेकडून जादा दराचे प्रदान झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) करारनामयातील अटी व शर्ती क्रं. 3 नुसार किटकनाशक व जंतूनाशके महानगरपालिकेच्या गोडावून पर्यंत पोहचविण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादाराची असतांना सदर मालाच्या डिलिव्हरी चलान मध्ये सदर माल कोणत्या वाहनाने, कोणत्या तारखेस, वाहनाचा क्रमांक याबाबत नोंदी नाहीत. तसेच सदर माल दि. 17/12/2011 ला प्राप्त झाल्याचे



Scanned by CamScanner

महापालिकेने नमूद केले आहे. सदरील डिलिव्हरी चलान क्रं. 2377 दि. 17/12/2011 मध्ये मिशील या सुध्दा समाविष्ट असल्याने सदर मिशील प्रती बॅग प्रमाणे खरेदी केले असल्याने महापालिकेने सदर मालाचे स्थानिक वजनमाप काटयावर वाहनासहीत वजन करणे आवश्यक असतांना सदरील कार्यवाही केली नसल्यामुळे मिशील योग्य त्या वजनात महानगरपालिकेने प्राप्त झाल्याची खात्री केली नसतांना पुरवठादारास नियमबाहयपणे प्रदान केल्याचे आढळते. अर्धसमासपत्र क्रं. 27 दि. 21/5/2015 अनुसार हयाबाबत खुलासा मागविण्यात आला असता डिलिव्हरी चलान व बिलामधील संपूर्ण रकाने भरले नसल्याचे आणि मिशील चे वजन चंद्रपूर येथे केले नसल्याचे महानगरपालिकेने मान्य केले आहे.

3) तसेच औषध व क्लोरीन गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त केला नसतांना कंत्राटदारास पुर्ण रकमेचे नियमबाहयपणे प्रदान केल्याचे आढळते.

4) महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रं. विकास 1198/प्र.क्रं. 43/ कराधान – 1/ दि. 5 मे 1999 आणि महाराष्ट्र कर कायदा 1999 चा नियम 17 च्या कलम 14 मध्ये कलम 6 (ब) नव्याने अंतर्भुत करण्यात आले असून ज्या पुरवठाधारकाकडून 50000 रु. पेक्षा जास्त किंमतीचा माल संपूर्ण वर्षात खरेदी केल्याचे आढळल्यास अशा पुरवठादाराकडून प्रदानाच्या 4% रक्कम कार्य कंत्राटाची वसुल करणे आवश्यक आहे. हयामुळे एकूण रु. 20856 संबंधितांकडून वसुल करुन शासन लेखाशिर्षात भरणा करणे आवश्यक आहे.

वरील नमूद नियमबाहयता असतांना कंत्राटदारास महानगरपालिकेने नियमबाहय प्रदान केल्याचे आढळून असल्याने व रु. 20856 वसुली करून शासनाकडे भरणा करणे आवश्यक असल्याने उर्वरित रक्कम रु. 521400 – 20856 = 500544 आक्षेपित ठेवण्यात येते.

DATBNKM6401 (Ref No. 8, Hmm No. 2)

### 14 करवसुलीची उददिष्टपुर्ती अवैधरीत्या दर्शविण्याची अनियमितता

**करसंकलन**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : करवसुली मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 34407695.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 34407695.00/-

*सन 2012-13 चे लेखापरीक्षणास विभागाने सादर कलेल्या करवसुली विवरणपत्रामध्ये मालमत्ता करासह इतर कर मिळून करवसुली 73.98% केली असल्याचे नमूद आहे. व त्यानुसार शासनाकडून विविध योजनांचा लाभ महानगरपालिकेने घेतला आहे. परंतू सदर करवसुलीची टक्केवारी अवैधरीत्या दर्शविण्यात आल्याचे दिसून आले.*



Scanned by CamScanner

महानगरपालिका चंद्रपुर सन 2012-13 चे लेखापरीक्षणास सादर केलेल्या करवसुली नोंदवही, चलान, बँक स्क्रोल आणि मागणी नोंदवही ची पडताळणी करण्यात आली असून सदर अभिलेख्यातील आकडेवारीबाबत एकत्रित विवरण लेखापरीक्षणास सादर करण्याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 35 दि. 4/6/2015 नुसार कळविण्यात आले होते. सदर अर्धसमासपत्राचे उत्तरामध्ये सन 2012-13 मध्ये करवसुली खालील प्रमाणे रकमांच्या नोंदी आहेत.

2012-13 मधील करवसुली

| अक्रं | कराचे नाव | मागणी | | | वसुली | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | थकबाकी | चालू | एकुण | थकबाकी | चालू | एकुण | |
| 1 | मालमत्ता कर | 25924447 | 75553380 | 101477827 | 13776245 | 58775652 | 72551897 | 71.49 % |
| 2 | शिक्षण कर | 5583999 | 18220777 | 23804776 | 3475104 | 16286857 | 19761961 | 83.01 % |
| 3 | रोहयो कर | 636782 | 2509845 | 3146627 | 482209 | 2176418 | 2658627 | 84.49 % |
| 4 | वृक्ष कर | 489244 | 1419106 | 1908350 | 293853 | 1085919 | 1379772 | 72.30 % |
| 5 | अग्निशमन कर | 265515 | 1509331 | 1774646 | 181647 | 1175428 | 1357075 | 76.47 % |
| 6 | जाहीरात कर | 10512 | 122643 | 133155 | 10512 | 117842 | 128354 | 96.39 % |
| | एकूण | 32910499 | 99334882 | 132245381 | 18219570 | 7961816 | 97837686 | 73.98 % |

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शा.नि.क्रं. संकिर्ण 2009/प्र.क्रं.106/09/नवि-14 मुंबई दि. 31 ऑगस्ट 2009 नुसार राज्यातील नगरपरिषद कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे वेतनश्रेण्या लागू करण्यास मान्यता देतांना सर्व कराची वसुली चालू मागणीच्या किमान 90% पर्यंत करावयाची आहे. तथापि महानगरपालिका चंद्रपुर येथे सन 2012-13 मध्ये चालू कराची मागणी एकुण रूपये 99334882 असून त्यापैकी एकूण रूपये 79618116 वसुली म्हणजे 80% करण्यात आली. तसेच थकबाकीची रक्कम चालू वसुलीच्या म्हणजे रू. 99334882 च्या 10% पेक्षा जास्त राहणार नाही याची दक्षता घेण्यासाठी म्हणजे सन 2012-13 अखेर आवश्यक असल्यामुळे वर्ष आरंभी थकबाकी रू. 32910499 (-) सन 2012-13 मधील वसुली रू. 18219570 = 14690929 रू. एकुण वर्षअखेर थकबाकी (-) जास्तीत जास्त 10% थकबाकी रू. 9933488 आवश्यक होती. = रू. 4757441 वर्षाअखेर थकबाकी वसुली झाली नाही. परंतू सन 2012-13 अखेर थकीत कराची थकबाकी रू. 475744 केलेली नसतांना म्हणजे थकबाकीची सन 2012-13 मध्ये फक्त 55% वसुली केलेली असतांना म्हणजे चालु कराची 80% व थकबाकीची वसुली 55 % म्हणजे सरासरी 68% वसुली झालेली असतांना प्रत्यक्षात सन 2012-13 अखेर 73.98 % वसुली करण्यात आल्याबाबत जमा खर्च अहवालात अवैध नोंदी घेण्यात येवून शासनाकडून विविध योजना व आस्थापना अनुदानाचा लाभ महानगरपालिकेने नियमबाहयपणे घेतला असल्याचे दिसून आले. तसेच सन 2012-13 अखेर रू. 34407695 एवढया मोठया प्रमाणात कराची रक्कम थकीत असल्याचे दिसून आले. तसेच चालू वसुलीचे प्रमाण 80% व थकबाकीचे प्रमाणे 55% असल्याने महानगरपालिकेने थकीत रकमा वसुली बाबत कोणतीही उपाययोजना केली नसल्यामुळे प्रत्येक वर्षी थकबाकीच्या रकमेमध्ये वाढ होत असतांना आणि उकत शासन निर्णयानुसार चालु कर वसुली 90% पर्यंत करणे आवश्यक असतांनाही उदिदष्टपुर्ती महानगरपालिकेने केलेली नाही. तसेच कर वसुलीच्या टक्केवारीमध्ये 5% जादाची वाढ दर्शविण्यात आलेली असल्याने करवसुली बाबत सन 2012-13 मध्ये उदिदष्टपुर्ती अवैधरीत्या दर्शविण्याची अनियमितता झाल्याचे दिसून आले. सबब उकत शासन निर्णयाचे तंतोतंत पालन व्हावे आणि महानगरपालिकेची थकबाकी नियमापेक्षा जास्त राहणार नाही याबाबत प्रशासनाने दक्षता घेणे आवश्यक असल्याने सन 2012-13 अखेर



Scanned by CamScanner

थकबाकीची एकूण रक्कम 34407695 /- तातडीने वसुल होणे आवश्यक आहे.

DATBNKM6401 (Ref No. 34, Item No.

15 म.न.पा.चे मालकीची व भाडेपट्टेवर दिलेल्या इमारत/गाळे यांचे भाडे व मालमत्ताकर थकबाकीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
अनियमितता संख्या : 1

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 12221283.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 12221283.00/-

***म.न.पा.तील भाड्याने दिलेले दुकाना/गाळे यांचे चालू व थकीत भाडे व कर वसुलीची रक्कम 100% वसुली न झाल्यामुळे म.न.पा.ची आर्थिक हानी झालेली आहे.***

चंद्रपूर शहर महानगरपालिका यांनी स्वमालकीच्या स्थावर मालमत्तेवर बांधकाम केलेले व्यापारी संकुल, दुकाने, गाळे इत्यादी मालमत्ता भाडेतत्वावर भोगवटादार यांना आवंटीत केले असता कर संकलन विभागाने अर्धसमासपत्र क्र 74 दि. 21-7-2015 चे अनुषंगाने पत्र क्र. चशमनपा/कवि/20/2015 दि. 28-7-2015 नुसार सादर केलेले संबंधित अभिलेखे व दुकान/गाळे भाडे वसुली/ थकबाकीच्या रकमांच्या विवरणपत्राचे अवलोकनांती म.न.पा.चे एकूण 20 व्यापारी संकुलातील सन 2011-2012 चे थकीत भाडे तसेच सन 2012-2013 ची मागणी व वसूली खाली नमूदप्रमाणे होती.

| सन 2011-2012 चे थकीत भाडे | सन 2012-2013 ची चालू मागणी | एकूण मागणी | सन 2011-2012 ची थकीत वसूली | सन २०१२-2013 ची चालू वसूली | एकूण वसूली | माहे 31 मार्च 2013 अखेर येणे रकमा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 21,55,501 | 1,80,02,699 | 2,11,58,200 | 27,13,453 | 62,23,464 | 89,36,917 | 1,22,21,283 |

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

उपरोक्त विवरणावरून दुकाने/गाळे यांची सन 2011-2012 ची थकीत वसूली 100% झालेली नसून रु. 4,42,048/- वसूल होणे शिल्लक होते. त्याचप्रमाणे चालू मागणी रु. 1,17,79,235/- पैकी फक्त 34.57% वसूल झाले असून रु. 1,17,79,235/- असे थकीत व चालू मागणी एकूण रु. 1,22,21,283/- दि. 31 मार्च 2013 अखेर भोगवटादाराकडून वसूलीअभावी थकीत राहिले. म्हणजेच एकूण मागणीपैकी वसूलीची टक्केवारी 42.24 इतकी अत्यल्प असल्यामुळे म.न.पा.ला मोठ्या



Scanned by CamScanner

महसुलापासून वंचित राहावे लागले. भोगवटादाराकडून निर्धारित केलेले भाडे व त्यावरील करआकारणीची रक्कम वसूलीबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949, कलम-128 मधील तरतुदीनुसार म.न.पा.कडून सत्वर नियोजन/प्रयत्न होत नसल्यामुळे थकीत रकमात वाढ होत आहे व सदर बाब म.न.पा. चे उत्पन्नाशी संबंधित असल्यामुळे त्याचा परिणाम महसूल प्राप्तीवर होत आहे. त्याचप्रमाणे अपुऱ्या निधीमुळे विकास कामांवर खीळ बसत आहे.

त्यामुळे सन 2012-2013 अखेरची दुकान/गाळेभाडे व मालमत्ता कर थकबाकी रक्कम रुपये 1,22,21,283/- वसूलपात्र आहे.

सदर आक्षेप अर्ध समाज पत्र क्र. 74 दि.21-7-2015 चे अनुषंगाने आवश्यक अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे नोंदविण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 1,22,21,283 |
| गुंतलेली रक्कम | 1,22,21,283 |

DATPVKM6101 (Ref No : 57, Hmm No : 74)

## *16 दुकान/गाळ्यांचा योग्य विनियोग न करण्याची अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 1**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 8371168.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 8371168.00/-

***म.न.पा.ने बांधकाम केलेल्या व्यापार संकुलातील दुकाने/गाळे बऱ्याच कालावधीपासून सिल/रिकामे असल्यामुळे म.न.पा चे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

## 29 ग्रंथालय विभागातील पुस्तक खरेदीतील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
अनियमितता संख्या : 02



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

लेखा शीर्ष :00 मनपा निधी

अनियमितता कलम : ९ब

गुंतलेली रक्कम रु. 150000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7500.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 7500.00/-

**निविदा प्रक्रियेचा अवलंब न करता पुरवठादाराकडून दरपत्रके बोलावून पुस्तके खरेदी करण्याची आली. मूल्यवर्धित कराअंतर्गत वैध नोंदणीकृत प्रमाणपत्र असल्याचे नस्तीमध्ये सलग्न नसल्याचे आढळून आले.**

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
| --- | --- | --- |
| 1778 | 30/03/2013 | 150000/- |

चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत ग्रंथालय विभागातील महात्मा गांधी वाचनालय व हुतात्मा वाचनालय असे दोन वाचनालय कार्यरत असून त्या त्या ग्रंथालयाला आवश्यक विविध पुस्तके खरेदीची मागणी संबंधित सहायक ग्रंथपाल हे आयुक्तांना करून सदरील प्रमाणकान्वये पुरवठादाराकडून खरेदी करण्यात आले. त्यावर खालील अनियमितता आढळून आल्या.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची 'ड', प्रकरण 5 संविदा, उपनियम 2(1) अन्वये दोन लाख रुपयापेक्षा कमी रकमेच्या कोणत्याही संविदेच्या निविदेची सूचना, महानगरपालिकेच्या अधिकृत संकेत स्थळावर दर्शविण्यात येईल. अथवा महाराष्ट्र उद्योग, उर्जा, व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखसं-1093/(2635)/उद्योग-6 दि.16 जुलै 1993 मधील उपपरिच्छेद ३.3(फ) अन्वये दरकाराव्यतिरिक्त वस्तूची खरेदी करीत असतांना एका वस्तूची वार्षिक खरेदी 50,000 किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशा वेळी निविदेची जाहिरात योग्य त्या वृत्तपत्रात देऊन निविदा प्रकियेचा अवलंब करून वृत्तपत्राद्वारे मागविणे बंधनकारक आहे. तथापि संबधित सहायक ग्रंथपाल यांनी उपरोक्त बाबींचा नियमाने विचार न करताच फेमस बुक सेंटर, नागपूर या विक्रेतेकडून दरपत्रके मागवून शासनाने ठरविलेल्या तरतुदीचे पालन न केल्याने स्पर्धात्मक दरांचा लाभ महानगरपालिकेला मिळाला नाही.

2) सदरील प्रमाणकान्वये पुंस्तकांची खरेदी फेमस बुक सेंटर, नागपूर या पुरवठादाराकडून/विक्रत्याकडून करण्यात आली असून उपप्रमाणकांवर विक्री कर/मूल्यवर्धित कर विभागाचे नोंदणीकृत असलेले प्रमाणपत्र नस्तीमध्ये सलग्न करण्यात आले नसल्याने संबंधिताकडे मूल्यवर्धित कर अधिनियमाअंतर्गत वैध नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र नसल्याचे आढळून येते. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 ची सुधारणा दि. 04 एप्रिल 2012 नुसार विक्रेतेकडून 5% दराने मूल्यवर्धित कराची रक्कम कपात केली अथवा नाही याबाबत स्पष्ट होऊ शकले नाही. त्यानुसार संबंधित विक्रतेकडून पुस्तकांच्या किमतीच्या 5% म्हणजेच 5x150000=7500 रुपये कपात करण्यात आले नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.103 दि.26.08.2015 नुसार विभागाने सादर केलेल्या अनुपालनाचे अनुषंगाने परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DLFSPPMS501 (Ref No : 30, Hmm No : 103)



Scanned by CamScanner

**30 अपंग, महीला व बालक आणि अनु. जाती व अनु. जमातीकरीता विहीत प्रमाणात खर्च न करण्याची अनियमितता**

महिला व बालकल्याण, अपंग आणि अजा व अज लाभ योजना

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

अनियमितता संख्या : 01

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 263873025.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 26387025.00/-

***महानगरपालिकेने सन 2012-13 मध्ये स्वउत्पन्नातून अपंग, महीला व बालक आणि अनुसूचित जाती व जमाती करीता विहीत प्रमाणात अंदाजपत्रकात तरतुद करून संबंधित लाभार्थ्यांना उचित लाभ दिला नसल्याचे आढळले. सदर बाब शासनाच्या आदेशाची अवहेलना करणारी असल्याचे दिसून आले.***

सन 2012-13 चे चंद्रपुर महानगरपालिकेच्या जमा व खर्च अहवाल व अंदाजपत्रकातील रकमांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे रकमा महानगरपालिकेला स्वउत्पन्नातून प्राप्त झाल्याचे आढळून आले.

| अक्र. | स्वउत्पन्नाचे नाव | रक्कम रूपये |
|---|---|---|
| 1 | मालमत्ता व इतर कर | 222003330 |
| 2 | विशेष वसुली | 1100 |
| 3 | इमारत भाडे | 6697010 |
| 4 | गाळे विक्री | 1365110 |
| 5 | नमुने व निविदा विक्री | 706100 |
| 6 | लायसन फी व इतर फी | 789450 |
| 7 | इमारत परवाना फी | 13427043 |
| 8 | नोटीस व वारंट फी | 32890 |
| 9 | स्थानिक संस्था नोंदणी फी | 490535 |
| 10 | कत्तलखाना फी | 17750 |
| 11 | उदयान व जलतरण फी | 197600 |
| 12 | वाचनालय फी | 22877 |
| 13 | पाणीपुरवठा हस्तांतरण वसुली | 4164680 |
| 14 | यात्रा कर | 300090 |
| 15 | किरकोळ कर | 5117716 |
| 16 | किरकोळ बांधकाम | 3500 |
| 17 | पाणी विक्री | 53650 |
| 18 | नाव दाखल फी | 4152092 |
| 19 | जाहीरात कर | 68357 |
| 20 | कांजी बंदोबस्त फी | 2500 |
| 21 | किरकोळ वसुली | 4259645 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | एकूण रूपये | 263873025 |

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या स्वउत्पन्नातून खालीलप्रमाणे खर्च करणे आवश्यक होते. (1) शासन परिपत्रक नगरविकास विभाग क्र.बी.सी.सी.-1081/6056/UD-10 दि.03 जुलै 1982 नुसार अनु. जाती व जमाती करीता 5% निधी (2) शासन निर्णय क्र.संकीर्ण 2005 प्र.क्र.255/05/नवि-20 दि.08 नोव्हेंबर 2010 नुसार महिला व बाल कल्याण करिता राबविण्याचा योजना करिता 5% निधी (3) अपंग व्यक्ती साठी समान संधी संरक्षण व समान सहभाग कायदा 1995 मधील कलम 40,42 व 43 नुसार 3% निधी वैयक्तिक लाभासाठी खर्च करणे आवश्यक होते.

| | एकूण स्वउत्पन्न रूपये | 3% अपंगाकरीता रूपये | 5% महीला व बालकल्याणाकरीता रूपये | 5% अनु. जाती व जमाती करीता रूपये |
|---|---|---|---|---|
| रूपये | 26387025 | 7916190 | 13183651 | 13183651 |

परंतू महानगरपालिकेने सन 2012-13 मध्ये अपंगाकरीता रू. 100000 पण खर्च निरंक आणि महीला व बालकल्याणाकरीता रूपये 300000 तरतुद करून खर्च फक्त रूपये 78276 एवढाच केला आहे. मात्र अपंग व अनु. जाती व जमाती करीता काहीही तरतुद केलेली नाही. महानगरपालिकेची उक्त कृती नियमबाहय असून शासन निर्देशाचे उल्लंघन करणारी असल्याने वरील बाबतच्या अनुशेषासह खर्च करण्याबाबत मा. आयुक्त यांचे विशेष लक्ष वेधण्यात येत आहे. शासनाचे हयाबाबत स्पष्ट निर्देश असतांनाही महानगरपालिकेने त्याचे पालन केले नसल्याने सन 2012-13 मध्ये प्राप्त स्वउत्पन्नाची एकूण रक्कम रूपये 26387025 आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

DATBNKM6401 (Ref No : 33, Hamn No : 67)

## 31 महानगरपालिका कार्यालयाबाहेर रकमांचे प्रदान नियमबाहयपणे रोखीने करण्याची अनियमितता

**जनगणना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : मानधन राज्य शासनै निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1947000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1947000.00/-

***सन 2012-13 मध्ये श्री. मनोहर विठोबा बोकावार यांना रूपये 1947000 जनगणना कामासाठीच्या कर्मचा-यांना प्रदानाकरीता नियमबाहयपणे रोख देण्यात आली. सदर रकमांचे प्रदान श्री. बोकावार यांनी महानगरपालिका कार्यालयाबाहेर पर्यवेक्षक व प्रगणक यांना प्रदान केले. सदरील प्रत्येक प्रदानाच्या रकमा रू 1000 पेक्षा जादा असल्याचे दिसून आले.***

महानगरपालिका चंद्रपूर येथे सन 2012-13 मध्ये जनगणना कामाकरीता एकूण 165 प्रगणक व पर्यवेक्षक यांना



Scanned by CamScanner

नेमण्यात आले असता त्यांना शासन निर्देशानुसार रूपये 10000 ते 12000 हया दरम्यानच्या रकमांचे प्रदानासाठी रू. 1947000 तत्कालीन उपआयुक्त यांनी मंजूरी देवून सदर रक्कम श्री. मनोहर विठोबा बोकावार यांचेकडे रोखीने देण्याबाबत टिपणीवर निर्देशित केले होते. त्यानुसार महानगरपालिकेच्या लेखा विभागाने रू. 1947000 रोख श्री. बोकावार यांना दिल्याचे प्रमाणक क्रमांक 627 दि. 13/8/2012 नुसार आढळले. त्यामुळे अर्धसमासपत्र क्रं. 81 दि. 24/7/2015 नुसार खुलासा मागविण्यात आला असता सादर केलेले उत्तर हे मोघम असल्याचे दिसून आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 84 (2) नुसार शंभर रुपयापेक्षा अधिक रक्कम महानगरपालिकेकडून देय असेल तेव्हा ती धनादेशाव्दारे प्रदान करावयाची असून ती कोणत्याही रितीने प्रदान करावयाची नाही. तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शा.नि.क्रं. संकिर्ण - 1010/प्र.क्रं./68/कोषाप्र - 5/दिनांक 18 एप्रिल 2011 नुसार कार्यालयातील अधिकारी व कर्मचा-यांना प्रदानाची रक्कम फक्त E.C.S. व E.F.T. प्रणालीव्दारे करावयाचे आहे.

तरीसुध्दा महानगरपालिका चंद्रपूर येथे रू. 1947000 उक्त शासन निर्णय व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदीकडे दुर्लक्ष करून सदर रक्कम महानगरपालिका कार्यालयाबाहेर नेवून संबंधित जनगणना प्रगणक व पर्यवेक्षक यांना रोखीने प्रदान केली असल्याबाबत संबंधितांच्या राजस्व मुद्रांकावरील पोच लेखापरीक्षणात सादर करण्यात आल्या. मात्र सदर रकमा नियमबाहयपणे प्रदान करण्यात आलेल्या असतांना लेखा विभागाने नकारात्मक भुमिका वठविली नाही. ही आश्चर्यकारक बाब आहे. संबंधित प्रदानाच्या रकमा व पोचपावतीवर सहया करणारे प्रगणक व पर्यवेक्षक यांच्या राजस्व मुद्रांकावरील स्वाक्षरी कोणत्याही अधिका-याने अधिप्रमाणित केलेल्या नसल्याने व तत्कालीन उपआयुक्त यांनी सदरील रक्कम रू. 1947000 श्री. बोकावार यांना रोखीने देण्याबाबत आदेशित केले असल्याने हयाबाबत संबंधितांविरूध्द प्रशासकीय कार्यवाही होणे आवश्यक असल्याने रोखीने प्रदान केलेली रक्कम रू. 1947000 आक्षेपीत ठेवण्यात येते.

DATBNKM6401 (Ref No : 36, Hmm No : 61)

## *32 पशुंची तपासणी न करताच पशुवध फी वसुल करण्याची अनियमितता*

**स्वच्छता विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 9430.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9430.00/-

***सन 2012-13 मध्ये स्वच्छता विभागामार्फत बोकड, शेळी, मेंढी इत्यादींच्या कत्तलीबाबत प्रत्येकी रू 10 प्रमाणे वसुल करण्यात आले. परंतू सदरील बोकड, शेळी व मेंढी चे मांस नागरिकांना खाण्यायोग्य असल्याबाबत महानगरपालिकेकडून कोणतीही तपासणी केलेली नसतांना पशुवधाबाबतची एकूण रू 9430 नियमबाहयपणे वसुल करण्यात आले.***

चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन 2012-13 मध्ये बोकड 647, शेळी 295 व मेंढी 1 असे एकूण 943 पशुंची कत्तल करण्यात आल्यामुळे प्रत्येकी रू. 10 प्रमाणे पशुवध फी रू. 9430 वसुल करण्यात आली. परंतू सदरील बाबत वसुल



Scanned by CamScanner

करण्यात आलेल्या फी बाबत कत्तल करावयाचे पशु निरोगी असल्याबाबतची तपासणी शासनाच्या पशुवैदयकीय अधिका-याकडून केलेली नसतांना महानगरपालिकेने फक्त पशुवध फी वसुल करण्याचे तंत्र अवलंबविल्याचे दिसून आले. हयाबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 30 दि. 21/5/2015 नुसार संबंधितांना खुलासा मागविण्यात आला असता संबंधितांनी पुढिलप्रमाणे उत्तर सादर केले आहे.

"पशुवधगृहात कत्तल करावयाचे पशु - पशुवैदयकीय अधिकारी यांचेकडून तपासणी करून घेणेबाबत शासनाचे कोणतेही आदेश कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच कत्तल करावयाचे पशु संबंधित व्यावसायिकांनी वैदयकीय अधिका-याकडून तपासणी केले होते किंवा नाही. याबाबत कागदपत्र सबंधितांकडून मागविण्यात आलेले आहे. तसेच यापुढे वैदयकीय तपासणी करूनच पशुवध करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत."

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 337 अनुसार मानवी आहारासाठी ठेवलेल्या वस्तुंची पाहणी करण्यासाठी मा. आयुक्तांनी तरतुद करावयाची आहे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये विक्रीसाठी ठेवलेली किंवा विक्रीच्या प्रयोजनासाठी किंवा विक्रीसाठी माल तयार करण्याच्या प्रयोजनासाठी महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोणत्याही ठिकाणी ठेवलेली किंवा आणलेली आणि मानवी आहारासाठी किंवा औषधासाठी योजलेली जनावरे, जनावरांचे मांस, कोंबडया, वन्यप्राणी, मासे इत्यांदींची सतत आणि दक्षतेने पाहणी करण्यासाठी तरतुद करणे हे मा. आयुक्तांचे आदय कर्तव्य आहे. तसेच ज्या बाबी खाण्यायोग्य नव्हत्या. त्या बाबी जर विक्रीसाठी ठेवण्यात आल्या असतील तर संबंधितांविरूध्द कार्यवाही करण्याची जबाबदारी सुध्दा मा. आयुक्तांची आहे. यावरून महानगरपालिका चंद्रपूर ला पशुवधास नेमलेले जनावरांची तपासणी करून घेणेबाबत शासनाचे आदेश नव्हते. ही बाब दिशाहीन करते. तसेच सन 2012-13 मध्ये कत्तल केलेल्या पशुंची तपासणी बाबत संबंधिताकडून कागदपत्र मागविण्यात आलेले आहे असे उत्तरात नमुद आहे. परंतू कोणत्याही पशुंचे तपासणी अहवाल लेखापरीक्षणास सादर केलेला नाही. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 378 अनुसार मा. आयुक्तांनी दिलेल्या लायसन्सशिवाय शहरातील कोणतीही जागा कत्तलखाना म्हणून किंवा मानवी आहारासाठी योजलेल्या कोणत्याही जनावरांची कत्तल करण्यासाठी वापरता येत नसतांना सन 2012-13 मध्ये कत्तल केलेल्या एकूण 943 जनावरांबाबत वेगवेगळया व्यक्तींकडून फी वसुल केलेली आहे. यावरून कत्तल केलेले पशुची कत्तल लायसन्स धारकांनी केल्याची खात्री होत नाही. तसेच लायसन्स धारकाकडून कत्तलखाना लायसन्स फी वसुल केल्यानंतर त्यांचेकडून पुन्हा प्रती जनावर रू. 10 प्रमाणे पशुवध फी केलेली असल्याने जनावरांची कत्तल लायसन्स धारकाकडून करण्यात आलेली नसल्याचे दिसून आले. यावरून चंद्रपूर शहरातील नागरिकांना खाण्यायोग्य जनावरांचे मांस मिळण्यासाठी महानगरपालिकेने उचित कार्यवाही न करताच सन 2012-13 मध्ये 943 जनावराबाबत प्रत्येकी रू. 10 प्रमाणे एकूण रू. 9430 नियमबाहयपणे पशुवध फी वसुल केल्याचे आढळल्याने वसुलीची रक्कम रूपये 9430 आक्षेपित ठेवण्यात येते.

DATBNKM6401 (Ref No : 37, Item No : 30)

### 33 प्रवास भत्ता अनुज्ञेय नसलेल्या श्रेणीतुन केल्यामुळे झालेल्या जादा प्रदानाबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 22165.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7101.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 13519.00/-



Scanned by CamScanner

**वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक – प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा5 दिनांक 3 मार्च 2010 मधिल अ.क्र. 4.2 अन्वये शासकिय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन 4400/- पेक्षा कमी असल्यास व्दितीय वर्ग शयनयान वर्गाने पात्र असतील. परंतु 6 कर्मचा-यांनी वातानुकुल वर्गाने प्रवास केल्यामुळे त्यांना रूपये 13,519 /- जादा प्रदान केलेल्या टिकीटाची वसुली करावी**

सन 2012-13 मध्ये मनपाचे खालील कनिष्ट अभियंता व आरोग्य निरिक्षक यांनी नागपूर ते मुंबई व मुंबई ते परत नागपूर असा मंत्रालयीन व प्रशासकिय कामाकरीता रेल्वेच्या I व III वातानुकुलीत श्रेणीने प्रवास केला.

| प्र.क्र./ दिनांक | रक्कम | कर्मचा-याचे नाव व पदनाम | प्रवासाचा प्रकार | गाडीचे नाव | टिकीट | प्रवास दिनांक | जादा टिकीट | तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 376/ | 5100 | महेश वारई, क. | I-वातानुकुलीत | विदर्भ एक्स. | 2215 | 25-4-12 | 1842 | टिकीट नाही. |
| 9-7-12 | | अभियंता | —“”— | हावडा मेल | 2215 | 26-4-12 | 1842 | - |
| 376/ | 5100 | राजीव पिंपळशेंडे | —“”— | विदर्भ एक्स. | 2215 | 25-4-12 | 1842 | टिकीट नाही. |
| 9-7-12 | | ,क.अभियंता | —“”— | हावडा मेल | 2215 | 26-4-12 | 1842 | टिकीट नाही. |
| 537/ | 2842 | अनिल घुमडे , | III-वाताकुलीत | दुरांतो एक्स. | 1280 | 17-7-12 | 907 | - |
| 6-8-12 | | क. अभियंता | —“”— | विदर्भ एक्स. | 892 | 18-7-12 | 519 | - |
| 946/ | 3181 | प्रकाश खोब्रागडे, | —“”— | दुरांतो एक्स. | 1014 | 15-10-12 | 641 | टिकीट नाही. |
| 31-10-12 | | नगर अभियंता | —“”— | दुरांतो एक्स. | 1307 | 18-10-12 | 934 | टिकीट नाही. |
| 946/ | 3021 | अनिल घुलके, | —“”— | दुरांतो एक्स. | 1014 | 17-10-12 | 641 | - |
| 31-10-12 | | क.अभियंता | —“”— | दुरांतो एक्स. | 1307 | 18-10-12 | 934 | - |
| 946/ | 2921 | बेनहर जोसेफ , | —“”— | दुरांतो एक्स. | 1014 | 17-10-12 | 641 | - |
| 31-10-12 | | आरोग्य निरी. | —“”— | दुरांतो एक्स. | 1307 | 18-10-12 | 934 | - |
| | 22165 | | | | | एकुण- | 13519 | |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय आहे.

1. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक -प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा5 दिनांक 3 मार्च 2010 मधिल अ.क्र. 4.2 अन्वये शासकिय अधिकारी/कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन 4400/- पेक्षा कमी असल्यास व्दितीय वर्ग शयनयान वर्गाने पात्र असतील. असे असतांना वरील कर्मचा-याचे ग्रेड वेतन 4400/- पेक्षा कमी असतांना त्यांनी वरील प्रमाणे प्रथम व तृतीय श्रेणी अधिका-यांना देय असलेल्या वातानुकुल वर्गाने प्रवास केला. प्रत्यक्षात प्रवास केलेल्यां कालावधीत रेल्वेचे व्दितीय वर्ग शयनयान वर्गाचे नागपू र ते मुंबई चे टिकीट रूपये 373/- असतांना त्यांना त्यापेक्षा जादा दराने प्रवासाचे भाडे देण्यात आले . त्यामुळे नियमवाहयरित्या अतिप्रदान केलेले रक्कम रूपये 13,519 /- वसुलीची होणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

2. श्री महेश बारई, राजीव पिंपळशेंडे व खोब्रागडे यांनी नागपूर ते मुंबई चे टिकीट जोडलेले नाही किंवा त्याचा क्रमांक देयकात नमुद नाही . वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक -प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा5 दिनांक 3 मार्च 2010 मधिल अ.क्र. 4.2 टिप 3 नुसार रेल्वेच्या वातानुकुल वर्गाने केलेल्या प्रवासाच्या प्रकरणी प्रवास भत्ता देयकात टिकीट क्रमांक दिनांक नमुद करणे आवश्यक असेल असे असतांना वरील कर्मचा-यांनी टिकीट सादर केले नाही. त्यामुळे त्यांना प्रदान केलेले रुपये 7101/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No. 39, Hmm No. 100)

***34 मालमत्ता व इतर कराची थकीत रकमांची नोंद सन 2012-13 मधील मागणी नोंदवही मध्ये न घेतल्याची अनियमितता.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
गुंतलेली रक्कम रु. 279058.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 279058.00/-

***सन 2011-12 मधील थकीत रकमांची नोंद सन 2012-13 मधील मागणी नोंद्वहीमध्ये समाविष्ठ न केल्यामुळे संबधित भोगवटदाराकडून मालमत्ता कराची रक्कम रुपये 279058 वसूल होणे आवश्यक आहे.***

चंद्रपूर महानगरपालिकेतील प्रत्येकी तीन झोनमधील सन 2011-12 व 2012-13 मधील निवडक वार्डाची मागणी नोंदवही मागवून सन 2011-12 मधील मालमत्ता व इतर कराची रक्कम चालू आर्थिक वर्षात न भरल्याने सन 2012-13 मधील संगणीकृत मागणी नोंदवहीमध्ये थकीत रकमांची मागणी समाविष्ठ केल्याची तपासणी केली असता खालील नमूद झोन व त्यानुषंगाने निवडक वार्ड मधील भोगवटदाराकडून मालमत्ता व इतर कराची मागणी सन 2012-13 मधील



Scanned by CamScanner

मागणी नोंदवहीमध्ये समाविष्ठ केल्याचे दिसून आले नाही.

झोन क्र.1 मधील वडगाव वार्डातील थकीत रकमांची नोंद सन 2012-13 मधील मागणी नोंदवही मध्ये समाविष्ठ न केल्याचे विवरण

| अ.क्र. | सन 2012-13 मधील जुना मालमत्ता क्र. | सन 2011-12 मधील मालमत्ता क्र. | कर धारकाचे नाव | कराचा प्रकार | | | | थकीत रकमा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सर्वसाधारण कर | शिक्षण कर | वृक्ष कर | अग्निशमन कर | |
| 1 | 13/9 | 9 | गीताबाई वा.घुगे | 2124 | 538 | 53 | 6 | 2717 |
| | | | | 308 | 46 | 6 | 6 | 366 |
| 2 | 13/15 | 15 | अर्जुन सी.मडावी | 332 | 36 | 4 | 2 | 374 |
| 3 | 13/38 | 38 | दादाजी मा.झीलपे | 2464 | 912 | 46 | 25 | 3447 |
| 4 | 1387 | 87 | नामदेव ब.काळे | 6324 | 1072 | 116 | 32 | 7544 |
| 5 | 13/134 | - | देवराव भि.नगरकर | 559 | 83 | 10 | 11 | 663 |
| 6 | 13/366/1 | 154 | अमृत पू.वेल्हानकर | 1108 | 205 | 21 | 22 | 1356 |
| 7 | 13/159 | - | अर्जुन तू.बोबडे | 715 | 106 | 13 | 14 | 8<br>4<br>8 |
| 8 | - | 159/1 | अर्जुन तु.बोबडे | 550 | 81 | 10 | 11 | 652 |
| 9 | 13/169 | 169 | आदर्श गृह निर्माण संस्था | 257 | 37 | 4 | 5 | 303 |
| 10 | - | 200 | एस.एन.गोरंटीवार | 2918 | 648 | 54 | 58 | 3678 |
| 11 | 232 | 232 | वासुदेव द.येरगुडे | 616 | 90 | 12 | 6 | 724 |
| 12 | 13/241 | 241 | रंजन शं.येरगुडे | 667 | 99 | 13 | 13 | 792 |
| 13 | 13/255/1 | 255 | बापुजी शं.डेरकर | 1232 | 180 | 20 | 6 | 1438 |
| 14 | 13/272 | 272 | भगवान रा.काळे | 481 | 71 | 9 | 10 | 571 |
| 15 | 13/307 | 307 | सुनील मा.पाऊणकर | 3501 | 517 | 62 | 7 | 4087 |
| 16 | 13/366/1 | 366/1 | रवींद्र अ. वेल्हानकर | 770 | 114 | 14 | 15 | 913 |
| 17 | 13/367 | 367 | वीरमती प्र.अग्रवाल | 2078 | 384 | 38 | 21 | 2581 |
| 18 | 13/371 | 371 | कमल सु.मामीडपल्लीवार | 1210 | 224 | 22 | 24 | 1480 |
| 19 | - | 373 | बी.एन.बोबगिरवार | 1950 | 360 | 36 | 19 | 2365 |
| 20 | 13/445 | 445 | नारायन पं.आस्टेकर | 1796 | 399 | 33 | 36 | 2264 |
| 21 | 13/445 | 445 | नारायन पं.आस्टेकर | 1542 | 456 | 114 | 27+11 | 2150 |
| 22 | - | 460/4 | सी.वि.चित्तावार | 1540 | 228 | 28 | 15 | 1764 |
| 23 | 13/613 | 613 | मलिनी म.पेठे | 525 | 44 | 47 | - | 2977 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 24 | 13/633 | 633 | रमेश कुंदलवार | 6400-1100=5300 | 1186-204=982 | 122-21=101 | 22-22=0 | 7730-1347=6383 |
| 25 | 13/646 | 646 | शुष्मा शा. बोरले | 937 | 347 | 86 | 17+19 | 1406 |
| 26 | 13/647 | 647 | शमीम पटेल | 1129 | 418 | 104 | 21+23 | 1695 |
| 27 | 13/672 | 672 | शामराव मा.बांदुलकर | 2013 | 299 | 39 | 8 | 2359 |
| 28 | 13/686 | 686 | रमेश स.राठोड | 1155 | 214 | 21 | 23 | 1413 |
| 29 | 13/757 | 757 | जगदीश/संजय रा. जगशेट्टीवार | 9622 | 42 | 76 | 1069+192 | 15337 |
| 30 | 13/792(5) | 792(5) | प्रमोदरा.दामले | 712 | 105 | 13 | 14 | 844 |
| 31 | 13/921 | 921 | ओमप्रकाश शर्मा | 1155 | 214 | 21 | 23 | 1413 |
| 32 | 13/936 | 936 | गुणवंत ग. कत्तूरवार | 1412 | 261 | 26 | 28 | 1727 |
| 33 | 13/1069 | 1069 | शुभ्रदाबाई येरगडे | 1868 | 274 | 30 | 6 | 2178 |
| 34 | 13/1312 | 1312 | इंद्रजीत सिंग | 2834 | 630 | 52 | 57 | 3573 |
| 35 | 13/1338 | 1338 | टावर भरत, एयरटेल | 4374 | 1144 | 486 | 81+77 | 6172 |
| 36 | - | 1380/13 | विजयकुमार नडार | 787 | 233 | 58 | 15+16 | 1109 |
| 37 | 13/1404 | 1404 | पौर्णिमा द.गर्ग | 2898 | 644 | 54 | 58 | 3654 |
| एकूण थकीत रक्कम | | | | | | | | 95317 |

झोन क्र.3 मधील शात्रीनगर वार्डातील थकीत रकमांची नोंद सन 2012-13 मधील मागणी नोंदवही मध्ये समाविष्ठ न केल्याचे विवरण

| अ.क्र | सन 2012-13 मधील जुना मालमत्ता क्र. | सन 2011-12 मधील मालमत्ता क्र. | कर धारकाचे नाव | कराचा प्रकार | | | | थकीत रकमा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सर्वसाधारण कर | शिक्षण कर | वृक्ष कर | अग्निशमन कर | |
| 1 | - | 65 | बी.आर.खशारकर | 3798 | 844 | 70 | 73 | 4785 |
| 2 | - | 98 | किशोर ध.गर्जर | 2450 | 454 | - | 23 | 2927 |
| 3 | - | 100 | अमरनाथ गु. वर्मा | 16341 | 3631 | - | 303 | 20275 |
| 4 | 4/127/1 | - | संजय प्र.विरमलवार | 1193 | 221 | 22 | 24 | 1460 |
| 5 | 4/164 | 164 | अविनाश प. लेदे | 616 | 136 | 10 | 6 | 768 |
| 6 | - | 171 | प्रमोदकुमार स. वालके | 1895 | 426 | | 35 | 2356 |
| 7 | - | 237 | विलास ना. मसराम | 1555 | 292 | | 29 | 1876 |
| 8 | 4/358 | 358 | रामचंद्र वि.मून | 2509 | 368 | | 46 | 2935 |
| 9 | 4/360 | 360 | शांताराम डो. कानकर | 498 | 64 | | 11 | 573 |
| 10 | 4/364 | 364 | मधुकर चो. गोंगले | 1074 | 160 | 20 | 12 | 1266 |
| 11 | - | 370 | आनंदराव रा.कायरकर | 442 | 48 | | 1 | 491 |
| 12 | 4/406/ | 406/1 | दशरथ स.पंचवटे | 464 | 68 | 8 | 4 | 542 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | | | 1412 | 210 | 26 | 14 | 1662 |
| 13 | 4/416 | 416 | प्रदीप सु.गेडाम | 1137 | 168 | 31 | 7 | 1366 |
| 14 | 4/423 | 423 | कमलाकर वायकर | 772 | 114 | 14 | 16 | 916 |
| 15 | - | 426/1 | पुष्पाराजू वाढई | 288 | 40 | 8 | 2 | 338 |
| 16 | - | 432 | चंदभान दा.राऊत | 577 | 54 | | 1 | 632 |
| 17 | - | 477 | कवडू भ.पेटकर | 244 | 36 | 5 | 5 | 290 |
| 18 | - | 504 | सुभद्राबाई तु. नाट | 175 | 26 | 3 | | 204 |
| 19 | - | 511 | सुधाकर मो.वाढरे | 344 | 36 | 1 | | 381 |
| 20 | - | 625 | आशाताई भा. गोमासे | 346 | 51 | 7 | 7 | 411 |
| 21 | 4/633/2 | 633/2 | सुनील र.साळवे | 324 | 48 | 6 | 6 | 384 |
| 22 | 4/639 | 639 | नानाजी सां.चिंचोळकर | 193 | 29 | 4 | 4 | 230 |
| 23 | 639/1 | | श्रीधर स. झिंगरे | 1655 | 246 | 30 | 12 | 1953 |
| 24 | 4/640 | 640 | नामदेव स. बागडे | 828 | 122 | 16 | 10 | 976 |
| 25 | 4/645 | 645/1 | सुनिता चं. ठांवरी | 378 | 48 | 7 | 3 | 438 |
| 26 | 4/648 | 648 | शत्रुघन मा.वनकर | | | | | |
| 27 | 4/863/2 | 863/1 | महेश भा. दवस | 525 | 156 | 39 | 20 | 740 |
| 28 | 4/863 | 863 | रेखाताई भा.मटाले | 2590 | 464 | 32 | 57+26 | 3169 |
| 29 | 99 | 10 | सौ.पल्लवी स.कोंडावर | 1283 | 238 | 24 | 26 | 1571 |
| 30 | 4/649/1 | 649/1 | रमेश ग.वाटेकर | 288 | 42 | 6 | 2 | 388 |
| 31 | 4/318/1 | 318/1 | सहदेव बा.मोरे | 447 | 74 | 9 | 3 | 533 |
| 32 | 4/653/1 | 653/1 | विठ्ठल का.भोयर | 340 | 52 | 6 | 6 | 414 |
| 33 | 4/100/10 | 100/10 | सौ.लिपीका शां.सत्तार | 1522 | 282 | 28 | 30 | 1832 |
| 34 | 4/549/1 | 549 | रहीमवीर मो.पठाण | 1391 | 258 | 26 | 28 | 1703 |
| 35 | 4/86 | 86 | मे.सर्वोदय महिला मंडळ, साई ट्रेडर्स | 17496 | 2504 | - 648(रो. ह. कर) | 0 | (36189-16837)=19352 |
| 36 | 4/86 | 86 | मे.सर्वोदय महिला मंडळ, बालाजी ट्रेडर्स | 11664 | 5184 | 1296+216 | 58 | 18418 |
| 37 | 4/86 | 86 | शोभा इलेक्ट्रॉनिक्स | 11664 | 5184 | 1296+216 | 58 | 18418 |
| 38 | 4/86 | 86 | प्रदीप | | | | | 500 |
| 39 | 4/705 | 705 | विनोद ग.वाघमारे | 1059 | 177 | 21 | 7 | 1244 |
| 40 | - | 798 | सौ.कुसुमबाई रा.थोरात | 468 | 69 | 9 | 10 | 547 |
| 41 | 4/812 | 812 | गेंदलाल रा.कच्छावरे | 770 | 114 | 14 | 16 | 914 |
| 42 | - | 1007 | सौ.वनमाला रा.ठाकरे | 1670 | 370 | 30 | 17 | 2087 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 43 | 4/1058 | 1058 | भाऊराव स.पंचवटे | 936 | 138 | 18 | 10 | 1102 |
| 44 | - | 1120 | जैन कॉम्प्लेक्स, दुसरा माळा | 22873 | 5083 | 423 | 457 | 28836 |
| 45 | - | 1120/7 | पुष्पांजली जनरल स्टोर्स | 1604 | 594 | 148 | 30+32 | 2408 |
| 46 | - | 1120/8 | मनोहर इंटरप्राईजेस | 1604 | 594 | 148 | 30+32 | 2408 |
| 47 | - | 1120/9 | यथार्थ | 802 | 235 | 59 | 15+17 | 1131 |
| 48 | - | 1120/10 | अफजल रुक्साना | 802 | 235 | 59 | 15+17 | 1131 |
| 49 | - | 1120/11 | गंगा - | 578 | 86 | 11 | 12 | 687 |
| 50 | - | 1120/12 | भगवती कनस्ट्रक्शन | 1260 | 233 | 23 | 26 | 1542 |
| 51 | - | 1135 | अथीरकुमार शह | 4384 | 812 | 84 | | 5280 |
| 52 | 4/1274/1 | 1274/1 | भाऊराव प.गेडाम | 1037 | 154 | 19 | 21 | 1231 |
| 53 | 4/1336 | 1336 | विठ्ठल ल.ठक | 386 | 58 | 8 | 4 | 456 |
| 54 | - | 1359/1 | वसंत श्री.बिजवे | 9543 | 2049 | 41 | | 11635 |
| 55 | - | 1380 | गोवर्धन दा.रामटेके | 1422 | 211 | 25 | 6 | 1664 |
| 56 | - | 1362/1 | राजेश बी.पटले | 596 | 84 | 11 | 13 | 704 |
| 57 | - | 1135/1 | विजय शं.ठाकूर | 2332 | 432 | 44 | 24 | 2832 |
| एकुण थकीत रक्कम | | | | | | | | 183741 |

ह्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 91 दिनांक 23.08.3015 नुसार खुलासा मागविण्यात आला असता सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याचे दिसून आले.

तरी संबंधित कर संग्रहकाने थकीत रकमांची नोंद सन 2012-13 मधील मागणी नोंदवहीमध्ये समाविष्ठ करून उक्त मालमत्ताधारक यांच्याकडून थकीत रकमाची वसुली करण्यात यावी. तसेच थकीत रकमांवर उचित दंड व शास्तीची रक्कम संबंधित कर अधिकक्षकाने जबाबदारी निश्चित करून महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण 8 कराधन नियम कलम 41(1) अन्वये 2% नुसार थकीत रकमांवर शास्ती आकारून वसूल होणे आवश्यक आहे व महानगरपालिका निधीमध्ये जमा करून सदरील अभिलेखे पुढील लेखापरीक्षणाच्या वेळी दर्शविण्यात यावे.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.91 दि. 23.08.2015 नुसार विभागाने सादर केलेल्या अनुपालनाचे अनुषंगाने परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| गुंतलेली रक्कम | 279058 |
| आक्षेपाधीन रक्कम | 00 |
| वसुलपात्र रक्कम | 279058 |

DLFSPPM8501 (Ref No : 50, Hmm No : 91)

## 35 *म.न.पा. तील स्वच्छता विभागाचे कचरा गोळा करण्याचे कंटेनर दुरुस्तीमधील अनियमितता.*



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
अनियमितता संख्या : 1

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 170540.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 170540.00/-

***मनपाने स्वच्छता विभागातील कचरा गोळा करण्याची गंजलेली/तुटलेली लोखंडी कंटेनर दुरुस्तीकरिता शासन निर्देशाप्रमाणे विहित कार्यपद्धती अवलंबिली नाही.***

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 1275 | 18-1-2013 | 24552 |
| 1276 | 18-1-2013 | 22444 |
| 1498 | 26-2-2013 | 30388 |
| 1499 | 26-2-2013 | 36036 |
| 1500 | 26-2-2013 | 26400 |
| 1501 | 26-2-2013 | 30720 |
| | एकूण रुपये | 1,70,540 |

म.न.पा. चंद्रपूर येथील स्वच्छता विभागाची शहरात ठिकठिकाणी कचरा गोळा करण्याकरिता ठेवण्यात येत असलेली एकूण 34 लोखंडी कंटेनर तुटलेली असल्यामुळे मे. सरोजकुमार वर्मा, चंद्रपूर यांचेकडून यांत्रिक विभागाद्वारे वेल्डिंगची कामे करून दुरुस्त करण्यात येऊन सन 2012-2013 या वित्तीय वर्षात उपरोक्त प्रमाणकान्वये एकूण रु. 1,70,540 /- खर्च करण्यात आला.

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

उपरोक्त नमूद तुटलेली एकूण 34 लोखंडी कंटेनर प्रत्येकी 5 ते 6 नग याप्रमाणे मे. सरोजकुमार वर्मा, चंद्रपूर व मे. पंकजकुमार विश्वकर्मा, चंद्रपूर या 2 वेल्डींगचे काम करणाऱ्या फर्मकडून दुरुस्तीकरिता दरपत्रके प्राप्त केली असून ती नस्तीत संलग्न आढळली. सदर दुरुस्तीचे काम जाहीर निविदा न मागविता स्थानिकरित्या दरपत्रके नाममात्ररित्या तुकड्यांमध्ये प्राप्त करून कंटेनर दुरुस्तीचे काम केल्याचे आढळून आले. महा. शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस/1088/2512/उद्योग-6 दि. 2 जाने. 1992 मधील नमूद निर्देशांनुसार रुपये 50,000 /- वरील खरेदी/दुरुस्तीविषयक कामांकरिता जाहीर निविदा प्रक्रियेचा अवलंब करून व स्पर्धात्मक दरनिश्चिती करून आवश्यक कामे करणे अनिवार्य आहे. सदर दुरुस्ती कामाचे तुकडे पाडून कामे केलेली आहेत. तसेच करण्यात आलेल्या दुरुस्ती कामांकरिता फक्त दोन वेल्डिंगची कामे करणाऱ्या फर्मची दरपत्रके निव्वळ कार्यपद्धतीचा भाग म्हणून नस्तीत ठेवण्यात आलेली असून त्यातील कमी दरे नमूद केलेल्या वेल्डिंग फर्मधारकाकडून दुरुस्तीचे काम करवून घेण्यात येऊन त्याची नोंद साठापुस्तक नोंदवहीत घेतलेली आहे. उपरोक्त शासन निर्णयात नमुदनुसार निविदाकरण अथवा दरपत्रके मागवून स्पर्धात्मक दरनिश्चितीकरिता किमान 3 निविदा/दरपत्रके प्राप्त करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कंटेनर दुरुस्तीचे कामामध्ये शासन निर्देशांचे पालन झालेले नसून म.न.पा. ला स्पर्धात्मक दरांचा लाभ घेता न आल्यामुळे सदर दुरुस्ती कामात अनियमितता झाल्याचे स्पष्ट होते. सदर दुरुस्तीचे कामे एकूण 7 प्रमाणकान्वये विभागण्यात येऊन व मे. सरोजकुमार वर्मा, चंद्रपूर यांचेकडून रु. 4/- प्रती इंचाप्रमाणे वेल्डिंगचे कामाचा दर निश्चित करण्यात येऊन कामे देण्यात आली. द्वितीय दरपत्रक धारक मे. पंकजकुमार विश्वकर्मा यांनी किमान दरापेक्षा प्रत्येक दरपत्रकात रु. 4/- पेक्षा अधिक वेगवेगळा दर नमूद केला आहेत. किमान दरनिश्चिती करतांना प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करून त्यास सक्षम



Scanned by CamScanner

प्राधिकाऱ्याकडून मंजुरी प्राप्त केलेली नसल्याचे तसेच आवश्यक दुरुस्ती कामे करण्याबाबतचा विभागाने निर्गमित केलेला कार्यादेश नस्तीत दिसून आला नाही.

2) सदर कचरा कंटेनर गंजलेली/तुटलेली असून त्यांची वेल्डिंग दुरुस्तीची कामे करणे आवश्यक असल्याचे कार्यशाळा निरीक्षकाचा अहवाल नस्तीत आढळून आला नाही. त्यामुळे कंटेनर दुरुस्तीच्या आवश्यक्तेबाबत लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही.

3) महा. आकस्मिक खर्च नियम 1965 मधील नियम 44 नुसार कंटेनर दुरुस्ती केलेल्या वेल्डिंग फर्मधारकाने प्रदानार्थ सादर केलेल्या देयकामागे कार्यशाळाप्रमुखाने दुरुस्तीचे काम योग्यरीत्या केल्याची खात्री झालेली असून त्याची नोंद साठापुस्तकाचे पृष्ठ क्रमांक – वर घेतलेली आहे अश्या आशयाचे प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्राशिवाय दुरुस्ती कामाकरिता प्रदान केलेली रक्कम नियमबाह्य ठरते.

उपरोक्त अनियमिततेबाबत अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

सदर आक्षेपं अर्ध समाज पत्र क्र. 94 दि.25/08/2015 नुसार कार्यशाळा विभागास खुलासा सादर करण्याबाबत लेखी कळविण्यात आले असता लेखापरीक्षण पथकाने मागितलेली माहितीचे अनुषंगाने संबंधित मुद्द्यांबाबत सदर विभागाने समर्पक व परिपूर्ण अनुपालन सादर केले नसल्याने सदर आक्षेप घेण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 170540 |
| गुंतलेली रक्कम | 170540 |

DATPVKMs101 (Ref No : 85, Hmm No : 94)

## *36 ई. निविदा पद्धतीशिवाय बांधकामे करण्याची अनियमितता.*

**विविध बांधकामे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : बांधकाम राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 16368209.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 16368209.00/-

***सन 2012-2013 च्या लेखापरिक्षणाकारीता सादर केलेल्या विविध योजनामधील बांधकामाच्या नस्ती ची पडताळणी केली असता सदरील बांधकामे ई.निविदा पद्धतीचा अवलंब करुन केल्याचे आढळले नाही. महानगरपालिकेने विविध वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा प्राप्त केलेल्या आहेत. मात्र शासनाने निर्देशित करुनही ई.निविदा पद्धतीचा अवलंब केला नसल्याचे आढळले.***

चंद्रपूर महानगरपालिका सन 2012-2013 चे लेखापरिक्षणा करिता सादर केलेल्या विविध बांधकामाच्या नस्ती मध्ये कंत्राटदारा कडून B-1 ह्या नमुन्यातील निविदा प्राप्त केल्याचे आढळले. सदरील निविदा प्रपत्रातील पान क्र.13 वर



Scanned by CamScanner

मा.आयुक्त व कंत्राटदार ह्यांचे समन्वयातून मंजूर झालेल्या schedule-B चा दर मा.आयुक्त ह्यांनी स्वअक्षरात नमूद करून स्वाक्षरी करावयाची आहे. परतू बहुतांशी निविदा पत्रामध्ये मा.आयुक्तांनी निविदा दर नमूद केला नसतांनाही महानगरपालिकेने नियमबाह्यपणे कंत्राटदारास कार्यारंभ आदेश दिल्याचे दिसून आले.

2. तसेच निविदा पत्रामधील बहुतांशी रकाने कोरे असून त्यावर मा.आयुक्त व कंत्राटदारांच्या स्वाक्षरी सुद्धा आढळल्या नाहीत.

3. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील नियम क्रमांक 200 नुसार विहित प्रपत्रे सुद्धा मागवून नस्तीला टाचन केले नाही.

महानगरपालिकांमध्ये अनेक प्रकारच्या अनियमितता कामे करतांना होत असल्याने विकास कामासाठी ई-निविदा पद्धती द्वारे निविदा मागवून कामे व बांधकामे करण्याबाबत आदेशीत केलेले आहे. त्यानुसार ई-निविदा बाबत शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक सीएटी-10/2006/प्र.क्र.133 ईमारती-2 दिनांक 2 नोहेंबर 2006 नुसार बांधकाम करण्यासाठी सुद्धा ई-निविदा प्रणालीचा अवलंब करण्याबाबत सूचित केले असतांनाही महानगरपालिकेने उक्त शासननिर्णयानुसार ई-निविदा मागविलेल्या नाही. सदर्हू बाब नियमबाहय असून वित्तीय नियमाचा भंग करणारी आहे. तसेच ई-निविदा प्रणालीमुळे कंत्राटदाराबाबत ची पारदर्शकता सुद्धा दिसून येत असल्याने महानगरपालिकेने ई-निविदा प्रणालीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

उक्त शासन निर्णयाचे पालन महानगरपालिका चंद्रपूर येथे झाले नसल्याने प्रदानाची एकूण रक्कम रु. 16368209 आक्षेपाधित ठेवण्यात येत आहे.

ई-निविदेशिवाय करण्यात आलेली बांधकामे

| अ.क्र | योजनेचे नाव | कामाचे नाव | तांत्रिक मंजुरी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
| 1 | B.R.G.F. योजना | इंदिरानगर बॉक्ससेल पूल बांधणे | 143 | 25/01/2010 | 2545260 |
| 2 | B.R.G.F. योजना | रमाळा तलाव बॉक्ससेल पूल बांधणे | 145 | 25/01/2010 | 2712085 |
| 3 | B.R.G.F. योजना | जलनगर वार्ड शौचालय बांधणे. | 145 | 25/01/2010 | 1461595 |
| 4 | B.R.G.F. योजना | महेशनगर भूमीगत नाली व फुटपाथ | 145 | 25/01/2010 | 4841574 |
| 5 | B.R.G.F. योजना | मा. भवानी वार्डात शौचालय व बांधकाम | 145 | 25/01/2010 | 1461595 |
| 6 | B.R.G.F. योजना | कृष्णानगर ते भारत चौक रस्ता डांबरीकरण | 257 | 28/01/2010 | 3346100 |
| | | एकूण रुपये | | | 16368209 |

ह्याबाबत अर्धसमास पत्र क्र.108 दिनांक 04/09/2015 मुद्दा क्रमांक 7 नुसार खुलासा मागविण्यात आला असता उत्तर मोघम स्वरूपाचे आढळल्याने लेखा आक्षेप घेण्यात आला आहे.

DATBNK.M6-H (Ref No. 77, Hum No. 108)



Scanned by CamScanner

## 37 बांधकामे अपूर्ण असण्याची अनियमितता

बांधकाम विषयक अनुदाने (विविध योजना )

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : बांधकाम राज्य शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 45070276.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 45070276.00/-

सन 2012-2013 च्या लेखापरिक्षण वर्षाअखेर महानगरपालिकेस शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानापैकी एकूण 15 बांधकामे अपूर्ण असल्याचे विवरणपत्र लेखापरिक्षणास सादर केले आहे. सदरील विवरणपत्राची पडताळणी केली असता बहुतांशी कामे प्रदीर्घ कालावधी पासून सुरु करूनही विहित कालावधीत पूर्ण झालेली नसल्याने चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत रहिवाश्यांना सदरील बांधकामाचा लाभ मिळाला नसल्याचे दिसून आले.

चंद्रपूर महानगरपालिकेस 1.राजाभाऊ खोब्रागडे निधी 2.UIDSSMT 3.अल्पसंख्यांक बहुउद्देशीय योजना 4.विशीष्टपूर्ण योजना 5.स्थानिक विकास कार्यक्रम 6. रस्ते व त्याची सुधारणा इत्यादी करिता वेळोवेळी अनुदान प्राप्त झाले आहे. मात्र त्याचा विनियोग विहित कालावधीत झाला नसल्याने चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत नागरिकांना सदरील बांधकामाचा लाभ मिळू शकलेला नाही. तरीही कंत्राटदारांना विनादंड मुदतवाढी देण्यात येवून कंत्राटदाराचे हित महानगरपालिकेने साध्य केले असल्याचे दिसून आले. विहित मुदतीत काम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदाराविरुद्ध महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 05/06/ प्र क्र.53/इमा.2 मुंबई दि.27/09/2006 नुसार उचित कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. संबंधित कामे कंत्राटदारांनी विहित मुदतीत पूर्ण केलेली नसल्याने महानगरपालिका चंद्रपूर अंतर्गत नागरिकांना सदरील योजना मधील कामे व बांधकामापासून मिळणारे लाभ मिळू शकले नाहीत.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-10.02/ प्र.क्र.126/अर्थोपाय मुंबई दि.06 जून 2008 नुसार राज्य शासनाकडून विविध योजना अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानाचा विनियोग लगतच्या पुढील आर्थिक वर्षाअखेर पर्यंत करून त्यानंतर सुरु होणाऱ्या पुढील आर्थिक वर्षाचे सुरवातीस राहिलेला अखर्चित निधी शासनाकडे परत करणे बंधनकारक असतांना खालील प्रमाणे कामे अव्याहत पणे आहे फेब्रुवारी 2009 पासून नियमबाह्यपणे सुरू ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरील कामाचा दर्जा शासकीय मानकाप्रमाणे अबाधित राहिला नसल्याचे दिसून आल्याने ह्या बाबत सर्व संबंधिताविरुद्ध उचित कार्यवाही होणे आवश्यक असून सदरील योजनेअंतर्गत अखर्चित निधी तात्काळ शासनाकडे परत करणे आवश्यक असल्याने सदरील प्रदान करण्यात आलेली एकूण रक्कम रुपये 59569492 आक्षेपीत ठेवण्यात येत आहे.

कामाचा तपशील

| अ.क्र | निधीचे नाव | कामाचे नाव | कार्यारंभ आदेश क्र | दिनांक | प्र.क्र | दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | UIDSSMT | भूमीगत सेव्हरेज | क्यु-4 | 24.08.09 | 5 | 24.01.13 | 3464094 | अपूर्ण कामे |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पठाणपुरा गेट व बिनबा गेट प्लॉट चे काम | | | | | | |
| 2 | UIDSSMT | भूमीगत सेव्हरेज पाईपलाईन टाकणे | क्यु-2 | 24.08.09 | 7 | 04.03.13 | 10085387 | अपूर्ण कामे |
| 3 | UIDSSMT | भूमीगत सेव्हरेज पठाणपुरा गेट व बिनबा गेट प्लॉट चे काम | क्यु-4 | 24.08.09 | 6 | 06.04.13 | 2000000 | अपूर्ण कामे |
| 4 | अल्पसंख्यांक बहुउद्देशीय योजना | भूमीगत सेव्हरेज पठाणपुरा गेट व बिनबा गेट प्लॉट चे काम | क्यु-4 | 24.08.09 | 5 | 14.01.13 | 5464014 | अपूर्ण कामे |
| 5 | अल्पसंख्यांक बहुउद्देशीय योजना | भूमीगत सेव्हरेज पाईपलाईन टाकणे | क्यु-2 | 24.08.09 | 7 | 04.03.13 | 12049342 | अपूर्ण कामे |
| 6 | विशीष्टपूर्ण कामे | मनपा ईमारत व व्यापार संकुल बांधकाम | 765 | 17.02.09 | 1 | 30.06.12 | 2508143 | अपूर्ण कामे |
| 7 | विशीष्टपूर्ण कामे | मनपा ईमारत व व्यापार संकुल बांधकामे | 765 | 17.02.09 | 2 | 01.11.12 | 9499296 | अपूर्ण कामे |
| | | | | | | एकूण रु. | 45070276 | |

DATBNKM6401 (Ref.No : 75, Item No : 105)

***38 बाबूपेठ वार्ड येथील महर्षी कर्वे शाळेतील वालकंपाउंड चे बांधकाम अभिलेख्यातील अनियमितता.***

**खुल्या जागेवरील विकास कामे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : बांधकाम राज्यशासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*



Scanned by CamScanner

गुंतलेली रक्कम रु. 543228.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 536891.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 6337.00/-

***सन 2012-13 च्या लेखापरीक्षणामध्ये करिता खुल्या जागेवरील विकास निधी योजनेतील अभिलेख्यांची तपासणी केली असता सन 2012-13 मध्ये एकच काम पूर्ण करण्यात आले असल्याचे दिसून आले. सदर बांधकामाच्या नस्तीची पडताळणी केली असता गंभीर अनियमितता असताना कंत्राटदारास पूर्ण रक्कम प्रदान केल्याचे आढळून आले.***

चंद्रपूर महानगरपालिका सन 2012-13 चे लेखापारीक्षेत खुल्या जागेवरील विकास कामे या योजनेमधून खालील प्रकारचे एकच काम पूर्ण झाले असून त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

1. कामाचे नावे - बाबूपेठ वार्ड येथील महर्षी कर्वे शाळेतील वालकंपाउंड चे बांधकाम करणे -
2. तांत्रिक मंजुरी – क्र. 141 दि. 29.03.2011 मध्ये रु. 4,86,300/-
3. कार्यारंभ आदेश – 114 दि. 15.06.2011 मुदत 4 महिने.
4. कंत्राटदार- मे. महेश कन्स्ट्रक्शन.
5. काम पूर्ण – दि. 12.10.2011.
6. मुल्यांकन – रु. 5,43,228/- मो. पु. क. 372 पान क्र. 42 व 384 पान क्र. 28.
8. प्रदान – प्र. क्र. 43 दि. 30.04.2012 रु. 5,43,228/- प्रथम व अंतीम देयक.

1. उपरोक्त कामाच्या निविदा प्रपत्राची पडताळणी केली असता पान क्र. 13 वर कंत्राटदारास मंजूर करण्यात आलेल्या कामाचा दर नमूद करून मा. आयुक्त यांनी प्रपत्रामध्ये स्वाक्षरी करणे आवश्यक असताना दर नमूद करून स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे कंत्राटदार व महानगरपालिका यांच्या समन्वयातून सदरील कामाचा दर मान्य करण्यात आला होता, याबद्दल पडताळणी करता आली नाही.

2. तसेच निविदा प्रपत्रामधील पान क्र. 15 वर कंत्राटदारानी निविदा प्रपत्र महानगरपालिकेने स्वीकृत केले असल्याबाबत मा. आयुक्तांनी निविदा पत्राच्या पान क्र. 15 वरील क्लॉज बाबत स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे कंत्राटदार मे. महेश कन्स्ट्रक्शन यांचे निविदा प्रपत्र आणि लिफाफा क्र. 1 मधील आवश्यक दस्तएवज महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका चे नियम 202 नुसार परिपूर्ण होते याची खात्री मा. आयुक्तांनी केली नसल्याचे आढळून आले.

3. Royalty clearance certificate करिता कार्यालयीन आदेश क्र. CNP/PW/90 दि. 01.04.2011 बाबत दि 04.04.2011 ते 12.10.2011 पर्यंतची गौन खनिज बाबतचा अर्ज मा. जिल्हाधिकारी चन्द्रपूर यांचे कडे मे. महेश कन्स्ट्रक्शन यांनी दि. 29.03.2012 ला केलेला होता. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी यांनी पत्र क्र. 302 दि. 17.07.2012 नुसार मे. महेश कन्स्ट्रक्शनयांना Royalty clearance certificate निर्गमित केल्याचे दिसून आले. परंतु मे. महेश कन्स्ट्रक्शन यांना कार्यारंभ आदेश क्र. 114 दि. 15.06.2011 नुसार उपरोक्त काम देण्यात आले असून त्यापूर्वीच्या दि. 04/04/2011 ते 14/06/2011 ह्या 2 महिन्यात उपरोक्त काम सुरु नव्हते. आणि



Scanned by CamScanner

कार्यारंभ आदेश सुद्धा दि. 04/04/2011 ते 14/06/2011 नंतर देण्यात आला असल्याने कंत्राटदारांनी सादर केलेले Royalty clearance certificate हे इतर कामाचे असल्याचे दिसून आले. तरी सुद्धा महानगरपालिकेने मे. महेश कन्स्ट्रक्शन यांना रु. 70.67 नुसार 89.75 मीटरचे एकूण रु. 6337/- च्या गौण खनिज शुल्क वसुलीची नियमबाह्यरित्या सूट दिल्याचे दिसून आले. तसेच संबंधीत कंत्राटदारांनी उपरोक्त कामावर वापरलेल्या गौण खनिजाबाबत महसूल विभागाकडील वाहतूक पावत्या/परवाने सुद्धा सादर केले नसताना नियमबाह्यपणे सूट देण्याबाबत महापालिकेचा उद्देश स्पष्ट होणे आवश्यक आहे.

उपरोक्त नियमबाह्यतेवरून बाबूपेठ वार्ड येथील महर्षी कर्वे शाळेतील वालकंपाउंड बांधकामाबाबत च्या अभिलेख्यामध्ये गंभीर अनियमितता असताना कंत्राटदारास रक्कमांचे प्रदान केल्याचे आढळून आल्याने गौण खनिज शुल्क रु. 6337/- वसुली होणे आवश्यक असून उर्वरित रक्कम रु. 5,36,891/- अक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. ह्या बाबत अर्धसमास पत्र क्र. 108/- दि. 04/03/2015 मधील मुद्दा क्र. 5 नुसार विचारणा करण्यात आली असता उत्तर समर्पक नसल्याचे दिसून आले.

DATBNKM6401 (Ref No : 77, Hmm No : 180)

## *39 अनुदानित रक्कमांचा दुरुपयोग करण्याची अनियमितता.*

**नागरी दलित वस्ती सुधार योजना.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : बांधकाम राज्यशासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1795000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1795000.00/-

***सन 2012-13 मध्ये नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत रु. 70,00,000/- एवढे अनुदान प्राप्त झाले असून त्यापैकी लेखापरीक्षणास सादर केलेल्या विवरणपत्रावरून एकूण 10 कामावर रु. 17,95,000/- खर्च झाला आहे यावरून नागरी दलित वस्ती सुधार योजना अनुदानाचा दुरुपयोग महानगरपालिका चंद्रपूर येथे होत असल्याचे दिसून आले.***

नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन 2012-13 चे लेखापरीक्षणास खालील प्रमाणे कामे/ बांधकामे करण्यात आल्याचे विवरणपत्र सादर करण्यात आले आहे. सदर विवरणपत्रात नमूद कामाच्या अभिलेख्यांची पडताळणी केली असता संबंधीत कामावर खालील प्रमाणे खर्च झाला आहे.

<u>कामाचा तपशील -</u>

| क्र. | कामाचे नाव | तांत्रिक मंजुरी | कार्यारंभ | कंत्राटदार | काम पूर्ण | प्रदान | मुल्यांकन रु. | शेरा/देयक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|



Scanned by CamScanner

| | | क्र. दिनांक व रक्कम | आदेश क्र. व दिनांक | | दिनांक | प्र.क्र./दिनांक/रक्कम | मोजमाप पुस्तिका क्र./पान क्र. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | चोखामेळा होस्टेल ते घडसे यांचे घरापर्यंत कॉंक्रीट नाली. | 34/ 12.4.10/ 3,92,480 | 619/ 13.12.10 | के. एस. पोटदुखे | 09.03.12 | 9/ 24.01.13 1,00,000 | 131/40 1,00,000 | पहिले व अंतिम |
| 2 | बायपास रोड ते हरिदास मंडल घर रस्ता डांबरीकरण | 19/ 8.4.10/ 9,54,080 | 632/ 13.12.10 | रामा कंस्ट्रक्शन | 10.04.11 | 10/ 24.1.13/ 2,50,000 | 16/64 2,50,000 | पहिले व अंतिम |
| 3 | एम. ई. एल. वार्डात रस्ता डांबरीकरण | 140/ 6.1.2006/ 3,12,285 | 2197/ 19.3.11 | ए. आर. वैरागडे | 09.04.11 | 11/ 24.01.13 1,50,000 | 16/62 1,50,000 | पहिले व अंतिम |
| 4 | श्री. लोणारे ते श्री. खरतरे घर कॉंक्रीट नाली. | 33/ 12.4.10/ 4,05,130 | 626/ 13.10.10 | मोहन नामनवार | 29.3.11 | 12/24.1.13/ 2,00,000 | 18/70 2,00,000 | पहिले व अंतिम |
| 5 | मेगशी आशालू ते रामळू पर्यत कॉंक्रीट नाली. | 6/ 6.4.10/ 4,98,490 | 640/ 30.10.10 | मोहन चौधरी | 10.3.11 | 3/ 3.11.12/ 1,45,000 | 131/42 1,45,000 | पहिले व अंतिम |
| 6 | नेताजी हायस्कूल ते आत्राम घर कॉंक्रीट नाली. | 30/ 12.4.10/ 6,01,830 | 775/ 3.2.11 | मोहसीन जव्हेरी | 28.3.11 | 4/ 24.1.13/ 1,00,000 | 14/90 1,00,000 | पहिले व अंतिम |
| 7 | श्री. वुरड ते निर्गुण घरापर्यंत नाली बांधकाम. | 31/ 12.4.10 9,72,001 | 844/ 24.3.11 | रमेश चाहरे | 27.7.11 | 5/ 24.1.13/ 2,50,000 | 501/46 2,50,000 | पहिले व अंतिम |
| 8 | श्री. तेलसे ते शिवाजी स्टोर्स कॉंक्रीट नाली. | 39/ 13.4.10 6,65,460 | 627/ 13.12.10 | भाग्यलक्ष्मी कंस्ट्रक्शन | 10.04.11 | 6/ 24.1.13/ 2,50,000 | 536/44 2,50,000 | पहिले व अंतिम |
| 9 | मुक्ती कॉलनी अप्रोच रोड | 40/ 13.4.10/ 4,57,435 | 839/ 24.3.11 | आर. पी. कोठारी | 25.4.11 | 7/ 24.1.13/ 1,00,000 | 536/42 | पहिले व अंतिम |
| 10 | प्रमोद गृहउद्योग ते वुरड मोहल्ला नाली बांधकाम. | 32/ 12.4.10 9,79,905 | 625/ 13.12.10 | महेश कंस्ट्रक्शन | 27.03.11 | 8/ 24.1.12/ 2,50,000 | 530/75 9,81,914 | पहिले व अंतिम |
| | | | | | | एकूण रु. | 1795000 | |

यावरील अभिप्राय –

1. महाराष्ट्र शासन सामाजिक न्यांय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र. विघयो 2004/प्र.क्र.71/विघयो-1 मुंबई दिनांक 14 जुलै 2004 मधील परिच्छेद क्र. 1(5) व सामाजिक न्याय विभागाचे परिपत्रक क्र. विघयो 2002/प्र.क्र.78/ विघयो 01/दिनांक 08/नोव्हेंबर 2002 प्रमाणे आणि महाराष्ट्र शासन नगर



Scanned by CamScanner

विकास विभाग शासन निर्णय क्र. विघयो -102000/1592/प्र.क्र.181/नवी-4मुंबई दि. 5 मार्च 2002 मधील मुद्दा क्र. 7(ब) नुसार दलित वस्ती सुधार योजना मधून हाती घेण्यापूर्वी सदरील कामे दलित वस्ती मधील आणि आवश्यकतेनुसार घेण्यात आल्याबाबत नगररचना विभागाकडून मंजूरी घेवून त्यानंतर सदर कामाची प्रक्रिया सुरु करणे आवश्यक होते. मात्र उपरोक्त कामे नगररचना विभागाने मंजूर केल्याबाबत आढळले नाही. त्यामुळे सदरील योजनेवर महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शा. नि. त्रु. द. व सु 2011/प्र.क्र.442/अजाक/मुंबई दि. 5 डिसेंबर 2011 मधील परिशिष्ट 'अ' नुसार शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान महानगरपालिकेने शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे खर्च झाल्याबाबातची पडताळणी करता आली नाही.

2. महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र. विघयो 2004/प्र.क्र.71/विघयो-1 मुंबई दिनांक 14 जुलै 2004 मधील परिच्छेद क्र. 1 मधील अ. ज. 5 व सदर विभागाचे परिपत्रक क्र. विघयो 2002/प्र.क्र.78/ विघयो 01/दिनांक 08/नोव्हेंबर 2002 नुसार नागरी दलित वस्तीमध्ये सदर योजना राबविताना सदरील भागातील 80% पेक्षा जास्त लोकसंख्या ही अनुसूचित जातीची असणे आवश्यक आही. परंतु उपरोक्त कामाच्या शिर्षक व स्थळवर्णनावरून सदरील कामे सदर शासन आदेशाप्रमाणे अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या वार्डमध्ये घेण्यात आली नसल्याचे दिसून आले.

3. महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र. विघयो 2004/प्र.क्र.71/ विघयो -1 मुंबई दिनांक 14 जुलै 2004 मधील परिच्छेद क्र. 1(5) व परिपत्रक क्र. विघयो 2002/प्र.क्र.78/ विघयो 01/दिनांक 08/नोव्हेंबर 2002 प्रमाणे दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत दलित वस्ती मध्ये करावयाची कामे नमूद आहेत. त्याला अनुसरून दलित वस्ती मध्ये वाचनालयाची सुद्धा कामे घेता येतील असे शासनाचे आदेश असताना फक्त रस्ते व नाल्याची कामे घेतली आहे. यावरून सदर निधीचा विनियोग शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार झाला नसल्याचे दिसून आले.

4. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका चे नियम 141 मध्ये स्पष्टपणे तरतुदी केल्या आहेत की, एखाद्या कामासंबंधीच्या प्रकल्पासोबत सादर करावयाच्या कागदपत्रामध्ये अहवाल, विनिर्देश, मोजमाप, परिमाण व दर या संबंधीचे तपशीलवार विवरणपत्रे तसेच प्रत्यक्ष बाबीचा एकूण अंदाजित खर्च दर्शविणारा गोषवारा यांचा समावेश असेल. त्या सर्व खर्चाचा मेळ घेतल्यानंतर त्याला अंदाज म्हणण्यात येईल. अशा अंदाजपत्रका सोबत सर्वसाधारण अहवाल जोडणे सक्तीचे व अनिवार्य आहे. तसेच अंदाजासोबत प्रस्ताव दर्शविणारी अभिकल्पने सर्वसाधारण अहवाल द्वारा नोंदविलेली नाही. तसेच उक्त 10 कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमांची एकूण बेरीज रु. 62,39,096/- असून सदरील 10 कामावरील खर्च रु. 17,95,000/- म्हणजे फक्त 29% झालेला असून ती कामे पूर्ण झाली असल्याबाबत काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मा. आयुक्त यांनी कामाची पाहणी करून पूर्ण झाल्याबाबतची खात्री झाल्याबाबत स्वाक्षरी केलेली नाही.यावरून महानगरपालिका चंद्रपूर येथे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्राप्त अनुदानाचा विनियोग शासनाने निर्देश दिल्याप्रमाणे परिपूर्ण होऊन सदर योजनेची फलश्रुती झालेली नसल्याचे दिसून आले.

5. वरील कामाचे कार्यारंभ आदेश हे सन 2010-11 ह्या वित्तीय वर्षातील असून काम सन 2011-12 मध्ये पूर्ण



Scanned by CamScanner

होऊनही कामाच्या मुल्यांकनाप्रमाणे करावयाचे प्रदान सन 2012-13 मध्ये केले आहे. यावरून शासनामार्फत नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत दर वर्षी प्राप्त होणारे अनुदान त्याच वित्तीय वर्षात खर्च करण्याची तजवीज महानगरपालिके मार्फत होत नसल्याचे दिसून आले.

सबब सन 2010-11,2011-12 व 2012-13 मध्ये नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानाचा मेळ घेऊन सदरील अनुदानामधून करावयाच्या कामाबाबत मेळ घेऊन अनुपालन दर्शविण्यात यावे. तोपर्यंत सन 2012-13 मध्ये झालेला खर्च रु. 17,95,000/- अक्षेपित ठेवण्यात येते.

DATBNKM6401 (Ref No : 78, Hmm No : 108)

## 40 *कोहिनूर स्टेडीअम येथे वालकंपाउंड उंची वाढविणे प्रदानामधील अनियमितता.*

**क्रिडांगण विकास निधी.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : बांधकाम राज्यशासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 342593.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 338993.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3600.00/-

***सदरील कामावर गौण खनिजाचा वापर करण्यात आला असून गौण खनिज शुल्क वसूल केले नाही. तसेच साहित्य तपासणी अहवाल काम पूर्ण झाल्यानंतर प्राप्त करण्यात आला. त्यामुळे वापरलेले गौण खनिज आणि वाळू, विटा, गिट्टी ईत्यादी शासनाच्या मानकानुसार वापरण्यायोग्य होत्या असे मानता येणार नाही.***

सन 2012-13 चंद्रपूर महानगरपालिकेचे लेखापरीक्षणामध्ये खालील कामाबाबत प्रदान करण्यात आल्याचे आढळून आले. मात्र सदरील प्रदानापूर्वी आवश्यक ती खबरदारी घेऊन प्रदान केले नसल्याचे दिसून आले.

कामाचा तपशील -

1. कामाचे नावे - कोहिनूर स्टेडीयम येथे वालकंपाउंड उंची वाढविणे.
2. तांत्रिक मंजुरी – क्र. 112 दि. 22.03.2012, रु. 3,62,570/-
3. प्रशासकीय मंजुरी – प्रा. अ. मनपा-39 दि. 29/02/2012.
4. कामाचा आदेश – 631 दि. 13.03.2012 मुदत 2 महिने.
5. काम सुरु दिनांक – 16.04.2012.
6. काम पूर्ण – दि. 10.05.2012.
7. मुल्यांकन – मो. पु. क्र. 116 पान क्र. 45 रुपये 3,42,593/-



Scanned by CamScanner

8. प्रदान – प्र. क्र. 632 दि. 16.08.2012 रु. 3,42,593/-
9. कंत्राटदार- मे. निलम एस. शेख.

1. सदर कामावर वापरण्यात आलेल्या वाळू, रेती, गिट्टी व विटा ईत्यादी बाबत नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निर्देश क्र. 37 दि. 03.01.2006 नुसार शासकीय प्रयोगशाळेकडून गुणवत्ता तपासणी करवून घेऊनच योग्य दर्जाच्या साहित्याचा वापर बांधकामामध्ये करावयाचा आहे.परंतु सदरील काम दि. 10.05.2012 ला पूर्ण झाल्यानंतर चाचणी अहवाल क्र. 6866 दि. 18.05.2012 नुसार प्राप्त झाला आहे. यावरून उक्त काम पूर्ण झाल्यानंतर साहित्य तपासणी अहवाल प्राप्त झाल्याचे आढळून आले. यावरून योग्य दर्जाच्या साहित्याचा वापर कंत्राटदरानी केला याबाबत महानगरपालिकेने सदरील काम चालू असताना साहित्य तपासणी केली नाही केले नसल्याचे परीणामी सदर बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे नाकारता येत नाही.
2. सदरील कामावर रेती प्राकलनामध्ये 49 क्युबिक मीटर दर्शविण्यात अली परंतु प्र. मी. ब्रास रु. 200/- प्रमाणे 18 ब्रास ची गौण खानिजाबाबत शासनाकडे भरणा करावयाची रक्कम रु. 3600/- वसूल करण्यात अली नाही किंवा कंत्राटदरांनी वापरलेल्या गौण खानिजाबाबत च्या वाहतूक पास सुद्धा प्राप्त करण्यात आलेल्या नाहीत. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 108 दि. 04.03.2015 नुसार खुलासा करण्यास सूचित केले असता खुलासा समर्पक नसल्याचे दिसून आले.

यावरून सदर कामावर वापरण्यात आलेले गौण खानिज आणि साहित्य शासनाच्या मनकाप्रमाणे योग्य असलेले वापरण्यात आल्याबाबत लेखापीक्षणात पडताळणी करता आली नसल्याने वरील प्रमाणे रु. 3600/- च्या वसुली व उर्वरित रक्कम रु. 3,38,993/- अक्षेपित ठेवण्यात येते.

DATBNKM6401 (Ref No : 79, Item No : 108)

## *41 प्राप्त निविदा धारकांएवजी इतरांना कामाचे कंत्राट देण्याची अनियमितता.*

**वैशिष्ट्यपूर्ण योजना.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : बांधकाम राज्यशासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 253838.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 253838.00/-

***निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदा धारकांएवजी निविदा सादर न करणाऱ्या कंत्राटदारास कामाचा आदेश देण्यात आल्याचे दिसून आले.***



Scanned by CamScanner

सन 2012-13 महानगरपालिका चंद्रपूर च्या बांधकाम विभागाच्या अभिलेख्याची तपासणी केली असता खालील कामाबाबत संबंधीत कंत्राटदार श्री. पराते यांनी निविदा सूचनेनुसार निविदा महानगरपालिकेकडे सादर केले नसताना त्यांना कार्यकंत्राट आदेश देण्यात आल्याची अनियमितता दिसून आले.

कामाचा तपशील -

1. कामाचे नावे – मनपा ईमारत व व्यापार संकुल बांधकामाचे आर्कीटेक्चरल कन्सलटिंग.
2. कंत्राटदार- मे. श्री. परामे ॲंड असोसीएट.
3. कामाचा आदेश – क्र. 590 दि. 07.03.2012.
4. प्रमाणाक क्र. – 5 दि. 30.03.2013 रु. 2,53,838/-

सदरील कामाची निविदा सूचना वर्तमान पत्रात प्रसिद्धीस दिल्यानंतर खालील प्रमाणे कंत्राटदरांनी निविदा भरल्या होत्या.

प्राप्त निविदा – 1. श्री. धर्मेंद्र पंडीत, चंद्रपुर.
2. मे. वेदी कंसलटट, नागपूर.
3. श्री. रोहित उलरवर, चंद्रपुर.
4. श्री. राम तलरेजा, चंद्रपुर.
5. मे. आरकेन डिझाईन ग्रुप, चंद्रपुर.
6. श्री. सचिन चिंतावार, चंद्रपुर.
7. श्री. वैभव सहारकर, चंद्रपुर.

वरील पैकी 7 निविदा पैकी मे. वेदी कन्सलटिंग, नागपूर, यांची सर्वात कमी दराची निविदा महानगरपालिकेने मंजूर केली होती. मात्र सदर कामाच्या नस्ती मधील दि. 15.12.2011 च्या टिपणीनुसार उक्त कामाचे आदेश श्री. पराते ॲंड असोसीएट यांना देण्याबाबत प्राधिकृत अधिकाऱ्यांनी लेखी निर्देश दिल्यामुळे श्री. पराते ॲंड असोसीएट यांना दि. 07.03.2012 ला काम सुरु करण्याचा आदेश देण्यात आला. सदरील काम करण्यासाठी मात्र मे. वेदी कंसलटट, नागपूर, यांना मंजूर झालेले दर श्री. पाराते ॲंड असोसीएट यांचे करिता मंजूर करण्यात आले. मात्र याबाबत अर्धपत्रसमास क्र. 108 दि. 04.09.2015 बाब क्र. 3 नुसार लेखापरीक्षण पथकाने खुलासा मागविला असता सदहू खुलासा समाधानकारक नसल्याने सदर लेखाआक्षेप घेण्यात आला.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 206 नुसार कोणत्याही प्रकारच्या कामाच्या अमलबजावनीसाठी निविदा प्रपत्र, सुरक्षा ठेव, आयकर निपटारा प्रमाणपत्र, चालू असलेल्या बांधकामाचे प्रतीज्ञापत्र आणि पतदारी प्रमाणपत्र ईत्यादी सादर केल्याशिवाय त्या कंत्राटदाराची निविदा स्विकृत करावयाची नसताना श्री. पराते ॲंड असोसीएट यांनी निविदा व इतर अभिलेखे सादरच केले नसतांना नियमबह्यपणे कामाचा आदेश देऊन त्यांना रु. 2,53,838/- चे प्रदान सुद्धा केले आहे. यावरून सदर कामाबाबत व कंत्राटदाराबाबत लेखापरीक्षणामध्ये कोणतीही खात्री झाली नाही. तसेच कामाबाबतची सुद्धा पडताळणी करता अली नाही. सबब नियमबाह्य प्रदानाबाबत रु. 2,53,838/- लेखा परीक्षणामध्ये मान्यता देता येणार नसल्याने उक्त रक्कम रु. 2,53,838/- संबंधीत प्राधिकृत अधिकारी यांचे कडून वसूल होणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

DATBNKMo101 (Ref No : 80, Hmm No 100)

## 42 मानवी मजूर पुरविण्याबाबतचे कंत्राट नियमबाह्यपणे देण्यात आल्याची अनियमितता.

**साफसफाई करणे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : स्वच्छता मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 606300.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 606300.00/-

***झोन क्र.1,2,3 अंतर्गत नाली व इतर साफसफाई करिता मानवी मजूर पुरविण्याबाबत दरपत्रके मागवून सदर काम करण्यात आले. सदरील काम हे पंजीकृत कंत्राटदाराकडील निविदा मागवून स्पर्धात्मक दराद्वारे करणे आवश्यक होते. नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे स्थायी निर्देश क्रमांक 36 दि.29 डिसेंबर 2005 मधील बाब क्रमांक 13 नुसार नियमबाह्य ठरते.***

चंद्रपूर महानगरपालिका सन 2012-2013 मधे झोन क्रमांक 1,2,3 मधील नाल्या व इतर सफाई करिता सेवा सहकारी संस्था यांचे कडून मानवी मजूर पुरविण्याबाबतचे दरपत्रके मागविली असता (1) मे. मनोहर बहुउद्देशीय सेवा सह संस्था (2) मे. क्रांतीसूर्य बहुउद्देशीय बेरोजगार सेवा सह संस्था (3) श्री. विठ्ठल सेवा सहकारी संस्था (4) मे. महालक्ष्मी बहुउद्देशीय सेवा सह संस्था यांचे दरपत्रके प्राप्त झाली. वाटाघाटी अंती प्रती मजूर दर रु.300/- मंजूर करून (1) मे. मनोहर बहुउद्देशीय सेवा सह संस्था (2) मे. महालक्ष्मी बहुउद्देशीय सेवा सह संस्था (3) श्री. विठ्ठल सेवा सहकारी संस्था यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले. सदर तिनही सहकारी संस्थेने प्रत्येकी 18 मजूर महानगरपालिकेच्या झोन 1,2,3 मधील नाल्या व इतर साफसफाई करिता पुरविले असल्याने त्यांना खालील प्रमाणे महानगरपालिकेने प्रदाने केल्याची दिसून आले.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | संस्थेचे नाव | एकूण मजूर | प्रत्यक्ष निर्माण मनुष्यदिन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1486 | 25/02/13 | 134250 | श्री. विठ्ठल सेवा सहकारी संस्था | 18 | 447 |
| 2 | 1603 | 19/03/13 | 139050 | श्री. विठ्ठल सेवा सहकारी संस्था | 18 | 463 |
| 3 | 1601 | 19/03/13 | 126600 | मे. महालक्ष्मी बहुउद्देशीय सेवा सह संस्था | 18 | 422 |



Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 1602 | 19/03/13 | 120600 | मे. महालक्ष्मी बहुउद्देशीय सेवा सह संस्था | 18 | 402 |
| 5 | 1777 | 30/03/13 | 85800 | मे. मनोहर बहुउद्देशीय सेवा सह संस्था | 18 | 286 |
| एकूण रुपये | | | 606300 | | | |

वरीलप्रमाणे रकमांचे प्रदान प्रतीमजूर प्रतिदिन रु.300/- प्रमाणे संबंधित संस्थेला करण्यात आले. परंतु नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे स्थायी निर्देश क्र.36 दि. 29 डिसेंबर 2005 मधील बाब क्रमांक 13 नुसार नियमबाह्य आहे. सदर निर्देशानुसार महापालिकेने त्याच्या कामाकरिता मानवी मजूर पुरविण्याबाबत कंत्राट न देता उक्त काम हे जाहीर निविदा / दरपत्रके मागवून कंत्राटदारामार्फत करून कंत्राटदाराने केलेल्या कामाचे मोजमाप मुल्यांकन करून मुल्यांकनाप्रमाणे कंत्राटदारास प्रदान करावयाचे आहे. परंतु महानगरपालिकेने उक्त कामाकरिता तीनही संस्थेकडून प्रत्येकी 18 मजुराची मागणी करून नाल्या सफाई चे कामे करवून घेतली सदर बाब हि उक्त स्थायी निर्देशानुसार नियमबाह्य ठरते.

तसेच मनोहर बहुउद्देशीय सहकारी संस्थेला उक्त काम देण्यात आले असता त्यांनी खालील प्रमाणे कामाकरिता कमी मजूर लावल्याचे दिसून आले.

| अ.क्र. | दिनांक | कमी लावलेले मजूर |
|---|---|---|
| 1 | 07/02/13 | 10 |
| 2 | 08/02/13 | 07 |
| 3 | 09/02/13 | 01 |
| 4 | 11/02/13 | 01 |
| 5 | 13/02/13 | 02 |
| 6 | 14/02/13 | 01 |
| 7 | 14/02/13 | 02 |
| 8 | 19/02/13 | 02 |
| 9 | 20/02/13 | 04 |
| 10 | 21/02/13 | 01 |
| 11 | 22/02/13 | 05 |
| 12 | 23/02/13 | 08 |
| 13 | 25/02/13 | 04 |
| 14 | 26/02/13 | 05 |
| एकूण कमी लावलेले मजूर | | 53 |



Scanned by CamScanner

वरीलप्रमाणे कमी मजूर कमी लावण्यात आलेले असल्याने सदर भागातील साफसफाई व नाल्या साफसफाई कामे कशी, केव्हा व कशी पूर्ण झाली याबाबत चे अभिलेखे या संदर्भ नस्तीमध्ये उपलब्ध नाही. तसेच दरपत्रके जाहीररित्या मागविली असता दरपत्रके सादर करणाऱ्या सर्वच सहकारी संस्थेला मानवी बळ पुरविण्याबाबत कार्यारंभ आदेश दिलेले आहे. यावरून कंत्राटदाराचे हित साध्य करण्याकरिता सर्वच सहकारी संस्थेला सरसकट कार्यारंभ आदेश महानगरपालिकेने दिले असल्यामुळे सदरील कामे व महानगरपालिकेची कार्यप्रणाली संशयास्पद असल्याचे दिसून आले. याबाबत अर्धसमास पत्र क्र.80 दि.24/07/2015 नुसार खुलासा मागविण्यात आला असता खुलासा मोघम स्वरुपात सादर करण्यात आल्याचे दिसून आले. तसेच दैनदिन कचरा उचलणे बाबत सुद्धा बचत गटांना कार्यारंभ आदेश देण्यात आले. मात्र त्यांचेकडून करारनामे करवून घेण्यात आलेली नाहीत. तसेच त्याचे कडील लेटरहेड वर त्यांच्या बचतगटाचा नोंदणी क्रमांक सुद्धा नमूद नाहीत. सदर कामाचे प्राकलन तयार करतांना सन 2012-2013 मधील अकुशल मजुराकरिता प्रतीदिन रु.200/- हा दर गुहीत धरण्यात आलेला नाही.

त्यामुळे सदर कामावर अतिप्रदान झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे वरीलप्रमाणे नमूद प्रदानाची एकूण रक्कम रुपये 606300/- आक्षेपीत ठेवण्यात येत आहे.

DATBKM6401 (Ref No : 81, Hmm No : 80)

### *43 टाकाऊ वस्तू संतुलन कंत्राटातील अनियमिततेमुळे महानगरपालिकेच्या झालेल्या हानीबाबतची अनियमितता.*

**घन कचरा व्यवस्थापन**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष: स्वच्छता मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3233284.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3233284.00/-

> ***महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या प्रभागामधून गाळ, माती, कचरा व इतर टाकाऊ वस्तू संकलन करण्याचा कंत्राट देण्यात आला. मात्र निविदा अटी व शर्ती चे पालन झाले नसल्याचे कंत्राटदारांना नियमबाह्यपणे प्रदान झाले असल्याने महानगरपालिकेची आर्थिक हानी झाल्याचे दिसून आली.***

1. चंद्रपूर महानगरपालिका सन 2012-13 मधे टाकाऊ वस्तू संकलना करिता निविदा सूचना मागविण्यात येवून कंत्राटदार श्री. महेश बोडखे यांची निविदा मंजूर करून त्यांना उक्त काम देण्यात आले. संबंधित कंत्राटदारास



Scanned by CamScanner

सन 2012-13 मधे खालील प्रमाणे प्रदान करण्यात आले.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 1665 | 26/3/2013 | 694369 |
| 2 | 1575 | 13/3/2013 | 585863 |
| 3 | 1576 | 13/3/2013 | 635273 |
| 4 | 53 | 30/3/2013 | 658131 |
| 5 | 1604 | 19/3/2013 | 659648 |
| एकूण रुपये | | | 3233284 |

वरील प्रमाणकाची पडताळणी केली असता महानगरपालिका चंद्रपूर अंतर्गत वेगवेगळ्या प्रभागातील गाळ, माती, कचरा व इतर टाकाऊ वस्तू संकलन करण्याबाबत कंत्राटदारास प्रदान केल्याचे आढळले. संबंधित कंत्राटदाराच्या निविदा प्रप्रत्रासोबतच्या अभिलेख्याचे पडताळणी केली असता श्री. महेश बोडखे कंत्राटदार यांची आर्थिक क्षमता रु.5000000/- रकमेची असतांना त्यांना प्रतिमाह रु.667495•12 महिने =8009941 रुपये चा कंत्राट नियमबाह्य पणे देण्यात आल्याचे दिसून आले. महाराष्ट्र शासन नगर प्रशासन संचालनालय स्थायी निर्देश क्र.36 दि.29/12/2005 व महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 1088/(2512)/उद्योग-6 दि.2 जानेवारी 1992 मधील तरतुदी नुसार तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर कंत्राटदाराच्या पात्रता बाबत पडताळणी करावयाची आहे.

यामधे 1. तांत्रिक क्षमता :- साधन सामुग्री

2. आर्थिक क्षमता :- कंत्राटाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबीवर गुंतवणूक करण्याची क्षमता.

3. अनुभव व पात्रता :- पूर्वानुभव प्रमाणपत्र

4. नोंदणी व परवाने :- नोंदणी व परवाना धारकप्रमाणपत्र

इत्यादी बाबत काटेकोरपणे पडताळणी झाल्यानंतरच निविदा दराचा लिफाफा उघडावयाचा आहे.

तरी सुद्धा श्री. महेश बोडखे, कंत्राटदार यांची आर्थिक क्षमता रु.5000000/- असतांना त्यांना 1 वर्षकालावधीचा सुमारे रुपये 8009941/- रुपये क्षमतेचा कंत्राट नियमबाह्यपणे देण्यात आल्याचे दिसून आले.

2. निविदा अटी व शर्ती नुसार कंत्राटदारांनी हातगाड्या सह आर्थिक दर निविदा प्रपत्रे नमूद करावयाचे होते. त्यानुसार त्यांची निविदा मंजूर करण्यात आली. मात्र प्रत्यक्षात महानगरपालिकेने खरेदी केलेल्या हातगाड्या कंत्राटदाराने वापरल्या असल्याने शिवाय सदरील हातगाड्या बाबतची रक्कम सुद्धा महानगरपालिकेने बिलातून कपात करून न घेता संपूर्ण रकमांचे प्रदान कंत्राटदारास केलेला असल्याने महानगरपालिकेची हानी झालेली आहे.

3. निविदा अटी व शर्ती नुसार महानगरपालिका हद्दीमधील कचरा, गाळ, टाकाऊ वस्तू, संकलन करण्याचा



Scanned by CamScanner

कंत्राट श्री. महेश बोडखे यांना दिला असतांना प्रदान करावयाच्या मूल्याची रक्कम मानवी श्रमदिनाद्वारे काढण्यात येवून कंत्राटदारास अनावश्यक प्रदान करण्यात आले.

4. नगरपरिषद प्रशासन संचालनालय याचे स्थायी निर्देश क्रमांक 36 दि. 29 डिसेंबर 2005 मधील बाब क्रमांक 13 नुसार कामाची अंमलबजावणी करतांना किती मनुष्यबळ लागणार आहे या तपशिलावर आधरित म्हणजे Input basis तत्वावर निविदा मागावावयाच्या मागवून कंत्राटदारास प्रदान करावयाचे नाही. तसेच स्थायी निर्देश क्रमांक 35 मधील बाब क्र.6 नुसार कंत्राटाद्वारे केलेल्या कामाची नोंद नोंदणी पुस्तकात घेतल्यानंतरच झालेल्या मुल्यांकन रकमेनुसार कंत्राटदारास रकमांचे प्रदान करावयाचे आहे. तथापि उपरोक्त प्रमाणकान्वये दर्शविलेल्या प्रदानाबाबतचे मुल्यांकन मोजमाप पुस्तकात नोंदविण्यात आल्याचे आढळून आले नाही. जर उक्त कामाकरिता कंत्राटदारांनी प्रत्यक्षात मानवी सेवक लावले असते आणि लावलेल्या मानवी सेवकांनी टाकाऊ वस्तू संकलनाचे काम दिले असते तर महानगरपालिका चंद्रपूर येथील तांत्रिक अधिकारी / अभियंता यांनी झालेल्या कामाची नोंद मोजमाप व मुल्यांकन करण्यात आले नसल्याने वरील प्रमाणकाद्वारे दर्शविलेले प्रदान संशयीत देयकाद्वारे झाले असण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

5. सदर कंत्राट शहरातील नेमून दिलेल्या विविध भागातील गाळ, माती, केरकचरा व टाकाऊ वस्तू संकलन करावयाच्या कामावर अनुपस्थित असलेल्या मजुरांचा प्रतिदिन 300 रनिंग मीटरचे रु. 315 प्रमाणे कपाती करण्यात आल्या. मात्र लेखा परिक्षण पथकाचे अर्धसमास पत्र क्र.57 दि. 24/06/2015 चे उत्तरामधे नाली सफाई कामाचे मोजमाप दररोज करणे शक्य नाही असे कळविले आहे. यावरून उक्त कामाचे मोजमापानुसार महानगरपालिकेने कंत्राटदारास प्रदान करावयाचे होते हि बाब सिद्ध होत असतांना अर्धसमास पत्र क्रमांक 57 दिनांक 24/06/2015 मधील बाब क्रमांक 6 चे उत्तरामध्ये साफ सफाईचे कामाचे दर वेतन कायद्यानुसार शासनाने ठरविलेले आहे. सदर काम नियमित स्वरूपाचे असल्याने किमान वेतन कायदा 1947 चे नियम लागू होत असल्याने, किमान वेतन दराप्रमाणे मंजुरी दर क्र.300/- धरण्यात आला असल्याने कळविलेले आहे. मात्र प्रत्यक्षात किमान वेतन अधिनियम 1948 नुसार नगर विकास नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक लवेसू-1006/556/प्र.क्र.59/2006/नवि-18 दि 24.05.2006 मधील परिच्छेद 2 नुसार नेमणूक केली असती तर त्यांना किमान वेतन कायदा 1948 नुसार वेतन उचित होते. परंतु श्री. महेश बोडखे यांना सदर कामाचा कंत्राटमहानगरपालिकेने दिलेला असतांना त्यांनी लावलेल्या मंजूर कामगारांना महानगरपालिकेने किमान वेतन कायदा 1948 नुसार वेतन देणे नियमबाह्य आहे. वरील कामावर लावण्यात आलेल्या मजूर कामगारांना वेतन देण्याची जबाबदारी ही कंत्राटदार श्री. महेश बोडखे यांची असल्याने मजुराच्या अनुपस्थितीबाबत प्रती मजूर 300 रनिंग मीटरप्रमाणे करण्यात आले नसल्यामुळे बिलातून रकमा कपात करण्यात आल्या होत्या ते काम पुढे कधी केले व त्याचे प्रदान कधी केले याबाबतचे अभिलेखे व नोंदी नस्तीमध्ये दिसून आल्या नाहीत.

यावरून वरील प्रमाणकाद्वारे दर्शविलेले प्रदान नियमबाह्य व संशयित आणि नगर परिषद संचालनालयाकडे निर्देशाची अनुसरून नसल्याचे दिसून येत असल्याने झाल्याप्रदानाची रक्कम रुपये 3233284 आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

DA{BNKM6461 (RefNo : 86, Hmm No : 57)



Scanned by CamScanner

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम



Scanned by CamScanner

——————— **निरंक** ———————



Scanned by CamScanner

# भाग दोन

## सर्वसाधारण अनियमितता



Scanned by CamScanner

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ.ब.क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी



Scanned by CamScanner

**१४ प्रमाणणकार लेखाशिर्ष, लेखासंकेतांक, अंदाजपत्रकीय तरतुद व चढत्या क्रमांकाची बेरीज नमुद नसतांना रकमेची अदाई करण्याची अनियमितता.**

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
अनियमितता संख्या : 02

*अनियमितता कलम : 95*

गुंतलेली रक्कम रु. 948048176.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 948048176.00/-

| |
|---|
| *मनपाचे वित्त विभागाव्दारे प्रमाणकावर आवश्यक तपशिल नमुद असल्याशिवाय देयकाचे प्रदान करणे नियमबाह्य असतांना सन 2012-13 मधील संपुर्ण प्रमाणकावर लेखाशिर्ष, लेखा सांकेतांक, अंदापत्रकीय तरतुद व चढत्या क्रमांकाची बेरीज नमुद न करताच नियमबाह्यपणे देयके अदा करण्यात आली. वार्षिक लेख्यामध्ये नमुद असलेली संपुर्ण खर्चाची रक्कम रूपये 948048176/- आक्षेपीत ठेवण्यात येत आहे.* |

सन 2012-13 या वित्तीय वर्षातील प्रमाणकाची तपासनी केली असता खालील अनियमितता आढळुन आल्यात.

1. सन 2012-13 या वित्तिय वर्षातील माहे मार्च 2013 या निवडक महिण्यातील प्रमाणकाची तपासनी केली असता प्रमाणकावर लेखाशिर्ष नमुद केलेला नाही. त्यामुळे सदर प्रमाणके कशाची आहेत हे प्रमाणकावरील कार्य संकेतांक, प्रधानशीर्ष, गौणशीर्ष तपशिलवार शीर्ष इत्यादीचा उल्लेख नसल्यामुळे प्रमाणकावर केलेला खर्च प्रत्यक्षात योग्य शीर्षातच झाल्याचे तपासनी करता आली नाही.

2. त्याच प्रमाणे प्रमाणकावर अंदाजपत्रकातील तरतुद, प्रमाणकामध्ये केलेला खर्च, आतापर्यंत झालेला एकुण खर्च व शिल्लक तरतुद इत्यादीचा उल्लेख केलेला नाही . खर्चाकरीता अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद अस्तित्वात असेल तरच केवळ तो खर्च करण्यात येईल आणि त्याची नोंद प्रमाणकावर घेणे आवश्यक आहे . सदर खर्चाची कोणतीही अर्थसंल्पीय तरतूद नसेल किंवा अर्थसंकल्पीय तरतूद मर्यादेपेक्षा जास्त रक्कम खर्च होण्याची शक्यता असेल तर वर्षाच्या समाप्ती होण्यापुर्वी अतिरिक्त विनियोजन किंवा पुनर्विनियोजनव्दारे अतिरिक्त निधी मिळण्यासाठी पावले उचलण्यात येण्याकरीता प्रमाणकावर अतिरिक्त निधी मिळण्यासाठी पावले उचलण्यात येण्याकरीता प्रमाणकावर अंदाजपत्रकीय तरतूदीचा उल्लेख करने आवश्यक ठरते . त्यामुळे सन 2012-13 मधील देयकाव्दारे केलेला खर्च हा अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार तसेच प्राप्त अनुदानाइतकाच करण्यात आला याची लेखापरीक्षणास



Scanned by CamScanner

शहानिशा करता आली नाही. तसेच लेखाशिर्षाअभावी प्रदान रक्कमा संशयीत प्रदान असण्याची शक्यता नाकारता येत नाही . सबब सन 2012-13 च्या वार्षिक लेख्यामध्ये नमुद असलेली संपु र्ण खर्चाची रक्कम रुपये 94,80,48,176/- आक्षेपीत ठेवण्यात येत आहे.

DATSSKM6702 (Ref No : 3, Hmn No : 06)

## *45 कर विभागातील जमा रकमाच्या विवरणपत्राची पडताळणी करणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*
गुंतलेली रक्कम रु. 97837686.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 97837686.00/-

***जमा रकमेचा ताळमेळ बँक कॅशबुकशी न घेणे. महानगरपालिकेतील संबंधित कर विभाग व लेखा विभाग ह्या दोन्ही विभागाने ताळमेळ विवरणपत्र ठेवणे. ताळमेळाचे विवरण त्रीमासिक किंवा महानगरपालिकेने त्यापेक्षा निश्चित केलेल्या कमी कालावधीच्या अंतरामध्ये ठेवणे.***

सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे चंद्रपूर महानगरपालिकातील कर विभागातील जमा रकमांचा ताळमेळ माहे 31 मार्च 2013 अखेरे बँक कॅशबुक मधील शिल्लक रकमेशी घेणे आवश्यक आहे. कर विभागातील जमा रकमांचे ताळमेळ घेण्याबाबत अर्धसमासपत्रान्वे क्र. 35 दिनांक 04/06/2015 व 39 दिनांक 05/06/2015 ला विचारणा केली असता प्राप्त अनुपालन लक्षात घेऊन खालील अनियमितता दिसून येत आहे.

1) शासन परिपत्रक क्र.1009/प्र.क्र.57/कोषा प्र.5 दिनांक 05 जाने. 2010 जमा रकमेचा ताळमेळ घेण्यासंदर्भात विभागीय अधिकाऱ्यांनी जमा रकमांची पडताळणी करून घेण्यासंदर्भात तरतुदी विहित केल्या आहेत. तथापि विभागाला अर्धसमास पत्र क्र. 39 दिनांक 05/06/2015 अन्वये जमा रकमा संबधित रकमेची ताळमेळाबाबत विचारणा केली असता उत्तर प्राप्त न झाल्यामुळे संबंधित विभाग प्रमुखाने शासन निर्णयाचे पालन न केल्याचे दिसून येत आहे.

2) राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता नियमावली (NMAM) मधील प्रकरण 30, नियम 30.2 नुसार जमा रकमाबाबतच्या आकडेचा तपशील/माहिती महानगरपालिकेंतील संबंधित कर विभाग व लेखा विभाग ह्या दोन्ही विभागाने ठवणे अनिवार्य असल्याने व ते न ठेवल्याने जमा रकमांचा ताळमेळ सारखे असल्याचे भाकीत होत नाही.

3) उपरोक्त नियमावली मधील प्रकरण 30 नुसार नियम 30.14 अन्वये जमा रकमा संबंधित ताळमेळाचे विवरण त्रीमासिक किंवा महानगरपालिकेने त्यापेक्षा निश्चित केलेल्या कमी कालावधीच्या अंतरामध्ये ठेवणे आवश्यक असतांना तसे न ठेवल्याचे आढळून येत आहे.

तरी विभागाने सन 2012-2013 मध्ये मालमत्ता कराबाबत बँकेत जमा रकमांचे मासिक ताळमेळ घेऊन आवश्यक



Scanned by CamScanner

दस्तएवजासह लेखापरीक्षणास अनुपालन सदर करावे, तोपर्यंत सदर आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता कराच्या प्राप्त महसुलाची एकूण रक्कम रु. 97837686/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

तरी यासंबंधात कर विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांनी मालमत्ता कराच्या बँकेत जमा रकमांचे वेळोवेळी ताळमेळ न घेणेबाबत संबंधित विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 97837686 |
| वसुलपात्र रक्कम | 0 |

DLFSPPM8501 (Ref No : 28, Hmo No : 39)

**46 सेवानिवृत होणा-या कर्मचा-याच्या वेतनातुन 3 महिने आधी भविष्य निर्वाह निधी वर्गणीची रक्कम कपात न करण्याबाबत.**

**भ.नि.नि.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : भ. नि. नि. मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, 1998 चे नियम 7(4) व 11 नुसार वर्गणीदार त्याच्या नियम सेवावधीनंतर त्यांच्या निवृतीच्या शेवटच्या तीन महिन्यापूर्वी निधीमध्ये वर्गणी भरण्यात आली. नियम 16(अ) नुसार वर्गणीदाराची 20 वर्षाची सेवा पूर्ण झाली नसतांना विशेष कारणासाठी नापरतावा अग्रीम मंजुर करण्यात आली. तसेच अग्रीमाची कपात पुढील महिण्याच्या वेतनातुन केली नाही. ही नियमबाहय बाब आहे.***

महानगरपालीका चंद्रपूरचे सन 2012-13 या वित्तीय वर्षातील भविष्य निर्वाह निधीच्या लेख्याची तपासनी केली असता महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम , 1998 चे नियम 7(4) व 11 नुसार वर्गणीदार त्याच्या नियम सेवावधीनंतर त्यांच्या निवृतीच्या शेवटच्या तीन महि न्यापूर्वी निधीमध्ये वर्गणी भरणार नाही . त्यावर व्याज प्रदान करणे भाग पडल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधीतांवर निश्चित करून अतिरिक्त प्रदान कराव्या लागणा -या व्याजाची वसुल संबंधीताकडुन करण्यात येईल. खालील कर्मचा-यांच्या वेतनातुन जादा वर्गणी कपात केल्या मुळे त्यांना मनपाला सदर कालावधीचे जादा व्याज प्रदान करावे लागले . जादा व्याजाची परिगणना करून रक्कम संबंधीताकडुन वसुली करावी.



Scanned by CamScanner

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | भ.नि.नि. क्रमांक | सेवानिवृतीचा दिनांक | महिन्या पर्यंत भरलेली | जादा महिने | वर्गणी भरलेला महिना |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | मोहन उमाटे | 642 | 30.9.2012 | सप्टें12 | 3 म | 7000 |
| 2. | भैया कामडे | 704 | 31.10.2012 | ऑक्टो12 | 3 म | 600 |
| 3. | मनोहर बोक्कावार | 709 | 31.1.2013 | डिसें12 | 2 म | 7000 |
| 4. | आशा महातव | 757 | 31.7.2012 | मे12 | 1 म | 1000 |
| 5. | नरेश नंदवंशी | 773 | 31.10.2012 | सप्टें12 | 2 म | 5000 |
| 6. | अशोक खनके | 780 | से.नि.दिनांक नाही | जुलै12 | | 4000 |
| 7. | लटारी नागपूरे | 841 | 30.4.2012 | मार्च12 | 2 म | 3500 |
| 8. | रमेश बनकर | 865 | 30.4.2012 | मार्च12 | 2 म | 10000 |
| 9. | सावित्री गुंडावार | 885 | 31.10.2012 | सप्टें12 | 2 म | 1500 |
| 10. | लिला मल्लेलवार | 893 | से.नि.दिनांक नाही | जून12 | | 3000 |
| 11. | दयाल सुखदेवे | 1013 | 30.6.2012 | जुन12 | 3 म | 3000 |
| 12. | रामदास येरभे | 1117 | 28.2.2013 | डिसें12 | 1 म | 1000 |
| 13. | मिना निरीया | 1180 | 31.1.2013 | जाने12 | 3 म | 1000 |
| 14. | शैलजा देवांग | 1320 | से.नि.दिनांक नाही | एप्रिल12 | | 10000 |
| 15. | आशा जांभुळकर | 1340 | 31.12.2012 | ऑक्टो12 | 1 म | 5000 |
| 16. | अब्दुल शेख | 1362 | 28.2.2012 | डिसें12 | 1 म | 2000 |
| 17. | उमरा शेख | 1363 | 30.6.2012 | एप्रिल12 | 1 म | 8000 |
| 18. | सिगा सारसर | 1478 | 31.12.2012 | डिसे12 | 3 म | 1000 |
| 19. | आशा पिंपळकर | 1487 | 31.8.2012 | ऑग12 | 3 म | 600 |
| 20. | शामराव नागरीकर | 1578 | 30.11.2012 | नोव्हे12 | 3 म | 5000 |
| 21. | हिराबाई व्यास | 1922 | 31.10.2012 | ऑक्टो12 | 3 म | 1000 |

2. खालील कर्मचा-यांना मुली-मुलाचे लग्न व शिक्षण , स्वताचे व पत्नीचे आजारपण या करीता नापरतावा अग्रीम मंजुर करण्यात आला. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, 1998 चे नियम 16(अ) नुसार वर्गणीदाराची 20 वर्षाची सेवा पूर्ण झाल्यानंतर अथवा त्याचा नियम सेवावधी पूर्ण होवुन तो सेवानिवृत होण्यापुवी 10 वर्षे यापैकी जी घटना अगोदरची असेल त्यावेळी नापरतावा अग्रीम मंजुर करावा परंतु खालील कर्मचा-याची सेवा 20 वर्षाची नसतांना व ते सेवानिवृती होण्यात 10 वर्षे कमी नसतांना त्यांना सदर नापरतावा अग्रीम मंजुर केला ही नियमबाहय बाब आहे.

| प्र.क्र./दिनाक | रक्कम | कर्मचा-याचे नाव | खाते क्र. | अग्रीम घेण्याचे कारण | सेवा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 11/17.8.2012 | 200000 | सघमित्रा पुणेकर | 1570 | पतीचे आजारपण | 12 |
| 21/16.1.2013 | 150000 | मधुकर इंगोले | 1650 | स्वताचे आजारपण | 13 |
| 24/12.2.2013 | 75000 | अंबादास बनकर | 1676 | मुलीचे लग्न | 13 |
| 26/18.3.2013 | 45000 | रेखा कावळे | 1788 | मुलीचे लग्न | नोंद नाही |



Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 16/9.11.2012 | 45000 | रमेश नंदवंशी | 1820 | मुलीचे लग्न | 13 |
| 26/18.3.2013 | 44000 | शेख मुमताज | 1840 | मुलीचे लग्न | 14 |
| 16/9.11.2012 | 35000 | राजेश उसरे | 1880 | मुलीचे शिक्षणाकरीता | 13 |

3. श्री दिनकर नामदेव निखाते भ.नि.निधी.क्र. 1097 यांना प्र.क्र. 5 दिनाक 16-6-2012 अन्वये रूपये 30000 परतावा अग्रीम माहे जुन महिन्यात देण्यात आले परंतु त्याच्या वर्गणीची कपात माहे ऑगष्ट देय सप्टेबर 2012 च्या वेतनातुन कपात केली . महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य नि र्वाह निधी नियम , 1998 चे नियम 14(2) नुसार अग्रीम ज्या महिण्यात काढण्यात आले त्यानंतरच्या महिन्याच्या वेतनापासून सुरू केली जाईल . असे असतांना श्री निखाते यांच्या वेतनातुन नियमबाहयपणे भ .नि.नि. च्या अग्रीमाची उशिरा कपात केली.

DATSS.M6707 (Ref No 46 Hmm No 58)

*47 वेतन राखीव निधीमधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा निधी*
*अनियमितता कलम : 93*

***वेतन राखीव निधीला कर्मया-याचे एक महिण्याचे वेतन व भत्याची रक्कम दरवर्षी माहे 31 डिसेंबर रोजी हस्तांतरीत करणे आवश्यक असतांना जमा केली नाही. वेतन राखीव निधीमधुन रुपये 1,00,00,000 कोटीची वेतन व भत्याकरीता मनपानिधीत नियमबाहयपणे जमा करण्यात आली.***

सन 2012-13 या वित्तीय वर्षातील वेतन राखीव निधी च्या नोंदवही व अभिलेख्याची तपासनी केली असता खालील अनियमितता आढळुन आल्या याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे नियम 91 नुसार कर्मचा-याचे 1 महिण्याचे वेतन व भत्याच्या रक्कमे इतकी रक्कम दरवर्षी माहे 31 डिसेंबर रोजी किंवा तत्पुर्वी वेतन राखीव निधीला हस्तांतरीत करणे आवश्यक असतांना जमा केली नाही. मनपाचे सन 2012-13 मध्ये नोव्हेंबर देय डिसेंबर मध्ये कर्मचा-याचे वेतन रोख पुस्तीकेनुसार रूपये 41,40,734 होते सदर रक्कम मनपा निधीतुन वेतन राखीव निधीला स्थानांतरीत करणे आवश्यक होते परंतु सदर रक्कम स्थानांतरीत केली नाही.



Scanned by CamScanner

2. वेतन राखीव निधीचे ओरीएन्टल बँक ऑफ कॉमर्स चे बचत खाते क्रमांक 02022011000754 मधुन दिनांक 30-5-2012 ला रुपये 1,00,00,000 कोटीची रक्कम धनादेश क्रमांक 594208 अन्वये काढुन ती स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेत वेतन व भत्याकरीता जमा करण्यात आली. सदर रक्कम वेतन राखीव निधीतुन काढतांना महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 101(4) तसेच नगरपरिषद अधिनियम 1965 चे कलम 91 नुसार जिल्हाधिका-यांची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक असतांना ती घेण्यात आली नाही. सदर रक्कम 6 महिण्यात बचत खात्यात जमा करणे आवश्यक असतांना ती करण्यात आली नाही.

3. वेतन राखीव निधी नोंदवही नमुना 73 सन 2013-14 पासुन अदयावत ठेवण्यात आली नसल्यामुळे सन 2013-14 मधील सुरुवातीची शिल्लकेची तपासनी करता आली नाही.

*48 अनुदान नोंदवही अपुर्ण असणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 04**

*अनियमितता कलम : ९३*

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 192 अन्वये नगरपरिषदेला शासनाकडून मिळालेली सर्व अनुदानाच्या नोंदी नोंदवहीत घेण्यात आल्या नाही. नोंदवही सक्षम अधिका-याने प्रमाणित केली नाही. नोंदीसमोर नोंद योग्य असल्याची सक्षम अधिका-याने स्वाक्षरी केली नाही. नोंदवहीतील पुर्ण रकाने भरले नाही***

अनुदान नोंदवहीची तपासनी केली असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 192 अन्वये नगरपरिषदेला शासनाकडून मिळालेली सर्व अनुदाने नमुना क्रमांक 149 प्रमाणे असलेल्या अनुदान पुस्तकांत वेगवेगळया पृष्ठावर नमूद केली पाहिजेत अनुदान नोंदवहीची तपासनी केली असता अनुदानाच्या सर्व बाबीची नोंद घेण्यात आली नाही. उदा. दवाखाने अनुदान, रस्ते बांधनी परीसर, तेरावा वित्त आयोग, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना, शिक्षण व रोजगार हमी कर, वैशिष्टपुर्ण अनुदान, नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना, दुकानाची नोंदनी अनुदान , खनिज विकास निधी , अल्पसंख्यांक विकास महामंडळ , UIDSSMT अनुदान, IHSDP अनुदान, BRGF अनुदान, अग्निशमन सेवा अनुदान , अ.जा. व



Scanned by CamScanner

नवबौद्ध घरकुल योजना अनुदान.

2. अनुदान नोंदवही सक्षम अधिका-याने प्रमाणित केली नाही.

3. अनुदान नोंदवहीत अनुदानाच्या नोंदीसमोर नोंद योग्य असल्याची सक्षम अधिका-याने स्वाक्षरी केली नाही.

4. नोंदवहीतील रकाना क्रमांक 6,7,8 व 9 पुर्णपणे भरले नाही.

DAT55KM6702 (Ref No : 48, Item No : 98)

## 49 रोख पुस्तकामधील अनियमितता.

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 04**

*अनियमितता कलम : 9ड*

***रोख पुस्तकामध्ये असंवितरीत रकमेचे विवरणपत्र, बँकेचे पासबुक उपलब्द झाले नसल्यामुळे रोख पुस्तक व बँकेचा ताळमेळ घेता आला नाही. महिना व वर्ष अखेरचा गोषवारा काढला नाही. रोखपुस्तक प्रमाणणित केले नाही. खाडाखोड व उपरीलेखन केलेल्या ठिकाणी सक्षम अधिका-याने प्रमाणित केले नाही.***

लेखाविभागातील सन 2012-13 मधील शिक्षकाचे व शिक्षकेत्तर कर्मचा-याचे वेतनाचे रोख पुस्तक तपासले असता खालील अनियमितता आढळुन आल्या.

1. रोख पुस्तकातील 31 मार्च 2013 मधील अखेरची शिल्लक तपासली असता रूपये 8712912.78 आढळुन आली परंतु सदर असंवितरण रक्कमेचे विवरण पत्र उपलब्द नव्हते. त्यामुळे थकित रक्कम केव्हापासुन, कुणाची व कशाकरीता प्रलंबीत आहेत याची तपासनी करता आली. वरील रक्कम कोणत्या बँकेत शिल्लक आहेत याबाबतचे बँक पासबुक/विवरणपत्र सादर केले नाही. त्यामुळे रोख पुस्तक व बँकेतील शिल्लक याचा ताळमेळ घेण्यात आला नाही.

2. महिना व वर्ष अखेर जमा व खर्चाचा गोषवारा रोखपुस्तकात काढण्यात आला नाही.

3. सन 2012-13 चे रोख पुस्तक सक्षम अधिका-याने प्रमाणित केले नाही.

4. रोख पुस्तकात अनेक ठिकाणी खोडतोड व उपरीलेखन केले परंतु उपरीलेखनावर सक्षम अधिका-



Scanned by CamScanner

याची पतीस्वाक्षरी घेण्यात आली नाही.



## 50 लेखापरीक्षण अहवालातील लेखाआक्षेपाबाबत विहीत मुदतीत कार्यवाही केली नसल्याची अनियमितता

लेखापरीक्षण

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपा व शासन निधी

अनियमितता कलम : 9इ

***नगरपालिका चंद्रपूर कडे सन 2012-13 अखेरपर्यंत 1454 व महानगरपालिका चंद्रपूरकडे 83 लेखा आक्षेपांचे अनुपालन झाले नसल्याचे दिसून आले. वरीलप्रमाणे दोन्हींच्या लेख्यावरील एकूण 1537 लेखा आक्षेपांचे अनुपालन सन 2012-13 अखेरपर्यंत झालेले नसल्याने चंद्रपूर महानगरपालिकेच्या लेख्यामधील अनियमिततांच्या संख्येमध्ये दरवर्षी वाढ होत असतांना महानगरपालिकेचे मा. आयुक्त यांनी सदर बाबीत प्राधान्य दिलेले नाही.***

चंद्रपूर महानगरपालिका सन 2012-13 चे लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमासपत्रा क्रं. 101 दिनांक 26/3/2015 नुसार नगरपरिशद चंद्रपूर व महानगरपालिका चंद्रपूर कडील थकीत लेखा आक्षेपाबाबत खुलासा मागविण्यात आला होता. त्यानुसार सन 2012-13 मध्ये एकूण 793 लेखाआक्षेप वगळण्यात येवून वसुलीची रक्कम मात्र निरंक असल्याचे आणि महानगरपालिका चंद्रपूर चे 83 लेखा आक्षेपापैकी वगळलेले लेखा आक्षेप निरंक असल्याचे लेखापरीक्षणास कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 107 (अ) नुसार मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, मुंबई यांच्याकडून अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त तीन महीन्याच्या आत संपूर्ण लेखा आक्षेपांचे अनुपालन तयार करून महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मंजूरी घेवून अनुपालन संबंधित स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडे सादर करावयाचे आहे. तथापि महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम मधील नियम 10(1) नुसार लेखाआक्षेपाचे अनुपालन जास्तीत जास्त 4 महीन्याचे आत करणे आवश्यक आहे. परंतू महानगरपालिका चंद्रपूर, नगरपरिषद चंद्रपूर ने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम नुसार विहीत मुदतीत कार्यवाहीच केली नसल्याचे स्पष्ट होत असल्यामुळे महानगरपालिकेला त्यांचे प्रशासकीय कामकाजात सुधारणा करणे आणि शासनाच्या व महानगरपालिकेच्या लेखाआक्षेपामध्ये गुंतलेला निधी वसुली करणे याबाबत कोणताही कार्यवाही झालेली नाही. थकित लेखा आक्षेपांचे विहीत मुदतीत अनुपालन महानगरपालिका व नगरपरिशद चंद्रपूर ने केलेले नसल्याने थकित लेखा आक्षेपांच्या संख्येमध्ये दरवर्षी मोठया संख्येने भर पडत आहे. त्यामुळे शासनाचा स्थानिक निधी लेखा विभागामार्फत



Scanned by CamScanner

लेखापरीक्षण करून लेख्यामधील दोष, उणिवा, अपहार, हानी, अनियमितता आणि गंभीर प्रकरणे या बाबींवर प्रतिबंध घालण्याचा शासनाचा उददेश सफल झालेला नाही. वरीलप्रमाणे गंभीर प्रकरणे या बाबींबाबतची जबाबदारी मा. आयुक्त आणि विभाग पमुखावर असल्याने हयाबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत प्रशासनाचे विशेष लक्ष वेधण्यात येत आहे. तसेच लेखा आक्षेपांचे विहीत मुदतीत अनुपालन व लेखापरीक्षण अहवालावर महागनरपालिकेने करावयाच्या कार्यवाहीबाबत मा. सचिव, नगरविकास विभाग यांचे उचित आदेश होण्यासाठी त्याचेसुध्दा लक्ष वेधण्यात येत आहे.

DATBNKMs49 (Ref No : 54, Hmm No : 101)

## *51 प्राथमिक शाळाच्या अभिलेख्यात आढळून आलेल्या नियमबाहयता.*

**शालेय पोषण आहार, शिष्यवृत्ती व गणवेश वाटप**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 14**

*लेखा शीर्ष :00 राज्य व केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सन 2012-13 प्राथमिक निवडक शाळेच्या अभिलेख्याची पडताळणी केली असता रोखपुस्तक, प्रमाणके, गणवेश खरेदी व शिष्यवृत्ती वाटप मध्ये अनियमितता आढळून आल्या आहेत. असेच संबंधित शाळेचे मुख्याध्यापक हे रोख रकमा हाताळत असतांना सुध्दा त्याचेकडून प्रतिभूती बंधपत्र घेण्यात आले नसल्याने प्राथमिक शाळेमध्ये आर्थिक व्यवहार नियमबाहय पणे सुरु असल्याचे दिसून आले.***

महानगरपालिका चंद्रपूर अंतर्गत प्राथमिक शाळेकडील अभिलेख्याची पडताळणी केली असता उपलब्ध झालेल्या अभिलेख्यामध्ये खालीलप्रमाणे नियमबाहय बाबी असल्याचे आढळून आल्या आहेत.

1) नगरपालिका लेखासंहीता नगरपरिषदेच्या वतीने प्राथमिक शाळांना राज्य व केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाची रक्कम शालेय पोषण आहार, शिष्यवृत्ती व गणवेश खरेदी बाबतची रक्कम महानगर पालिकेच्या बॅंक खात्यामध्ये भरणा करण्यात आलेली नाही. उक्त नियमानुसार प्राप्त अनुदान महानगरपालिकेच्या निधीमध्ये प्रथम भरणा करून त्यानंतर सदर रक्कम खर्चासाठी वापरणे आवश्यक होते. परंतू सदरची कार्यवाही न करता शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडून केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाची रक्कम परस्पर शाळेच्या खात्यामध्ये नियमबाहयपणे वर्ग करण्यात येत असल्याचे दिसून आले.

2) नगरपालिका लेखासंहीतानुसार सर्वसाधारण रोखपुस्तकात दैनिक नोंदी घेवून कलम 51 नुसार रोजच्या रोज ताळमेळ घेणे आवश्यक असतांना प्राथमिक शाळेकडील रोखपुस्तक दररोज न लिहीता जेव्हा जेव्हा आर्थिक व्यवहार करण्यात आले. त्याच तारखेस रोखपुस्तकात नोंदी घेण्यात आल्या आहेत. तसेच संबंधितांनी ताळमेळ सुध्दा घेतला नसल्याने प्रत्येक महीना अखेरीस बॅंक पासबुकातील नोंदी व रोखपुस्तकातील नोंदीची पडताळणी करता आली नाही.

3) शालेय पोषण आहारावर प्रत्येक दिवशी खर्च झालेला असतांना लेखासंहीता कलम 48 नुसार दैनिक रोखपुस्तक



Scanned by CamScanner

लिहीण्यात आले नाही. त्यामुळे प्रत्येक दिवशीच्या आहारावरील खर्च शासन निर्देश प्रमाणे होवून विदयार्थ्यांना सकस आहार देण्यात आला असल्याची खात्री झाली नाही. तसेच म. शा. शा. शि. व क्रिडा विभाग शा. नि. क्रं. शापोआ 2010/प्रक्रं. 18/ प्रा.शि. – 4/ मुंबई दि. 2/2/2011 नुसार प्रत्येक दिवशी वापरलेल्या भाजीपाल्याची नोंद नोंदवहीत घेवून संबंधित मुख्याध्यापकांनी नोंदी प्रमाणित केलेल्या नाहीत.

4) शिष्यवृत्तीचे वाटप करतांना संबंधित विदयार्थ्यांची ओळख करून घेण्यासाठी शासन मान्यता प्राप्त वैध अभिलेखे प्राप्त न करताच मुख्याध्यापकांनी शिष्यवृत्तीचे वाटप केले असल्याने वाटप दर्शविण्यात आलेली शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित लाभार्थी विदयार्थ्यास प्रदान करण्यात आल्याची खात्री झाली नाही.

5) मुंबई वित्तीय नियम 1959 मधील विभाग 13 जमानत ठेवी मधील नियम 51 नुसार संबंधित मुख्याध्यापकाकडून प्रतिभूती बंधपत्र शासनाने विहीत केलेल्या नमून्यात मुख्याध्यापकाकडून प्रभार मिळाल्याच्या दिनांकापासून 30 दिवसाचे आत प्राप्त करून घेणे आवश्यक असतांना सदरची कार्यवाही महानगरपालिकेने केली नसल्याने संबंधित शाळेचे मुख्याध्यापक नियमबाहयपणे आर्थिक व्यवहार हाताळत असल्याचे दिसून आले.

6) म. शा. जि. क्रं. भाख्यंस / 1088/2512 उदयोग – 6 दि. 2 जानेवारी 1992 नुसार रू. 1000 चे वरील खरेदी दरपत्रके मागवून कराराव्दारे खरेदी न केल्यामुळे शालेय पोषण आहाराअंतर्गत खरेदी केलेला माल जादा दराने खरेदी करण्यात येवून शासन निधीची हानी झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) गैरहजर असलेल्या विदयार्थ्यांबाबत बचत झालेल्या आहाराची रक्कम शासन निधीत भरणा करण्यात आली नाही.

8) प्राथमिक शाळेच्या अभिलेख्यांवर नियंत्रण ठेवण्याची प्राथमिक जबाबदारी प्रथमत: संबंधित केंद्र प्रमुखांची असतांना त्यांचेकडून अनियमिततेबाबत पडताळणी करण्यात आल्याचे अभिलेखे आढळले नाही.

9) उपलब्ध करण्यात आलेल्या प्रमाणकाची पडताळणी केली असता प्राप्त झालेल्या मालाची नोंद साठा पुस्तकात घेवून रोख साठा पुस्तकाचा पान क्रमांक प्रमाणकावर नमूद करून मुख्याध्यापकांनी प्रमाणित केले नाही. तसेच प्रमाणकांची अदाई झाल्यानंतर सदर प्रमाणकावर Paid & Cancelled शिक्का मारून मुख्याध्यापकांनी प्रमाणकातील रकमेचे प्रदान करण्यात आल्याचे प्रमाणित केले नाही.

10) रोखपुस्तकामध्ये प्रत्येक तारखेचे जमा व खर्चाची नोंद घेवून, सुरवातीची शिल्लक, प्राप्त झालेल्या रकमेचा तपशिल व नाव किंवा हुददा नमूद करून चढत्या क्रमांकाची बेरीज नमूद करण्यात आली नाही.

11) खर्च बाजूरा प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम,रकमेचे प्रदान कोणास केले इत्यादी नोंदी घेवून उतरत्या क्रमांकाची वजाबाकी करण्यात येवून अखेरची शिल्लक प्रत्येक तारखेची काढण्यात आलेली नाही.

12) शालेय शिक्षण समितीचे आहार वाटपाबाबतचे प्रमाणपत्र संबंधित मुख्याध्यापकांनी प्राप्त करून दप्तरी ठेवले नाही.

13) तसेच आवश्यक त्या ठिकाणी शिक्षण समिती अध्यक्षांनी पाहणी करून स्वाक्षरी केलेली नाही.

14) प्राथमिक शाळेकडे प्राप्त झालेल्या वेगवेगळया लेख्याशिर्षातील रकमेचे स्वतंत्र रोखपुस्तक ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे विशिष्ट प्रयोजनासाठी प्राप्त झालेली रक्कम संबंधित मुख्याध्यापकांनी विहीत कालावधीत खर्च केल्याची पडताळणी करता आली नाही.

वरील अनियमिततेवरून प्राथमिक शाळेकडील अभिलेख्यामध्ये भरीव सुधारणा करण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रशासनाचं विशेष लक्ष वेधण्यात येत आहे.

DATBNKM6401 (Ref No : 10, Ilmm No : 55)



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

52 नियम, अधिनियम व शासन निर्णयानुसार प्रदान रकमाबाबत कार्यवाही केली नसल्याची अनियमितता

शालेय पोषण आहार
लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष:00 शासन निधी
अनियमितता कलम : 9ड

> प्राथमिक शाळांकडील अभिलेख्यांचे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहीता 1971 मधील नियम क्रं. 46 (4) व मुंबई वित्तीय नियम 1959 मधील तरतुदीनुसार अनेक अनियमितता झाल्याचे दिसून आले. उक्त नियम व तरतुदींचे पालन झाले नसल्याने महानगरपालिका निधी व शासकीय अनुदानाची हानी झाली असण्याची शक्यता आहे.

सन 2012-13 चे लेखापरीक्षणात निवडक प्राथमिक शाळेच्या अभिलेख्यांची पडताळणी केली असता खालील अनियमितता दिसून आल्या.

1) मुंबई वित्तीय नियम 1959 मधील तरतुदी व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहीता 1971 चे नियम 39 मधील नमूना क्रं. 18 नुसार रोखपुस्तक ठेवण्यात आली नाही, रोखपुस्तकाचे प्रत्येक दिवस अखेर रोकडवहीच्या दोन्ही बाजुला बेरजा येणारी शिल्लक अक्षरी व अंतिम अंकात नमूद करण्यात आलेली नाही.

2) बहुतांश शाळेकडील रोखपुस्तक व बूंक पासबुक नुसार सुरवातीची शिल्लक व अखेरच्या शिलकेमध्ये तफावत असल्याचे दिसून आले.

3) नगरपरिषद लेखासंहीता 1971 मधील तरतुदीनुसार खर्चास प्राप्त झालेल्या रकमा शासनाने मान्यता दिलेल्या राष्ट्रीयकृत बँकेत 24 तासात किंवा जास्तीत जास्त 7 दिवसाचे आत भरणा न करताच परस्पर खर्च केल्याचे दिसून आले.

4) रूपये 1000/- चे वरील खरेदीबाबत म. शा. प. क्रं. भाख्यंस/1088/2512/उदयोग - 6 दि. 2/1/1992 अनुसार उचित कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) जेव्हा जेव्हा खर्च करणे आवश्यक असते तेव्हा तेव्हाच बँकेमधून रकमांची उचल करावयाची आहे. शालेय पोषण आहारावर प्रत्येक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी खर्च करावयाचा असल्याने झालेल्या खर्चाबाबत प्रत्येक दिवशी खर्च रोखपुस्तकात नमूद करणे आवश्यक आहे. परंतू सर्वच शाळेकडील रोखपुस्तकामध्ये उपरोक्त अनियमितता दिसून आली.

6) म. शा. शा. नि. क्रं. शापोआ/2010/प्र.क्रं. 14/प्राशि - 4/मुंबई दि. 2/2/2011 नुसार प्रत्येक दिवशी वापरलेल्या भाजीपाल्याची नोंद नोंदवहीत घेवून प्रमाणित करण्यात आले नाही. तसेच प्रत्येक दिवशी उपयोग केलेले साहीत्य, भाजीपाला, व अन्नपदार्थाबाबत झालेल्या खर्चाबाबतचे बिजक घेण्यात आलेले नाही. त्यामुळे प्रपत्र9 - 2 मध्ये दर्शविण्यात आलेल्या आहाराबाबत पडताळणी करता आली नाही. त्यामुळे संबंधित मुख्याध्यापकांनी उक्त शासन निर्णयानुसार विदयार्थ्यांना आहार देण्यात आला हयाबाबत सत्यता पडताळता आली नाही.

7) शिष्यवृत्तीचे वाटप करतांना संबंधित विदयार्थ्यांच्या ओळखीबाबत त्यांचे पालक किंवा प्रतिष्ठीत व्यक्ती आणि शासनाने प्राधिकृत केलेले अभिलेखे उदा. आधार कार्ड आणि विदयार्थी दुस-या शाळेत शिक्षण घेत असल्यास त्या शाळेच्या



Scanned by CamScanner

मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्रा इत्यादी वैध अभिलेखे प्राप्त न करताच फक्त विदयार्थ्यांच्या सहया घेवून शिष्यवृत्तीचे वाटप केल्याचे दिसून आले. तसेच संबंधित विदयार्थ्यांच्या स्वाक्षरी मुख्याध्यापकाने प्रमाणित सुध्दा केलेल्या नाहीत. त्यामुळे शिष्यवृत्ती वाटपाबाबत लेखापरीक्षणात खात्री झालेली नाही.

8) खर्च रकमांबाबत शाळा शिक्षण समितीची पूर्व मंजुरी व कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक असतांना सदर मंजूरीचे ठरावामध्ये परिपूर्ण बाबींचा समावेश करण्यात येत नाही.

9) आर्थिक व्यवहार तथा जडसंग्रह मालमत्ता सांभाळणा-या कर्मचा-याकडून मुंबई वित्तीय नियम 1959 मधीलपरिच्छेद 51 अनुसार ज्यांच्याकडे रोख रक्कम, भांडार वा शासकीय मालमत्ता ठेवण्याचे काम दिले असेल अशा कनिष्ठ कर्मचा-यांनी जमानतीची रक्कम व प्रत्येक परिस्थिती आणि स्थानिक स्थिती लक्षात घेवून विहीत नमुन्यातील प्रतिभूती देणे आवश्यक असतांना संबंधितांनी प्रतिभुती बंधपत्रे भरून दिल्योच आढळले नाही.

10) महाराष्ट्र नगरपरिशद लेखासंहीता नियम 1971 चे नियम क्रमांक 46(4) नुसार रू. 1000 वरील प्रदानाच्या रकमा धनादेशाव्दारे अदा न करता रोखीने प्रदान केल्याचे आढळले.

11) रोख पुस्तकामध्ये दैनंदिन जमा व खर्चाचे गोषवारे काढून बँकेतील व हस्तस्थ शिलकीचा मेळ घेण्यात आला नाही. त्यामुळे बँक शिल्लक व रोखपुस्तकातील शिलकेमध्ये तफावती आढळून आल्या आहेत.

याबाबत अर्धसमासपत्र क्रं. 55 दि. 24/6/2015 अनुसार खुलासा मागविण्यात आला असता सन 2012-13 चे लेख्याबाबत कार्यवाही केल्या जाईल. असे कळविले असल्याने उपरोक्त बाबींसंदर्भात पुढिल वित्तीय वर्षात उक्त अनियमितता होणार नाही याबाबत दक्षता घेणे आवश्यक असून वरीलप्रमाणे सुधारणा लेख्यामध्ये करण्यात येणार असल्याची जबाबदारी शिक्षण विभागाने स्विकारल्याचे लेखापरीक्षणास कळविले नाही. त्यामुळे याबाबतचा लेखा आक्षेप नोंदविणे क्रमप्राप्त झाला आहे. तरी आवश्यक सर्व प्राथमिक शाळांनी आवश्यक त्या सुधारणेबाबत अवगत करून लेखा अनुपालन सादर करण्यात यावे.

DATBNKMh461 (Ref No - 52, Item No - 3)

### *53 मालमत्ता कर विभागातील झालेल्या अनियमितेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

**कर दात्याला प्राप्त रकमांची पोहोच म्हणून नकल प्रत देण्यात आली. मुद्रांकित अनुक्रमांक पटनी नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात आली नाही. वार्षिक गोषवारे दैनिक वसुली नोंदवही मध्ये तयार करण्यात आले नाही.**

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर येथील सन 2012-13 मधील निवडक महिन्यातील कर विभागातील



Scanned by CamScanner

करदात्याकडून प्राप्त झालेल्या मालमत्ता करासंबंधी पावती पुस्तके सोबत दैनिक वसुली नोंदवही तपासणी करीत असतांना लेखापरीक्षणात खालील क्रमवार नमुद अनियमितता निर्दशनास आल्या आहे

1) अदात्याकडून प्राप्त झालेली रकमांची मूळ पावती अदात्याला देण्यात न येता, नकल प्रत देण्यात येते. तसेच मूळ पावती पुस्तकामध्ये ठेवण्यात येते असे काही प्रकरणात दिसून आलेले आहेत. राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता नियमावली (NMAM) अन्वये प्रकरण क्रमांक 5 मधील नियम 5.7(a) नुसार मूळ पावती करदात्याला देण्यात यावी व दुसरी प्रत बँकमध्ये रकमा भरण्यासाठी वापर करावे. तथापि उक्त बाबीबाबत अर्धसमास पत्रान्वे अभिप्राय प्राप्त झाले असून मागील 40 वर्षापासून कर दात्याला कार्बन प्रत देण्याची प्रकिया चालू आहे असे नमूद केले आहे व याबाबतचा आक्षेप आजपावतो कोणत्याही लेखापरीक्षण पथकाने नोंदविलेला नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे सदर बाब नियमबाह्य असतांना कार्बन प्रत नागरिकांना देण्यात आल्यामुळे संबधीताकडून गंभीरबाबी निर्माण झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) पावती पुस्तकातील मुद्रांकित अनुक्रमांक पटनी नोंदवहीमध्ये नोंद न घेता संबंधित कर्मचारी/अधिकारी यांनी ठरविल्या प्रमाणे नोंद उक्त नोंदवह्या मध्ये घेण्यात येते. राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता नियमावली (NMAM) अन्वये प्रकरण क्रमांक 5 मधील नियम 5.7(d) नुसार नमुन्यात ठेवणे आवश्यक असतांना तसे केले जात नाही. सदरील बाबीबाबत आक्षेप मागील लेखापरीक्षण पथकाने सन 2011-12 या वर्षातील लेखापरीक्षण करतेवेळी घेतला असून त्यात सन 2014-15 पासून सुधारणा झालेली आहे असे म्हटले आहे.

3) दैनिक वसुली नोंदवही मध्ये काही प्रकरणात वार्षिक गोषवारे न केल्याचे आढळून आले. त्यामुळे वार्षिक लेख्यामध्ये चुकीची आकडेवारी नमूद करून सदर वार्षिक लेखे मनपा स्थायी समितीला सादर केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.14 दि.28.04.2015 नुसार विभागाने सादर केलेल्या अनुपालनाचे अनुषंगाने परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DLFSPPM8501 (Ref No. 13, Hmm No. 14)

## 54 *जन्म व मृत्यू विभागातील जमा रकमांच्या अभिलेख्यातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्यां : 4**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

*मुद्रांकित अनुक्रमांक पटनी नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात आली नाही. पावती प्रतवर प्राधिकृत अधिकाऱ्याची सही तसेच दैनिक वसुली नोंदवहीतील पृष्ठ क्रमांकाची नोंद घेण्यात येत नाही. नोंदवही प्राधिकृत अधिकाऱ्याकडून प्रमाणित करण्यात आले नाही. वार्षिक गोषवारे दैनिक वसुली नोंदवही मध्ये तयार करण्यात आले नाही.*



Scanned by CamScanner

## चंद्रपुर महानगरपालिका

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर येथील सन 2012-13 या वर्षामधील निवडक महिन्यातील जन्म व मृत्यु विभागातील जन्माची व मृत्युचे प्रमाणपत्रपोटी मिळालेल्या रकमांची पावती पुस्तक सोबत दैनिक वसुली नोंदवहीशी पडताळणी करीत असतांना अभिलेख्यामध्ये खालील नमूद अनियमितता आढळून आल्या व त्यावरील अभिप्रायाचे अनुपालन प्राप्त होऊन लेखाआक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1) पावती पुस्तकातील मुद्रांकित अनुक्रमांक पटनी नोंद्वहीमध्ये नोंद न घेता संबंधित कर्मचारी/अधिकारी यांनी ठरविल्या प्रमाणे नोंद उक्त नोंदवह्या मध्ये घेण्यात येते. राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता नियमावली (NMAM) अन्वये प्रकरण क्रमांक 5 मधील नियम 5.7(d) नुसार नमुन्यात ठेवणे आवश्यक असतांना तसे केले जात नाही.

2) जन्म व मृत्यू प्रमाणपत्राद्वारे प्राप्त झालेल्या रकमाची पावती संबंधित व्यक्तीला देण्यात आली असून द्वियम प्रतवर नमूद प्राधिकृत अधिकाऱ्याची सही तसेच दैनिक वसुली नोंदवहीतील पृष्ठ क्रमांकाची नोंद घेण्यात येत नाही. खालील नमूद पावती पुस्तकामधील पावतीवर प्राधिकृत अधिकाऱ्याची सही व पृष्ठ क्रमांकाची नोंद नोंद नाही.

| अ.क्र. | पावती पुस्तक क्र. | पावती क्रमांक |
|---|---|---|
| 1 | 4785 | 478450 ते 478500 |
| 2 | 4786 | 478501 ते 478600 |
| 3 | 4787 | 478601 ते 478700 |
| 4 | 4788 | 478701 ते 478800 |
| 5 | 4789 | 478801 ते 478900 |
| 6 | 4790 | 478901 ते 479000 |
| 7 | 4791 | 479001 ते 479100 |
| 8 | 4792 | 479101 ते 479200 |
| 9 | 4793 | 479201 ते 479300 |
| 10 | 4794 | 479301 ते 479400 |
| 11 | 4795 | 479401 ते 479500 |
| 12 | 4796 | 479501 ते 479580 |

3) दैनिक वसुली नोंदवही प्राधिकृत अधिकाऱ्याकडून प्रमाणित करण्यांत आले नाही. नोंदवही प्रमाणित न केल्यामुळे प्रमाणपत्राद्वारे मनपाकडे जमा झालेल्या रकमा अचूक असल्याचे सिद्ध होत नाही.

4) मनपाला प्राप्त झालेल्या रकमाचे वार्षिक गोषवारे दैनिक वसुली नोंदवही करणे आवश्यक आहे. तथापि दैनिक वसुली नोंदवही मध्ये वार्षिक गोषवारे न केल्याचे आढळून आले. त्यामुळे वार्षिक लेख्यामध्ये चुकीची आकडेवारी नमूद करून सदर वार्षिक लेखे मनपा स्थायी समितीला सादर केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदरील अनियमिततेबाबत विभागाकडून प्राप्त अनुपालनानुसार जमा रकमा संबंधित अभिलेखे यापुढे उपरोक्त प्रमाणे ठेवण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे. परंतु सन 2012-13 या वर्षाचे अभिलेखे नियमबाह्यपणे ठेवण्यात आल्याचे दिसून आले. सदरील बाबींचे सकारात्मक अनुपालन सादर करे पर्यंत आक्षेप कायम करण्यात येत आहे.

सदर्हू अनियमितेबाबत संबंधित विभागाला अर्धसमास पत्र क्र. 25 दि. 21/05/2015 ला पत्रान्वे विचारणा केली असता प्राप्त अनुपालनार्थ उक्त परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

DLFSPPM8501 (Ref No : 15, Item No : 2)



Scanned by CamScanner

## 55 चंद्रपूर शहर महानगरपालिका येथील स्थानिक संस्था कर (LBT) वसुली बाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 146820223.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 146820223.00/-

***मनपा चंद्रपूर यांना स्थानिक संस्था कर अधिनियम 2010 मधील नियम क्र.40 (1)(क) नुसार विहित कालावधीत LBT ची वसुली झाली नाही, त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

महाराष्ट्र शासन राजपत्र, नगरविकास विभाग दि. 25 ऑक्टोबर 2011 अन्वये नगर परिषद चंद्रपूरचे महानगरपालिकेत रुपांतर होऊन चंद्रपूर शहर महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र शासन अधिसूचना, नगरविकास विभाग दि. 1 जून 2012 अन्वये चंद्रपूर महानगरपालिका येथे दि. 1 जुलै 2012 पासून जकात कराऐवजी स्थानिक संस्था कर (LBT) हि नवीन करप्रणाली लागू करण्यात आली. त्याअनुषंगाने सन 2012-2013 मध्ये चंद्रपूर शहरातील एकूण 2989 व्यापाऱ्यांची नोंदणी करण्यात आली त्यांचेकडून खाली नमूदनुसार नोंदणी शुल्क, सी.डी. शुल्क, स्थानिक संस्था कर व शास्तीची रक्कम रोखीने वसूल करण्यात आली.

| अनुक्रमांक | झोनचे नाव | नोंदणी शुल्क | स्था.सं.कर | शास्ती | सी.डी.शुल्क | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जटपुरा झोन | 83700 | 29884 | 59767 | 2200 | 175551 |
| 2 | तुकूम झोन | 84300 | 8060 | 16120 | 3400 | 111880 |
| 3 | अंचलेश्वर झोन | 131400 | 5788 | 11576 | 2850 | 151614 |
| 4 | कार्यालयीन जमा | - | - | - | 3150 | 3150 |
| | एकूण | 299400 | 43732 | 87463 | 11600 | 442195 |

उपरोक्त अधिसूचनेनुसार स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून माहे 7/2012 ते 10/2012 या कालावधीत रु.51,54,022 अंशतः वसुली करण्यात येऊन L.B.T. बाबत व्यापाऱ्यांचा विरोध लक्षात घेता शासनाने नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. स्थासंक 2011/प्र.क्र.139/नवि 34 दि. 31 ऑगस्ट 2012 दि. 1 जुलै 2012 ऐवजी दि. 1 नोव्हेंबर 2012 पासून स्थानिक संस्था कर लागू करण्याबाबत सुधारित आदेश निर्गमित करण्यात आला असता माहे नोव्हेंबर 2012 ते मार्च 2013 या कालावधीत एकूण रु. 14,16,66,201/- इतकी L.B.T.ची रक्कम प्राप्त झाली. म्हणजेच सन 2012-2013 या वर्षात माहे जुलै 2012 ते मार्च 2013 या कालावधीत रु. 14,68,20,223/- L.B.T. पोटी महसूल गोळा झाला.

स्थानिक संस्था कर अधिनियम 2010 मधील नियम 40(1)(क) नुसार प्रत्येक महिन्याचा LBT कर पुढील महिन्याचे दहा तारखेच्या आत मनपाकडे भरणा करणे आवश्यक आहे. तथापि मनपाने उपलब्ध केलेल्या माहितीनुसार खालीलप्रमाणे झोननिहाय व्यापाऱ्यांनी माहे जून 2012 नंतर माहे नोव्हेंबर 2012 ते मार्च 2013 या कालावधीतील LBT च्या रकमेचा भरणा केल्याचे आढळून आले.



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

| अनुक्र | झोन क्र | LBT भरणा केलेल्या व्यापाऱ्यांची संस्था |
|---|---|---|
| 1 | तुकूम -1 | 6 |
| 2 | तुकूम -2 | 15 |
| 3 | अंचलेश्वर | 33 |
| 4 | जटपुरा -1 | 18 |
| 5 | जटपुरा -2 | 13 |
| | एकूण -- | 85 |

स्थानिक संस्था कर दि. 1 नोव्हेंबर 2012 पासून दरमहा निर्धारित कालावधीत व्यापाऱ्यानकडील खरेदी व विक्रीची विवरणपत्रे घेऊन शासन अधिसूचना दिनांक 1 जून 2012 मधील तरतुदीनुसार भरणा करवून घेणे आवश्यक होते . तथापि मनपातील LBT विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी उक्त शासन निर्देशाप्रमाणे वेळीच कार्यवाही न केल्यामुळे मनपाला सन 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये माहे जून 2013 नंतर एकूण 85 व्यापाऱ्यांनी भरणा केलेल्या LBT च्या रकमेपासून वंचित राहावे लागले. सदर रक्कम वेळीच मनपाचे तिजोरीत जमा झाली असती तर मनपाला त्याचा विकास कामांकरिता विनियोग करता आला असता. विलंबाने LBT चा भरणा झाल्यामुळे मनपाचे सन 2012-13 या वित्तीय वर्षाकरिता आर्थिक नुकसान झालेले आहे.

तरी शासन निर्देशानुसार LBT च्या रकमेच्या वसुलीची विहित कालावधीत LBT धारक व्यापाऱ्यांकडून ठोस कार्यवाही न करणेबाबत संबंधित विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावा.

सदर आक्षेप अर्ध समासपत्र क्र. 26 दि.21-5-2015 नुसार LBT विभागास खुलासा करण्याबाबत लेखी कळविण्यात आले असता लेखापरीक्षण पथकाने मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने संबंधित विभागाने समर्थनीय खुलासा केलेला नाही. तसेच अर्धसमास पत्रातील मुद्द्याबाबत आवश्यक अनुपालन विभागाने केले नसल्याने सदर परिच्छेद घेण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 146820223 |
| गुंतलेली रक्कम | 146820223 |

DATPVKM6101 (Ref No : 18, Hmn No : 20

## *56 स्थानिक संस्था कराच्या (LBT) बँकेत जमा रकमेशी ताळमेळाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

*अनियमितता कलम : 95*

गुंतलेली रक्कम रु. 146820223.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 146820223.00/-

***मनपा चंद्रपूर यांनी सन 2012-13 मध्ये स्थानिक संस्था कराबाबत प्राप्त महसूल रुपये 146820223 चा बँकेतील रकमेच्या नोंदीशी ताळमेळ घेतलेला नाही.***

शासन अधिसूचना, नगरविकास विभाग दि. 1 जून 2012 अन्वये चंद्रपूर महानगरपालिका येथे दि. 1 जुलै 2012 पासून तसेच नगरविकास विभाग शासन निर्णय दि. 31 ऑगस्ट 2012 नुसार दि. 1 नोव्हेंबर 2012 पासून जकात कराऐवजी स्थानिक संस्था कर (LBT) हि नवीन करप्रणाली लागू करण्यात आली असता चंद्रपूर महानगरपालिकेने LBT नोंदणी शुल्क व सी.डी. शुल्क याबाबत रु. 4,42,195 रोखीने वसुली करून रोखपालाने बँकेत भरणा केलेली असल्याचे लेखा विभागातील अभिलेख्याचे तपासणीअंती निदर्शनास आले. त्याचप्रमाणे सन 2012-2013 या आर्थिक वर्षात माहे 1 जुलै 2012 ते 31 मार्च 2013 या कालावधीत LBT धारक व्यापाऱ्यांनी मनपाने प्राधिकृत केलेल्या एकूण सहा बँकामध्ये परस्पर चलनद्वारे रु. 14,68,20,223 भरणा केल्या असल्याचे विभागाने सादर केलेल्या माहितीवरून आढळून आले.

मनपाने LBT चा भरणा करण्यास प्राधिकृत केलेल्या 6 बँकांचे माहे मार्च 2013 चे विवरणपत्रे व चलने तपासले असता खालीलप्रमाणे जमा व शिलका आढळून आल्या.

| | बँक ऑफ इंडिया | ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स | आयडीबीआय बँक | अक्सिस बँक | पंजाब नैशनल बँक | बँक ऑफ महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|---|---|
| 1)सुरु.शिल्लक | 123076 | 1395705 | 288340 | 1217771 | 680285 | 2899351 |
| 2)जमा रकमा | 44432633 | 5692159 | 2652560 | 8189131 | 4833213 | 5424845 |
| एकूण - | 44555709 | 7087864 | 2940900 | 9406902 | 5513498 | 8324196 |
| 3)आहरण | 17775000 | 4504836 | 15665 | 7008776 | 4000190 | 7104533 |
| 4)शिल्लक | 26780709 | 2583028 | 2925235 | 2398126 | 1513307 | 1219663 |

लेखा विभागाने उपरोक्त बँकेतील विवरणानुसार जमा खर्चाच्या रकमा रोख पुस्तकात नोंदी घेऊन व त्याप्रमाणे ताळमेळपत्रकात कमी जास्त खर्चाच्या रकमांची नोंद घेऊन महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र. 107 नुसार मेळ घेणे आवश्यक आहे. याबाबत विभागाला अर्धसमासपत्र क्र. 36 दि. 4-6-2015 अन्वये सन 2012-2013 मधील रोखपालाने बँकेत जमा केलेल्या व LBT धारक व्यापाऱ्यांनी परस्पर चलनद्वारे भरणा केलेल्या रकमांचे ताळमेळ घेतल्याचे अभिलेख लेखापरीक्षणास सादर करण्याबाबत कळविले असता आवश्यक अभिलेख उपलब्ध करवून देण्यात आला नाही.

तरी विभागाने सन 2012-2013 मध्ये LBT बाबत बँकेत जमा रकमांचे मासिक ताळमेळ घेऊन आवश्यक दस्तएवजासह लेखापरीक्षणास अनुपालन सदर करावे, तोपर्यंत सदर आर्थिक वर्षामध्ये LBT च्या प्राप्त महसुलाची एकूण रक्कम रु. 14,68,20,223/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

तरी यासंबंधात LBT विभागात कार्यरत कर्मचार्यांनी LBT च्या बँकेत जमा रकमांचे वेळोवेळी ताळमेळ न घेणेबाबत



Scanned by CamScanner

संबंधित विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

सदर लेखाआक्षेप अर्ध समाज पत्र क्र. 36 दि. 04-06-2015 चे अनुषंगाने आवश्यक अनुपालन अप्राप्त असल्याने घेण्यात येते.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 146820223 |
| गुंतलेली रक्कम | 146820223 |

DATPVKM6101 (Ref No. 20, Hmm No. 3...

## *57 बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदार यांचेकडून स्थानिक संस्था कराची आकारणी व वसुलीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 1**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मनपातील नगररचना व लेखा विभागाने बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदार यांचेकडून वसूल केलेल्या LBTLBTLBT च्या रकमेबाबत माहिती सादर केलेली नाही.***

चंद्रपूर शहर महानगरपालिका येथे म.शा. अधिसूचना दि. 1 जून 2012 तसेच सुधारित शासन निर्णय, नगरविकास विभाग क्रमांक स्थासंक 2011/ प्र.क्र.139/नवि 34 दि. 31 ऑगस्ट 2012 अन्वये दि. 1 नोव्हेंबर 2012 पासून जकात कराऐवजी स्थानिक संस्था करप्रणाली सुरु करण्यात आल्यामुळे स्थानिक संस्था कर अधिनियम 2010 मधील कलम 27(4) नुसार महानगरपालिकेच्या हद्दीत बांधकाम करण्याचे काम हाती घेणारा कोणताही बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदार स्थानिक संस्था कर भरण्याकरिता महापालिकेकडे स्वतःची नोंदणी करून त्यांनी शहराच्या हद्दीत बांधकामाकरिता आयात/खरेदी केलेल्या मालाच्या किमतीवर एकतर शासनाने ठरवून दिलेल्या मानकानुसार LBT चा भरणा करावा अथवा खाली नमूद इमारतीचे टप्प्यानुसार LBT रकमेचे ठोक प्रदान करण्याचे पर्याय स्वीकारण्याबाबत प्रस्तावित केलेले आहे.

अ) चौथ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम - रुपये 100 प्रती चौ. मीटर
(ज्या इमारतीत उद्वाहन नसेल तेथे)

ब) सातव्या मजल्यापर्यंतचे बांधकाम - रुपये 150 प्रती चौ. मीटर
(ज्या इमारतीत उद्वाहन असेल तेथे)

क) उत्तुंग इमारतींचे बांधकाम - रुपये 200 प्रती चौ. मीटर
(सात मजल्यापेक्षा अधिक)



Scanned by CamScanner

शासन अधिनियमातील उपरोक्त तरतुदींचे अनुषंगाने चंद्रपूर शहर महानगरपालिका येथील नगररचना विभागाद्वारे नविन बांधकामाकरिता परवानगी दिलेल्या इमारतीचे बांधकाम करणारे व्यावसायिक तसेच महानगरपालिकेतील बांधकाम विभागाकडील कामे करणारे कंत्राटदार यांनी LBT भरणा करण्याकरिता नोंदणी केलेली संख्या व त्यांचेकडून वसूल/भरणा करण्यात आलेल्या रकमेचे विवरण मागणीकरिता नगररचना विभागाला अर्धसमासपत्र क्रमांक 50 दिनांक 20-6-2015 तसेच बांधकाम विभागातील कामे केलेले नोंदणीकृत कंत्राटदार यांना प्रदान केलेल्या देयकांमधून लेखा विभागाने कपात केलेल्या LBT च्या रकमा प्रमाणक क्रमांक व दिनांक नमूद करून विवरण सादर करण्यास अर्धसमासपत्र क्रमांक 49 दिनांक 20-6-2015 नुसार कळविले असता आवश्यक माहिती/अभिलेखे विहित कालावधीत लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे शहरातील बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदार यांची LBT भरणाकरिता नोंदणी केलेली संख्या व सन 2012-2013 या कालावधीत त्यांचेकडून स्थानिक संस्था करापोटी प्राप्त झालेला महसूल याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

तरी शासन निर्देशानुसार चंद्रपूर शहरातील बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदार यांची LBT करिता नोंदणी केलेली संख्या तसेच त्यांचेकडून भरणा/वसूल केलेल्या रकमांची माहिती व अभिलेखे लेखापरीक्षणास सादर न करणेबाबत संबंधित विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

सदर लेखा आक्षेप अर्धसमासपत्र क्र. 49 व 50 दि.20-6-2015 नुसार नगररचना व लेखा विभागास खुलासा करण्याबाबत लेखी कळविण्यात आले असता लेखापरीक्षण पथकाने मागितलेली माहितीचे अनुषंगाने संबंधित मुद्द्यांबाबत सदर विभागाने आवश्यक माहिती/अभिलेखे सादर केलेले नसून तसे अनुपालन विभागाने केले नसल्याने सदर परिच्छेद ठेवण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 0 |
| गुंतलेली रक्कम | 0 |

DATPVKM6101 (RefNo 62, Hmm No: 50)

**58 श्री. भुपेश बाबुरावजी गोठे, आरोग्य निरीक्षक यांचे पदोन्नतीचे वेळी केलेल्या चुकीचे वेतननिश्चितीबाबत**

6

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 95*

गुंतलेली रक्कम रु. 430172.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 430172.00/-

***स्वच्छता विभागातील श्री. भुपेश गोठे आरोग्य निरीक्षक यांचे पदोन्नती नियुक्तीचे वेतन निश्चितीकरण म.ना.से.(वेतन) नियम 1981 मधील 11 नुसार न केल्यामुळे आर्थिक नुकसान झालेले आहे.***



Scanned by CamScanner

प्रमाणक क्र.882 दिनांक-15/03/2013 रक्कम-430172

श्री. भुपेशबाबुरावजी गोठे हे न.प. चंद्रपूर येथे कनिष्ठ लिपिक पदावर कार्यरत असतांना त्यांनी All India Institute of Local Self Government मुंबई, येथून दि. 25-7-2006 ला स्वच्छता निरीक्षकाचा पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला असल्यामुळे नगरपरिषद सर्वसाधारण सभा दि. 28-1-2010,ठराव क्र. 43 अन्वये तसेच मुख्याधिकारी, नगरपरिषद चंद्रपूर यांचे आदेश क्र. चनप/मु.अ./साप्रआ/1/10 दि. 6-4-2010 नुसार विद्यमान वेतनश्रेणी रु. 4000-100-6000 व सुधारित वेतनबँड रु. 5200-20200+ रु. 2400 ग्रेड वेतनमध्ये स्वच्छता निरीक्षक पदावर नियुक्ती करण्यास मान्यता प्रदान करण्यात येऊन तात्पुरती निवृत्ती देण्यात आली. त्यांचे सेवापुस्तक तपासले असता ते सदर पदावर दि. 7-4-2010 ला रुजू झाले असून त्यांचे खालीलप्रमाणे वेतननिश्चित करण्यात आले.

दिनांक 6-4-2010 ला कनिष्ठ लिपिक पदावरील वेतन रु. 7740 + रु. 1900 ग्रे.वे.

दिनांक 7-4-2010 ला आरोग्य निरीक्षक पदोन्न्ती/नियुक्ती अंतर्गत वेतनबँड रु. 5200-20200+ रु. 2400 ग्रेड वेतनमध्ये केलेली वेतन निश्चिती -

दिनांक 7-4-2010 ला निश्चित केलेले वेतन रु. . 7740 + रु. 2400 ग्रे.वे.<u>(चुकीचे आहे)</u>

वेतनवाढ दि. 1-7-2011 ला वेतन - रु. 7740 + रु. 2400 ग्रे.वे. = रु. 10140 वर 3% वेतनवाढ
रु. 310 एकूण रु. 8050 + रु. 2400 ग्रे.वे.

दि. 1-7-2012 - रु. 8050 + रु. 2400 ग्रे.वे. = रु. 10450 वर 3% वेतनवाढ
रु. 320 एकूण रु. 8370 + रु. 2400 ग्रे.वे.

दि. 1-7-2013 - रु. 8370 + रु. 2400 ग्रे.वे. = रु. 10770 वर 3% वेतनवाढ
रु. 330 एकूण रु. 8700 + रु. 2400 ग्रे.वे.

दि. 1-7-2014 - रु. 8700 + रु. 2400 ग्रे.वे. = रु. 11100 वर 3% वेतनवाढ
रु. 340 एकूण रु. 9040 + रु. 2400 ग्रे.वे.

उपरोक्त वेतन निश्चितीचे अवलोकन केले असता ते म.ना.से.(वेतन) नियम 1981 मधील तरतुदींचे अनुषंगाने केलेले नसल्याचे दिसून येते. वेतन नियम 1981 मधील नियम 11 नुसार कायम स्वरूपी, अस्थायी अथवा स्थानापन्न पद धारण करणाऱ्या कर्मचाऱ्याची अन्य पदावर पदोन्नतीने अथवा थेट भरतीने अस्थायी वा स्थानापन्न स्वरुपात नियुक्ती करण्यात आली असता त्यांना जुन्या(विद्यमान) पदावरील एक वेतनवाढ मिळून पदोन्न्ती/नियुक्तीचे पदाचे ग्रेड वेतन देय होते. संबंधितांना नियुक्तीचे पदावर रुजू दि. 7-4-2010 ला विद्यमान पदावरील एक वेतनवाढ न दिल्यामुळे त्यांचे दि. 7-4-2010 पासून एक वेतनवाढीच्या रकमेने आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यांचे नियुक्तीचे पदावर खालीलप्रमाणे वेतन विनियमित होईल.

दिनांक 7-4-2010 ला वेतननिश्चिती रु. 7740 + रु. 1900 ग्रे.वे.= रु. 9640 वर 3% वेतनवाढ
रु. 290 एकूण रु. 8030 + रु. 2400 ग्रे.वे.

वेतनवाढ दि. 1-7-2011 ला वेतन - रु. 8030 + रु. 2400 ग्रे.वे. = रु. 10430 वर 3% वेतनवाढ
रु. 320 एकूण रु. 8350 + रु. 2400 ग्रे.वे.



Scanned by CamScanner

दि. 1-7-2012 - रु. 8350 + रु. 2400 ग्रे.वे. = रु. 10750 वर 3% वेतनवाढ
रु. 330 एकूण रु. 8680 + रु. 2400 ग्रे.वे.

दि. 1-7-2013 - रु. 8680 + रु. 2400 ग्रे.वे. = रु. 11080 वर 3% वेतनवाढ
रु. 340 एकूण रु. 9020 + रु. 2400 ग्रे.वे.

दि. 1-7-2014 - रु. 9020 + रु. 2400 ग्रे.वे. = रु. 11420 वर 3% वेतनवाढ
रु. 350 एकूण रु. 9370 + रु. 2400 ग्रे.वे.

तरी संबंधितांचे वरनमुद्नुसार वेतन नियम 11 प्रमाणे सुधारित वेतननिश्चितीची सेवापुस्तकात नोंद घेऊन त्याप्रमाणे त्यांना देय/आहरीत वेतनाचे विवरणपत्र तयार करून फरकाची रक्कम अदा केल्याचे लेखापरीक्षणास सप्रमाण अनुपालन सादर करावे.

सदर लेखा आक्षेप अर्ध समास पत्र क्र. 58 दि.24-6-2015 चे अनुषंगाने आवश्यक अनुपालन अप्राप्त असल्याने घेण्यात येते.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 430172 |
| गुंतलेली रक्कम | 430172 |

DATPVKM6101 (Ref No . 21, Hum No : 58)

## 59 *श्री. नामदेव राउत यांच्या सेवापुस्तकामध्ये आढळुन आलेल्या अनियमितता बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 03**

*अनियमितता कलम : 9ड*

***श्री नामदेव राउत यांची ग्रंथपाल या पदावर पदोन्नती करतांना न.प्र. संचालनालय शासन आदेश दिनांक 17.12.2005 नुसार सहायक ग्रंथपाल या पदावरील 12 वर्षाचा अनुभव नसतांना पदोन्नती देण्यात आली. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे I.G.S. प्रमाणपत्र उपलब्द नाही. ग्रंथपाल हे पद तांत्रिक सेवेतील असतांना त्यांची बदली लेखा व इतर विभागात करण्यात आली. त्यांनी B.Lib. व M.Lib. परीक्षेला बसण्याकरीता परवाणगी घेतली नाही.***

श्री नामदेव राउत शिपाई यांचे सेवापुस्तक व त्याअनुषंगाने नस्तीची तपासनी केली असता यांची पदोन्नती कार्यालयाचे आदेश क्र. चनप/मुअ/साप्रआ/95 दिनांक 5.3.2010 अन्वये ग्रंथालय विभागात सहायक ग्रंथपाल या पदावर दिनांक 5.3.2010 ला अंतर्गत भरतीने पदोन्नती करण्यात आली. तसेच



Scanned by CamScanner

कार्यालयीन आदेशानुसार पुन्हा ग्रंथपाल या पदावर अंतर्गत भरतीने पदोन्नती देण्यात आली. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहे.

1. चंद्रपूर नगर परिषदेच्या आस्थापनेवर मंजुर केलेल्या आकृतीबंधातील मंजुर पदाचा आढावा प्रस्तावित सुधारीत आकृतीबंधाबाबतचे महाराष्ट्र राज्य शासन नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे आदेश क्रमांक नप्रसं2005/6/32/सीएच/1/प्रलंबीत पदनि/प्र.क्र.877/2005/का-24 दिनांक 17.12.2005 अन्वये आस्थापनेवार ग्रंथपाल व सहायक ग्रंथपाल असे प्रत्येकी 1 पद मंजुर करण्यात आले त्यानुसार ग्रंथपाल हे पद भरण्याकरीता शैक्षणिक अर्हता सहायक ग्रंथपाल या पदावरील किमान 12 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. परंतु श्री राउत यांना सहायक ग्रंथपाल या पदावर 4 वर्षाचा अनुभव असतांना त्यांची शासनाचे आदेशाची अवहेलना करून नियमबाहयरित्या ग्रंथपाल या पदावर पदोन्नती देण्यात आली.

2. तसेच वरील आदेशानुसार ग्रंथपाल यांनी संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अशी विभागीय परीक्षा विहीत केली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे I.G.S. प्रमाणपत्र आवश्यक असतांना राउत यांचे प्रमाणपत्र उपलब्द नसतांना त्यांना नियमबाहयरित्या पदोन्नतीने नेमणुक देण्यात आली.

3. शासन नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे आदेशअन्वये प्रशासकीय सेवेतील अधिका-याची(Non Technical) तांत्रिक व लेखा सेवेतील पदावर किंवा तांत्रिक व लेखा सेवेतील अधिका-याची प्रशासकीय सेवेतील पदावर बदलीने/प्रतिनियुक्तीने नेमणूक करता येणार नाही. असे असतांना श्री राउत यांची झोन क्रमांक 1 मध्ये झोनल अधिकारी व अतिक्रमण विभागात बदली करण्यात आली. त्यामुळे नियमाचे उल्लंघन झाल्याचे दिसुन येते.

4. सेवापुस्तकात ग्रंथपाल या पदाची वेतनश्रेणी नमुद करण्यात आली असुन पदोन्नतीचे आदेशाची नोंद घेण्यात आली नाही परंतु वेतन पटाची तपासनी केली असता श्री राउत यांना ग्रंथपाल या पदानुसार वेतन काढण्यात येत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सेवापुस्तकामध्ये प्रथम पदोन्नतीची नोंद घेवुन त्यानुसार पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु तसे केल्याचे दिसुन येत नाही.

5. अर्धसमास पत्र क्रमांक 71 दिनांक 17.7.2015 नुसार श्री राउत हे सेवत असतांना त्यांनी B.Lib. व M.Lib. परीक्षा उत्तीर्ण केली. परंतु शासकिय सेवेत असतांना कर्मचा-यांने सेवेशी निगळीत असलेले शिक्षण घेण्याकरीता कार्यालयाची परवाणगी आवश्यक आहे. परंतु श्री राउत यांनी परवाणगी प्राप्त न केलेली नाही. हि नियमबाहय बाब असल्याचे आढळुन येते. तसेच सदर परीक्षेला उपस्थित असल्याची रजेची नोंद सेवापुस्तकामध्ये घेण्यात आली नाही व परीक्षेला बसण्याची परवाणगीचे पत्र नस्तीस उपलब्द नाही

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 71 दिनांक 17.7.2015 निर्गमित केले असता त्याबाबत योग्य समर्थनिय खुलासा व अभिलेख सादर करण्यात आले नाही.



Scanned by CamScanner

**60 मनपा अधिकारी व कर्मचा-यांना मोबाईल सिम कार्ड पुरवुन मासिक बिलाचे शोधन करण्याबाबत.**

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
अनियमितता संख्या : 04

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 25496.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 25496.00/-

***मनपाच्या 46 पदाधिकारी, अधिकारी व कर्मचा-यांना मोबाईल बिलाचे शोधन लोकसेवेसाठी नसतांना खर्च करण्यात आला. मोबाईलची मर्यादा किती असावी याबाबत शासनाचे किंवा मनपाचे कोणतेही आदेश नाही.***

मनपाचे सन 2012-13 या वित्तीय वर्षातील मधील खर्चाचे बिले तपासतांना आयडि या मोबाईल ग्रुपमधील एकुण 46 अधिकारी व कर्मचारी यांना मोबाईल बिलाच्या रकमेचे शोधन करण्यात येत आहे. प्रमाणक क्रमांक 1605 दिनांक 22-3-2013 रूपये 25496 नुसार आयडिया कंपनीचे Invoice No 1731246 दिनांक 22-2-2013 चे दिनांक 21 जानेवारी 2013 ते 20 फेब्रुवारी 2013 या कालावधीतील मोबाईल बिलाचे खालील प्रमाणे रकमेचे प्रदान केले.

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचारी यांचे नाव/पदनाम | मोबाईल क्रमांक | मर्यादा | बिलाची देय रक्कम माहे 21 जाने13 ते 20 फेब्रु 13 |
|---|---|---|---|---|
| 1. | नगर सचिव | 9011018632 | 500 | 176 |
| 2. | डॉ. आंबटकर | 9011018633 | 1000 | 784 |
| 3. | नगर अभियंता | 9011018635 | 500 | 242 |
| 4. | फायर ऑफिसर | 9011018636 | 500 | 303 |
| 5. | बोरीकार, क. अभि. | 9011018637 | 850 | 604 |
| 6. | वनकर, --"-- | 9011018638 | 500 | 283 |
| 7. | बारई | 9011018639 | 850 | 445 |
| 8. | घुमडे | 9011018640 | 850 | 549 |
| 9. | हजारे | 9011018641 | 500 | 1299 |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10. | पिंपळशेंडे | 9011018643 | 500 | 269 |
| 11. | शेख | 9011018644 | 750 | 335 |
| 12. | मोगरे | 9011018645 | 500 | 365 |
| 13. | पोतुनवार | 9011018646 | 500 | 547 |
| 14. | जोसेफ | 9011018647 | 500 | 1115 |
| 15. | राउत | 9011018648 | 500 | 483 |
| 16. | दिंगलवार | 9011018649 | 500 | 1455 |
| 17. | भुपेश गोटे | 9011018650 | 500 | 333 |
| 18. | अडके | 9011018651 | 500 | 285 |
| 19. | उसटे | 9011018652 | 300 | 776 |
| 20. | मैलापवार | 9011018653 | 500 | 309 |
| 21. | वॉटर टॅंकर | 9011018654 | 500 | 196 |
| 22. | प्रदिप पाटील, लेखाधिकारी | 9011018655 | 500 | 357 |
| 23. | उपायुक्त | 8888804822 | | 530 |
| 24. | गर्गेलवार | 9011061182 | 500 | 380 |
| 25. | प्रदिप मडावी | 9011095168 | 500 | 246 |
| 26. | खांडरे | 8308823235 | 500 | 401 |
| 27. | इंटरनेट | 8308819756 | - | 3136 |
| 28. | बेग | 8888872412 | - | 173 |
| 29. | बोरीकर | 8308836441 | 850 | 543 |
| 30. | इंटरनेट | 9922094823 | - | 347 |
| 31. | इंटरनेट | 8308215600 | - | 1366 |
| 32. | इंटरनेट | 8308815823 | - | 1366 |
| 33. | तळवेकर | 8308825823 | 500 | 214 |
| 34. | काळे | 8308828623 | 500 | 544 |
| 35. | आयुक्त | 9922267698 | - | 1399 |
| 36. | महापौर | 9922269054 | - | 462 |
| 37. | नामदेव राउत | 8308846919 | 500 | 346 |
| 38. | आशिष जिवतोडे | 9922434201 | 500 | 347 |
| 39. | एल.बी.टी. | 9763609116 | 500 | 167 |
| 40. | --"-- | 9763603196 | 500 | 232 |
| 41. | --"-- | 976304318 | 500 | 315 |
| 42. | --"-- | 9789880479 | 500 | 369 |
| 43. | --"-- | 9689880784 | 500 | 191 |
| 44. | --"-- | 9689880849 | 500 | 167 |
| 45. | --"-- | 8975453200 | 500 | 167 |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 46. | सारंग निर्मळे | 8975454300 | 500 | 578 |
| | | | | 25496 |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. वरील केलेला नगरपालीका निधीतुन केलेला असल्यामुळे नियमानुसार लोकसेवेसाठी तातडीने आवश्यक असलेल्या कामांसाठी नगरपालिका निधीतून तात्पुरत्या स्वरूपात करता येतो . परंतु वरील अधिकारी व कर्मचा -यांना पुरविण्यात आलेल्या मोबाईल बिलाचे शोधन लोकसेवेसाठी नसतांना खर्च करण्यात आला . मनपा अधिकारी कर्मचा -यांना मोबाईल सेवा पुरविण्याबाबतचे शासनाचे आदेश असल्यास तसेच सिमकार्ड पुरविणे व बिलाचे शोधन करण्याबाबत मनपाचा ठराव असल्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 63 दिनांक 14-07-2015 अन्वये विचारणा केली असता मनपाने खुलासा केला नाही. यावरून सदर खर्च नियमबाहयरित्या केल्याचे दिसुन येते.

2. मोबाईलचे सिम कार्ड घेतांना ते व्यक्तीच्या नावाने विकत घ्यावे लागते परंतु बिलाची तपासनी केली असता बिलात अनेक ठिकाणी नगर सचिव , नगर अभियंता, फायर ऑफिसर, वॉटर टँकर, उपायुक्त, इंटरनेट, आयुक्त, महापौर, एल.बी.टी. आदिच्या नावाने सिमकार्ड असल्याचे दर्शविण्यात आले. परंतु सदर सिम कार्ड कोणाच्या नावाने आहे त्याचा उल्लेख नसल्यामुळे सदर सिमकार्डचा दुरूपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3. मनपाने अधिकारी व कर्मचा -यांना देण्यात आलेले सिम कार्डचा उपयोग कोणत्या कार्याल यीन कामासाठीच केला जातो याची लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

4. प्रत्येक अधिकारी व कर्मचा-यांना मोबाईल वापरण्याची मर्यादा दिलेली आहे. सदर मर्यादा कोणत्या नियमानुसार ठरविण्यात आली याचे आदेश लेखापरीक्षणास सादर केला नाही. त्यामुळे वरील अधिकारी व कर्मचारी यांच्या मोबाईल बिलवर करण्यात येत असलेला खर्च नियमबाहय ठरतो.

DATSSKM6702 (Ref No : 43, Hmm No : 63)

### *61 चंद्रपूर शहर महानगरपालिका येथील स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून प्राप्त विवरणपत्राबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 1**

*म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9इ*



Scanned by CamScanner

**मनपातील नोंदणी केलेल्या 2989 धारक व्यापाऱ्यांपैकी 86 व्यापाऱ्यांनी LBT भरणाबाबत विवरण सादर केलेले नसल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.**

चंद्रपूर शहर महानगरपालिका येथे शासन अधिसूचना, दि. 1 जून 2012 नुसार दि. 1 जुलै 2012 पासून स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला असता विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार सन 2012-2013 या वर्षात एकूण 2989 व्यापाऱ्यांनी LBT भरणा करण्याकरिता नोंदणी केल्याचे निदर्शनास आले. सदर व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था कर अधिनियम 2010 मधील कलम 29 (1) नुसार वित्तीय वर्ष संपल्यानंतर त्यांनी खरेदी/आयात केलेल्या मालाचे व एकूण उलाढालीबाबत वार्षिक विवरणपत्रे 90 दिवसांचे आंत महानगरपालिकेस सादर करणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने LBT विभागाला अर्धसमासपत्र क्रमांक 51 दिनांक 20-6-2015 अन्वये माहिती सादर करण्यास कळविले असता वरनमुद 2989 नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यांपैकी 2875 व्यापाऱ्यांनी कराचा भरणा करून वार्षिक विवरणपत्रे सादर केल्याचे अनुपालन प्राप्त झाले. म्हणजेच उर्वरित 86 व्यापाऱ्यांनी LBT चा भरणा केलेला नसून तशी विवरणपत्रेसुद्धा मनपाला सादर केलेली नाही. त्याचप्रमाणे सदर व्यापाऱ्यांनी अधिनियमातील कलम 19 अन्वये खरेदी केलेल्या/आयात केलेल्या मालाची नमुना 'घ' मध्ये नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. विभागाला अर्धसमासपत्र क्रमांक 42 दिनांक 17-6-2015 नुसार आवश्यक नोंदवही व अभिलेखे सादर करण्याबाबत कळविले असता करनिर्धारणाचे वेळी व्यापाऱ्यांकडून सदर अभिलेखे मागविण्यात येतात असे अनुपालन प्राप्त झाले.

उपरोक्त 86 नोंदणीकृत व्यापाऱ्यानी LBT भरणा केल्याबाबतचे विवरण सादर केलेले नसल्यामुळे आवश्यक अभिलेखे/नोंदवह्या प्राप्त न करता त्यांचे LBT चे संबंधात वसुली प्राप्त न होता त्यांचे निर्धारणसुद्धा झाले नसल्याचे निदर्शनास येते. या व्यापाऱ्यांनी LBT च्या रकमेचा भरणा न केल्यामुळे विभागाने त्यांचेविरुद्ध कोणती कारवाई केली, तसेच त्यांचे कडून येणे असलेली LBT ची रक्कम व त्यावर विलंबनाबाबत शास्ती झाली व दंड किती वसूल केला याबाबतची माहिती विभागाकडून लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही.

तरी अधिनियमातील तरतुदीनुसार LBT नोंदणी केलेल्या 89 व्यापाऱ्यांनी LBT चा भरणा न केल्यामुळे व तसे विवरण सादर न केल्यामुळे मनपाला झालेल्या नुकसानीबाबत विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून तसे लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

सदर लेखा आक्षेप अर्ध समासपत्र क्र. 42 दि.17-6-2015 व क्रमांक 51 दिनांक 20-6-2015 नुसार LBT विभागास खुलासा सादर करण्याबाबत लेखी कळविण्यात आले असता लेखापरीक्षण पथकाने मागितलेली माहितीचे अनुषंगाने संबंधित मुद्द्यांबाबत सदर विभागाने समर्पक व परिपूर्ण अनुपालन सादर केले नसल्याने सदर परिच्छेद घेण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 0 |
| गुंतलेली रक्कम | 0 |

DATPVKM6101 (Ref No : 63, Hmm: No : 51)



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

## 62 आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीमधील अनियमिततेबाबत.

**कुटुंब कल्याण योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा/शासन निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

***महानगरपालिका चंद्रपूर येथील आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना 6वा वेतन आयोग लागू करण्यात आला नाही.***

सन 2012-13 चे लेखापरीक्षणामध्ये माहे जानेवारी/2013, माहे फेब्रुवारी/2013 व माहे मार्च/2013 चे वेतनपटाची पडताळणी केली असता सदर वेतनपट हे सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी नुसार तयार करण्यात आलेले नाही. सदर वेतनपटात नमूद असलेले कर्मचारी व अधिकारी यांच्या सेवापुस्तकांची पडताळणी केली असता महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग परिपत्रक क्र.बीयुडी 1285/ सीआर-62/कु.क्र.2 मुंबई दिनांक 8 ऑगस्ट 1985 नुसार महानगरपालिका/नगरपरिषदांच्या क्षेत्रामधील कुटुंब कल्याण प्राथमिक आरोग्य सेवांची पुनर्रचना करून नवीन आरोग्य केंद्र स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सदर शासन निर्णयातील परिच्छेद (क) नुसार कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक अहर्ता व त्या त्या पदासाठीचे सेवाप्रवेश नियम अंमलात असलेल्या त्यावेळच्या नियमानुसार आवश्यक होते. तसेच शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय BUD-1284/779/CR-143/FW-II दि.21 ऑगस्ट 1985 नुसार चंद्रपूर नगरपरिषदेकरिता 5 आरोग्य केंद्र निर्माण करून त्यामध्ये खालील पदांना मान्यता दिलेली आहे.

| | | संख्या |
|---|---|---|
| अ.क्र. | पद | 5 |
| 1 | महिला वैद्यकीय अधिकारी | 5 |
| 2 | स्टाफ नर्स | 20 |
| 3 | प्रसविका | 20 |
| 4 | MPW male | 5 |
| 5 | वर्ग 4 कर्मचारी (महिला) | 5 |
| 6 | कॉम्पुटर ऑपरेटर कम क्लर्क | 74 |
| 7 | स्वयंसेवी आरोग्य सेविका | |

मा. अध्यक्ष व मुख्याधिकारी नगरपरिषद, चंद्रपूर यांच्या स्वाक्षरीत असलेल्या दि. 25/10/1985 व दि. 25/02/2013 च्या पदभरती जाहिरातीचे अवलोकन केले असता महिला वैद्यकीय अधिकारी ,आरोग्य परिचारिका, परिचारिका प्रसविका, सहाय्यक परिचारिका, बहुउद्देशीय आरोग्य पुरुष कर्मचारी, स्वयंसेवी आरोग्य महिला कर्मचारी, कॉम्पुटर ऑपरेटर कम क्लर्क व चतुर्थश्रेणी महिला कर्मचारी यांच्या वेतनश्रेणी जाहिरातीमध्ये नमूद असून व अहर्ता जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

चंद्रपूर नगरपरिषदेचा दि. 23/10/2008 च्या सर्वसाधारण सभा समिती ठराव 43 नुसार चंद्रपूर नगरपरिषदेच्या अंतर्गत राष्ट्रीय कुटुंब कल्याण व माता बाळ संगोपन कार्यक्रमाअंतर्गत नियुक्त कर्मचाऱ्यांना , वेतन, ग्रॅच्यूईटी , भविष्य निर्वाह निधी, वैदकीय प्रतिपूर्ती इत्यादी सोई सुविधा लागू करण्याबाबत ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यानुसार 5 व्या वेतन आयोगापर्यंत आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना लाभ देण्यात आला आहे.



Scanned by CamScanner

मात्र महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2009/ प्र.क्र.106/09/नवि-14 मुंबई दि.31/08/2009 नुसार राज्यातील नगरपरिषद कर्मचाऱ्यांना 6 व्या वेतन आयोगाच्या शिफारशी प्रमाणे वेतनश्रेण्या लागू करावयाच्या असतांना नगरपालिका चंद्रपूर येथे दि.24/10/2011 पर्यंत व त्यानंतर महानगरपालिका चंद्रपूर शहर येथील कर्मचाऱ्यापैकी आरोग्य विभागातील कर्मचारी व अधिकारी सोडून इतरत्र कर्मचाऱ्याना सहाव्या वेतन आयोगातील शिफारशी प्रमाणे वेतनश्रेण्याचा लाभ देण्यात आल्याचे दिसून आले. त्यामुळे उक्त शासन निर्णयाचे पालन करून चंद्रपूर शहर महानगरपालिका मधील आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना 6 व्या वेतन आयोगाचा लाभ देण्याबाबत शासन निर्णयाचे पालन झाले नसल्याने आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना असुधारीत वेतनश्रेणीद्वारे वेतन देण्यात असल्याचे लेखापरीक्षणास आढळून आले.

याबाबत लेखापरीक्षण पथकाने अर्धसमास पत्र क्रमांक 34 दि.28/05/2015 (1) मा.आयुक्त, महानगरपालिका चंद्रपूर यांना 3 दिवसांत खुलासा करण्यात सूचित केले असता मा.आयुक्त महानगरपालिका, चंद्रपूर यांनी खुलासा सादर केला नाही. चंद्रपूर नगरपरिषदेच्या दिनांक 30/11/2009 ठराव क्र.34 नुसार नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे 6 व्या वेतन आयोगाच्या शिफारसी नुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय नुसार क्र.संकीर्ण 2009 प्र.क्र.10609/नवि-14 दि.31 ऑगस्ट 2009 प्रमाणे ठरावाद्वारे 6व्या वेतन आयोगाच्या शिफारशी प्रमाणे वेतनश्रेण्या लागू करण्याबाबत मंजुरी देण्यात आली असून महानगरपालिका चंद्रपूर अंतर्गत असलेल्या आरोग्य विभागाला मात्र 6 व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आलेल्या नाहीत. मात्र आरोग्य विभाग वगळता इतर सर्व विभागातील कर्मचाऱ्यांना 6 व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आलेल्या आहेत.

7वा वेतन आयोग सुद्धा भविष्यात येऊ घातला असतांना महानगरपालिका चंद्रपूर येथे आरोग्य विभागाच्या शिफारशी लागू केलेल्या नाहीत हि बाब गंभीर स्वरुपाची आहे.

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 2012 मधील नियम 51(2) आणि 67(ब) नुसार कर्मचाऱ्यांच्या सेवा, वेतन, विशेषाधिकार व भत्ते या संबंधीचे सर्व प्रश्न मा.आयुक्तांनी निकालात काढावयाचे असताना आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना असुधारीत वेतनश्रेणीद्वारे वेतन दिल्या जात असल्याचे दिसून आले. तसेच लेखापरीक्षण पथकाने ह्याबाबत मा.आयुक्तांना खुलासा करण्याबाबत सूचित करूनही त्यांनी अर्धसमास पत्राचे उत्तर दिले नाही. यावरून महानगरपालिकेने लेखापरीक्षण अर्धसमासपत्राकडेही दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट झाले आहे.यामुळे सदर बाबीकडे मा.सचिव, नगरविकास विभाग, चंद्रपूर यांचे विशेष लक्ष वेधण्यात येत आहे.

DATBNKM6401 (Ref No : 71, Hmm No : 34)

## *63 आगप्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजना केली नसल्याची अनियमितता.*

-

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

***महानगरपालीकेने सन 2012-2013 चे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध केलेल्या अभिलेख्याची पडताळणी केली***



Scanned by CamScanner

*असता आगप्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजना बाबत खर्च केल्याचे अभिलेखे पहावयास मिळाले नाही. यावरून महानगरपालिका चंद्रपूर येथे उक्त उपाययोजना केली नसल्याने भविष्यात कोणतेही अप्रीय घटना घडल्यास त्या बाबत संबंधित विभागप्रमुख व प्रशासनीक प्रमुख हे जबाबदार राहणार असल्याने सदरील आगप्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजना तातडीने करणे आवश्यक आहे.*

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण दिनांक 5 फेब्रुवारी 2007 व आगप्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 आणि महाराष्ट्र आगप्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजनानियम 2006 अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात आगप्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजना करण्याबाबत शासनाने सूचित केलेले आहे. त्याअनुषगाने महानगरपालिका चंद्रपूर चे अंतर्गत सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व झोन कार्यालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व महानगरपालीकेचे इतर ठिकाणी विखुरलेले सर्व कार्यालयामधे आगप्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजना करणे आवश्यक आहे.महाराष्ट्र आगप्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील प्रकरण दोन कलम 3(1) नुसार आगप्रतीबंधक, नियंत्रक आणि अग्निशमन करण्यासाठी आणि आग लागल्यास जीवमालमत्ता सुरक्षित ठेवण्याची सुनिश्चिती करण्यासाठी इमारत उपविधीनुसार आवश्यक घटकातील किंवा त्या–त्या वेळी अंमलात असलेले कोणतेही लायदे किंवा भारतीय राष्ट्रीय इमारत संहीता 2005 मधील तरतुदीद्वारे आवश्यक असतील अशा उपाययोजना करावयाच्या आणी सदर उपाययोजना नेहमी दुरुस्त व कार्यक्षम ठेवावयाच्या आहेत. परंतु सन 2012-2013 मधे ह्या बाबत कोणत्याही प्रकारचा खर्च केला नसल्याचे अनियमितता अभिलेख्यावरून दिसून आली.

महानगरपालिका चंद्रपूर येथे महाराष्ट्र आगप्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजनाअधिनियम 2006 मधील कलम 20(1) अनुसार अग्निशमक उपाययोजना करण्यासंबंधात मा.आयुक्तांनी कर्तव्याचे पालन केले नसल्यामुळे सदर्हू बाब मा.संचालक, महाराष्ट्र अग्नीशमक सेवा, उद्योग सारथी बिल्डींग, मुंबई यांचे निदर्शनास प्रशासनाने आणून दिल्याचे अभिलेखे आढळले नाही.

यावरून महानगरपालिका चंद्रपूर येथे आगप्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजना करण्याबाबत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ह्या बाबत त्वरीत कार्यवाही न झाल्यास ह्यांची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुख व मा.आयुक्तांची राहणार असल्याबाबत विशेष लक्ष वेधण्यात येत आहे.

DATBNKM6401 (Ref No : 84, Hmm No : 37)

***64 आरोग्य विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन श्रेणीतील कमाल टप्प्यावरील वेतनानंतरच्या वेतनवाढीबाबत.***



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 119473.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 119473.00/-

***आरोग्य विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन श्रेणीतील कमाल टप्प्यावरील वेतनानंतरच्या कुंठीत वेतनवाढी न दिल्यामुळे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

| | | |
|---|---|---|
| प्रमाणक क्र.1658 | दिनांक-26/03/2013 | रक्कम-49309 |
| प्रमाणक क्र.1660 | दिनांक-26/03/2013 | रक्कम-70164 |

आरोग्य विभागातील खालील अधिकारी/कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके तपासणीअंती वेतनवाढीबाबत अनियमितता आढळून आल्या

1) डॉ.(श्रीमती) अल्का वसंतराव आकुलवार ह्या चंद्रपूर शहर महानगरपालिका (तत्कालीन न. प. चंद्रपूर) येथे कार्या. आदेश क्र. च.न.पा./ना.आ.के./294/87 दि. 14-8-1987 नुसार शासनाचे मंजूर वेतनश्रेणीवर नागरी आरोग्य केंद्राकरिता स्त्री वैद्यकीय अधिकारी या पदावर तात्पुरती नेमणूक केली असता त्या दि. 17-8-1987 ला रुजू झाल्या. त्यांचे पाचव्या वेतन आयोगानुसार दि. 1-4-2004 पासून शासन निर्देशान्वये लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी रु. 8000- 275-13500 मध्ये रु.11025 वेतन निश्चित करण्यात येऊन त्यांना नियतकालिक (वार्षिक) वेतनवाढी निर्गमित करण्यात आल्या. त्यांची दि. 1-8-2012 ला वेतन रु. 13500 वेतन श्रेणीच्या कमाल टप्प्यावर होते. .व आजही ते तेवढेच वेतन घेत असल्याचे सेवा पुस्तकातील नोंदीवरून दिसून आले. त्याचप्रमाणे

2) श्री. उदय गंगाधरराव वाघाडे हे आरोग्य विभागात कार्या. आदेश क्र. च.न.पा./मुली/ - /3/88 दि. 7-4-1988 अन्वये दि. 11-4-1988 ला कनिष्ठ लिपिक पदावर रुजू झाले असता त्यांनासुद्धा दि. 1-4-2004 ला पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन श्रेणी रु. 3050-75-3950-80-4590 मध्ये रु. 4510 वेतन निश्चित करण्यात येऊन पुढील वेतनवाढ दि. 1-9-2005 ला रु. 4590 मंजूर करण्यात आली. त्यानंतर विभागाने त्यांना कुठल्याही वेतनवाढी न दिल्यामुळे त्यांचे वेतन रु. 4590 लेखापरीक्षानापर्यंत आहरित केल्या जात असल्याचे निदर्शनास आले.

तथापि म.शा. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपूर -1288/579/सेवा – 10 दि. 14 ऑक्टोबर 1988 नुसार असुधारीत वेतनश्रेणीमध्ये तसेच शा.नि. क्र. वेतन- 1099/ प्र.क्र.1/99/सेवा-3 दि. 25 जानेवारी 1999 नुसार पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर पोहोचतील त्यांना त्यांच्या वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यांवर दर दोन वर्षांनी एक याप्रमाणे कमाल 3 वेतनवाढी मंजूर करण्याबाबत निर्देश आहेत. त्याअनुषंगाने संबंधिताना खालीलप्रमाणे कुंठीत वेतनवाढी देय ठरतात.

1) डॉ.(श्रीमती) अल्का वसंतराव आकुलवार, - दि.1-8-2014 ला रु.13775 (1ली कुंठीत वेतनवाढ)
स्त्री वैद्य.अधिकारी

2) श्री. उदय वाघाडे, कनिष्ठ लिपिक - दि.1-9-2007 ला रु.4670 (1ली कुंठीत वेतनवाढ)
दि.1-9-2009 ला रु.4750 (2री कुंठीत वेतनवाढ)



Scanned by CamScanner

दि.1-9-2011 ला रु.4830 (3री कुंठीत वेतनवाढ)

तरी शासन निर्णय दि. 25 जानेवारी 1999 मध्ये दिलेल्या निर्देशानुसार संबंधितांना वरनमुद्नुसार वेतनवाढी मंजूर करुन व देय फरकाची रक्कम अदा केल्याचे विवरणासह लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

सदर लेखा आक्षेप अर्ध समाज पत्र क्र. 56 दि.24-6-2015 चे अनुषंगाने आवश्यक अनुपालन अप्राप्त असल्याने घेण्यात येते.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 119473 |
| गुंतलेली रक्कम | 119473 |

DATPVKM6101 (Ref No : 22, Hmm No : 56)

## 65 *नागरीकांना आरोग्यविषयक सुविधा मिळाल्या नसल्याची अनियमितता*

**आरोग्य विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : सार्व. आरोग्य मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिका चंद्रपूर च्या क्षेत्रामध्ये सार्वजनिक वैदयकीय सहाय्य नागरीकांना मिळण्यासाठी सार्वजनिक रूग्णालये व दवाखाने नियमित चालविण्याचे महानगरपालिकेचे आवश्यक कर्तव्य असतांनाही सन 2012-13 मध्ये झोन क्रं. 2 व 7 मधील बाहय रूग्ण विभाग वारंवार बंद ठेवण्यात आल्यामुळे नागरीकांना आरोग्य विषयक सुविधा मिळाल्या नसल्याचे आढळून आले.***

सन 2012-13 चे महानगरपालिका चंद्रपूर च्या झोन क्रं. 2 व 7 च्या बाहय रूग्ण विभागातील अभिलेख्यांची पडताळणी केली असता झोन क्रं. 2 व 7 मधील बाहय रूग्ण विभाग वारंवार बंद ठेवण्यात आल्याचे आढळले. त्यामुळे हयाबाबत अर्धसमासपत्रा क्रं. 29 दि. 21/5/2015 नुसार खुलासा मागविण्यात आला असता झोन क्रं. 2 येथील वैदयकीय अधिकारी प्रसूती रजेवर असल्याने व झोन क्रं. 7 मधील वैदयकीय अधिकारी माहे जून 2012 पासून कार्यरत नसल्यामुळे बाहयरूग्ण सेवा बंद होती असे कळविण्यात आले.

यावर पुढिलप्रमाणे अभिप्राय देण्यात येते........

1) झोन क्रं. 2 येथील वैदयकीय अधिकारी प्रसूती रजेवर असतांना त्याचा प्रकार आस्थापना विभागाने इतर अधिका-याकडे का सोपविण्याबाबत आदेश निर्गमित केले नाहीत.



Scanned by CamScanner

2) झोन क्रं. 7 येथील वैदयकीय अधिकारी जुन 2012 पासून कार्यरत नसतांना झोन क्रं. 7 मध्ये वैदयकीय अधिका-याची पर्यायी व्यवस्था आस्थापना विभागाने का केलेली नाही.

3) उपरोक्त झोन अंतर्गत नागरीक महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विषयक सुविधेपासून वंचित राहू नये किंवा नागरीकांचे प्राण धोक्यापत येवू नये हयाबाबत सर्वकष काळजी घेण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 53 नुसार मा. आयुक्त यांनी सुध्दा हंगामी स्वरूपात वैदयकीय अधिका-याची नेमणूक करून बाहय रुग्ण विभागातील आरोग्य विषयक सुविधा नागरीकांना उपलब्ध करून देण्याबाबत ची कार्यवाही केली नसल्यामुळे झोन क्रं. 2 व 7 मधील बाहय रुग्ण विभाग नियमबाहयपणे बंद ठेवला असल्याची अनियमितता दिसून आली. त्यामुहे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 63 (6) नुसार महानगरपालिकेने नागरीकांच्या सार्वजनिक आरोग्यविषयक सुविधा पुरविण्याचे आवश्यक कर्तव्य पार पाडले नसल्याचे दिसून आले.

DATBNKM6401 (Ref No : 55, Item No : 29)

***66 मनपा सार्वत्रिक निवडणूक 2012 मध्ये कर्मचारी/अधिकारी मानधन तसेच अतिकालिक भत्त्याच्या रकमाच्या प्रदानाच्या अनियमिततेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 278476.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 265591.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 655.00/-

***नियुक्तीचा आदेश व अतिकालिक कामाच्या तासाची नोंदवही नस्तीमध्ये आढळून न आल्याने भत्त्याची रक्कम प्रदान करण्यात आले. वाहन चालकांचा नियुक्ती आदेश व लॉग बुक नस्तीमध्ये आढळून न आल्याने तरी रकमांची प्रदान करण्यात आले. दैनिक प्रवास भत्ता सक्षम अधिकाऱ्याने प्रवास भत्ता देयक मंजूर न करताच वाहन चालकाला रु.110/- प्रदान करून रु.10 प्रतिदिवस प्रमाणे जादा रकमांचे शोधन करण्यात आले. वेतन पट नोंदवही उपलब्ध करण्यात आली नाही.***

सन 2012-13 वर्षातील चंद्रपूर महानगरपालिका येथील महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ आदेश मनपा/2012/प्र.क्र.15/का.05 , दि.13/03/2012 नुसार मनपा सार्वत्रिक निवडणूक 2012 पार पाडण्यात आली व त्याकरिता कामकाजासाठी आवश्यक कर्मचारी/अधिकारी यांची निवड केली असून त्यांच्या मानधन/अतिकालिक भत्यांची रक्कम प्रदान करण्यात आली. त्यावर अभिप्राय खालील प्रमाणे

1) प्रमाणक क्र.515 दिनांक:-01/08/2012 रक्कम:-46227

श्री. बबन बाकरवाले, कनिष्ठ लिपिक (एकूण वेतन रु.9094) व श्री. श्रीकांत पोटदुखे, कनिष्ठ लिपिक (एकूण वेतन रु.9620)



Scanned by CamScanner

यांना मनपा सार्वत्रिक निवडणूक 2012 मध्ये निवडणूक कामकाजाकरिता नियुक्त करून त्यांनी केलेल्या अतिरिक्त कामाची भरपाई म्हणून अतिकालिक भत्याची मागणी करून अनुक्रमे रु. 1387/- व 1140/- संबंधित कर्मचाऱ्याला प्रदान करण्यात आले. परंतु केल्याचे आदेश नस्ती मध्ये आढळून न आल्याने त्यांची नियुक्ती करण्यात आली अथवा नाही त्याबाबतची पडताळणी करता आली नाही. तसेच अतिकालिक कामाची नोंदवही सुद्धा उपलब्ध झाली नसल्याने अतिकालिक भत्याच्या रकमाचे उचित शोधन झाल्याचे दिसून येत नाही.

2) प्रमाणक क्र.252 दिनांक:-23/05/2012 रक्कम:-197844

प्रमाणक क्र.515 दिनांक:-01/08/2012 रक्कम:-46227

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | एकूण वेतन | अतिकालिक कामाचे एकूण तास | प्रदान केलेला अतिकालिक भत्ता |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.व्ही.व्ही.गढे | शिल्प निर्देशक | 19340 | 25 | 2302 |
| 2 | श्री.मिलिंद दुबे | स.कु. | 8730 | 120 | 4365 |
| 3 | श्री.बबन गेडाम | स.कु. | 8040 | 120 | 4020 |
| 4 | श्री.गणेश धकाते | क.लि. | 10080 | 66 | 3168 |
| 5 | श्री.लक्ष्मण आत्राम | क.लि. | 10080 | 50 | 2400 |
| 6 | श्री.शागीर.अ.सहीद | शिपाई | 7890 | 66 | 2170 |
| 7 | श्री.हेमंत पाथर्डे | शिपाई | 8890 | 66 | 2445 |
| 8 | श्री.रामदास चन्नूरवार | शिपाई | 8730 | 30 | 1091 |
| 9 | श्री.अंबादास बंकर | शिपाई | 8730 | 66 | 2401 |
| 10 | श्री.राजेंद्र कुचनवार | शिपाई | 8730 | 30 | 1091 |
| 11 | श्री.राजू बेंडले | शिपाई | 7890 | 30 | 986 |
| 12 | श्री.रमेश नागपुरे | शिपाई | 10560 | 20 | 880 |
| 13 | श्री.संतोष लांडगे | हेल्पर | 7490 | 66 | 2060 |
| 14 | श्री.विवेक निकोडे | हेप्लर | 7890 | 66 | 2170 |
| 15 | श्री.भारत हजारे | स.का. | 5740 | 46 | 1100 |
| एकूण रक्कम | | | | | 32649 |

सदरील प्रमानाकान्वे कर्मचाऱ्यांना वर्ष 2012 मधील मनपा निवडणुकीकरिता नियुक्त करण्यात आल्याचे आदेश नस्ती मध्ये आढळून आले नाही. तसेच अतिकालिक भत्याची नोंदवही उपलब्ध न करता संबंधित विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी अतिकालिक भत्याची संबंधित विभाग प्रमुखानची सही व हुद्दा नसलेले अतिकालिक तासाचे विवरण सादर करून निवडणूक अधिकारी यांनी आदेश व भत्याची नोंदवही न तपासताच उपरोक्त रकमांचे प्रदान केल्याचे दिसून आले. त्यामुळे रक्कम रु. 197844+46227=244071 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3) एकूण 39 वाहन चालकांची निवडणुकीच्या दैनदिन कामकाजाकरिता निवड करण्यात आल्याचे दिसून येते त्यापैकी श्री.प्रकाश रामटेके, वाहन चालक तहसील कार्यालय, चंद्रपूर, श्री.के.व्ही.गाडगे, वाहन चालक, उपविभागीय कार्यालय, राजुरा व आर.जि.सय्यद, वाहन चालक, गडचिरोली येथे कार्यरत असून नियुक्ती आदेश व लॉग बुक नस्ती मध्ये आढळून न



Scanned by CamScanner

आल्याने अनुक्रमे रक्कम रु. 9480/-, 9190/- व 2850/- प्रदान केल्याची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे रक्कम रु. 21520 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4) प्रमाणक क्र.150 दिनांक:-08/05/2012 रक्कम:-34405

वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास 1010/प्र.क्र.2/सेवा 5 दि. 3 मार्च 2010 नुसार 4200 ग्रेड वेतन असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा दैनिक भत्ता रु.100/- असून खालील नमूद कर्मचारी निवडणुकीच्या कामकाजकरिता दौऱ्यावर जाण्याकरिता त्यांच्या दैनिक प्रवास भत्ता सक्षम अधिकाऱ्याने प्रवास भत्ता देयक मंजूर न करताच वाहन चालकाला रु.110/- प्रदान करून रकमांचे शोधन करण्यात आले. त्यामुळे रक्कम रु. 10/- प्रति दिवस संबंधित वाहण चालकाला जादा प्रदान केल्याचे दिसून येते. तपशीलवार जादा प्रदान केलेली रक्कम खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | वाहन चालक नाव | कार्यालायचे नाव | कालावधी | प्रदान केलेला अति.भत्ता | प्रदान करावयाचा अति. भत्ता | जादा प्रदान |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बी.सी.ताकसांदे | सा.बां.उपविभाग, वरोरा | 28/03/2012 ते 17/04/2012 | 2255 | 2100 | 155 |
| 2 | वि.एस.मेमाणे | सा.बां.उपविभाग,गडचांदूर | 26/03/2012 ते 16/04/2012 | 2420 | 2200 | 240 |
| 3 | एच.एम.वर्मा | - | 27/03/2012 ते 16/04/2012 | 2310 | 2100 | 210 |
| 4 | सुधाकर सिडाम | सा.बां.उपविभाग, भद्रावती | 11/04/2012 ते 15/04/2012 | 550 | 500 | 50 |
| एकूण वसूलपात्र रक्कम | | | | | | 655 |

5) वेतन पट नोंदवही संबधित विभागाने उपलब्ध केली नसल्यामुळे प्रदान झालेल्या रकमांची सत्यता पडताळता आली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.84 दि. 06.08.2015 नुसार विभागाने सादर केलेल्या अनुपालनाचे अनुषंगाने परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DLFSPPM8501 (Ref No : 29, Hmm No : 34)

## *67 श्री.नामदेव राऊत, सहायक ग्रंथपाल यांच्या प्रवास भत्ता देयकातील अनियमिततेबाबत.*

-

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*



Scanned by CamScanner

**सहायक ग्रंथपाल यांनी दि. 28/06/2012 चे प्रवास भत्ता देयक करून चंद्रपूर येथी कार्यालयात उपस्थीत असल्याची नोंद दैनदिन हजेरी नोंदवहीमध्ये घेतल्याचे दिसून आले. सक्षम अधिकाऱ्याची मंजुरी न घेताच प्रवास भत्ता देयकाची रक्कम प्रदान झालेली आहे.**

सन 2012-2013 मधील ग्रंथालय विभागातील म. गांधी वाचनालय व हुतात्मा वाचनालयातील निर्गमित केलेला धनादेश दुरुस्ती करण्यासाठी सहायक ग्रंथालय, संचालक नागपूर येथे श्री. नामदेव राऊत, सहायक ग्रंथपाल हे स्वतः गेले असल्याचे प्रवास भत्ता देयकावरून आढळून आल्याचे दिसून येते. त्यावर खालील नियमबाह्य खर्च तसेच अनियमितता आढळून आल्याचे दिसून येत आहे.

1) सहायक ग्रंथपाल हे दिनांक 28/06/2012 ला देयकावर दर्शविल्याप्रमाणे चंद्रपूर येथून सकाळी 6=00 वाजता सहायक ग्रंथपाल, संचालक नागपूर येथे गेले असता त्याच दिवशी त्यांनी मनपा, चंद्रपूर येथील कार्यालयात उपस्थित असल्याची नोंद दैनदिन हजेरी नोंदवहीमध्ये घेतल्याचे दिसून आले. तथापि त्यांच्याकडून प्राप्त अनुपालन पत्रामध्ये कार्यालय सकाळी 8=00 वाजता सुरु होत असल्याचे दर्शविले आहे. त्यामुळे ते कुठे उपस्थित होते याचा बोध होऊ शकला नाही.

2) उपरोक्त देयकाची तपासणी केली असता सहा. ग्रंथपाल यांनी देयकावर स्वाक्षरी केल्याचे व सक्षम अधिकाऱ्याने देयक मंजूर झाल्याचे दिनांकनिहाय स्वाक्षरी व हुद्दा नमूद नसल्याचे आढळून आले व प्रवास भत्त्याची रक्कम मंजूर न होताच प्रदान झाल्याचे दिसून आले. तथापि अर्धसमास पत्राच्या अनुपालनाची साक्षांकित प्रत जोडली असून दिनांक 30/06/2015 ची स्वाक्षरी केल्याचे दिसून आले.

उपरोक्त नियमबाह्य बाबीबाबत उचित अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे व अशाप्रकारचे देयक पुन्हा सादर होण्याची शक्यता असल्यामुळे मनपा निधीची हानी न होणे तसेच नियमबाह्यबाबी बाबत मनपाचे विशेष लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.92 दि. 24.08.2015 नुसार विभागाने सादर केलेल्या अनुपालनाचे अनुषंगाने परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DLFSPPM8561 (Ref No : 31, Item No : 92)

## 68 शासकीय वास्तुंचे देखभाल दुरूस्तीवर मंजूर तरतुद खर्च न करण्याची अनियमितता

**हुतात्मा स्मारक देखभाल व दुरुस्तीवर खर्च न करण्याची अनियमितता.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : देखभाल व दुरुस्ती म.न.पा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 200000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 200000.00/-

**सन 2012-13 मध्ये लेखापरीक्षणास सादर केलेल्या अंदाजपत्रकाची पडताळणी केली असता हुतात्मा स्मारकाच्या देखभाल दुरूस्तीसाठी खर्च झाला नसल्याने दिसून आल्यामुळे अर्धसमासपत्र क्रमांक 76 दि.**



Scanned by CamScanner

**22/7/2015 नुसार अभिलेखे सादर करण्याबाबत कळविले असता सदरच्या उत्तरावरुन रू 200000 हुतात्मा स्मारकाच्या देखभाल दुरूस्तीवर तरतुद केल्याचे पण खर्च न झाल्याचे आढळून आले. यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 100 नुसार महापालिकेने अर्थसंकल्पिय अंदाजास अंतिम स्विकृती देण्याच्या तरतुदीचे पालन झाले नसल्याचे आढळून आले.**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. हु.स्मा.क्र.-1982/123 मुंबई दि.26 सप्टेंबर 1983 मध्ये घेतलेल्या शासन निर्णयानुसार स्वातंत्र चळवळीत बळी पडुन हौतात्म्य पत्करलेल्या देशभक्तांकरीता संपुर्ण महाराष्ट्रामध्ये जवळपास 105 हुतात्मा स्मारके बांधण्याचा निर्णयामुळे चंद्रपुर येथे सुध्दा हुतात्मा स्मारक बांधण्यात आले आहे. सदर हुतात्मा स्मारक महानगरपालिका चंद्रपूर च्या हददीत असल्यामुळे सदर हुतात्मा स्मारकाच्या देखभाल दुरूस्तीची जबाबदारी महानगरपालिका चंद्रपूर कडे सोपविण्यात आलेली आहे. सन 2012-13 चे लेखापरीक्षणाकरीता सादर केलेल्या मंजूर अंदाजपत्रक व जमा खर्च अहवालाची पडताळणी केली असता हुतात्मा स्मारकाच्या देखभाल दुरूस्ती साठी कोणतीही तरतुद केली नसल्याचे आढळते. मात्र सन 2012-13 मध्ये हुतात्मा स्मारक वाचनालयाकरीता रू. 12000 तरतुद करण्यात येवून रू. 14165 प्रत्यक्ष खर्च करण्यात आला आहे. मात्र अर्धसमासपत्र क्रं. 76 दि. 22/7/2015 चे उत्तरामध्ये रू. 200000 तरतुद केल्याचे नमूद आहे. परंतू खर्च मात्र निरंक आहे. सदर बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 मधील कलम 100 नुसार नियमबाहय ठरते.

हुतात्मा स्मारकाचे देखभाल व दुरूस्ती साठी अंदाजपत्राकाम मंजूर करण्यात आलेली तरतुद सन 2012-13 मध्ये खर्च झालेली नाही. यावरून महानगरपालिका फक्त निव्वळ अंदाजपत्रकीय बाब म्हणून अंदाजपत्रकात तरतुद केल्याचे आकडे नमूद करीत असेल किंवा सदर वास्तुचे रक्षण करण्याचे भान महापालिकेला नसल्यामुळे सदर खर्च झालेला नसावा. ही बाब प्रकर्षाने लेखापरीक्षणात आढळून आली. महानगरपालिका चंद्रपूर येथे सन 2012-13 मध्ये एकूण रूपये 948048176 एवढया प्रचंड रकमेच्या खर्चाचे नियोजन केल्याचे आढळते. मात्र ज्यांनी देशाला स्वातंत्र मिळण्यासाठी आपल्या प्राणाचे बलीदान दिले त्या हुतात्म्याचे स्मारकाच्या देखभाल दुरूस्तीसाठी फक्त रूपये 2 लाख तरतुद केली मात्र ती तरतुद सुध्दा संपूर्ण 2012-13 हया वित्तीय वर्षात खर्च करण्याचे नियोजन करण्याची प्रशासनाने तसदी घेतली नाही. ही बाब शासन निर्देशाची अवहेलना करणारी आहे.

सन 2012-13 मध्ये अंदाजपत्राकीय तरतुदीनुसार रू. 1559493 मनपाच्या इमारत दुरूस्ती, रू. 1857300 शहरातील रस्ता दुरूस्ती, रू. 79541 शहर सौंदर्यीकरण, स्टेडियम, शहरातील रस्ते व त्याची सुधारणा, रू. 28922669, रूपये 20759277 महानगरपालिका कार्यालय बांधकाम अशा विविध प्रकारे खर्च केल्याचे आढळते. मात्र शासनाने हस्तांतरीत केलेल्या हुतात्मा स्मारकाच्या देखभाल दुरूस्ती साठी रू. 2 लाख तुटपुंजी तरतुद करण्यात आली. हयावरून महानगरपालिका प्रशासनास शहर सौंदर्यीकरण व महानगरपालिकाची भव्य वास्तु इत्यादीबाबत मेहेरनजर तर ज्यांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाचे बलिदान दिले त्यांच्या स्मृती असलेल्या बाबीकडे उदासीनता असल्याचे दिसून आले. शासनाने देखभाल दूरूस्तीसाठी चंद्रपूर महानगरपालिका कडे हस्तांतरीत केलेल्या हुतात्मा स्मारकाचे रक्षणासाठी घेतलेल्या निर्णयामुळे शासनाचा उददेश महानगरपालिकेकडून साध्य होत नसल्याबाबत मा. सचिव. नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई व मा.जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे विशेष लक्ष वेधण्यात येते. सबब सन 2012-13 मध्ये हुतात्मा स्मारकाचे देखभाल दुरूस्तीसाठी केलेली तरतुद रू. 200000 आक्षेपीत ठेवण्यात येते.

DATBNKM6401 (Ref No : 35, Hmn No : 76

**69 वृक्ष निधीमधुन ट्रिगार्ड खरेदीमधील नियमबाहय अनियमितता.**



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
अनियमितता संख्या : 09

लेखा शीर्ष :00 वृक्ष निधी निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 864000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 864000.00/-

*उदयोग, उर्जा व कामगार विभाग शान निर्णय क्र. भांखस-1080/(2512)/उदयोग-6 दिनांक 2-1-1992 नुसार मनपाने भांडार संघटनेकडुन खरेदी न करता खाजगी पुरवठाधारकाकडुन खरेदी केली ही नियमबाहय बाब ठरते. पुरवठादारानां निविदा भरण्यासाठी कमीतकमी 3 आठवडयाचा कालावधी देण्यात आला नाही. जाहिरात राज्यस्तरीय वर्तमान पत्रात दिली नाही. मे. कत्याल इंडस्ट्री यांचे पुर्वानुभवाची तपशिलवार माहिती, विक्रीसंबंधी नोंदणी क्रमांक, आयकर विवरणपत्र, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र पॅन कार्ड सादर केले नाही. जाहिरातीचा आकार नमुद नाही. मनापाला डुप्लीकेट बिल सादर केले. पुरवठा चलान सादर केले नाही. साहित्य योग्य प्रकारे व चांगल्या स्थितीत प्राप्तीची नोंद कार्यालय प्रमुखाने स्वाक्षरीसह प्रमाणित केले नाही. ITI चे प्रमाणपत्र नाही. ट्रिगार्ड कुठे लावले याचा अहवाल सादर केला नाही. त्यामुळे सदर खरेदीवर केलेला खर्च रुपये 864000/- लेखापरीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.*

प्र.क्र. 4 दिनांक 2-11-2012 रूपये 864000 नग 1000 दर 768 बि.क्र.9 दि. 7-9-2012

महानगरपालीका चंद्रपुरचे सन 2012-13 चे लेखापरीक्षण करतांना वृक्ष निधीमधुन मनपा हद्दीतील झाडांच्या संरक्षणाकरीता with three rings of M.S. flat 18x13 mm welded to jail 1 kg. & tree m.s. Angle 18x3mm 5' long welded to jail etc. completed ट्रिगार्ड खरेदी करण्या करीता दैनिक सन्नाटा या वर्तमान पत्रात जाहिरात दिली. त्यानुसार 5 निविदा प्राप्त झाल्या. त्यातील कमीत कमी दराची निविदा कत्याल इंडस्ट्री यांची प्रती नग रूपये 788 असल्यामुळे त्यांना चंशमनपा /बांध/झोन क्र .4/348/2012 दिनांक 10-8-2012 अन्वये ट्रिगार्ड 1 महीन्यात पुरविण्याचे कार्यादेश देण्यात आले. यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. उदयोग, उर्जा व कामगार विभाग शान निर्णय क्र . भांखस-1080/(2512)/उदयोग-6 दिनांक 2-1-1992 मधील परिशिष्ट 4,5व6 अन्वये साहित्याची खरेदी कारागृह विभाग , महाराष्ट्र लघु उदयोग विकास महामंडळ यांचेकडुनच खरेदी करण्यात यावी . जर सदर विभाग वस्तुच्या पुरवठयासंबंधी असमर्थ असेल तर अशा वस्तुची खरेदी या वस्तु उत्पादित करीत असलेल्या राज्य शासनाची महामंडळे, निमशासकिय संस्था यांच्याकडुन मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेने ठरवुन दिलेल्या दराने खरेदी करावी. असे असतांना मनपाने भांडार संघटनेकडुन खरेदी न करता खाजगी पुरवठाधारकाकडुन खरेदी केली ही नियमबाहय बाब ठरते.



Scanned by CamScanner

2. वरील शासन निर्णयातील परिशिष्ट 8.3 (अ) नुसार निविदा प्रशिध्द झाल्यानंतर पुरवठादारांना निविदा भरण्यासाठी कमीतकमी 3 आठवडयाचा कालावधी देण्यात या वा. असे असतांना मनपाने दिनांक 17-7-2012 ला दैनिक सन्नाटामध्ये जाहिरात दिली व निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक 27-7-2012 असा नमुद केला. यामुळे खुल्या बाजारपेठेतील कंत्राटदारांना पुरेसा अवधी न मिळाल्यामुळे अनेक कंत्राटदार निविदा भरण्यापासुन वंचीत राहील्याचे दिसुन येते. जाहितरात व निविदा भरण्याचा कालावधी 7 दिवसाचा ठरविण्यामागील कारण नमुद केले नाही . त्यामुळे केलेली कृती नियमबाह्य ठरते.

3. 1000 ट्रिगार्ड खरेदीची किंमत 864000 असतांना सदर साहित्याची खरेदी करण्याकरीता उदयोग, उर्जा व कामगार विभाग शास न निर्णय क्र . भांखस-1093/(2635)/उदयोग-6 दिनांक 16-7-1993 व दिनांक 2.1-1992 अन्वये रूपये 50000/- किंवा त्यापेक्षा जास्त रकमेची खरेदी असेल तर महाराष्ट्र राजपत्र पुरवणी भाग 2 निविदा चौकशी प्रशिध्द करून जाहिर निविदा मागवाव्यात . तसेच परिशिष्ट 8.2 नुसार राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमानपत्रात जाहिरात देणे बंधनकारक राहील . महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2012 मधील जाहिरातीबाबत 5 लक्ष ते 50 लक्ष पर्यंत खरेदीबाबत राज्यस्तरीय दैनिकात प्रकाशित करणे आवश्यक असतांना मनपाने सदर जाहिरात स्थानिक वर्तमान पत्र दैनिक सन्नाटा यात जाहिरात दिली . त्यामुळे मर्यादित पुरवठाधारकानेच साहित्यपुरवठा करावा यासाठीच स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात दिल्याचा हेतु दिसुन येतो . यामुळे मनपाला स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही.

4. उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस-1080/(2512)/उदयोग-6 दिनांक 2-1-1992 मधील परिशिष्ट 8.5(ई) नुसार पुर्वानुभवाची तपशिलवार माहिती , विक्रीसंबंधी नोंदणी क्रमांक, निविदेच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राह धरलेले आयकर भरल्यासंबंधीचे विवरणपत्र , मध्यवर्ती भांडार खरेदीसंघटनेकडे किंवा त्या त्या विभागाकडे नोंदणी झाल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना ती सादर केली नाही . तसेच मुंबई दुकाने व संस्थाने अधिनियम 1948 चे नमुना ड नुसार संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र व आयकर विभागाचे पॅन कार्ड सादर करण्यात आला नाही . त्यामुळे शासन निर्णयानुसार दोन लि फाफा पध्दतीमध्ये तांत्रीक निविदेचा लिफापा उघडतांना वरील बाबी असल्या शिवाय पुरवठादाराचा दुसरा लिफापा उघडण्यात येवु नये असे असतांना दुसरा लिफापा उघडुन मे . कत्याल इंडस्ट्री यांना पुरवठा आदेश देण्यात आला. सदर बाब नियमबाहय आहे.

5. जाहिरात प्रशिध्दी करण्याकरीता कार्यालयाचे पत्र क्रमांक चंशमनपा/बांधकाम/1071/12 दिनांक16-7-2012 नुसार दैनिक सन्नाटा या स्थानिक वर्तमान पत्रात दिनांक 17-7-2012 ला कमीत कमी जागेत जाहिरात प्रशिध्द करावी असे नमुद केले . प्रत्यक्षात कमीत कमी किती जागा याचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे दैनिक सन्नाटा ने जास्तीत जास्त जागेत म्हणजेच 20X16 सेंमी. मध्ये जाहिरात प्रशिध्द झाली त्यामुळे जाहिरातीवर जादा खर्च झाल्याचे दिसुन येते.



Scanned by CamScanner

6. कल्याल इंडस्ट्रिजने सादर केलेल्या बिलावर बिल क्रमांक 9 नमुद असुन सदर क्रमांक छापील नसुन हातानें टाकण्यात आला . त्यामुळे सदर बि ल डुप्लीकेट असल्याचे दिसुन येते . बिलावर दुकानदारची व खरेदीदाराची स्वाक्षरी नसुन त्यावर रेव्हेन्यु स्टॅम्प टिकिट लावण्यात आले नाही . बिलावर साहित्य चांगल्या स्थितीत प्राप्त झाले असुन साठा पुस्तकात नोंद घेतल्याचे विभाग प्रमुखाने प्रमाणित केले नाही.

7. पुरवठा आदेश क्रमांक 348 दिनांक 10-8-2012 अन्वये साहित्य एक महिन्यामध्ये पुरविण्यात यावे असे असतांना पुरवठाधारकाने सदर साहित्य केव्हा पुरविले याबाबतचे पुरवठा आदेश /चलान सादर केले नाही. तसेच सक्षम अधिका -याने साहित्य विहीत मुदतीत व चांगल्या स्थितीत प्राप्त झाले याबाबत दिनांकासह स्वाक्षरी केली नाही . तसेच साहित्य नमुद स्पेशिफीकेशननुसार असल्याची औदयोगीक प्रशिक्षण संस्थेचे (ITI) प्रमाणपत्र जोडले नसल्यामुळे साहित्य योग्य प्रकारे असल्याची तपासनी लेखापरीक्षणास करता आली नाही.

8. खरेदी केलेले ट्रिगार्ड नगरसेवकांना दिल्याचे त्यांचे प्रत्रानुसार आढळुन येते परंतु 1000 ट्रिगार्ड कुठे लावण्यात आले याबाबतचा अहवाल नस्तीसोबत सादर करण्यात आला नाही . ट्रिगार्ड लावण्यापुर्वी झाडे लावणे आवश्यक असतांना झाडे खरेदीचे बिले व ती लावण्याचा मजुरीचा खर्च वृक्षनिधीतुन करण्यात आला नाही. त्यामुळे झाडे खरेदी न करता व तीचे रोपन न करता सदर ट्रिगार्ड कुठे लावण्यात आली याचा तपासनी अहवाल सादर केला नाही . त्यामुळे खरेदी केलेले ट्रिगार्डचा योग्य प्रकारे उपयोग झाला नसल्याचे नस्तीवरून दिसुन येते. त्यामुळे सदर खरेदीवर केलेला खर्च रूपये 864000/- लेखापरीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

9. वार्षिक अहवालाची तपासनी केली असता संकिर्ण फ मध्ये वृक्ष निधीची अंदाजपत्रकात तरतुद 1000000 असुन खर्च निरंक दर्शविण्यात आला. परंतु प्रत्यक्षात खर्च रूपये 864000 करण्यात आला. यावरून वार्षिक अहवाल निस्काळपणे अंदाजित केल्याचे दिसुन येते.

DATSSKM6702 (Ref No : 38. Hmm No : 107)

## 70 *अनुसुचित जाती व नवबौध्द घटकासाठी घरकुल बांधकामाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 अ.जा. व नवबौध्द घरकुल योजना निधी*

*अनियमितता कलम : 9ड*



Scanned by CamScanner

सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग शासन निर्णय क्र.बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक-2 दिनांक 9-3-2010 मधील अ.क्र.11 नुसार योजनेचे सर्वेक्षण करणे, मार्गदर्शन करने इत्यादीबाबीसाठी प्रशासकिय खर्च म्हणुन 5टक्के रक्कम घरकुल योजनेसाठी उपलब्ध होणाऱ्या निधीतुन राखुन ठेवण्यात आली नाही. योजनेवर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जादा खर्च करण्यात आला. अनेक लाभार्थ्यांच्या जुन्या घराचा फोटो काढण्यात आला नाही.

महानगर पालिका क्षेत्रात सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाव्दारे सन 2007-08 पासुन अनुसुचित जाती व नवबौध्द घटकासाठी घरकुल योजना सुरू करण्यात आली. त्या नुसार सहायक आयुक्त समाज कल्याण विभागातर्फे निवड केलेल्या लाभार्थ्यांना सन 2012-13 मध्ये योजनेचा पहिला हप्ता रूपये 1 लक्षाचे वाटप लाभार्थ्यांना करण्यात आले. त्यातील खालील लाभार्थ्यांचे अर्ज व अनियमितता आढळून आल्या.

| प्र.क्र./दिनांक | रक्कम | लाभार्थीचे नाव | अभिप्राय |
|---|---|---|---|
| 309/13-3-13 | 100000 | विलास वाकडे | 1.घर पावती झीटुजी वाकडे यांचे नावाचे असतांना त्यांचे मृतु प्रमाणपत्र नाही.<br>2.विलास वाकडे यांचे घर फोटोमध्ये स्लॅपचे असतांना त्यांना लाभ कसा? |
| 314/13-3-13 | 100000 | प्रेमीला दे. वासनिक | 1. प्रेमीला वासनीक यांचे जातीचे प्रमाणपत्र जोडले नाही<br>2. तहशिलदार यांचा उत्पन्नाचाद दाखला नाही. |
| 347/16-3-13 | 100000 | कुंदन गोडघाटे | 1. जुन्या घराचा फोटो नस्तीसोबत जोडला नाही. |
| 349/16-3-13 | 100000 | राहुल थुल | 1. जुन्या घराचा फोटो नस्तीसोबत जोडला नाही. |
| 345/28-3-13 | 100000 | घनशाम तामगाडगे | 1. जुन्या घराचा फोटो नस्तीसोबत जोडला नाही. |
| 365/30-3-13 | 100000 | नागोराव मेश्राम | 1. जुन्या घराचा फोटो नस्तीसोबत जोडला नाही. |
| 364/30-3-13 | 100000 | नत्थु कांबळे | 1. दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्र नाही. |
| 375/30-3-13 | 100000 | रमेश थुल | 1. जुन्या घराचा फोटो नस्तीसोबत जोडला नाही. |
| 380/30-3-13 | 100000 | प्रसन्नजी बोथे | 1. मागील 15 वर्षापासुन राहात असल्याचे प्रमाणपत्र नाही.<br>2. नायब तहशिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला नाही.<br>3. 7/12चा उतारा किंवा घोषीत झोपडपट्टीमध्ये समाविष्ट असुन संरक्षण पात्र आहे हा नगर अभियंता यांचे पत्र नाही. |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. वरील लाभार्थी कुंदन गोडघाटे, राहुल थुल, घनशाम तामगाडगे, नागोराव मेश्राम, रमेश थुल, यांचे जुन्या घराचा फोटो नस्तीसोबत जोडला नाही. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग शासन निर्णय



Scanned by CamScanner

क्र.बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक-2 दिनांक 9-3-2010 मधील अ.क्र.22(अ) अस्तीत्वातील घरे तोडून नविन घराचे बांधकाम करण्यापुर्वी घराची पाहणी करून कच्च्या घराचा लाभार्थीच्या कुटुंबासोवत फोटो घेण्यात यावा. सदर कार्यवाही समाज कल्याण संचालनालयातील अधिकारी ने करावी.

2. प्रेमीला वासनीक यांचे जातीचे प्रमाणपत्र जोडले नाही . जातीच्या प्रमाणपत्राशिवाय लाभार्थ्यांना नियमानुसार लाभ देता येत नाही.

3. प्रसन्नजी बोथे मागील 15 वर्षापासुन राहात असल्याचे प्रमाणपत्र नाही. नायव तहशिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला नाही . घराचा 7/12 उतारा किंवा घोषीत झोपडपट्टीमध्ये समाविष्ट असुन संरक्षण पात्र आहे असे नगर अभियंता यांचे पत्र नाही.

4. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग शासन निर्णय क्र .बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक-2 दिनांक 9-3-2010 मधील अ.क्र.11 नुसार योजनेचे सर्वेक्षण करणे , मार्गदर्शन करने इत्यादीबाबीसाठी प्रशासकिय खर्च म्हणुन 5टक्के रक्कम घरकुल योजनेसाठी उपलब्द होणा-या निधीतुन राखुन ठेवण्यात यावी. परंतु तसे केल्याचे आढळुन आले नाही.

5. वरील शासन निर्णय दिनांक 9/3/2010 मधील क्र. 24 नुसार घराचे बांधकामाचा दर्जा चांगला असल्याची तपासणी करण्यासाठी संचालक , समाज कल्याण पुणे यांनी जिल्हा निहाय पथक तयार करावे. एका जिल्हयातील पथकाकडुन दुस -या जिल्हयातील बांधकामाची पाहनी करण्यात यावी . तसेच संचालकस्तरावर काही प्रकरणी बांधकामाची तपास नी करण्यात यावी . असे असतांना नियमानुसार कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

6. सन 2012-13 मधील अंदाजपत्रक व वार्षिक अहवालाची तपासनी केली असता मध्ये केंद्र व राज्याकडुन रूपये 3,00,00,000 चे अनुदान प्राप्त झाले व वार्षिक लेख्यानुसार रूपये अंदाजपत्रात तरतुद केलेल्या रूपये 3 कोटीपेक्षा जादा रूपये 3,19,36,894 खर्च करण्यात आला. जादा खर्चास स्थायी समितीची कार्योतर मंजुरी घेण्यात आली नाही.

DATSSKM6702 (Ref No : 40, Hima No : 99)

***71 चंद्रपूर विकास योजनेच्या अधिप्रमाणित प्रती तयार करून शासनाकडे पाठविण्याकरीता अग्रीमाची रक्कम रूपये 40000/- नगररचना कार्यालय चंद्रपूर यांना प्रदानाबाबत***

0

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :नगररचना*



Scanned by CamScanner

*अनियमितता कलम : ९ड*

गुंतलेली रक्कम रु. 40000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 40000.00/-

***विकास योजनेच्या अधिप्रमाणीत प्रती नगररचना विभाग चंद्रपूर यांनी तयार केल्या त्यामुळे सदर खर्च नगररचना विभाग चंद्रपूर यांची करायचा असतांना तो नगररचना मनपा चंद्रपूर यांनी केला. याबाबत नगररचना विभाग चंद्रपूर यांना रूपये 40000 अग्रीमाचे शोधन केले परंतु अग्रीमाचे समायोजन केले नाही. अग्रीम मनपाव्यतीरीक्त अन्य कार्यालयाला देता येत नसतांना नियमबाहयरित्या अग्रीमाचे शोधन केले. अग्रीम प्राप्तीची पावती सादर केली नाही.***

प्रमाणक क्रमांक 1347 दिनांक 4.2.2013 रूपये 40000/- च्या प्रमाणकाची तपासनी केली असता नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग शाखा कार्यालय चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक जा .क्र.विकासा योजना चंद्रपूर (सुधारीत)न.रचं/184 दिनांक 17.1.2013 अन्वये शासनाने चंद्रपूर शहराची सुधारीत विकास योजना मंजूर केली असून सदर विकास योजनेच्या अधिप्रमाणीत 5प्रती व ई.पी.च्या 5 प्रती शासनाकडे मंजुरीसाठी विहीत मार्गाने सादर करणे आवश्यक आहे त्यासाठी एकुण 8 प्रती x 2 अशा 16 प्रती तयार करणे आवश्यक आहे यासाठी एकुण 40000/- ची आवश्यकता असल्याचे पत्राव्दारे कळविले. त्यानुसार वरील प्रमाणकाव्दारे दिनांक 28.1.2013 ची आर्डर शिट नुसार नगररचनाकार , मनपा चंद्रपूर यांनी मंजुरी दिल्यानुसार रूपये रूपये 40000/-चे अग्रीमाचा धनादेश क्रमांक 806316 दिनांक 4.2.2013 नगररचनाकार चंद्रपूर यांना प्रदान करण्यात आला . यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. नगररचनाकार चंद्रपूर यांना धनादेश क्र. 0806316 दिनांक 4.2.2013 नूसार नमुना नं. 22 मध्ये नगररचनाकार यांना रक्कम प्रदान केल्याचे दिसुन येते . परंतु सदर धनादेश नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग कार्यालयाला पाठविल्याचे पत्र नस्तीस नाही . तसेच नगररचना कार्यालयाला धनादेश प्राप्त झाल्याची पोच /पावती देणे आवश्यक असतांना सदर कार्यवाही केली नाही . त्यामुळे धनादेश नगररचना कार्यालयाला प्राप्त झाला असुन तो शासनशिर्षात जमा झाल्याची लेखापरीक्षणास तपासनी करता आली नाही.

2. शासनाने चंद्रपूर शहराची सुधारीत विकास योजना मंजूर केली असून सदर विकास योजनेच्या अधिप्रमाणीत 5प्रती व ई.पी.च्या 5 प्रती शासनाकडे मंजुरीसाठी विहीत मार्गाने सादर करणे आवश्यक असतांना सदर अधिप्रमाणीत प्रती नगररचना विभाग चंद्रपूर यांनी तयार केल्या त्यामुळे सदर खर्च नगररचना विभाग चंद्रपूर यांची करायचा असतांना तो नगररचना मनपा चंद्रपूर यांनी केला . सदर खर्च मनपाने करण्याबाबतचे कुठलेही आदेश नसतांना नगररचना विभाग चंद्रपूर यांना प्रदान केलेली रक्कम रूपये. 40000 लेखापरीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.



Scanned by CamScanner

3. रक्कम रूपये 40000/- अग्रीमाव्दारे नगररचना विभाग चंद्रपूर यांना प्रदान केले . मुंबई वित्तीय नियमावली 1959 चे नियम 142 नुसार अग्रीमाचे समायोजन अग्रीम दिल्याचे दिनांकापासुन 3 महिन्यात करणे आवश्यक असतांना लेखापरीक्षण कालावधीपर्यंत सदर रकमेचे समायोजन झाले नाही . तसेच मनपामधील कर्मचा-याव्यतीरीक्त अन्य दुस-यांना अग्रीम देता येत नसतांना महाराष्ट्र शासनाचे नगररचना विभागांना अग्रीम दिले हि नियमबाहय बाब आहे.

4. प्रमाणकावर लेखाशिर्ष व अंदाजपत्रकातील तरतुद नमुद नसल्यामुळे सदर खर्च कोणत्या लेखाशिर्षातुन करण्यात आला व त्याकरीता अंदाजपत्रकाती किती तरतूद होती हे तपासता न आले नसल्यामुळे याची माहीती सादर करावी.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञा पन क्रमांक 41 दिनांक 05/06/2015 ला निर्गमित केले असता त्याबाबत कोणतेही अनुपालन सादर केले नाही.

DATSSKM6702 (Ref No : 41, Hmm No : 41)

### 72 नगररचना विभागाने जाहिरातीवर केलेल्या नियमबाहय शोधनाबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : नगर रचना*

*अनियमितता कलम : 95*

गुंतलेली रक्कम रु. 16000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 16000.00/-

***वर्तमानपत्रात दिलेली जाहिरात, जाहिरातीचे बिल जोडण्यात आली नाही. सदर जाहिरातीची खर्च प्रत्यक्षात नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग शाखा कार्यालय चंद्रपूर यांनी करायचा किंवा महानगर पालिका चंद्रपूर यांनी करायचा याचे आदेश नस्तीसोबत जोडले नाही. नगर रचना कार्यालयाला धनादेश प्राप्तीची पोच पावती जोडली नाही.***

प्रमाणक क्रमांक 755 दिनांक 12.9.2012 रूपये 16000/- चे जाहिरातीच्या प्रमाणकाची तपासनी केली असता नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग शाखा कार्यालय चंद्रपूर यंचे पत्र क्रमांक जा.क्र.सुधारीत /विनिनि/नरंच/174 दिनांक 30.1.2012 नुसार जिल्हयातील अ , ब, व क वर्ग विकास नियंत्रण नियमावली सुधारीत करून संर्व मंजुर विकास योजनेसाठी लागु करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नगर अधिनियम 1966 चे कलम 37 (1)ए ए अन्वये अधिसूचना



Scanned by CamScanner

निर्गमित केलेली आहे . त्यानुसार सदर बाबीची जाहिरात दै . चंद्रपूर समाचार व दै सन्नाटा मध्ये प्रकाशित केली त्या जाहिरातीचे रूपये 55920/- देयक नगररचना कार्यालयाकडे पाठविण्यात आले . जाहिरातीचा खर्च चंद्रपूर , राजूरा, बल्लारपूर, मुल, ब्रम्हपूरी व वरोरा या न .प. नी शेयर करायचा असल्याने प्रत्येकी 8000X2=16000 रूपये नगररचनाकार कार्यालय शाखा चंद्रपूर यांच्या नावाने जमा करावी असे पत्रात नमुद केल्यानुसार मनपा चंदपूरने धनादेश क्रमांक 034574 ने रक्कम रूपये 16000/- चे प्रदान करण्यात आले. यावर खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

1. मनपा चंद्रपूरने धनादेश क्रमांक 034574 रूपये 16000/- नगररचनाकार यांना प्रदान केल्याचे नमुना नं 22 वर दिसुन येते . धनादेश प्राप्त झाल्याची स्वाक्षरी प्रमाणकावर असुन त्याखाली नगररचनाकार यांच्या नावाचा शिक्का आहे. सदर धनादेश कोणत्या दिनांकास काढण्यात आला उल्लेख नाही. सदर धनादेश मनपाने पत्राव्दारे नगररचना कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक असतांना तसेच नगररचना कार्यालयाला धनादेश प्राप्त झाल्याची पोच /पावती देणे आवश्यक असतांना सदर कार्यवाही केली नाही . त्यामुळे धनादेश नगररचना कार्यालयाला प्राप्त झाला असुन तो शासनशिर्षात जमा झाल्याची लेखापरीक्षणास खात्री पटत नाही.

2. मनपाच्या प्रमाणकाची तपासनी केली असता प्रमाणकासोबत जाहिरातीचे बिल जोडण्यात आले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात बिलाची रक्कम किती याची तपासनी करता आली नाही.

3. नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग शाखा कार्यालय चंद्रपूर यांचे पत्रानुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालय नागपूर यांनी दैनिक चंद्रपूर समाचार व दैनिक सन्नाटा या वर्तमान पत्रात दिलेली जाहिरात नस्तीस जोडण्यात आली नाही.

4. नगररचनाकार कार्यालयाचे पत्र क्रमांक 174 दिनांक 30.1.2012 मधिल संदर्भ क्र. 1 महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्र .टिपीएस-1810/612/प्र.क्र.2200/2010/नवि-13 दिनांक 30/6/2011 चे परिपत्रक जोडले नसल्यामुळे सदर जाहिरातीची खर्च प्रत्यक्षात नगररचना आणि मुल्यनिधाररण विभाग शाखा कार्यालय चंद्रपूर यांनी करायचा किंवा महानगर पालिका चंद्रपूर यांनी करायचा याची तपासनी करता आली नसल्यामुळे केलेला खर्च योग्यप्रकारे केल्याचे दिसुन येत नाही.

5. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय नागपूर यांना नगररचना कार्यालयाने पाठविलेल्या पत्राची प्रत लेखापरीक्षणास सादर केली नसल्यामुळे सदर जाहिरात वर्तमानपत्रात देतांना जाहिरातीचा आकार कॉलम सेंमी. तसेच प्रकाशित करण्याचा दिनांक इ. ची माहिती लेखापरीक्षणास तपासता आली नाही.

6. सदर जाहिरातीवरील खर्च नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग शाखा कार्यालय चंद्रपूर यांनी त्यांचे आस्थापनेवरून केला नसल्याबाबत कुठलेही अभिलेख लेखापरीक्षणास सादर केला नसल्यामुळे सदर खर्च दुबार झाला नसल्याची तपासनी करता आली नाही.

7. प्रमाणकावर लेखाशिर्ष व अंदाजपत्रकातील तरतुद नमुद नसल्यामुळे सदर खर्च कोणत्या



Scanned by CamScanner

लेखाशिर्षातुन करण्यात आला व त्याकरीता अंदाजपत्रकाती किती तरतूद होती प्रमाणकावर नमुद नसल्यामुळे प्रतयक्षात अंदाजपत्रकात व प्रत्यक्षात किती खर्च झाला याची तपासनी करता आली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 40 दिनांक 5/6/2015 ला निर्गमित केले असता त्याबाबत कोणतेही अनुपालन सादर केले नाही.

DATSSKM6702 (Ref No : 42, Hmm No : 40)

## 73 कोर्ट केसेस प्रकरणात प्रदान रकमेतील अनियमितता.

दावे व खटले

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

अनियमितता संख्या : 06

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 866457.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 678650.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 7500.00/-

***मनपाची बाजु मांडण्याकरीता मनपाने जेष्ठ वकिलाची नियुक्ती करण्यात आली परंतु सदर वकिलाची नियुक्ती करतांना त्यांचा अनुभव, सनद डिग्री, नियुक्ती ठराव व पत्र नस्तीसोबत जोडले नाही. ॲड. किलोर यांना जादा ठरावापेक्षा जादा रक्कम प्रदान केली. कोर्टात दंडाची भरलेली रक्कमेची पावती नाही. रोख पुस्तकात नोंदविलेल्या खर्चापेक्षा वार्षिक अहवालात जादा खर्च दर्शविला. सन 2004 पासुन कोर्टात 282 प्रकरणे प्रलंबीत असल्याबाबतचा खुलासा नाही. केसेस सोबत वकीलाचे बिल, रक्कम प्राप्तीची पावती जोडलेल्या नाहीत.***

महानगरपालीका चंद्रपूरचे विरोधात मा उच्च न्यायालय , सिव्हील कोर्ट, औदयोगीक न्यायालय, कामगार न्यायालय, ग्राहक मंच व इतर वरिष्ठ शासकिय न्यायालयात प्रकरण दाखल झालेली असून पालिकेची बाजू मांडण्याकरिता 10 वर्ष अनुभव असलेल्या जेष्ठ वकिलाची नियुक्ती चे पॅनल तयार करून त्यांना उच्च न्यायालयाचे बार असोसिएशनचे मंजुर दराप्रमाणे औदयोगिक कामगार न्यायालय प्रति केस रूपये 7000 व सिव्हील केस रूपये 15000 प्रमाणे वकिलांना फि अदा करण्याचा ठराव क्रमांक 73(अ) दिनांक 8/4/2008 अन्वये मंजुर करण्यात आला . यानुसार सन 2012-13 मध्ये वकिलाच्या फी वर रूपये 866457/- खर्च केला. यावर पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. सन 2012-13 मध्ये विविध केस लढण्याकरीता वकील श्री पी .एम. सातपुते, किर्ती सातपुते, अनिल प्रकाश बजाज , एम.एच.टंडन, सत्तार सेख , महेश धात्रक , एस.जी.झिंझारडे, के.डी. देशपांडे, अनिल



Scanned by CamScanner

किलोर यांना पालिकेची बाजू मांडण्याकरिता रक्कम अदा करण्यात आली . परंतु सदर वकीलाची नियुक्ती करतांना त्यांचा अनुभव व वकीलीची सनद डिग्री तसेच महानगर पालिकेच्या पॅनलवर नियुक्ती केल्याबाबतचे पत्र सादर करण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 62 दिनांक 18-7-2015 नुसार विचारना केली असता उपायुक्त यांनी पत्र क्र . 887 दिनांक 17-7-2015 नुसार सादर केलेल्या खुलासानुसार मनपाच्या वकिल पॅनल वर नियुक्ती केलेल्या वकीलाचे आदेश व ठराव सादर करण्यात येत आहे असे मोघम उत्तर दिले. परंतु वकिलाची नियुक्तीचे आदेश किंवा ठराव तसेच अभिलेखे सादर केले नाही. त्यामुळे मनपाने नियमबाहयपणे वकीलांची नियमबाहयपणे निवड करून रकमेचे प्रदान केले.

2. प्र.क्र.224 दिनाक 11-5-2012 नुसार श्री अनिल एस. किलोर यांना पि.आय.एल.नं4/2011 गोपाल अमृतकर विरूध्द मनपा या हायकोर्ट नागपूर बेंच मध्ये जनहित याचीकेकरीता मनपाची बाजु मांडण्याकरीता मुख्याधिकारी यांनी वकीलपत्र क्र. चनप/मुअ/को.वि/क्ष/2011 दिनांक 17-2-2011 अन्वये वकील पत्र दिले . वकील पत्रात ॲड किलोर यांना किती रक्कम प्रदान करायचे याबाबत उल्लेख नसल्यामुळे ॲड किलोर यांनी सादर केलेल्या बिलानुसार त्यांना रूपये 22500/- प्रदान केले. मनपा ठराव क्रमांक 73(अ) दिनांक 8/4/2008 व दि बाम्बे कोर्ट फिस ॲक्ट 1959 नुसार तसेच सन 2007 चे बार असोशियन यांनी ठरवून दिलेल्या दरानुसार अन्वये सिव्हील केस करीता जास्तीत जास्त 15000/- प्रदान करणे आवश्यक होते . परंतु ॲड किलोर यांना रूपये 22500/- प्रदान केले. जादा प्रदानाची रक्कम रूपये 7500/- लेखापरीक्षणास अमान्य करण्यात येत आहे. ॲड किलार हे मनपाच्या नियुक्त पॅनलवर नसतांना त्यांना प्रदान केलेले रक्कम रूपये 22500 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3. प्र.क्र. 643 नुसार ॲड प्रकाश बजाज यांनी दिनांक 29-8-2012 ला लेटरपॅडवर लिहुन दिले कि किरकोळ दिवानी अपील क्र .122/06 नुसार चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशन दुर्गापुर येथिल जकातीचे वादाबाबतचे सुन दिवानी दावा क्र.58/95 मध्ये झालेल्या आदेशावर वरीष्ठ न्यायालयात अपील दाखल करण्यास अर्ज दाखल केलेला होता . तो न्यायालयानी मान्य केला परंतु झालेला उशिर माफ करण्याकरीता विरूध्द पार्टीला नुकसान भरपाई म्हणुन रूपये 3000 एक महिण्याचे आत भरणा करावी असे आदेश पारील केले सदर रक्कम न्यायालयात न भरल्यास अपिल दाखल करून घेतली जाणार नाही असे ॲड बजाज यांनी कळविल्यानुसार त्यांना रूपये 3500 प्रदान करण्या त आले . परंतु न्यायालयाचे कोणतेही पत्र नस्तीस उपलब्द नाही . कोर्टात अपील अर्ज उशिर कशामुळे व कुणामुळे झाला? त्यानुसार कोणती कार्यवाही केली खुलासा केला नाही. कोर्टात दंडाची रक्कम रूपये 3500 जमा केल्याची पावती जोडली नाही . त्यामुळे झालेला खर्च रूपये 3500/- लेखापरीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येतो

4. सन 2012-13 मध्ये दावे व खटले मध्ये अंदाजपत्रकात तरतुद रूपये 10,00,000/- तरतुद असुन वार्षिक लेख्यानुसार वर्षात रूपये 8,66,457/- खर्च दर्शविण्यात आला . परंतु रोख पुस्तकामध्ये



Scanned by CamScanner

नोंदविलेल्या खर्चाचे प्रमाणकाची तपासनी केली असता प्रत्यक्षात रूपये 6,78,650/- खर्च नोंदविण्यात आला. यावरून वार्षिक अहवालात मोघम स्वरूपात खर्च नोंदविल्याचे दिसुन येते. ही नियमबाहय गंभीर बाब आहे.

5. सुट रजिष्टरची तपासनी केली असता तसेच कोर्ट विभागाने सादर केलेली प्रलंबीत प्रकरणाची यादी नुसार सन 2004 पासुन उच्च न्यायालय नागपूर येथिल एकुण 55 प्रकरणे, जिल्हा न्यायालय चंद्रपूर येथिल 210, औदयोगीक न्यायालय चंद्रपूर येथिल 15, कामगार न्यायालय चंद्रपूर 1 व जिल्हा ग्राहकमंच चंद्रपूर 1 असे एकुण 282 प्रकरणे प्रलंबित आहेत . अनेक वर्षापासुन मोठयाप्रमाणात न्यायालयीन प्रकरणे प्रलंबीत राहण्यामागील कारणे नमुद केली नाही.

6. मनपाने सन 2012-13 मध्ये वार्षिक लेख्यात रूपये 866457 खर्च दर्शविग्यात आला . परंतु प्रत्यक्षात बिलाची तपासनी केली असता खालील प्रमाणे रूपये 678650/-चा खर्च दर्शविण्यात आला शिल्लक खर्चाची सत्यता पडताळणी करता आली नाही . किंवा त्याबाबतचे खुलासा सादर केला नाही . सदर खर्चाच्या बिलाची तपासनी केली केली असता खालील अनियमितता आढळुन आल्या.

0. प्रमाणकावर लेखाशिर्ष व अंदाजपत्रकातील तरतुद नमुद नाही.
1. वकीलाने बिल सादर केले नाही.
2. वकील पत्र नस्तीमध्ये उपलब्द नाही.
3. कोर्टाचे writ petition order दाव्याची प्रत हमदस्त किंवा अंतिम निर्णयाची प्रत नाही.
4. वकीलाचे बिल फि मागणी पत्र.
5. रक्कम प्राप्तीबाबतची वकीलाची पावती/स्वाक्षरी नाही
6. धनादेशाव्दारे रक्कम प्रदान केला असल्यास धनादेश क्रमांक उल्लेख नाही.

| प्र.क्र./दिनांक | रक्कम | वकीलाचे नाव | प्रतिवादीचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|
| 202/11-5-2012 | 6900 | पी.एम.सातपुते | एन.जी.भावना | वरील 0,1,2 |
| 203/--"-- | 20000 | --"-- | गणपत बांते व इतर 3 | 0,1,2,3,4,5,6 |
| 204/--"-- | 15000 | --"-- | भारत राजा व इतर2 | --"-- |
| 205/--"-- | 7000 | --"-- | पारसनाथसिंह व जोती पारख | 0,5,6 |
| 206/--"-- | 21000 | --"-- | भावना व इतर 2 | 0,1,2,3,4,5,6 |
| 207/--"-- | 11500 | किर्ती सातपुते | परमानंद पोटदुखे | 4 |
| 208/--"-- | 12500 | प्रकाश बजाज | इकबालसिंग सोनी व महाजन | 0,1,2,3,4 |
| 209/--"-- | 2500 | --"-- | जयंत आयतवार | 0,1 |
| 210/--"-- | 7600 | --"-- | भामचंद अडवानी | 4,5 |
| 211/--"-- | 21950 | --"-- | किशोर रोकडे व इतर 4 | 0,1,2,3,4,5,6 |
| 212/--"-- | 7500 | --"-- | भरत खोडे | 0,4,5 |
| 213/--"-- | 8500 | --"-- | अरूण बोरकर व प्रविण कांकरीया | 0,5 |
| 214/--"-- | 15500 | --"-- | अनिल वडधरे व संजय चौधरी | 0,1,2,3,4,5,6 |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 215/--"-- | 13000 | एम.एच.टंडन | रंजना कोत्रीवार व इतर1 | 0,1 |
| 216/--"-- | 2500 | --"-- | गजानन लेडांगे | 0,1 |
| 217/--"-- | 4000 | --"-- | मुस्लीम कब्रस्थान | 0,1, |
| 218/--"-- | 3500 | सत्तार शेख | बाजीराव खोकले | 0,1, |
| 219/--"-- | 4000 | --"-- | किशोर खेटा | 0,1,2,5 |
| 220/--"-- | 11000 | --"-- | विरेंद्र वैदय व इतर 1 | 0,1,2,3,4,5,6 |
| 221/--"-- | 80000 | महेश धात्रक | रामदेवबाबा चॅरीटेबल व इतर 8 | 0,1,2,3,4,5,6 |
| 222/--"-- | 15000 | एस.जी.झिंझाडे | निशीकांत चंदेकर | 0,1,3 |
| 223/--"-- | 7500 | के.डी.देशपांडे | जिल्हाधिकारी चंद्रपुर | 0,1,3 |
| 224/--"-- | 22500 | अनिल किलोर | गोपाल अमृतकर | 0,2,3,4,5,6 |
| 527/6-8-2012 | 1000 | प्रकाश बजाज | दिपक जैस्वाल | 0,1, |
| 643/22-8-2012 | 3500 | --"-- | म.रा.वि.मंडळ | 0,1, |
| 1035/22-11-12 | 3000 | के.डी.देशपांडे | शैयद हाजी | 0,1,3,4 |
| 1036/--"-- | 3000 | --"-- | --"-- | 0,1, |
| 1041/--"-- | 10000 | महेश धात्रक | संध्या कुळकणीर् | 0,1, |
| 1047/16-11-12 | 22000 | --"-- | 0 | 0,1, |
| 1048/26-11-12 | 22000 | --"-- | गुरूकृपा असो व इतर | 0,1, |
| 1636/22-3-12 | 5000 | पी.एम.सातपुते | शामलाल अग्रवाल | 0,1, |
| 1637/--"-- | 27500 | --"-- | किशोर पिंपळकर व इतर 5 | 0,1,2,3,4,5,6 |
| 1638/--"-- | 15000 | --"-- | विठ्ठल दुरकर व इतर 2 | 0,1,2,3,4,5,6 |
| 1639/--"-- | 20000 | --"-- | नारायन उमाटे व इतर 1 | 0,1,2,3,4,5,6 |
| 1640/--"-- | 15000 | --"-- | विठ्ठल नियलकर इतर 2 | 0,1,2,3,4,5,6 |
| 1641/--"-- | 10700 | --"-- | आनंदरारव चट्टे व इतर 1 | 0,1,2,3,4,5,6 |
| 1642/--"-- | 5000 | --"-- | अंजनाबाई बनकर | 0,1,2,3,4,5,6 |
| 1643/--"-- | 7500 | --"-- | विजय मोगरे | 0,1,2,3,4,5,6 |
| 1644/--"-- | 1000 | --"-- | बादल हजारे | 0,1,2,3,4,5,6 |
| 1645/--"-- | 27000 | धात्रक महेश | दिपक जैस्वाल प्रविण कांकरीया | 0,1,2,3,4,5,6 |
| 1646/--"-- | 15000 | --"-- | भावना एनर्जी व चंद्रकांत दुरनकर | 0,1,2,3,4 |
| 1647/--"-- | 24000 | --"-- | फुलचंद हळदे व सैयद जूनदे | 0,1,2,3,4,5,6 |
| 1648/--"-- | 10500 | बजाज प्रकाश | क्राईष्ट हॉस्पीटल व इतर 2 | 0,2,3,4,5,6 |
| 1649/--"-- | 5000 | --"-- | नोटीस बाबत फी | 0,3 |
| 1650/--"-- | 2000 | --"-- | सुनिता बोढीया | 0,1,2,3,4,5,6 |
| 1651/--"-- | 9000 | --"-- | बाबुराव बागडे मोहम्मद सलील | 0,2,3,4,5,6 |
| 1652/--"-- | 60000 | --"-- | धर्मशिल काटकर व इतर 8 | 0,3,4,5,6 |
| 1653/--"-- | 2000 | --"-- | मध्यवर्तीत वन राजीक विदयालय | 0,1,2,3,4,5,6 |
| 1654/--"-- | 6500 | एम.एच.टंडन | चंद्रकांत इटनकर | 0,1, |
| | | | | 0,2,3,4,5,6 |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1655/--"-- | 13000 | --"-- | नामदेव भगत व बाबुराव गोवर्धन बैजु | 0,1,2,3,4,5,6 |
| 1656/--"-- | 13000 | --"-- | | 0,1,2,3,4,5,6 |
| एकुण- | 678650 | | | |

DATSSKM6792 (Ref No : 44, Hunn No : 62)

## 74 चंद्रपूर शहर महानगरपालिका येथे विविध विभागात नोंदवह्या न ठेवणेबाबतची अनियमितता.

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख् या : 1**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***म.न.पा.तील जंगम तसेच स्थावर मालमत्तेच्या (इमारती व मोकळ्या जमिनी ई.) नोंदी विहित नमुन्यातील नोंदवहीत न घेतल्यामुळे जंगम मालमत्तेबाबतची अद्यावत माहिती लेखापरीक्षणास पडताळता आली नाही.***

1) <u>जंगम मालमत्ता नोंदवही</u>

महानगरपालिका चंद्रपूर येथील सन 2012-13 चे लेखापरीक्षणात भांडार विभागाने फर्निचर, जोडण्या, रुग्णवाहिका, बस, फ्याक्स मशीन, संगणकीय सामुग्री, इत्यादी जंगम मालमत्ता खरेदीबाबत नोंदी घेतलेल्या नोंदवह्या लेखापरीक्षणास सादर करण्याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 83 दिनांक 5-8-2015 चे अनुषंगाने कळविण्यात आले असता संबंधित विभागाने पत्र क्र. चंशमनपा/स्टोअर/1179/2015 दि. 26-8-2015 नुसार म.न.पा.ने खरेदी केलेली चल साधनसामुग्रीची नोंद मालपुस्तक नमुना क्र. 116 मध्ये घेतलेली असून महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 114 (1) नुसार नमुना क्र. 114 साहित्याच्या नोंदी घेऊन नोंदवही अद्यावत करण्यात येत असल्याबाबत अनुपालन सादर करण्यात आले. लेखासंहिता नियम 156 नुसार खरेदी केलेले साहित्य संग्रहपुस्तकात नोंदविलेली सर्व जंगम मालमत्तेची वार्षिक पडताळणी करून पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्याने आद्याक्षरी व तसे प्रमाणपत्र नोंदवहीत नोंदविणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नोंदवहीतील नोंदी व प्रत्यक्षातील साहित्य यात विसंगती आढळल्यास तसा अहवाल अध्यक्षांना दिला पाहिजे. जंगम मालमत्तेची विहित नमुन्यातील नोंदवही सादर करण्यात न आल्यामुळे म.न.पा. कडील सदर साहित्याबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

तरी भांडार विभागाने विहित नमुना 144 मध्ये जंगम मालमत्तेच्या सर्व नोंदी घेऊन व त्या रीतसर सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करून आवश्यक पूर्तता केल्याबाबत अभिलेखासह पुढील लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

2) <u>स्थावर मालमत्ता (इमारती)</u>



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

म.न.पा. चंद्रपूर येथील स्थावर विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेल्या स्वमालकीच्या व संपादित केलेल्या जागेवर बांधकाम केलेल्या इमारतींची महाराष्ट्र लेखासंहिता नियम 155 नुसार नमुना 128 मधील नोंदवही तसेच मालमत्तेचे विवरण इत्यादींची पडताळणी केली असता म.न.पा.च्या एकूण 175 इमारती असून विहित नमुन्यातील नोंदवहीत स्तंभ 11 ते 17 पर्यंतच्या नोंदी अद्यावत नसल्याचे निदर्शनास आले. नोंदवहीत सन 1950 पासूनच्या मूळ नोंदी घेतलेल्या असून सदर मालमत्ता नष्ट करून त्यावर नविन बांधकाम केलेल्या इमारतींचे वर्णन,जागेची आजची किंमत इत्यादी अद्यावत नोंदी आढळल्या नाहीत त्यामुळे विवरणपत्रात दर्शविलेले इमारतींचे आजचे मुल्यांकनाबाबत नोंदवहीवरून पडताळणी करता आली नाही. त्याचप्रमाणे लेखासंहिता नियम 156 नुसार स्थावर मालमत्तेचे पुस्तकात नोंदविलेली सर्व मालमत्तेची वार्षिक पडताळणी सक्षम प्राधिकाऱ्याने करून तसे प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे व पडताळणीदरम्यान कोणत्याही प्रकारची गंभीर विसंगती आढळल्यास त्याबाबतचा अहवाल अध्यक्षांना देणे क्रमप्राप्त आहे.

तरी स्थावर विभागाने मालमत्तेच्या ( इमारती) नोंदवहीत आवश्यक व नविन बांधकामामुळे भर पडलेल्या मालमत्तेच्या व इतर नोंदी घेऊन व सक्षम प्रधिकाऱ्याच्या प्रमाणपत्रासह पूर्तता केल्याबाबतचे पुढील लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

3) <u>स्थावर मालमत्ता (मोकळ्या जमिनी)</u>

म.न.पा. चंद्रपूर यांच्या स्वमालकीच्या तसेच शासनाने हस्तांतरित करून संपादित केलेल्या जमिनीची नोंदवही तसेच अनुषंगिक अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करण्याबाबत स्थावर विभागाला अर्धसमासपत्र क्रमांक 83 दिनांक 5-8-2015 चे अनुषंगाने मागणी केली असता विभागाने विवरणपत्रात नमुदनुसार म.न.पा.चे कार्यक्षेत्रात एकूण 888515.86 वर्ग मीटर जमिनी असल्याचे निदर्शनास आले. तथापि विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 155 नुसार नमुना 129 मध्ये जमिनीच्या नोंदी असलेली नोंदवही (Register Register Of LandLand) ठेवलेली नसल्याचे आढळून आले. तसेच लेखासंहिता नियम 156 मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे पुस्तक यात नोंदविलेली सर्व स्थावर मालमत्ता याची वार्षिक पडताळणी करून पडताळणी अधिकाऱ्याने पुस्तकातील अद्यावत नोंदिंसमोर आद्याक्षरी करून तसे पडताळणीबाबतचे प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे व सदर मालमत्तेच्या नोंदींमध्ये कोणतीही गंभीर विसंगती आढळल्यास त्यासंबंधी त्वरित अध्यक्षांना प्रतिवेदन/अहवाल दिला पाहिजे. नियमातील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेची (जमिनी) आवश्यक नोंदवही न ठेवल्यामुळे वरील बाबी तसेच म.न.पा.कडे क्षेत्रनिहाय असलेल्या जमिनीच्या अद्यावत नोंदीची लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

तरी स्थावर विभागाने आवश्यक नोंदवही तयार करून व सर्व मालमत्तेची ( जमिनी) अद्यावत नोंदी व सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र नोंदवून पूर्तता केल्याबाबत पुढील लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

सदर आक्षेप अर्ध समास पत्र क्र. 83 दि. 5-8-2015 नुसार स्थावर विभागाने सादर केलेल्या माहितीचे अनुषंगाने घेण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 0 |
| गुंतलेली रक्कम | 0 |

DATPVKM6101 (Ref No : 59, Hmn No : 83)



Scanned by CamScanner

## 75 एम.एच 34-9889 (स्टाफ कार) मधील इंधन वापराबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
अनियमितता संख्या : 1

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

**मनपातील पदाधिकारी/अधिकारी यांचे स्टाफ कारवर शासनाने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जादा इंधन खर्च होत आहे.**

चंद्रपूर शहर महानगरपालिका येथील स्टाफ कार क्र. एम.एच 34-9889 चे लॉग बुकमधील सन 2012-2013 मध्ये इंधन वापराबाबत (पेट्रोल) नोंदीची लेखापरीक्षणाअंती खालील नामुद्प्रमाणे वापर झाल्याचे निदर्शनास आले.

| अ.क्र. | महिना | महिना अखेरचे M.K वाचन | सुरुवातीचे .M.K वाचन | वाहनाची एकूण धावसंख्या | पेट्रोल वापर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सप्टें. 2012 | 1581 | 0 | 1581 | 214 |
| 2 | ऑक्टो.2012 | 3708 | 1581 | 2127 | 249 |
| 3 | नोव्हें. 2012 | 6357 | 3708 | 2649 | 326 |
| 4 | डिसें. 2012 | 8087 | 6357 | 1730 | 263 |
| 5 | जाने. 2013 | 10282 | 8087 | 2195 | 281 |
| 6 | फेब्रु. 2013 | 12715 | 10282 | 2433 | 289 |
| 7 | मार्च 2013 | 14692 | 12715 | 1977 | 277 |
| एकूण | | | | 14692 | 1899 |

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

विभागातील स्टाफ कार करिता इंधन वापरास म.शा. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विअप्र 10-08/ प्र.क्र. 70/2008 विनिमय दिनांक 15 मे 2009 नुसार निर्गमित वित्तीय अधिकार नियमपुस्तिका 1978, भाग पहिला, उपविभाग दोनमधील अनु क्रमांक 19-अ, नियम 69 अन्वये 300 लिटर पेट्रोल प्रतिवर्ष म्हणजे महिन्याला सरासरी 250 लिटर अशी मर्यादा विहित केलेली आहे. त्या अनुषंगाने म.न.पा. ने स्टाफ कारमध्ये इंधन वापराकरिता विशेष अशी मर्यादा ठरवून दिलेली आहे काय? नसल्यास पदाधिकारी/अधिकारी यांना कोणता ठराव अथवा नियमाच्या आधारे इंधनखर्च मंजूर करण्यात येतो उपरोक्तनुसार वाहन क्रमांक MH 34-9889 वर सन 2012-2013 मध्ये शासन निर्देशानुसार विहित मर्यादेपेक्षा जादा पेट्रोलचा वापर झालेला आहे.

तरी म.न.पा. ने स्टाफ कारकरिता इंधन वापरावर काही निकष ठरवून तसे दिशानिर्देश दिले असल्यास त्याप्रमाणे लेखापरीक्षणास सप्रमाण सादर करावे अथवा शासन नियमापेक्षा अतिरिक्त इंधन (पेट्रोल) वापराबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे क्षमापन प्राप्त करून तसे लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

सदर आक्षेप अर्ध समाज पत्र क्र. 95 दि. 25/8/2015 नुसार कार्यशाळा विभागास खुलासा सादर करण्याबाबत लेखी कळविण्यात आले असता लेखापरीक्षण पथकाने मागितलेली माहितीचे अनुषंगाने संबंधित मुद्द्यांबाबत सदर विभागाने



Scanned by CamScanner

समर्पक व परिपूर्ण अनुपालन सादर केले नसल्याने सदर आक्षेप घेण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 0 |
| गुंतलेली रक्कम | 0 |

DATPVKM6101 (Ref No : 66, Hinar No : 95)

## 76 म.न.पा.तील कार्यरत वाहनांचे इतिहासपत्रकाबाबत (HISTORY SHEET).

-

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 2**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

गुंतलेली रक्कम रु. 2018561.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2018561.00/-

***मनपातील कार्यरत वाहनांच्या दुरुस्तीच्या नोंदी इतिहासपत्रकात (HISTORY SHEET) न घेतल्यामुळे वाहनावरील दुरुस्तीचा एकूण खर्च व वाहनाचा इतिहासाची माहिती उपलब्ध झाली नाही. मनपातील आयुष्यमान संपलेली/बंद अवस्थेतील वाहने निर्लेखित न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

चंद्रपूर शहर महानगरपालिका येथील यांत्रिक विभागाने अर्धसमासपत्र क्रमांक 70 दिनांक 15-07-2015 चे अनुषंगाने दिनांक 20-7-2015 ला लेखापरीक्षणास सादर केलेल्या माहितीनुसार म.न.पा. कडे एकूण 22 वाहने चालू तसेच 19 वाहने बंद अवस्थेत असल्याबाबतची माहिती सादर केली असून सन 2012-2013 मध्ये वाहन दुरुस्तीवर एकूण रु. 20,18,561/- इतका म.न.पा. निधी खर्च झालेला असल्याचे निदर्शनास आले. वाहने दुरुस्तीकरिता झालेल्या खर्चाच्या नोंदी तपासणीकरिता संबंधित वाहनाचे इतिहास पत्रकाची ( History Sheet) मागणी केली असता वाहन दुरुस्ती खर्चाच्या नोंदी प्राप्त देयाकानुसार साठा पुस्तकात घेण्यात येत असल्याचे विभागाचे प्राप्त उत्तरात नमूद केले असून आवश्यक दुरुस्तीच्या नोंदी साठापुस्तकात घेतल्याचे तपासणीत आढळून आले.

1. वाहन दुरुस्तीच्या तपशीलवार नोंदी वाहन खरेदी केल्यापासून महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 मधील नियम 69 (चार) मध्ये नमुद्नुसार शासन नमुना 12 मध्ये मोटर वाहनाचा इतिहासासह नियमितपणे ठेवण्याबाबत तरतूद आहे. यासंबंधात न.प. लेखासंहिता 1971 मध्ये नमुना विहित केलेला नसला तरी महा. शासनाने विहित केलेल्या नमुना 12 मध्ये प्रत्येक वाहनाचे इतिहासपत्रक ठेवणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रत्येक वाहनावरील खरेदी केल्यापासूनचे वार्षिक तसेच लेखापरीक्षनापर्यंत झालेल्या एकूण दुरुस्तीखर्चाची माहिती एका दृष्टीक्षेपात प्राप्त करणे सोईचे होते. त्याचप्रमाणे एखाद्या वाहनावरील खरेदीमूल्यापेक्षा जादा खर्च झाल्यास त्या वाहनाचे निर्लेखन करण्याची प्रक्रियेबाबत निर्णय घेता येणे शक्य होते.



Scanned by CamScanner

2. म.न.पा. कडे एकूण 41 वाहने असून त्यापैकी 10 वर्षावरील व सन 1974 पासून सेवेत असलेली एकूण 17 वाहने आहेत व ती सन 2013/2014 पासून बंद करण्यात आली.म.न.पा. ने सदर प्रत्येक वाहनांचे इतिहासपत्रक ठेवलेले नसल्यामुळे बंद वाहनांवर एकूण किती खर्च झाला याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध होऊ शकली नाही. त्याचप्रमाणे विभागाने वाहनांची घसारा नोंदवही न ठेवल्यामुळे वाहनाचे आजचे मूल्य लेखापरीक्षणास तपासता आले नाही. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2007/वाहन खरेदी/प्र.क्र.27/2008/नवि -26 दि. 18 फेब्रु. 2008 नुसार महानगरपालिकांमधील वाहन निरुपयोगी ठरविणेकरिता अवजड वाहनांसाठी 10 वर्षाचे आयुष्य किंवा 2,00,000 कि.मी. धावसंख्या तसेच हलके वाहन 10 वर्ष आयुष्य किंवा 2,40,000 कि.मी. धावसंख्या यापैकी जे अंतर पूर्ण होईल त्याअनुषंगाने वाहने निर्लेखनाबाबतची कार्यवाही करणेस निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदर वाहने सक्षम प्राधिकाऱ्याकडून तपासणी करून व Offset Price ( हातची किंमत) निश्चित करून वाहने निर्लेखित करण्याची कार्यवाही त्वरित करणे आवश्यक आहे, जेणेकरून निरुपयोगी व बंद अवस्थेत असलेल्या वाहनांच्या प्राप्त महसुलामधून आवश्यकतेनुसार नवीन वाहने खरेदी करण्यास मनपाला नियोजन करता येईल

तरी वाहन दुरुस्तीच्या नोंदिकरिता प्रत्येक वाहनाकरीता शासन नियमात नमुदनुसार नमुना 12 अद्ययावत करून वाहनाचा इतिहास व दुरुस्तीच्या नोंदी नियमित घेतल्याचे व नादुरुस्त व बंद असलेल्या वाहनांबाबत निर्लेखनाची कार्यवाही करून तसे लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे

सदर आक्षेप अर्धसमास पत्र क्र. 70 दि. 15-7-2015 नुसार कार्यशाळा विभागाने सादर केलेल्या माहितीचे अनुषंगाने घेण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 2018561 |
| गुंतलेली रक्कम | 2018561 |

DATPVKM6101 (Ref No : 67, Hmm No : 70)

## 77 म.न.पा.तील वाहनाकरीता इंधन खरेदी देयके व इंधन वापराबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**अनियमितता संख्या : 1**

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 419973.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 419973.00/-

**मनपातील इंधन पुरवठा देयके प्रमाणित केलेली नसून वाहनाचे लॉग बुकमध्ये वाहनाची दररोजची धावसंख्या व मासिक गोषवारे नमूद केलेले नाही.**

प्रमाणक क्रमांक दिनांक रक्कम



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

1525 4-3-2013 152386

1566 13-3-2013 126646

1751 30-3-2013 140941

चंद्रपूर शहर महानगरपालिका येथील म.न.पा. चे मालकीची कार्यरत असलेल्या वाहनांकरिता दैनंदिन वापरास मे. आदर्श सर्विस स्टेशन, चंद्रपूर यांचेकडून कंपनी दराने खरेदी केलेल्या इंधन पुरवठा देयकांची विभागाने वाहनांना आवश्यक इंधन पुरविण्यास निर्गमित केलेली मागणीपत्रे तसेच संबंधित वाहनांच्या लॉग बुकमधील इंधनांच्या नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1) इंधन पुरवठादाराने प्रदानार्थ सादर केलेल्या उपप्रमानकांची तपासणी करून उपप्रमानकात तसेच वाहनाचे लॉगबुकमध्ये दर्शविलेले इंधनाचे परिणाम योग्य असून त्याची नोंद पेट्रोल लेखा नमुना क्र. 126 मध्ये पृष्ठ क्रमांक वर घेण्यात आली आहे असे प्रमाणपत्र महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 मधील नियम क्र. 44 नुसार विभागप्रमुखाने उपप्रमानकामागे नोंदवून इंधनाचे प्रदान करणे आवश्यक असता विभागप्रमुखाने तसे प्रमाणित केलेले नसल्यामुळे पुरवठा केलेले इंधन उपप्रमानकात नमुदनुसार असल्याचे लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही. त्यामुळे त्याअनुषंगाने इंधन पुरवठाधारकाला केलेले प्रदान नियमबाह्य ठरते.

2) मागणीपत्रकानुसार वाहनाला इंधनाचा पुरवठा प्राप्त झाल्याबाबत संबंधित वाहनाचे लॉगबुकमध्ये नोंद घेतलेली असल्याचे दिसून आले. तथापि वाहनाचे लॉगबुकमध्ये दररोजची सुरवातीची धावसंख्या वाचन तसेच वाहन ग्यारेजमध्ये परत आल्यानंतरचे किलोमीटर धावसंख्या वाचन नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे दिवसभरात वाहन किती किलोमीटर चालविले गेले व त्याअनुषंगाने वाहनात भरण्यात आलेले इंधन याचा लेखापरीक्षणास मेळ घेता आला नाही. तसेच सदरबाबत वाहनाचे लॉगबुकात मासिक गोषवारासुद्धा काढण्यात आलेला नाही.

तरी वरील अनियमिततेबाबत आवश्यक ती पूर्तता करून तसे लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

सदर आक्षेप अर्धसमास पत्र क्र. 96 दि. 25/8/2015 नुसार कार्यशाळा विभागानस खुलासा सादर करणेबाबत लेखी कळविण्यात आले असता लेखापरीक्षण पथकाने मागितलेली माहितीचे अनुषंगाने संबंधित मुद्द्यांबाबत सदर विभागाने समर्पक व परिपूर्ण अनुपालन सादर केले नसल्याने सदर आक्षेप घेण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 419973 |
| गुंतलेली रक्कम | 419973 |

DATPVKM6101 (Ref No : 69, Hmn No: 96)

**78 म.न.पा. तील कार्यरत वाहने दुरुस्तीमधील अनियमितता.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ड*



Scanned by CamScanner

गुंतलेली रक्कम रु. 440499.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 440499.00/-

**मनपाने कार्यरत वाहने दुरुस्तीकरिता शासन निर्देशाप्रमाणे विहित कार्यपद्धती अवलंबिली नाही. तसेच दुरुस्ती खर्चाचे प्रदान करण्यापूर्वी उपप्रमाणक प्रमाणित केले नाही.**

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | फर्मचे नांव |
|---|---|---|---|
| 1756 | 30-3-2013 | 13423 | मे. सागर डिझेल्स, चंद्रपूर |
| 1757 | 30-3-2013 | 42818 | मे. सुभाष ऑटो इलेक्ट्रिकल्स,चंद्रपूर |
| 1758 | 30-3-2013 | 47759 | मे. सुभाष ऑटो इलेक्ट्रिकल्स,चंद्रपूर |
| 1759 | 30-3-2013 | 33725 | मे. सुभाष ऑटो इलेक्ट्रिकल्स,चंद्रपूर |
| 1760 | 30-3-2013 | 42174 | मे. सुभाष ऑटो इलेक्ट्रिकल्स,चंद्रपूर |
| 1761 | 30-3-2013 | 26850 | मे. सुभाष ऑटो इलेक्ट्रिकल्स,चंद्रपूर |
| 1762 | 30-3-2013 | 24800 | मे. हासन गैस वेल्डिंग,चंद्रपूर |
| 1763 | 30-3-2013 | 33200 | मे. हासन गैस वेल्डिंग,चंद्रपूर |
| 1764 | 30-3-2013 | 44950 | मे. साई ऑटो, इंजिनीअरिंग,चंद्रपूर |
| 1765 | 30-3-2013 | 35240 | मे. साई ऑटो, इंजिनीअरिंग,चंद्रपूर |
| 1766 | 30-3-2013 | 42000 | मे. साई ऑटो, इंजिनीअरिंग,चंद्रपूर |
| 1767 | 30-3-2013 | 22150 | मे. मोईम गॅरेज वर्क्स,चंद्रपूर |
| 1768 | 30-3-2013 | 31410 | मे. मोईम गॅरेज वर्क्स,चंद्रपूर |

चंद्रपूर शहर महानगरपालिका येथील कार्यरत असलेली वाहने आवश्यकतेनुसार वेगवेगळ्या ग्यारेजमधून किरकोळ बिघाड झाले असता स्थानिकरित्या दुरुस्ती करण्यास वरनमूद प्रमाणकान्वये खर्च करण्यात आला. सदर वाहने दुरुस्तीखर्चाच्या नस्त्यांचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1) वाहनामध्ये बिघाड असून त्याची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याबाबत वाहनचालकाची तक्रार व वाहन निरीक्षकाचा



Scanned by CamScanner

अहवाल संबंधित दुरुस्ती खर्चाचे नस्तीत आढळून आला नाही.त्यामुळे वाहनामध्ये बिघाड झाल्याबाबत लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही.

2) वाहने दुरुस्ती झालेल्या बऱ्याच नस्त्यांमध्ये स्थानिकरित्या दरपत्रके मागविण्यात आली नसल्यामुळे वा प्राप्त झालेली नसल्यामुळे आढळून आली नाहीत अथवा काही ठिकाणी फक्त दोनच दरपत्रके नस्तीत दिसून आली. कमी दरांबाबतचा तुलनात्मक तक्ता व त्यास मंजुरी प्रदान केलेली असल्याचेसुद्धा आढळून आले नाही. तसेच कमी दरे असलेल्या फर्मला वाहन दुरुस्त करण्याबाबत कार्यादेश दिलेला नाही. महा. शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखरा 1088/(2512)/ उद्योग-6, दिनांक 2 जाने.1992 मधील परि. 8.3( इ) मध्ये नमुदनुसार रु. 1000/- चे वरील दुरुस्तीकामास किमान 3 दरपत्रके प्राप्त करणे आवश्यक आहे. त्याशिवाय स्पर्धात्मक दरनिश्चिती करणे शक्य नाही. त्यामुळे सदर कामात म.न.पा. ला किमान दरांचा लाभ झाला नाही. परिणामी म.न.पा. निधीची हानी झाली आहे. त्याचप्रमाणे ग्यारेजधारकाने ज्या दिनांकास वाहन दुरुस्तीकामाचे देयक प्रदानार्थ सादर केले त्याच दिनांकास दरपत्रके प्राप्त झाल्याचे दिसून आले. म्हणजेच दरपत्रके कार्यपद्धतीचा भाग म्हणून आवश्यक असल्याने नस्तीत जोडल्याचे स्पष्ट होते.

3) महा. आकस्मिक खर्च नियम 1965 मधील नियम 44 नुसार वाहन दुरुस्तीनंतर प्रदानार्थ सादर केलेल्या देयकामागे कार्यशाळाप्रमुखाने वाहन दुरुस्तीचे काम समाधानकारक व योग्यरीत्या झालेले असून त्याबाबतची नोंद वाहनाचे साठापुस्तक/इतिहासपत्रकातील पृष्ठ क्रमांक – वर घेण्यात आली असण्याचे प्रमाणपत्र नमूद करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्राशिवाय दुरुस्ती कामाकरिता प्रदान केलेली रक्कम नियमबाह्य ठरते.

उपरोक्त अनियमिततेबाबत अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

सदर आक्षेप अर्ध समास पत्र क्र. 94 दि.25/08/2015 नुसार कार्यशाळा विभागास खुलासा सादर करण्याबाबत लेखी कळविण्यात आले असता लेखापरीक्षण पथकाने मागितलेली माहितीचे अनुषंगाने संबंधित मुद्द्यांबाबत सदर विभागाने समर्पक व परिपूर्ण अनुपालन सादर केले.नसल्याने सदर आक्षेप घेण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| आक्षेपाधीन रक्कम | 440499 |
| गुंतलेली रक्कम | 440499 |

DATPVKM6101 (Ref No : 70, Hmm No : 94)

## *79 मोजमाप पुस्तकातील अनियमितता.*

-

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष :00 मनपा/राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 125400596.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 125400596.00/-



Scanned by CamScanner

**महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या मोजमाप पुस्तकातील नोंदीची पडताळणी केली असता अनेक नियमबाह्य बाबी निदर्शनास आलेल्या आहेत सदरील मोजमाप पुस्तकातील नोंदी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली नुसार घेण्यात आल्या नसल्याचे दिसून आले.**

सन 2012-2013 चे लेखापरीक्षणास सादर केलेल्या मोजमाप पुस्तकात खालील बाबी नमूद नसून नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही कार्यवाही सुद्धा करून अद्यावत मोजमाप पुस्तके ठेवण्यात आले नसल्याचे दिसून आले.सदर मोजमाप पुस्तकात महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील वेगवेगळ्या नियमानुसार पुढील प्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

1. विकास कामाच्या मोजमापाच्या नोंदी कनिष्ठ अभियंता यांनी घेतलेल्या आहेत परंतु सदर नोंदी व कामाची तपासणी केल्याबाबत कार्यकारी अभियंता व मा.आयुक्तांच्या स्वाक्षरी नाहीत.

2. बांधकामाचे देयक मुल्यांकना नुसार संमत झाल्यानंतर मोजमापे व मूल्यांकनाच्या नोंदीवर लाल शाईने काट मारण्यात आलेला नाही.

3. मोजमाप पुस्तकामध्ये खालील संदर्भ नमूद केलेला नाही.

 अ. कामाचे संपूर्ण नाव व स्थळ दर्शक माहिती.

 ब. कामाचे तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी आदेशाचा संदर्भ.

 क. कामाचे लेखाशीर्ष

 ड. कामकरणारे कंत्राटदार व करारनामा संदर्भ

 इ. काम सुरु केल्याची तारीख / कार्यारंभ आदेशाचा संदर्भ

4. काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रावर आणि मोजमापाच्या गोषवाऱ्यावर मा.आयुक्त ह्यांनी काम पूर्ण झाल्याचे खात्री केल्याबाबत स्वाक्षरी केलेली नाही.

5. गौण खनिज, सिमेंट,स्टील इत्यादीबाबतचे परिमाणाचे गोषवारे काढण्यात आलेले नाहीत.

6. मोजमापे व मुल्यांकन मराठीमधे नोंदविण्यात आलेली नाहीत.

7. काम पूर्ण झाल्याची तारीख

वरील प्रमाणे नोंदी मोजमाप पुस्तकात आढळून आल्या नसल्याने दुबार प्रदानाची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सन 2012-2013 मधील पूर्ण/ अपूर्ण बांधकामाबाबतच्या सर्व मोजमाप पुस्तकातील नोंदी अद्यावत करणे आवश्यक असल्याने बांधकामावर झालेला सन 2012-2013 मधील संपूर्ण खर्च रुपये.125400596 आक्षेपीत ठेवण्यात येत आहे.

DATBNKM6401 (Ref No . 83, Hmm No : 108)



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

## अनुपालन व पोहोच

या लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांवरील अनुपालन अहवाल, महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा आधिनियम कलम 10(1) मधील तरतुदींनुसार, हा अहवाल प्राप्त झाल्यापासुन चार महिन्यांचे आत, आयुक्त, महानगरपालिका चंद्रपुर यांच्या स्वाक्षरीने पाठवावे. तत्पुर्वी हा लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक नमुद करुन पोहोच पाठवावी.

उपसंचालक,(म.न.पा.ले.प)
स्थानिक निधी लेखापरिक्षा
उपविभाग क्रं.3 औरंगाबाद.

जा.क्रं.स्था.18/ब/चंद्रपुर/ले.प.अ./2012-13/ 733 दिंनाक 22 DEC 2015

प्रत अग्रेषित -

1) मा.प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा )दोन,नागपूर.
2) मा.प्रधान सचिव-2,नगरविकास विभाग,मंत्रालय,मुंबई 32.
3) मा.संचालक,स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय,कोकण भवन,नवी मुंबई.
4) मा.विभागीय आयुक्त,नागपुर विभाग,नागपुर.
5) मा.सहसंचालक,स्थानिक निधी लेखापरिक्षा (म.न.पा.ले.प.),रायगड भवन,नवी मुंबई.
6) पुनर्विलोकन शाखा,रायगड भवन, नवी मुंबई.
7) कार्यालयीन प्रत.

उपसंचालक,(म.न.पा.ले.प)
स्थानिक निधी लेखापरिक्षा
उपविभाग क्रं.3 औरंगाबाद.



Scanned by CamScanner

## लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र

| नाव | परिच्छेद क्रमांक |
|---|---|
| बाबाराव नथ्थूजी कालपांडे, लेखापरिक्षा अधिकारी | 2, 3, 12, 13, 14, 17, 18, 19, 20, 21, 22, 24, 25, 26, 30, 31, 32, 36, 37, 38, 39, 40, 41, 42, 43, 50, 51, 52, 62, 63, 65, 68, 79 |
| प्रकाश वसंतराव कुंबलवार , सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 1, 8, 11, 15, 16, 35, 55, 56, 57, 58, 61, 64, 74, 75, 76, 77, 78 |
| सूमेध संपतराव कांबळे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 4, 5, 6, 7, 9, 10, 23, 27, 33, 44, 46, 47, 48, 49, 59, 60, 69, 70, 71, 72, 73 |
| शैलेंद्र प्रभाकर पुरी, कनिष्ठ लेखापरिक्षक | 28, 29, 34, 45, 53, 54, 66, 67 |



Scanned by CamScanner

चंद्रपुर · महानगरपालिका

## विवरणपत्रे व जोडपत्रे

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 32500.00 | 26000.00 | ---- | ---- | 58500.00 |
| 2 | 5 | 90528.00 | 9141.00 | ---- | ---- | 99669.00 |
| 3 | 6 | ---- | 410193.00 | ---- | ---- | 410193.00 |
| 4 | 7 | 1803822.00 | ---- | ---- | ---- | 1803822.00 |
| 5 | 8 | 275074.00 | ---- | ---- | ---- | 275074.00 |
| 6 | 9 | ---- | 71788.00 | ---- | ---- | 98706.00 |
| 7 | 12 | 89450.00 | 8850.00 | ---- | ---- | 98000.00 |
| 8 | 13 | 500544.00 | 20856.00 | ---- | ---- | 521400.00 |
| 9 | 14 | ---- | 34407695.00 | ---- | ---- | 34407695.00 |
| 10 | 15 | 12221283.00 | ---- | ---- | ---- | 12221283.00 |
| 11 | 16 | 8371168.00 | ---- | ---- | ---- | 8371168.00 |
| 12 | 17 | ---- | 50249.00 | ---- | ---- | 50249.00 |
| 13 | 18 | ---- | 2009921.00 | ---- | ---- | 2009921.00 |
| 14 | 19 | ---- | 141689.00 | ---- | ---- | 141689.00 |
| 15 | 20 | ---- | 247922.00 | ---- | ---- | 247922.00 |
| 16 | 21 | ---- | 219991.00 | ---- | ---- | 219991.00 |
| 17 | 22 | ---- | 511195.00 | ---- | ---- | 511195.00 |
| 18 | 23 | ---- | 4886.00 | ---- | ---- | 8555.00 |
| 19 | 24 | 14632545.00 | ---- | ---- | ---- | 14632545.00 |
| 20 | 25 | 462383.00 | ---- | ---- | ---- | 462383.00 |
| 21 | 26 | ---- | 760775.00 | ---- | ---- | 760775.00 |
| 22 | 27 | 239400.00 | 120240.00 | ---- | ---- | 239400.00 |
| 23 | 28 | ---- | 75100.00 | ---- | ---- | 75100.00 |
| 24 | 29 | 7500.00 | 7500.00 | ---- | ---- | 150000.00 |
| 25 | 30 | 26387025.00 | ---- | ---- | ---- | 263873025.00 |
| 26 | 31 | 1947000.00 | ---- | ---- | ---- | 1947000.00 |
| 27 | 32 | 9430.00 | ---- | ---- | ---- | 9430.00 |
| 28 | 33 | 7101.00 | 13519.00 | ---- | ---- | 22165.00 |
| 29 | 34 | ---- | 279058.00 | ---- | ---- | 279058.00 |
| 30 | 35 | 170540.00 | ---- | ---- | ---- | 170540.00 |
| 31 | 36 | 16368209.00 | ---- | ---- | ---- | 16368209.00 |



Scanned by CamScanner

चंद्रपुर महानगरपालिका

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 32 | 37 | 45070276.00 | ---- | ---- | ---- | 45070276.00 |
| 33 | 38 | 536891.00 | 6337.00 | ---- | ---- | 543228.00 |
| 34 | 39 | 1795000.00 | ---- | ---- | ---- | 1795000.00 |
| 35 | 40 | 338993.00 | 3600.00 | ---- | ---- | 342593.00 |
| 36 | 41 | ---- | 253838.00 | ---- | ---- | 253838.00 |
| 37 | 42 | 606300.00 | ---- | ---- | ---- | 606300.00 |
| 38 | 43 | 3233284.00 | ---- | ---- | ---- | 3233284.00 |
| 39 | 44 | 948048176.00 | ---- | ---- | ---- | 948048176.00 |
| 40 | 45 | 97837686.00 | ---- | ---- | ---- | 97837686.00 |
| 41 | 55 | 146820223.00 | ---- | ---- | ---- | 146820223.00 |
| 42 | 56 | 146820223.00 | ---- | ---- | ---- | 146820223.00 |
| 43 | 58 | 430172.00 | ---- | ---- | ---- | 430172.00 |
| 44 | 60 | 25496.00 | ---- | ---- | ---- | 25496.00 |
| 45 | 64 | 119473.00 | ---- | ---- | ---- | 119473.00 |
| 46 | 66 | 265591.00 | 655.00 | ---- | ---- | 278476.00 |
| 47 | 68 | 200000.00 | ---- | ---- | ---- | 200000.00 |
| 48 | 69 | 864000.00 | ---- | ---- | ---- | 864000.00 |
| 49 | 71 | 40000.00 | ---- | ---- | ---- | 40000.00 |
| 50 | 72 | 16000.00 | ---- | ---- | ---- | 16000.00 |
| 51 | 73 | 678650.00 | 7500.00 | ---- | ---- | 866457.00 |
| 52 | 76 | 2018561.00 | ---- | ---- | ---- | 2018561.00 |
| 53 | 77 | 419973.00 | ---- | ---- | ---- | 419973.00 |
| 54 | 78 | 440499.00 | ---- | ---- | ---- | 440499.00 |
| 55 | 79 | 125400596.00 | ---- | ---- | ---- | 125400596.00 |
| | | 1805641565 | 39668498 | | | |



Scanned by CamScanner

चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर

विवरणपत्र क्र. 1 (अ)

सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे चंद्रपूर महानगरपालिका निधीचे जमाचा लेखाशीर्षनिहाय विवरणपत्र

आकडे रु. (लाखात)

| अ.क्र. | लेखाशीर्ष | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे सुधारित अंदाज | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे प्रत्यक्ष आकडा | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | महसुली | 345532000 | 256614916 | 0 | 88917084 |
| 2 | भांडवली | 847172000 | 702600701 | 0 | 144571299 |
| 3 | इतर | 263500000 | 100368224 | 0 | 163131776 |
| | एकूण | 1456204000 | 1059583841 | 0 | 396620159 |

Scanned by CamScanner

## चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर

### विवरणपत्र क्र. 1 (ब)

### सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे चंद्रपूर महानगरपालिका निधीचे खर्चाचा लेखाशीर्षनि विवरणपत्र

आकडे रु. (लाखात)

| अ.क्र. | लेखाशीर्ष | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे सुधारित अंदाज | लेखापरीक्षण वित्तीय वर्षाचे प्रत्यक्ष आकडा | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | महसुली | 590456000 | 501237109 | 0 | 89218891 |
| 2 | भांडवली | 508800000 | 213597158 | 0 | 295202842 |
| 3 | इतर | 322000000 | 257805686 | 0 | 64194314 |
| | एकूण खर्च | 1421256000 | 972639953 | 0 | 448616047 |

Scanned by CamScanner

चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर

विवरणपत्र क्र. 1 (क)

महानगरपालिकेचे दिनांक 31/03/2013 अखेर मत्ता व दायित्व विवरणपत्र

आकडे रक्कम रु.(लाखात)

| अ.क्र. | मत्ता | रक्कम रु. | अ.क्र. | दायित्व | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शिल्लक रक्कम<br>(अ) हातातील- 3243625<br>(ब) बँकेतील- 39126714 | 42370339 | 1 | ठेवी (नगरपरिषदकडे ठेवलेल्या) अनामत व सुरक्षा ठेव | 21012176 |
| 2 | गुतंवणूक (एफडीआर) | 282644805 | 2 | कर्ज (परतफेड न केलेले) | 0 |
| 3 | वसूल करावयाच्या अग्रिम रकमा<br>इतर अग्रिम<br>सन अग्रिम | 164200 | 3 | प्रलंबित देयके<br>1.कर्मचाऱ्याचे वेतन<br>2.पेन्शन<br>3.उपदान/पेन्शन विक्री<br>4.रजा रोखीकरण<br>5.कपातीच्या रकमा | 0 |
| 4 | वसूल न झालेली कराची रक्कम- थकीत चालू | 28451055 | 4 | ठेकेदार/पुरवठादारांची देयके | 0 |
| 5 | मागणी प्रलंबित (भाडे,फी व शुल्क) थकीत चालू | 2263785 | 5 | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | 305756000 |
| 6 | शासनाकडून न.प.ला देय असलेली अनुदानाची रक्कम | 60003127 | 6 | एम.एस.ई.बी.देयक | 0 |
| 7 | खास निधी<br>(1) सेवानिवृत्ती निधी-647837<br>(2) वेतन राखीव निधी-3340434 | 12057202 | 7 | खर्च न केलेले अनुदान | 403901520 |

Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (3) रस्ता निधी-2249343<br>(4) भविष्य निर्वाह निधी-4964901<br>(5) वृक्ष निधी-854687 | | | | |
| | | 427954513 | 8 | कर्ज व आगाऊ रकमा | 0 |
| 9 | | | 9 | खास निधी<br>1.वेतन राखीव निधी सेव्हिंग गुंतवणूक | 25913693 |
| | | | | 2.भविष्य निर्वाह निधी | 4964901 |
| | | | | 3.वृक्ष निधी | 854687 |
| | एकूण | 427954513 | | एकूण | 762402977 |

टिप:-उपरोक्त दायित्व अनुक्रमांक 05 मध्ये नमूद आयुर्विमा कर्जाची रक्कम रु.3057.56 लक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चंद्रपूर यांनी घेतलेले असून चंसहमनपा पाणी पुरवठा योजना खाजगी करणानंतर संबधितकर्जाची फाईल मनपाला हस्तांतरित करण्यात आलेली आहे व शासन स्तरावर मनपाला प्राप्त विविध अनुदानातून कर्जाचे समायोजन करण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

# चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर

## विवरणपत्र क्र. 2

## सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे शासकीय अनुदानाचे जमा व खर्चाचे विवरणपत्र

आकडे रक्कम रु. (लाखात)

| अ. क्र. | अनुदानाचे नाव | मंजूर करणारे प्राधिकारी | राज्य लेख्यातील प्रधानशीर्ष | दि. 1/4/2012 रोजी शिल्लक अनुदान रक्कम रु. | सन 2012-2013 मधील प्राप्त अनुदान रक्कम | एकूण उपलब्ध अनुदान रक्कम रु. | सन 2012-2013 मध्ये केलेला खर्च रु. | शिल्लक अनुदान रु. | सन 2013-2014 मध्ये खर्च करण्यास अनुमती असलेली अनुदानाची रक्कम रु. | शासनास परत करावयाची अनुदानाची रक्कम रु. | उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले किंवा नाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | रस्ता | नगर विकास विभाग | 3054002 | 852083 | 30191820 | 31043903 | 28922669 | 2121234 | - | - | होय | - |
| 2 | तातडीची पा.पुरवठा | पाणी पुरवठा विभाग | 22450093 | 928751 | 2482000 | - | 2482000 | 928751 | - | - | होय | - |
